समतावादी

# मुक्त संवाद

नववर्षाभिनंदन

एक समृद्ध वाचन यात्रा

पत्रिका

जानेवारी २०२६ वर्ष तिसरे : अंक ५



जनेप प्राधिकरण
JNPA

**INDIA'S BEST PERFORMING PORT**

**२० तासांचा सर्वोत्तम**
टर्न अराउंड टाईम

भारतातील
पहिले बंदर-
आधारित
**विशेष आर्थिक**
**क्षेत्र**

जगातील
**२६ वे**
**सर्वात मोठे**
कंटेनर बंदर




**१००% लँडलॉर्ड**
असलेले
भारतातील पहिले
मेजर पोर्ट

**वाढवण बंदर**
जागतिक दर्जाचे व देशातील सर्वात मोठे बंदर
विकसित होत आहे

# जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण

## भरभराटीचे क्षण एकत्रित साजरे करण्याचा आनंद

JNPORT | JNPort | JNPA | JNPAPORT | JN Port

अधिक माहितीकरिता JNPA हेल्पलाईन नंबर १८०० २२८ २८२ वर कॉल करा, वेबसाईट : www.jnport.gov.in

# अंतरंग


✶ मराठी साहित्या, तू कुठे जाशील?
– आमंत्रित संपादकीय; राजेंद्र साठे २

✶ मलय पर्वतावरून लंकेचा वेध...
– राजा पटवर्धन ५

✶ लोकांचं संविधान!
– श्रीरंजन आवटे ११

✶ 'संघी–राम' आणि 'राजाराम'!
– डॉ. विवेक कोरडे १५

✶ जागतिक राजकीय अर्थव्यवस्था आणि आपलं रोजचं जगणं
– हितेश पोतदार १९

✶ तुम्हांस काय हवे खासगीपणा की सुरक्षितता?
– रवि आमले २८

✶ महात्मा गांधी मार्गावरचा इनर मंगोलिया
– गजानन जोशी ३२

✶ नेक्सपेरिया म्हणजेच, गुजरा हुआ जमाना
– डॉ. मोहन द्रविड ३७

✶ प्रेमाच्या शहाणपणाचा शोध
– प्रा.श्रीनिवास हेमाडे ४२

✶ वैशेषिक दर्शन : नास्तिकतेचा भास
– जगदीश काबरे ४७

✶ ...और बस्ती ना हो, यह दिल्ली है
– आशय गुणे ५२

✶ लिओनार्दो दा विन्ची नावाचा चित्रवैज्ञानिक
– डॉ. आनंद जोशी ५७

✶ सत्य: श्रमिकांचे काव्यबद्ध भावविश्व
– डॉ. नेहा सावंत ६३

✶ अपने मतलबवाला दर्दी सिनेपत्रकार : भाऊ पाध्ये
– प्रसाद कुमठेकर ६९

✶ फ्रीडम: स्वातंत्र्याचा चरितनामा
– सुलक्षणा महाजन ७४

✶ गाणं आत सुरू आहे...
– गणेश मनोहर कुलकर्णी ८१

✶ सहानुभावी नजरेचा कथात्म नजराणा
– नीतिन वैद्य ८६

✶ आत आणि बाहेर
मूळ कथा : वनफूल; अनुवाद : सुमती जोशी ९०

✶ आयुर्वेद – विज्ञान की छद्मविज्ञान
– डॉ. श्रीराम सावरीकर ९३






**प्रकाशक, संपादक**
डॉ. विवेक कोरडे

**कार्यकारी संपादक**
शेखर देशमुख

**सल्लागार संपादक मंडळ**
विजय प्र. दिवाण, सुलक्षणा महाजन
डॉ. शैलजा बरुरे, लोकेश शेवडे
सुजय शास्त्री, सायली परांजपे

**संपादकीय साहाय्य**
सुमेधा कुवळेकर

**व्यवस्थापन सल्लागार**
विकास नाईक

**शीर्षनाम आरेखन**
विजय नार्वेकर

**मुखपृष्ठ छायाचित्र**
ख्रिस्तपूर्व ३४०–३३० काळातला
ग्रीसच्या अँटिकिथिरा बेटावरच्या
समुद्रतळाशी सापडलेला अँटिकिथिरा
इफिबीचा पुतळा

**अंकातील छायाचित्रे**
इंटरनेटवरून साभार

**अंक मांडणी, सजावट**
वैभव केसरकर (८५५१८५०४६२)

**व्यवस्थापक**
चंद्रकांत माळगवे (९६१९८२३६७२)

**विनामूल्य वितरणासाठी**
'समतावादी मुक्त-संवाद पत्रिका' हे मासिक मालक विवेक दत्तात्रय कोरडे यांच्या करिता, प्रकाशक विवेक दत्तात्रय कोरडे यांनी जागृती प्रिंटर्स, त्रिमूर्ती ९१, घारपुरे पथ, गिरगाव, मुंबई ४००००४ येथे छापून रूम नं. ४६, पहिला मजला, आंबेडकर सदन, सखाराम बालाजी पवार मार्ग, करीरोड नाका, डिलाइल रोड, मुंबई ४०००१३ येथून प्रसिद्ध केले.
संपादक : विवेक दत्तात्रय कोरडे

'Samatawadi MuktSanvad Patrika' Monthly Publication owned by Vivek Dattatrey Korde Printed at Jagruti Printers,Trimurti 91, Gharpure Path, Giragaon Mumbai 400004 and Published at Room No. 46, First Floor, SakharamBalaji Pawar Marg, Currey Road Naka, Delisle Road, Mumbai 400013
Editor : Vivek Dattatrey Korde


(अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी, प्रतिक्रियांशी अथवा विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)


# मराठी साहित्या, तू कुठे जाशील?



आमंत्रित संपादकीय

राजेंद्र साठे

अ.भा. मराठी साहित्य संमेलन विशेष



**आकडे फेकायचे आणि उत्सव साजरे करायचे, अशा मायावी वातावरणात ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन १ ते ४ जानेवारी दरम्यान सातारा इथे भरत आहे. आकड्यांतून येणारा उत्साह इथेही जाणवणार आहेच, पुढच्या वर्षी तो बहुदा टिपेलाही पोहोचणार आहे, परंतु राजकारणाने दाखवलेल्या मार्गावरून चाललेल्या समाजाला किमान स्पर्श करण्याइतपत ताकद आणि क्षमता मराठी साहित्यिकांत आणि ते प्रसवत असलेल्या साहित्यांत उरलीनुरली आहे का, साहित्याने आपले दिवेपण गमावले आहे का, हे प्रश्न या क्षणी कळीचे ठरावेत, संमेलनात सामील महानुभावांनी जाहीरपणे नाही जमल्यास, निदान आपापसात तरी एकमेकांना हे प्रश्न विचारून पाहावेत. तेवढेच आत्मपरीक्षणाचे–आत्मसंवादाचे पुण्य पदरात पडावे...**

**(आनंद यादव यांच्या मराठी साहित्य, समाज आणि संस्कृती या पुस्तकाच्या मुखपृष्ठाची संपादित प्रतिमा.)**


‘‘या सबंध लेखात पुस्तकांना निव्वळ पुस्तके म्हणून अस्तित्व नसते हे आम्ही समजून चाललो आहोत. चार कविता, दोन गोष्टी, एखादी कादंबरी कोणीही प्रामाणिक लेखक चांगली लिहील. परंतु, संबंध साहित्याच्या निर्मितीचा साकल्याने विचार करणे आवश्यक आहे. त्यामुळे पुस्तके ज्या व्यक्तिमत्वाची निर्मिती असते त्या (लेखकाच्या) व्यक्तिमत्वावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. व्यक्तिमत्वाला पोखरणारा हा धोका म्हणजे भौतिक विकासाचा होय. पैसा, नोकरी व प्रतिष्ठेमुळे साध्य होणाऱ्या इतर भौतिक सवलती इत्यादी प्रचंड धोक्यापायी साहित्यिक व बुद्धिजीवी वर्गही साहित्याचे अवतारकार्यच विसरत चालला आहे.’’

– हल्ली लेखकाचा लेखकराव होतो तो का? या लेखातून... (टीकास्वयंवर)

भालचंद्र नेमाडे यांनी १९६८ साली लिहिलेला व गाजलेला हा लेख आता कित्येक शतके जुना वाटावा अशी अवस्था आहे. काही नवतरुण वाचकांना तर, या लेखात कल्पिलेले, ‘लिहिण्याच्या अवस्थेतला खास आदिलेखक व वाचण्याच्या स्थितीत असलेला अस्सल वाचक’, हे कंतारासारख्या सिनेमांचे प्रेरणास्थान वगैरे आहेत की काय, असा संभ्रम व्हावा. अर्थात, तो लिहिला तेव्हाही नेमाडे यांनी आदिलेखक व अस्सल वाचक हे अभयारण्यातल्या प्राण्यांइतकेच कसेबसे वाचून राहिलेले जीव आहेत, असा निष्कर्ष काढला होता व शेवटी ‘प्रीझर्व्ह वाइल्ड लाइफ’ असा संदेश दिला होता. ते प्राणिसंरक्षण काही घडलेले नाही.

मधल्या काळात ही आदिलेखकाची प्रतिमा घडवणारे खुद्द नेमाडे यांचेही खूप अवस्थांतर झाले आहे. सध्याचा काळ सनातनी संस्कृतीच्या ऐन पुनरुज्जीवनाचा आहे. तरीही इथे, कंदमुळे किंवा निव्वळ हवेवरच जगणारा जणू कोणी ऋषीच की काय अशा या (जीवन पणाला लावून लेखन करणाऱ्या) आदिलेखकाची कल्पना थारा मिळवू शकलेली नाही हेदेखील, तसे स्वाभाविकच असले तरी, नोंदवण्यासारखे आहे.

मुद्दा असा की, १९६८ मध्ये जवळपास कल्पनामात्रच असलेल्या आणि पुढची कित्येक वर्षे अनेकांना धाक वाटणाऱ्या या




*नेमाडेंना मराठीतला आदिलेखक शोधावासा वाटला, हेच एक आधुनिक साहित्यावरचे टोकदार भाष्य ठरावे...*

आदिलेखक नावाच्या इसमाचा मराठी साहित्याच्या प्रांतामध्ये आज आस किंवा भासही उरलेला नाही. संपत चाललेल्या २०२५मध्ये बसून ही नोंद आपण करीत असलो, तरी तो फारा वर्षांपूर्वीच संपून गेला असावा.

**अवतार कोण, त्यांचे कार्य काय?**

नेमाडे यांनी साहित्याचे अवतारकार्य असाही शब्दप्रयोग केला आहे. म्हणजेच, राम-कृष्ण इत्यादिकांप्रमाणे साहित्याकडे मनुष्यधर्माची ग्लानी घालवण्याइतकी शक्ती गृहीत आहे. त्यावरून १९६० च्या दशकात साहित्य ही किती म्हणून किमती वस्तू असावी व आज ५७ वर्षांनी तिचा किती म्हणून शक्तिपात झाला आहे, हे लक्षात येते.

अर्थात, सहित्याला तेव्हा खूप उंच जागा असली तरीही नेमाडे यांनी तेव्हादेखील आदिलेखकांच्या उदाहरणस्वरुप घेतलेल्या नावांमध्ये हयात इसम कोणीही नव्हता हेही नोंदायला हवे. यामध्ये मराठी प्रांतातील तुकाराम हाच शेवटचा दिसतो. एकूण जगाचा वगैरे विचार करू जाता, त्यातल्या त्यात अलिकडचा डोस्टोव्हस्कीच दिसतो. आदिलेखक तर सोडाच, पण साधे लेखक व्हायला निघालो तरी, पीएच.डी.चे प्रबंध वाचावे लागणे, प्राध्यापक म्हणून तयारी करून शिकवणे, विद्यापीठातल्या राजकारणात अडकणे, दहिसरमध्ये फ्लॅट घेणे इत्यादी चकव्यांमध्ये आपण कसे अडकत गेलो, हे खुद्द नेमाडे यांनी अनेकदा सांगितले आहे.

यातले आदिलेखक हे प्रकरण बाजूला ठेवू. पण साहित्य, मग ते कसेही असो, समाजाच्या धारणेमध्ये फार मोक्याची भूमिका बजावू शकते, ही तेव्हाची श्रद्धा त्यावेळपर्यंत तरी सार्वत्रिक होती, हे या लेखावरून दिसते. मृत्यूंजय, छावा, ययाती, माणदेशी माणसं, व्यक्ती आणि वल्ली, काजळमाया, चक्र, माहीमची खाडी, गोलपिठा व्हाया कोसला येणेप्रमाणे वाचक कोणत्याही इयत्तेत असू शकतो. पण ज्याच्या त्याच्या आंतरिक संवेदनेसाठी ते ते साहित्यच समई, लामणदिवा, मशाल किंवा दीपगृहातला दिवा इत्यादी असू शकते यावर खांडेकरवादी, मौज स्कूलवाले ते नेमाडपंथी यांचे एकमत होते असे दिसते.

**आदिलेखकांचा दुष्काळ की पर्यावरणाचा ऱ्हास**

आज साहित्याने हे दिवेपण गमावलेले दिसते. 'चाळीस दिवसात चाळीस किलो वजन कमी करा', 'समाजात कसे वावरावे' किंवा 'शेवग्याची लागवड' अशा पुस्तकांनी काही लोकांचे आयुष्य बदलून जातही असेल कदाचित. किंवा अच्युत गोडबोले यांचे 'मुसाफिर' वा शरद बाविस्करांचे 'भुरा' ही अनेकांना प्रेरणादायी वाटली असतील. पण, साहित्य म्हणून जे काही असते त्याविषयी, आज, वरच्या क्रमांकाचा आस्थेवाईकपणा पूर्वीसारखा उरलेला आहे, असे वाटत नाही.

यासाठी वेळोवेळी इंटरनेट, टीव्ही, सिनेमा, ओटीटी, मोबाइल, यूट्यूब इत्यादींना सराईत दाखलेबाज म्हणून पकडून आणता येते. वाचनाचे, लेखनाचे, साहित्य-प्रेमाचे मारेकरी हेच आहेत, असा सोपा तर्क केला जातो. अडचण अशी की, खूप काही बदलले आहे हे कळते. पण नेमके काय व कशामुळे याबाबत केवळ तर्कच करावे लागतात. यातले काही तर्क असे- बहुदा लोकांना जगण्यासाठी साहित्य निरुपयोगी वाटू लागले असावे, किंवा त्यांची श्रद्धाच उडाली असावी, किंवा खरेदी आणि विक्रीच्या कसबांपलीकडे आयुष्यात त्यांना आणखी वेगळ्या कशाची गरज उरलेली नसावी, किंवा 'जरीला'मधल्या त्या विद्यार्थ्याप्रमाणे 'हल्ली मी नुसता असतो', असे म्हणणाऱ्यांचीच बहुसंख्या झालेली असावी. किंवा प्रत्यक्ष जगण्याहून अधिक मोठे विधान करण्याची शक्ती साहित्यात उरलेली नसावी. इथवर आल्यावर एक पेच असाही पडतो की, मराठीत व एकूणच सर्वत्र आदिलेखकांचा जो दुष्काळ पडला आहे, त्यामुळे साहित्याचे संस्कृतीकारणातील उंच स्थान व ती वैशिष्ट्यपूर्ण शक्ती हरवली आहे की, साहित्याची शक्ती कमी झाल्यामुळे आदिलेखक निर्माण होण्याचे पर्यावरण संपून गेले आहे? या हरेक तर्काचा शोध घेऊन याच्या शेवटापर्यंत जाण्याची सोपी युक्ती दिसत नाही. त्यामुळे त्याची जी काय कठीण युक्ती असेल ती आता शोधायची वेळ आलेली आहे.

मराठी साहित्यात १९६० या सनाला फारच महत्त्व आहे. त्यावर्षी मराठी भाषेचे स्वतंत्र राज्य अखेर स्थापन झाले, हे तर एक कारण आहेच. त्यातूनच नंतर साहित्य संस्कृती मंडळ किंवा तत्सम उपक्रम सुरू झाले. साहित्य पुरस्कारही तेव्हाचेच असावेत. पण त्याहूनही एक महत्त्वाचे कारण आहे. मराठी साहित्यात साठोत्तरी नावाच्या एका पंथाचा मोठा दबदबा आहे. त्यांच्यामुळे साहित्याचे साठोत्तरी व साठपूर्ववाले असे सरळ विभाग पडतात.

नेमकी संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाच्या वादळानंतर १९६० च्या बंडाची प्रसिद्ध वावटळ उठल्याने ही जणू त्या वादळाचाच परिणाम असावा असा समज झाला. खरे तर ही मारामारी कलावादी, रंजनवादी इत्यादी साहित्यातल्या प्रस्थापितांपुरती होती. पण स्वातंत्र्य, काँग्रेस इत्यादींची झिलई उडू लागणे आणि वाढत्या नागरी बकालीमध्ये परात्मता फोफावणे यांचे, मर्ढेकर, गाडगीळ (किडलेली माणसे), भाऊ पाध्ये, नेमाडे अशा अनेकांच्या लिखाणाशी असे काही जुळून गेले, की हे साठोत्तरीवाले गांधी, नेहरु, लेनिन, माओ यांनाही छेद देऊन जाणारी कोणती तरी नवी नैतिकता जन्माला घालत आहेत असा समज बळावला. यापाठोपाठ आलेले दलित साहित्य, पँथरचे आंदोलन इत्यादींमुळे तर हा संबंध आणखी घट्ट झाला. (वात्रट शक्यता अशी की, चीनशी आपले युद्ध झाले नसते, तर माओच्या शंभर फुले उमलू द्यावाल्या सांस्कृतिक क्रांतीशी आपला संबंध जुळला असता.)

या धामधुमीत एक धारणा बळकट होत गेली की, जुना आदर्शवाद ही लबाड, भंपक, टाकाऊ वस्तू आहे. बाकी काही नाही तरी तो पहिल्यांदा टाकायला हवा. हे सर्व साठच्या बंडखोर लेखकांमुळे झाले असे नव्हे. त्यांची तेवढी ताकद त्याहीवेळी नव्हती. पण समाजाची तशी धारणा घडत असताना त्यांनी आपापली अक्षरे त्यात टाकली. तिथपासून नंतर देशासोबत महाराष्ट्रानेही १९७५, ८४, ८९, ९२, २००१, २०१४, २२, २४ आणि २०२५ असा प्रवास केला. साठोत्तरी किंवा मराठी साहित्याच्या एक-दोन मोठ्या भानगडी झाल्या त्या इथेच.

**उलट्या पावलाची भुते**

१९८०, ९०, २००० या काळात बऱ्याच खळबळी माजल्या, तरी इथली लोकशाहीची डोलकाठी आणि तिच्यावर लटकावलेले समता वगैरेंचे झेंडे हे ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात काशीयात्रेला निघालेल्यांच्या काठीवरच्या सोन्याइतकेच निश्चित होते. त्यांना पाडू पाहणाऱ्या ठगांचा बंदोबस्त झालेला आहे, अशा समजात सर्वजण होते. प्रत्यक्षात फार झपाट्याने डोलकाठ्या खेचल्या गेल्या आणि ठग आणि पेंढाऱ्यांची निशाणे त्यावर चढत गेली. लोकशाही व समाजवादाच्या दिशेने निघालेल्यांची पावले भुताची ठरली व उलटी पावलेवाल्यांचे बहुमत आवाजी मतदानाने संमत झाले.

१९६०मध्ये आदर्शवादाचा नॉशिया नेमका पकडणाऱ्या साठोत्तरी व बाकीच्या साहित्याला या बदलाने मात्र चकवा दिला. (की ते या भानगडीत जायला घाबरले?) महानुभाव परंपरा, वारकरी यांच्याबद्दल कळवळ्याने लिहिणाऱ्यांच्या चिमटीतून वारकरी ते धारकरी हा प्रवास निसटून गेला. शिवाजी, तुकाराम, फुले, शाहू, आंबेडकर, गांधीप्रणित माणुसकी थेट विकून टाकण्याच्या उद्योगाचा डाव्या चळवळींना पत्ता लागला नाही. पण त्याचा थांग लावण्याचा प्रयत्न साहित्यात अजून सुरुदेखील झालेला दिसत नाही.

आज गोहत्याबंदीच्या नावाने खून पाडणाऱ्यांचे किंवा मुस्लिम बायकांवर बलात्कार करणाऱ्यांचे सत्कार होतात, वेदमंत्रांची घोकंपट्टी करून दाखवणारे किंवा राम, राम असे लिहून वह्या भरून टाकणारे नवीन राष्ट्र घडवत आहेत, असे मानले जाते किंवा गुढीपाडव्याला मोटारसायकलींवरून शोभायात्रा काढणाऱ्या महिला म्हणजेच स्त्रीसमानता असे मानले जाते. क्रूरपणा, निर्बुद्धपणा आणि उन्माद अद्भुत पातळीला जाऊन पोचलेल्या या समाजामध्ये आपले साहित्य कधी व कशी डुबकी मारते आणि त्याच्याशी कोणते नाते जोडते, हा आजचा अत्यंत कळीचा प्रश्न आहे. भीषण बदलांच्या वाऱ्यांमध्ये मराठी साहित्याने आजवर दाखवलेली स्थितप्रज्ञता विलक्षण आहे. इथून पुढे ती मोडायची की 'अंगावरून वारं गेलेल्या' अवस्थेत पडून राहायचे याचा निर्णय आपोआप होणारा नाही, सक्रीयपणे तो करावा लागणार आहे.

**राजेंद्र साठे हे लेखक ज्येष्ठ पत्रकार, संपादक आहेत. 'सरदार वल्लभभाई पटेल : एक सडेतोड व्यक्तिमत्त्व' (मनोविकास) हे त्यांचे अलीकडचे प्रकाशित झालेले अनुवादित पुस्तक आहे. संपर्क–** satherajendra@gmail.com, **७०४५१ ५४३५४**

# मलय पर्वतावरून लंकेचा वेध...



राजा पटवर्धन

पुनर्शोध रामायणाचा



लक्ष्मणाच्या उच्छ्वासातूनही राग फुत्कारत होता. किश्किंधा नगर पहाडाच्या विशाल गुहेत वसलेले होते. रत्नांचा प्रकाश सर्वत्र पसरलेला होता. एकापेक्षा एक सरस अशी महावीरांची सदने दिसत होती. अंगद , हनुमान, वीरबाहू, सुबाहू, नल इत्यादिकांचे पर्वतासारखे उंच महाल पाहून लक्ष्मण चाट पडला होता. प्रचंड लांब रुंद रस्ते सुगंधाने दरवळत होते. सुग्रीवाचा महाल आहे की इंद्रसदन ? प्रासादाचा कळस की कैलास पर्वत ?...

वाल्मिकी रामायणातील वानरसेना ही एक अजब अद्भुत कहाणी आहे. रामायण पूर्व काळात ही दोन पाय आणि फक्त पुरुषांना एक शेपूट अशी विचित्र जमातच अस्तित्वात नव्हती. ब्रह्मदेवाच्या खास आज्ञेनुसार स्वर्गातील सर्व देवांनी अस्वले आणि वानर माद्यांच्या पोटी ही जमात जन्माला घातली. यात तेरा आदित्य, अकरा रूद्र, आठ वसू, दोन अश्विनी कुमार (मिळून ३३ कोटी. कोटी म्हणजे प्रकार) होतेच, त्या शिवाय समस्त गंधर्व. या गंधर्वांची अचूक नेमकी मोजदाद उपलब्ध नाही. ही मंडळी काहीशे असावी. दोन पाय, धारदार नखे आणि दात, विविध रंगांची त्वचा. आश्चर्यकारक वैशिष्ट्य म्हणजे, शेपटी. सूर्य, इंद्र, पवन इ. दिव्य देवदेवतांकडे या वानरांचे जैविक पितृत्व होते. आणखी एक खास वैशिष्ट्य असे, की या वानरांच्या मातांना शेपूट असल्याचा कुठेही उल्लेख नाही. हे सर्व वानर मुळात किश्किंधेत जन्माला आले. (ही किश्किंधा म्हणजे आजच्या कर्नाटक राज्यातील हंपी असे सांगितले जाते. तुंगभद्रेच्या परिसरात कोप्पल–विजयनगर जिल्ह्यातील हा परिसर. या वानर जमातीचे मूळ पुरुष ऋक्षराज (किंवा वृक्षराज) आणि जांबुवंत. (अस्वल–चार पाय, आखूड शेपूट, नखे, केसाळ त्वचा); ब्रह्मदेवाच्या जांभईतून जांबुवंत जन्मला, अशी पौराणिक कथा आहे. ऋक्षराजाला (वानर) सरोवराचे राखणदार म्हणून थेट ब्रह्मदेवाने नेमले असताना एक दिवस त्याने सरोवरात उडी मारून मनसोक्त पोहून घेतले. हा आज्ञा भंग होता. सरोवरातून बाहेर येताच मूळच्या पुल्लिंग रुपातल्याची स्त्री झाली. सूर्य आणि इंद्र दोघांचेही या विलक्षण अत्यंत रुपवान स्त्रीकडे एकाच वेळी लक्ष गेले. इंद्रपुत्र वाली आणि सूर्यपुत्र सुग्रीव हे जुळे वानर बंधु असे जन्मले!

**वानर राज्याची रहस्ये**

त्या वीर मातेचे पुढे काय झाले? देवच जाणे! इंद्राने वालीला स्वर्गात नेलेले नाही. सूर्य आपल्या पुत्र सुग्रीवाला हायड्रोजन बॉम्बच्या जवळ कशाला नेईल? ब्रह्मदेवाने त्या सुंदर मातेला पुन्हा वृक्षराजाचे रुप दिले असणार. तो वाली व सुग्रीव या दोघा बंधूंचा पिता किश्किंधेचा राजा झाला. वालीला किश्किंधेचे सिंहासन वारसा हक्कानेच मिळाले. (घराणेशाही केवळ अयोध्येच्या राजघराण्यातच नव्हती. वानरांच्या किश्किंधेतील राजघराण्यातही होती) हे वानर माणसांसारखे बोलायचे. यांच्या राजांची सिंहासनेही सोन्याची होती. यांच्या स्त्रिया दागदागिने घालायच्या. नाच गाण्यातही ही जमात रमत असे.

वानर पुरुषांप्रमाणे त्यांच्या स्त्रियाही मद्यप्राशन करायच्या, हे वाल्मिकी रामायणात तारा–लक्ष्मण संवादावरून स्पष्ट होते. वानर ही पूर्णपणे मानव जमात नव्हती. वनात किंवा वृक्षांवरही राहणारी, फळे, फुले, पाने, मुळे खाऊन जगणारी शाकाहारी प्राणीजमात होती. एक प्रकारची आदिवासी प्राणी जमात होती, असेही म्हणता येईल. रामजन्माआधीच ब्रह्मदेवाने ही खास देव–वानरी संकर योजना आखली.

विश्वामित्राने रामाच्या पंधराव्या वर्षी त्याला यज्ञ संरक्षणासाठी वनात नेले. नंतर विवाह. नंतर बारा वर्षे अयोध्येत वास्तव्य. नंतर कैकेयीच्या आज्ञेनुसार वनवास. वनवासात तेरा वर्षे झाल्यावर सीता हरण. एक वर्ष सीतेचा शोध. म्हणजे एकूण किमान चाळीस वर्षांचा काळ होतो. चाळीस वर्षात (संकरित) वानरांच्या किती पिढ्या जन्माला आल्या असाव्या? हे गणित कुणीतरी करायला हवे. देव–वानर यांच्या संकरासंबंधी ज्ञानी जाणकार तज्ज्ञ कुठे आहेत का? ब्रह्मदेवच जाणे. मी ही आकडेमोड केली, कारण रावणाकडचे सैन्य असेच हजारो ट्रिलियन. एवढ्या प्रचंड राक्षस सैन्याला तोंड द्यायचे, तर वानर सेनाही तितकीच मोठी किंवा अधिक हवी. वाल्मिकींनी शंकू परार्धांची मोजदाद केली आहे. वानर सैन्य कितीही मोठे असले तरी त्या सैन्याला लष्करी किंवा शस्त्र इ.चे प्रशिक्षण देणारा कुणी शिक्षक वा ऋषी नव्हता. शारीरिक बल म्हणजे बाहुबळ हेच मोठे शस्त्र होते. उंचच उंच वा लांबच लांब उडी मारणे, हा त्यांच्या हातचा मळ होता. त्यांना दहा, शंभर, सहस्त्र हत्तींचे बळ होते, असा तपशील वाल्मिकी रामायणात दिलेला आहे. कोणताही वृक्ष उपटून फेकणे हे त्यांच्या प्रतिकाराचे वैशिष्ट्य होते. मोठ्या शिळा वा पर्वत शिखरे दूरवर फेकून मारणे त्यांना सहज शक्य होत असे. थोडक्यात, रावणाच्या राक्षस सैन्याला तोडीस तोड अशी वानर सेना होती. भारतभरच्या सर्व पर्वतांवर आणि दऱ्याखोऱ्यात वृक्षांच्या सानिध्यात पाण्याची उपलब्धता असलेल्या ठिकाणी मुख्यत: वनप्रदेशात हे सैन्य विखुरलेले होते. पाने, फळे, कंदमुळे या आहारावर त्यांचे पोषण होत होते. वरील सर्व वर्णन हे 'इतिहास' म्हणून शिकवायचे? की महाकाव्य म्हणून? याला पुराणकथा म्हणायचे की भाकडकथा?

**वारसा घराणेशाहीचा**

आजच्या उपलब्ध तथाकथित प्रखर धर्माभिमान्यांपैकी किती जणांनी संपूर्ण वाल्मिकी रामायण (२४००० श्लोक) वाचण्याचे धाडस वा साहस केलेले आहे? रामाने वालीची शिकार केली, त्याचे समर्थन करताना म्हटले, ''तू फांदीवरचा प्राणी, भावाला हाकलून लावलेस, छोट्या भावाची पत्नी जी मुलगी, भगिनी

आणि सुने समान मानायची, तिला बळजबरीने स्वत:जवळ ठेवलीस म्हणून मी तुझी शिकार केली. या गुन्ह्याला देहदंडाचीच शिक्षा धर्म मान्य आहे. तीच शिक्षा मी तुला दिली.'' तद्नंतर वालीचे प्राण  कंठाशी आले तेव्हा त्याने रामाची क्षमा मागितली. सुग्रीवाला अपत्यच नव्हते. त्यामुळे वृक्षराज नंतर वाली, नंतर सुग्रीव अशी वानरबंधूंची घराणेशाहीची सत्ता टिकून राहिली. वालीपुत्र अंगदाला युवराज घोषित केले गेले. पुढील पिढीच्या घराणेशाहीची तरतूद झाली. मुद्दा असा, की वानर हा काय प्रकार होता हे समजून घेणे रामायणाचा विचार करताना महत्त्वाचे ठरते.


वालीच्या मृत्यूनंतर सुग्रीव किश्किंधेचा पुन्हा राजा झाला. त्याला त्याची पत्नी रुमा मिळाली, तशीच वालीची पत्नीही प्राप्त झाली. सुग्रीवाने पावसाळा संपला की सीतेचा शोध घेण्याची मोहीम सुरू करण्याचे अग्निसाक्षीने ठरलेले होते. तशा आणाभाका झालेल्या होत्या. चार महिने उलटले. पावसाळ्यात सीता शोध मोहीम बंद होती. विरह आणि शोक यात रामलक्ष्मण कष्टमय जीवन जगत होते. सीता हरणकर्त्या रावणाचे नाव जटायूमुळे समजले होते. दुसरा कोणताही धागा हाती लागलेला नव्हता. हेच काम सुग्रीवाने शपथपूर्वक हाती घेतले होते. त्याने चार महिन्यांत एकदाही रामलक्ष्मणाला तोंड दाखवले नव्हते. या काळात आपले जीवन निरर्थक झाल्याचे रामाला वाटू लागले होते. रामाला नैराश्याने (डिप्रेशन) ग्रासले. एक दिवस तर सीताशोध शक्य नसल्याचे वाटून तो लक्ष्मणाला म्हणाला, ''कोणत्या तोंडाने अयोध्येत जाऊन मातांसमोर उभा राहू? लक्ष्मणा तू एकटाच अयोध्येला जा'' हा जीवन संपवण्याचा विचार होता. लक्ष्मण धीर देऊन रामाची उमेद जागृत ठेवायचा. त्यानंतर रामाचा उत्साह भरुन आला. ''लक्ष्मणा, सुग्रीवाचे काम झाले. त्याला राज्य मिळाले आणि पत्नीही मिळाली. हे वानर चंचल स्वभावाचे असतात. विषयोपभोगात सुग्रीव कर्तव्य विसरला. शपथ विसरला. त्याला मी वालीचा रस्ता दाखवतो. तो आणि त्याचे सैन्य मी नष्ट करीन. कृतघ्नाला हीच शिक्षा योग्य!''

**सुग्रीवाची कानउघडणी**

राम लक्ष्मणाची अशी चर्चा सुरू असता किश्किंधेत हनुमानाची कालगणना सुरू होती. त्याने सुग्रीवाला सल्ला दिला. त्याची चांगलीच कानउघाडणी केली. सीताशोधाची तुला आठवण करून द्यावी, हे योग्य नसल्याचे त्याने समजावले. सुग्रीवही भानावर आला. हनुमानाने समस्त वानर सैन्याला त्वरित बोलावून घ्यायचे ठरले. रामलक्ष्मणाने सुग्रीवाचा राजमहाली पाहुणचार नाकारला होता. ते वनवासी व्रताचे पालन करीत होते. लक्ष्मण म्हणाला, ''रामा! तुला कष्ट घेण्याची गरजच नाही. सुग्रीवाला वालीचा रस्ता दाखवण्याचे काम मीच उरकून टाकतो.'' वनवासी लक्ष्मण योद्धा म्हणून निघाला. तेव्हा रामाने त्याला राजशिष्टाचार पाळण्याचा सल्ला दिला. संयम सोडून बोलू नकोस असे बजावले. लक्ष्मणाचे रूप पाहून वानरगण समजून चुकले. त्याने राजमहालाच्या प्रवेशद्वारा बाहेरुन प्रत्यंचेच्या आवाज काढला. हा अचानक झालेला गडगडाट कसला हे जाणकारांना समजले. सर्वांचे धाबे दणाणले. स्वत: युवराज अंगद बाहेर आला. ''अंगदा! सुग्रीवाला जाऊन सांग मी आलो आहे. त्याचे उत्तर मला येऊन सांग. मी इथे उभा आहे.''

तोपर्यंत वानरांचा धोक्याची घंटा दर्शवणारा सांघिक आवाज सर्वांना ऐकू येत होता. ही संकटाची चाहूल आहे, हे राजमहाली समजले होते. सुग्रीवाच्या अंत:पुरात गाणे बजावणे नृत्य गायन सुरू होते. आनंदाने भरलेले वातावरण होते. वानर स्त्रियांच्या गराड्यात सुग्रीव मद्यधुंद, कामासक्त, मदमोहित झालेला होता. हा सुरा प्राशनाचा प्रभाव असावा. रुमा पहिली पत्नी म्हणून आणि तारा पुन्हा प्राप्त झाल्याने सुग्रीव मस्तीत राहत होता. जसा वाली दोघींना पत्नी भावनेने वागवीत होता, आता सुग्रीवही तेच करीत होता. वहिनी आणि पत्नी यात दोघा बंधूंनी फरक केलेला नव्हता. वानर प्राण्यांना यात अनैतिक काहीच वाटत नव्हते. राम लक्ष्मणाच्या मानवी नैतिकतेत हे बसत नव्हते. अंगद लक्ष्मणाची देहबोली पाहूनच लटपटला होता. सुग्रीव तर निद्रावश झालेला होता. वानरांचा आरडाओरडा इतका वाढला की, सुग्रीवाची झोपच उडाली. अंगदाजवळ लक्ष्मणाने दिलेला निरोप त्यातील गर्भित अर्थासह सुग्रीवाच्या प्लक्ष आणि प्रभाव या सल्लागारांनी ऐकला होता. नीती आणि धर्म यांचे ते सल्लागार होते.

''सुग्रीवा! तू त्वरित लक्ष्मणाला जाऊन भेट. त्याला शांत कर. तू सत्यवचनाचेच पालन कर.'' (वा.रा.किश्किंधा. सर्ग ५१) ''मी रामलक्ष्मणाचा कोणताच अपराध केलेला नाही, असे असता लक्ष्मण का राग व्यक्त करतोय?'' असे सुग्रीव सल्लागारांना विचारीत होता. सल्लागारांनी सुग्रीवाचे तथ्यहीन बोलणे ऐकले. ''सुग्रीवा, तुजकडून प्रमाद घडला आहे. हात जोडून लक्ष्मणाला सामोरा जा. रामलक्ष्मणाचे बल देवराज इंद्रापेक्षा खूप अधिक आहे, याची तुलाही खात्री आहे.'' महाद्वाराबाहेर येऊन वालीपुत्र अंगदाने लक्ष्मणाला आत येण्याची विनंती केली. लक्ष्मणाच्या उच्छ्वासातूनही राग



*संतप्त राम-लक्ष्मण आणि ओशाळलेला सुग्रीव... बहकलेल्या सुग्रीवाला कर्तव्य आणि वचनाची आठवण करून देणे भाग पडले तेव्हा...*

फुत्कारत होता. किश्किंधा नगर पहाडाच्या विशाल गुहेत वसलेले होते. रत्नांचा प्रकाश सर्वत्र पसरलेला होता. एकापेक्षा एक सरस अशी महावीरांची सदने दिसत होती. अंगद, हनुमान, वीरबाहू, सुबाहू, नल इत्यादिकांचे पर्वतासारखे उंच महाल पाहून लक्ष्मण चाट पडला होता. प्रचंड लांब रुंद रस्ते सुगंधाने दरवळत होते. सुग्रीवाचा महाल आहे की इंद्रसदन? प्रासादाचा कळस की कैलास पर्वत? या सौंदर्याने लक्ष्मण समाधान पावला. आता अंत:पूर सुरू झाले. सोन्याचांदीने मढवलेली आसने आणि बैठका दिसत होत्या. सुमधूर संगीताचे स्वर कानी पडले. कोमल आवाजात कुणीतरी गात होते. तारुण्यात आलेल्या रुपगर्विता स्त्रिया दागिन्यांनी नटलेल्या फुलांच्या गजऱ्यांनी सजलेल्या कुलीन स्त्रिया होत्या. लक्ष्मण ब्रह्मचारी व्रती होता. संकोचून गेला. नुपूरांचे आवाज वाढले. अचानक एखादी नृत्यांगना मुरडत येण्यापूर्वीच लक्ष्मणाने धनुष्याची प्रत्यंचा ओढली. टणत्काराने आपला निषेध व्यक्त केला. त्याने स्वत:ची मर्यादा आखून घेतली आणि चार पावले मागे गेला. पुन्हा केलेला टणत्कार हा तीव्र निषेधाचा होता. सुग्रीव घाबरला. सिंहासनावरून उठला. त्याचे तोंड कोरडे पडले. घाबरून गेला. ''हे तारे सुंदरी! लक्ष्मण का रागावला असेल? त्यांच्या दृष्टीने विचार करून त्याच्या रागाचे काय कारण आहे ते मला सांग. तू असे कर. तू पुढे होऊन त्याची भेट घे. त्याचे सांत्वन कर. महात्मा लक्ष्मण स्त्रीशी कठोरपणे बोलणार नाही. तो प्रसन्न चित्त झाला की मी येऊन त्याला भेटतो.''

मद्याचा अंश पूर्णपणे न संपल्याने ताराचा किंचित तोलही गेला. थोडी अडखळली. पण सावरली. तिचा सोन्याचा कमरपट्टा थोडा सैल सुटला होता. एक साखळी लोंबत होती. लक्ष्मणाने मान खाली घातली. स्त्रीदर्शनाने त्याचा राग निवळला. ती प्रेमळ मृदू स्वराने लक्ष्मणाला म्हणाली, ''हे राजकुमारा! आपल्या रागाचे कारण मला सांगावे.'' लक्ष्मण वदला, ''हे स्वामी हिततत्पर तारे! विषयभोगात आसक्त होऊन सुग्रीव कर्तव्य विसरला हे तुला माहिती आहे. शोकात बुडालेल्या आम्हा भावांची अजिबात चिंता न करता तो विषयभोगात मग्न आहे. विलासात दंग आहे. धर्म आणि अर्थप्राप्तीची इच्छा करणाऱ्याला मद्यपान करणे अयोग्य आहे. मित्राचे उपकार वेळेवर फेडले नाही तर धर्मनाश होतो. मित्राच्या सहाय्याला विलंब आणि धर्मनाश झालेला आहे. आम्ही काय करावे असे तुला वाटते?'' ''रामाचे कोणते कार्य करण्याचे बाकी आहे हे तुला ठाऊक होते आणि आजही माहीत आहे.'' ''हे राजकुमारा, अरे ही संतापून बोलण्याची वेळ नाही. सुग्रीव रामाच्या कार्याचाच सतत विचार करीत असतो. चूक असेल तर समजून घ्यावी. हे वीर कुमारा! श्रेष्ठ गुणवान मनुष्य हीन गुणांच्या प्राण्यांवर कधी रागावतो का? सत्वगुणी त्यालाच म्हणतात ना? तुझ्यासारखा सद्विचारी क्रोधवश कसा होईल? रामाचा सुग्रीव मित्रच आहे, कार्याला विलंब झाला आहे. सुग्रीवाला काम असह्य झाला, कामवश झाला, त्यांचे अन्य कशातच लक्ष लागत नाही. कामासक्त पुरुषाचे मन तुला समजत नाही, तर वानराची गोष्ट काय? कसला धर्म आणि कसला अर्थ? मी इथे येण्यापूर्वी कामासक्त सुग्रीव माझ्या जवळच होता. तो निर्लज्यासारखा वागतोय. भावाला क्षमा कर. मोठे मोठे तपस्वी कामांध होऊन कसे वागतात, हे तुला चांगलेच माहीत आहे. वानर हे स्वभावत:च चंचल, सुग्रीव सुखोपभोगात आसक्त झाला तर तू समजून घे. तरीही त्याने रामाच्या कार्यासाठी सर्व वीर वानरांना जमण्याची आज्ञा केली आहे. लक्षावधी आलेलेही आहेत. तू मर्यादा राखून खाली मान घालून दूर उभा राहिलास हे मी जाणले. तरीही आदरपूर्वक माता

भगिनीच्या नात्याने परस्त्रीकडे पाहणे हा अधर्म ठरत नाही.''

तारेने लक्ष्मणाला आत येण्याची विनंती केली. सुग्रीव सोन्याच्या सिंहासनावर बसलेला लक्ष्मणाने पाहिला. गळ्यात सोन्याच्या साखळ्या आणि फुलांच्या माळा होत्या. सालंकृत युवतींनी सुग्रीवाला गराडा घातला होता. पत्नी रुमाला तो घट्ट मिठी मारून बसलेला होता. कृतांतासारखा भयंकर कृद्ध झालेल्या लक्ष्मणाला पाहून सुग्रीव घाबरला. थरथरतच त्याने सिंहासनावरून उडी मारली. त्याचे डोळे अजूनही लाल होते. तोल जात होता. भेलकंडत होता. सुग्रीव लक्ष्मणासमोर हात जोडून नेत्र मिटून उभा राहिला. काही प्रास्ताविक स्वरुपाचे बोलणे झाल्यावर लक्ष्मण शेवटी निर्वाणीचे बोलला, ''सुग्रीवा, आपला मतलब साधून मित्राचे काम जो सोईस्करपणे विसरतो त्यालाच कृतघ्न म्हणतात. त्याचा वध हा धर्माला मंजूर असतो. माझा भाऊ राम महात्मा, दयाळू आहे. तुझ्यासारख्या नालायक दुरात्म्या वानराला राज्यावर बसवले. हा उपकार स्मरणार नसलास तर रामाच्या बाणाने तूही वालीला भेटायला जाशील.'' अशा प्रसंगात लक्ष्मणाला सुग्रीव कसा सामोरा जाणार? ताराच पुढे सरसावली. म्हणाली, ''सुग्रीव हा वानरांचा राजा आहे. हा कपिराज कृतघ्न नाही. क्रूर कपटीही नाही. सुग्रीव रामाचे उपकार विसरलेला नाही. रामामुळेच सुग्रीव पुन्हा राजा झाला, त्याची पत्नी रुमा त्याला मिळाली. ताराही प्राप्त झाली.'' हे खरेच होते, सुग्रीवाला किती दीर्घ काळ परागंदा व्हावे लागले (सुमारे तेरा वर्षे) पळापळीत जीव मुठीत धरुन जगावे लागले आणि एकदम सर्व सुखे पायाशी लोळण घालत आली.

**तारेचा गौप्यस्फोट**

''हे राजपुत्रा! तुला विश्वामित्र मेनकेची हकीगत माहीत असणारच. महामुनी एका अप्सरेच्या प्रेमात पडला. दहावर्षे तप विसरला आणि विलासात मग्न होऊन रमला. तर मग एक वानरप्राणी, प्राण्यांच्या देहधर्माला अनुसरून कामोपभोगात रमला, अजूनही अतृप्तच असेल तर रामाने त्याला क्षमाकरणेच योग्य ठरावे. तू संतापून बोललास सामान्य मानवासारखा वागलास!'' लक्ष्मणाला एवढे फटकारल्यानंतर एखाद्या कसलेल्या मुत्सद्याप्रमाणे एक वानरी आपल्याला निरुत्तर करते, हा आघात लक्ष्मणाला पचवणे जड जात होते. तेवढ्यात तारा म्हणाली, ''हे धर्मज्ञ, तू ज्ञानी आहेस असे क्रोधवश होणे घातक ठरू शकते. तू क्रोध सोडून दे.'' तारेचा हा आघात तर वर्मी घाव होता. ''मी सुग्रीवाच्या वतीने तुझी माफी मागते. रामाच्या यशासाठी सुग्रीव आम्हा दोघा पत्नींचाच नव्हे, तर अंगदाचाही सर्व राज्यासह त्याग करील. हा पराक्रमी सुग्रीव रामाला सीता पुन्हा मिळवून देईल.''

ते ऐकून लक्ष्मणाला आनंद झाला. इतका की ताराचे पुढचे वाक्य त्याने ऐकले की नाही हेच कळत नाही. तारा पुढे असे म्हणाली की, ''मला हे कळले आहे की लंकेमध्ये शंभर हजार कोटी, छत्तीस अयुत, छत्तीस हजार आणि छत्तीसशे राक्षस राहतात. ही आकडेवारी आणि गणित सध्या बाजूला राहूदे.'' बोलता बोलता तारेने रावण कुठे राहतो, त्याचा गौप्य स्फोट केला होता. सीतेच्या हरणानंतर लंका हे नाव रामायण कथेत सर्वप्रथम ताराने सांगितले. (वा.रा. किश्किंधा, सर्ग १५) सीतेचे हरण रावणाने केले, हे सर्वप्रथम जटायूकडून समजले. आता रावण तिला घेऊन 'लंकेत' गेला हे ताराने सांगितले.

लंकेत रावण राहतो हे ताराला कसे समजले? तर वरील भलीमोठी संख्या वालीने ताराला सांगितली. इतके प्रचंड राक्षस सैन्य मारल्या शिवाय रावणाचा वध करणे शक्य नाही. लक्ष्मणाचे ताराच्या तपशिलाकडे लक्ष नव्हते. नाहीतर लंकेत रावण राहतो, हे समजल्यावर त्याने आनंदाने उड्या मारायला हव्या होत्या. आणखी एका रहस्याचा उलगडा झाला होता. सुग्रीव आता कामाला लागणार एवढ्यावरच लक्ष्मण खूश झाला होता. आता सीता जिवंत आहे का? हा प्रश्न उरला होता. तिचा शोध घेणे म्हणजे तत्पूर्वी लंकेचा शोध घेणे जरुरीचे होते. (शंभर योजने दूर) ताराने लक्ष्मणाला सांगितले, हे राजपुत्रा तुझ्या रागामुळे इथल्या वानर स्त्रिया अजून कापत आहेत, भयभीत आहेत. वालीच्या मार्गाने तू कुणाकुणाला पाठवणार आहेस, याची त्यांना धास्ती वाटत आहे. सुग्रीवाने सर्व वानरांना येत्या पंधरा दिवसांत हजर राहण्याची आज्ञा दिली आहे. तुमच्या सेवेत हजारो कोटी अस्वले, अब्ज लंगूर, कित्येक कोटी वानर असतील.

लक्ष्मण आता शांत दिसू लागला. नशेच्या प्रभावातून सुग्रीव बाहेर आला होता. ''लक्ष्मणा, रामाच्या कृपेनेच मला माझे राज्य, कीर्ती, संपत्ती आणि माझी स्त्री पुन्हा प्राप्त झाली आहे.'' ''सुग्रीवा, रामाला काहीही अशक्य नसले तरी तुझ्या सहकार्याने तो अधिक बलशाली होईल. सुग्रीवा, तू नगरीच्या बाहेर पडून पत्नीवियोगाने दुःखी झालेल्या रामाचे सांत्वन कर. दोघा पराक्रमींची भेट होऊदे.''

**हनुमान सेना सज्ज झाली...**

असा संवाद झाल्यानंतर सुग्रीवाने आपल्या सोन्याच्या पालखीत आपल्या शेजारी लक्ष्मणाला बसवले. वानरांनी ती पालखी प्रस्त्रवण (माल्यवान असेही संबोधले आहे) पर्वतावर रामापर्यंत नेऊन ठेवली. रामासन्मुख हात जोडून दोघेही उभे राहिले. रामाने सुग्रीवाचे आलिंगन देऊन स्वागत केले. सुग्रीवाने रामाला सर्व दिशांना कोणते वीर किती सैन्यासह जातील याचा तपशील दिला. सर्व पर्वत, नद्या, अरण्ये, सागर यांची समग्र माहिती दिली. ठरलेल्या मुदतीत सर्व वानर वीर आपापल्या सेनेसह हजर झाले. ''रामा! हे विविध बोलीभाषिक, विविध रंगांच्या त्वचेचे अगणित वानर देवेंद्रासारखे पराक्रमी, मेघ आणि पर्वताच्या आकाराचे अवाढव्य शरीराचे तसेच इच्छारुपीही आहेत. (हा खास राक्षसांचा गुण) मेरु ते विंध्य पर्वतावरून आलेले आहेत. हे युद्धात तुम्हाला मदत करतील. समुद्र तळातील पर्वतही शोधतील. सूर्यचंद्राचा प्रकाशही पोहचत नाही तिथेही जाऊन सीतेचा शोध घेतील. मी या अफाट दिव्य वानर, अस्वल सेनेला एका महिन्याची मुदत दिली आहे. रावणाला मारून सीतेला मुक्त करून आणतील यात शंकाच नाही.'' रामाचा चेहरा प्रसन्न झाला. ''सुग्रीवा, तुझ्या मदतीने मी युद्धात सर्व शत्रूंवर विजय मिळवीन रावणाने स्वनाशासाठीच सीताहरण केले. अनुल्हाद नावाच्या असुराने इंद्र पत्नी शची (इंद्राणी) ला पळवून नेले आणि तो नाश पावला. रावणाचेही तसेच होणार.''

हे म्हणणे ऐकून रामाच्या अंगात वीरश्री संचारली. सुग्रीवाने जगज्जेता संघ शेवटी जाहीर केला. त्यांना दिशा दिली, ती दक्षिण. अत्यंत निवडक अशा श्रेष्ठ वानरांची खास निवड होती. ती टीम अशी होती. नील, हनुमान, जांबुवान, सुहोत्र, शरारि, शलगुल्म, गज, गवाक्ष, गवय, सुषेण (सुग्रीवाचा सासरा – प्रज्ञावंत ताराचा पिता), गंधमादन, उल्कामुख, अनंग आणि वालीपुत्र अंगद. या टीमचा कॅप्टन ठरला अंगद! दक्षिणेतील पर्वत नद्यांची सविस्तर माहिती दिली. मलय पर्वताचा आणि चंदनाच्या अरण्याचा उल्लेख केला. समुद्र तीरापर्यंत गेल्यावर तुम्ही पुढचे ठरवा. असे सुग्रीव म्हणाला. महेंद्र पर्वतापलीकडे शतयोजने दूर विस्तीर्ण द्वीप आहे. (आजचा श्रीलंका नव्हेच नव्हे) तिथेही सीतेचा शोध घ्या. मानवांना तिथे पोहोचणे दुर्गमतेमुळे कठीण आहे. तो देश रावणाचे निवासस्थान आहे. रावण इंद्रासारखाच बलाढ्य आणि महातेजस्वी आहे.

सुग्रीवाने कुठे जा आणि कुठे जाऊ नका हेही कथन केले. सुग्रीवाचे अफाट भूगोल ज्ञान पाहून रामही आश्चर्यचकित झाला. हा शोध घेणे हे वानरेंद्रा तुम्हालाच शक्य आहे. मी स्वतः आणि लक्ष्मण असे दोघेही हे कार्य करण्यास समर्थ नाही. अशी कबुली रामाने दिलेलीच होती (वा.रा.कि.सर्ग ४०–१३) आज रामभक्तीचा बाजार भरवणाऱ्यांना हे राम वचन माहीत आहे का? गरूड, वासुकी, हंस यांची वसतिस्थाने अगस्त्य, वालखिल्य अशा ऋषींची वसतिस्थानेच नव्हेत तर विष्णू, अकरा रुद्रांसह शिव आणि खुद्द ब्रह्मदेवाचा लोक कुठे आहे, हेही सुग्रीवाने सांगितले. यम (मृत्यू देवता) कुठे राहतो तेही सांगितले. अखेर सुग्रीव हनुमानाला म्हणाला, ''तूच सीतेचा शोध घेण्यात यशस्वी होशील. वायुसुता! पृथ्वी, अंतरिक्ष, आकाश, सर्व देवलोक आणि समुद्र कुठेही गेले, तरी तुझ्याइतका बलवान गतिमान मी पाहिलेला नाही. तुझ्या पित्याचा वेग, स्फूर्ती आणि अप्रतिहत गती अशा सर्व गुणांसह तू सर्वज्ञानी आहेस. म्हणून हनुमंता तूच सीतेचा शोध घे.'' रामाची खात्री पटली. हनुमानच सीतेचा शोध घेईल. रामाने यावेळी स्वतःची अंगठी खूण म्हणून हनुमानाला दिली. हनुमानाने ती अंगठी मस्तकाला लावून रामाच्या पाया पडला. आपली जगज्जेती टीम घेऊन हनुमान मलय पर्वतावर गेला. (मुख्यतः पश्चिम घाटातील दक्षिण दिशेला केरळ, तामिळनाडू सीमेवर असावा) तिथूनच त्याला समुद्र उल्लंघून लंकेत उड्डाण करायचे होते.

**ही लेखमाला मूळ वाल्मिकी रामायणावरून बेतली आहे. रामायणातल्या घटना–प्रसंगांचा अर्थ–अन्वयार्थ लावताना, सादरीकरणात खेळकरपणा आणण्यासाठी आधुनिक प्रतीके/प्रतिमा/घटना/कृतींची जोड देण्यात आली आहे. हेतू हा की, रामायणकालीन घटनांचा आजच्या संदर्भाने वाचकांना सुलभपणे अर्थ लागावा.**

**– संपादक**

**राजा पटवर्धन हे विज्ञान, समाज, अर्थशास्त्र आणि संस्कृतीचे अभ्यासक आहेत. कोकणातील विकास प्रकल्पांवर यांनी सातत्यपूर्ण लेखन केले आहे. यांचे 'पुनर्शोध महाभारताचा' हे पुस्तक प्रकाशित आहे.**

**संपर्क : ९८२००७१९७५**

# लोकांचं संविधान!



श्रीरंजन आवटे






**क**धी नव्हे, ते भारतीय राज्यघटनेचे अर्थात संविधानाचे महत्त्व वारंवार अधोरेखित करण्याचा हा काळ आहे. सत्ताधारी असो वा विरोधक सारेच संविधानाच्या आणाभाका घेताना दिसताहेत. लोकशाही राष्ट्राची ही गरजही आहे. मात्र, कोणासाठी संविधान हा केवळ एक मुखवटा आहे आणि कोणासाठी संविधान हा जीवनमरणाचा प्रश्न यावरून सार्वजनिक स्तरावर होणारी खडाजंगी जाणकारांच्या चिंतेचा नि चिंतनाचा विषय बनून राहिली आहे. या पार्श्वभूमीवर, 'आहे रे' पासून 'नाही रे' वर्गाला, गर्भश्रीमंतांपासून तळाच्या शोषित-वंचितांना एक समान न्याय मिळवून देण्याचे अभिवचन देणाऱ्या, मुख्यतः भारतीय लोकशाहीचे मर्मस्थान  असलेल्या या दस्तावेजाचा अंगभूत वैशिष्ट्यांसह आंतरविद्याशाखीय वेध घेणारी ही लेखमाला...

**मी** काही राजकारणी नाही; मी एक केमिकल इंजिनियर आहे. मी सोबत जोडलेल्या सूचना हा एक माझा विचार आहे. तो तुम्हाला योग्य वाटल्यास त्यावर संविधान सभेत चर्चा व्हावी, असे मला वाटते. एका इंजिनियरने संविधान सभेचे सल्लागार बी. एन. राव यांना लिहिलेल्या पत्रातील या ओळी. दुसरा एक लेखक संविधान सभेच्या सचिवालयाला लिहिलेल्या पत्राचा शेवट करताना म्हणतो, माझ्या सूचनांचा आपण गांभीर्याने विचार करावा. त्यात गुणात्मक दर्जा असेल तर त्या स्वीकाराव्यात. केवळ एका सामान्य माणसाने सुचवल्या आहेत म्हणून त्या नाकारू नयेत. अशी एक दोन नव्हे तर शेकडो पत्रं संविधान सभेला प्राप्त झाली होती.

**नागरिकांचा सहभाग मोलाचा**

संविधानाला थोडा आकार येऊ लागला, तेव्हा फेब्रुवारी १९४८ मध्ये संविधानसभेने तयार केलेला कच्चा मसुदा, अध्यक्ष या नात्याने राजेंद्र प्रसादांना पाठवलाच, पण त्यासोबतच तो सर्वांसाठी जाहीर प्रकाशित केला. लोकांकडून सूचना मागवाव्यात किंवा नाही, याविषयी संविधानसभेत वाद झाला. सर्वसामान्य लोकांना कायद्यातलं काय कळणार, असं काहींना वाटत होतंच. या मसुद्याच्या पुस्तिकेची १ रू. एवढी किंमत होती. संविधान सभेने प्रांतिक विधिमंडळे, वकिलांच्या संघटना आणि अगदी सर्वसामान्य नागरिक या सर्वांनी प्रश्न, दुरुस्त्या, नव्या कल्पना सुचवाव्यात यासाठी आवाहन केले. वर्तमानपत्रे, आकाशवाणी यांसारख्या प्रसारमाध्यमातून त्यांच्यापर्यंत पोहोचवले. या आवाहनाला प्रतिसाद देत वेगवेगळ्या भागांतून, समूहांमधून अनेक सूचना आल्या.

यातल्या प्रत्येक पत्राची पोच संविधान सभेने दिली आहे. जास्तीत जास्त २ महिन्यात यातील प्रत्येक व्यक्तील/संघटनेला संविधान सभेने प्रतिसाद दिला. त्या सगळ्याचा दस्तावेज संविधानसभेच्या वादांच्या खंडांमध्ये वाचायला मिळतो. तंत्रज्ञान विशेष प्रगत नसताना संविधान निर्मितीच्या प्रक्रियेत लोकांना सहभागी करुन घेण्याचा संविधानसभेचा प्रयत्न केवळ अभूतपूर्व होता! त्यातून संविधानसभेचा प्रामाणिक लोकशाहीवादी हेतू दिसतो.

संविधान सभेने सूचना देण्याकरता आवाहन करण्यापूर्वीच सहारनपूर येथील सेवानिवृत्त अधिकारी श्री. इंदर लाल यांनी ५५ पानांचा प्रस्ताव संविधान सभेला पाठवला. 'संविधानाची मूलभूत तत्त्वे' या शीर्षकाचा हा प्रस्ताव होता. भारताचे सामाजिक, आर्थिक, राजकीय जीवन कसे असावे याबाबतची ही मांडणी होती. के. व्ही. अय्यर यांनी विविध समूहांच्या प्रथा-परंपरा या संदर्भात संविधान सभेला सूचना केल्या. वेद प्रचार मंडळ या संस्थेने २४ कलमी प्रस्ताव संविधान सभेकडे सादर केला होता. जमातवादापासून आणि धार्मिक असहिष्णुतेपासून मुक्त असे नवे संविधान हवे, अशी त्यांची तपशीलवार मागणी होती.

**प्रतिनिधित्वाच्या मागणीचा, नागरिकांच्या शहाणिवेचा सन्मान**

बऱ्याच संघटनांनी सूचना पाठवल्या, मागण्या केल्या. या मागण्या प्रामुख्याने प्रतिनिधित्व आणि अल्पसंख्य दर्जा या अनुषंगाने होत्या. अखिल भारतीय कश्यप महासभेने राजेंद्र प्रसादांना पत्र लिहून आपण मागास अल्पसंख्य आहोत, त्यानुसार आपल्याला प्रतिनिधित्व द्यावे, अशी मागणी केली. मद्रासमधील वन्नीकुला क्षत्रिय जाती, आसाममधील चहामळ्यात काम करणाऱ्या जाती जमाती यांनी नव्या संविधानात आपल्याला प्रतिनिधित्वाच्या अनुषंगाने मागण्या केल्या. या साऱ्या मागण्यांचा विचार करुन राजेंद्र प्रसादांनी जैन संघटनेचे सेठ छोगमल चोप्रा, अखिल भारतीय मोमिन परिषदेचे अब्दुल अन्सारी, कॅथॉलिक युनियन ऑफ इंडियाचे एम.रुतनास्वामी यांची सल्लागार समितीवर नियुक्ती केली. अल्पसंख्यांकांबाबतच्या सूचना पटलावर ठेवून त्यावर चर्चा केली गेली. अशा अनेक संघटनांच्या विविध सूचना आणि मागण्या होत्या.

सर्वच सूचनांबाबत संविधानसभेत मंथन झाले, नोंदी झाल्या. संविधान हे काही मोजक्या बुद्धिवादी अभिजनांनी लिहिले, असे सांगितले जाते; मात्र सामान्य माणसाला या प्रक्रियेत कसे सामावून घेतले हे रोहित डे आणि इस्रायली प्राध्यापक ऑर्नीट शानी यांनी 'असेंब्लिंग इंडियाज कॉन्स्टिट्यूशन' (२०२५) या त्यांच्या ताज्या पुस्तकातून दाखवले आहे. हे दस्तावेजांचे संशोधन भारताच्या गणराज्याच्या निर्मिती प्रक्रियेकडे पाहण्याची नवी दृष्टी देणारे आहे. त्यातून लक्षात येते की संविधान सभेचा सर्वसामान्य लोकांच्या समंजसपणावर, सामूहिक शहाणपणावर विश्वास होता. संविधान सभेची ही दृष्टी भारतात लोकशाही रुजवण्यासाठी किती आवश्यक होती, याची मनोमन खात्री पटते.

एका बाजूला हे पुस्तक तर दुसरीकडे रोहित डे यांचे २०१८ साली प्रसिद्ध झालेलं 'अ पीपल्स कॉन्स्टिट्यूशन' दैनंदिन जगण्यात संविधानाचा अनुवाद (प्रतिपाळ अशा अर्थाने) कसा होतो आहे, हेच सांगते. संविधान निर्मिती आणि त्यानंतरची दोन दशकं या काळातील राजकीय, कायदेशीर बाबींचा पट मांडतानाच डे यांनी भारतीय राजकीय प्रक्रियेचे वेगळेपण अधोरेखित केले आहे. या पुस्तकात डे यांनी प्रामुख्याने मूलभूत हक्क आणि त्या अनुषंगाने झालेले खटले यांचे विवेचन केले आहे. संविधान निर्मिती आणि त्यानंतरच्या राजकीय प्रक्रियेत सामान्य माणसाने आणि वंचित समूहाने आपला आवाज मांडण्याचा कसा प्रयत्न केला, याचा अंदाज या पुस्तकातून येतो.

**परिवर्तनपूरक दस्तावेज**

डे यांनी सर्वोच्च न्यायालयातील अलक्षित दस्तावेजांचे विश्लेषण केले आहे. त्यातून सामान्य मुस्लिम भाजीविक्रेता असो वा सेक्स वर्कर्स असोत, त्यांची मूलभूत हक्कांसाठीची न्यायालयीन लढाई या पुस्तकात तपशीलवार मांडली आहे. या पुस्तकाच्या तिसऱ्याच प्रकरणात 'मोहम्मद हनीफ कुरेशी विरुद्ध बिहार राज्य' (१९५८) या खटल्याचा ऊहापोह डे यांनी केला आहे. बिहारमध्ये गोमांस बंदी आणणारा कायदा केला गेला, तेव्हा आपल्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन होत असल्याचा दावा करत मोहम्मद हनीफ कुरेशी यांनी सर्वोच्च न्यायालय गाठले. हा आपल्या धार्मिक स्वातंत्र्यावर आणि व्यवसायावर घाला आहे, असा कुरेशी यांचा दावा होता. यावर न्यायालयाने निकालपत्र देताना म्हटले की, संविधानातील ४८ व्या अनुच्छेदानुसार गाय आणि दुभती वासरे यांचे रक्षण करण्यासाठी कायदा करण्याचा अधिकार सरकारला असला, तरीही पारंपरिक उदरनिर्वाहाच्या साधनांवर पूर्णपणे गदा आणणे योग्य होणार नाही. त्यामुळे गोमांसावरील पूर्ण बंदी रद्द झाली. अनेकदा बहुसंख्यांकांच्या दिशेने न्यायालयीन निकाल देऊन अल्पसंख्यांकांवर अन्याय झाल्याचे मांडले जाते. या पार्श्वभूमीवर डे यांचे या खटल्याकडे लक्ष वेधून घेणे महत्त्वाचे ठरते. याच खटल्याचा आधार घेत मिर्झापूर मोती कुरेशी (२००५) खटल्यात निकाल दिला गेला. अशा प्रकारच्या अनेक बाबींचा उल्लेख करताना संविधानामुळे लोकांचे आयुष्य बदलले, असा युक्तिवाद डे यांनी केला आहे. प्रख्यात संविधान अभ्यासक ग्रॅनवील ऑस्टिन यांनी भारतीय संविधानास 'सामाजिक दस्तावेज' असे म्हटले होते, ते त्यातील



*मसुदा समितीचे अध्यक्ष असलेल्या डॉ. आंबेडकरांनी सर्वसामान्य भारतीय नागरिकाच्याही मताचा आदर केला होता...*

परिवर्तनवादाच्या शक्यतांमुळेच. डे यांनी आपल्या पुस्तकातून एक प्रकारे त्या विधानाबाबतचे साद्यंत पुरावेच दिले आहेत.

थोडक्यात, डे यांच्या मांडणीतून संविधानाकडे तळातून वर पाहण्याचा (कॉन्स्टिट्यूशन फ्रॉम बिलो) दृष्टिकोन ध्यानात येतो. तसेच त्यांच्या पुस्तकातून नागरी समाज आणि विविध सामाजिक संघटनांच्या न्यायालयीन सक्रियतेतून बदल घडू शकतो, हे समोर येते. हजारो लोकांनी केलेल्या वैयक्तिक याचिका आणि सार्वजनिक कारणांसाठीच्या जनहित याचिका यातून लोकांनी संविधानाचा सकारात्मक अवलंब करत, हे संवैधानिक गणराज्य स्थापित केले आहे.

एकूणात ही दोन्ही पुस्तके संविधानाविषयीचे रुढ झालेले गैरसमज दूर करतात. अनेकदा अशी टीका केली जाते, की संविधान निर्मिती होत असताना सर्वसामान्य लोकांना त्याबाबत काहीही कल्पना नव्हती. काही मोजक्या, मूठभर अभिजनांनीच संविधान निर्मिती केली. तसेच स्वातंत्र्योत्तर भारतात सर्वसामान्य लोकांचा आणि न्यायालयाचा दूरदूरपर्यंत संबंध नसतो. त्यांना संविधानातील काही कळत नाही. हे दोन्ही निव्वळ गैरसमज आहेत, हे या पुस्तकांमधून सिद्ध होते. संविधान निर्मितीची प्रक्रिया असो वा नंतर ती राबवण्याची, या दोन्ही प्रक्रियांमध्ये सर्वसामान्य भारतीयांचा अर्थपूर्ण, लक्षणीय आणि भरीव सहभाग होता.

**संविधानिक मूल्य व्यवस्थेला आव्हान**

भारतीय गणराज्याच्या चौकटीला २०१४ नंतर धक्के बसताहेत. संविधानाच्या आत्म्यालाच हरताळ फासण्याचा प्रकार घडतो आहे. 'मेकिंग सेन्स ऑफ इंडियन डेमॉक्रसी' (२०२०) या पुस्तकात योगेंद्र यादवांनी भारताने 'रिपब्लिक



*भारतीय संविधानाचे प्रज्ञावंत कर्तेधर्ते*

२.०' मध्ये अर्थात दुसऱ्या गणराज्यात प्रवेश केला असल्याचे म्हटले आहे. या दुसऱ्या गणराज्याची मूल्यव्यवस्था संवैधानिक मूल्यव्यवस्थेच्या विरोधात आहे. अशा वेळी संविधान निर्मितीतील आणि त्यानंतरच्या संवैधानिक प्रक्रियेतील सर्वसामान्यांचा सहभाग हे केवळ स्मरणरंजनाचा भाग होऊ नये. उलट या प्रक्रियेमुळे आपल्यावर हे संविधान 'लोकांचं संविधान' म्हणून शाबूत ठेवण्याची ऐतिहासिक जबाबदारी आहे. तीन कृषी कायदे रद्द करण्यासाठी दिल्लीजवळ वर्षभर आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांनी नवी वाट दाखवली आहे. संविधान वाचवू इच्छिणाऱ्या प्रत्येकाला याच वाटेवरुन चालावं लागणार आहे. तेव्हाच 'आम्ही भारताचे लोक' या शब्दांना अर्थ येईल. अन्यथा पुस्तक स्वरूपात असलेले संविधान आणि प्रत्यक्ष व्यवहारातले संविधान यांचा काहीही मेळ असणार नाही. त्यामुळेच संविधानाचा आत्मा वाचवण्यासाठी नागरिकांनी प्रत्यक्ष व्यवहारात संवैधानिक मूल्यांचा अनुवाद करण्याची नितांत आवश्यकता आहे.

**श्रीरंजन आवटे कवी, लेखक आहेत. ते सध्या बँकॉक येथील सुआन सुनंधा राजभाट विद्यापीठात सहाय्यक प्राध्यापकपदी (राज्यशास्त्र) कार्यरत आहेत. राही श्रु. ग. यांच्यासोबत त्यांनी लिहिलेले 'आपलं आयकार्ड' हे संविधानारित पुस्तक वाचकप्रिय ठरले आहे.**

**संपर्क :** poetshriranjan@gmail.com




# ‘संघी-राम’ आणि ‘राजाराम’!



डॉ. विवेक कोरडे

विरोधी बाकावरून





**एकीकडे संसदेच्या सभागृहात संविधानाच्या प्रस्ताविकेचे सामूहिक वाचन करायचे, दुसरीकडे स्वहस्ते अयोध्येतल्या राम मंदिराची धर्मध्वजा उंचवायची... एकीकडे आंतरराष्ट्रीय समुदायासोबत वावरताना विश्वकल्याणाचा मोठा आव आणत ‘वसुधैव कुटुंबकम्’चा जप करायचा आणि दुसरीकडे स्वतःच निवडणुकांच्या राजकारणात सरशी व्हावी म्हणून परधर्मीयांविषयी द्वेषमूलक विधाने करून समर्थकांमध्ये विद्वेषाची पेरणी करायची. एकीकडे श्रीरामाच्या सात्विक रुपाचे गुणगान करायचे आणि दुसरीकडे समर्थकांनी रंगवलेल्या आक्रमक रामाला मूक संमती द्यायची... असा लोकशाहीच्या मुळाशी उठणारा खेळ सध्या सर्वोच्च पदावरून सुरू आहे. त्यात प्रातःस्मरणीय गांधीजींचा राम नेमका कसा होता, हे समजण्याची साधी तसदी देखील घेण्याची गरज विद्यमान नेतृत्वाला भासलेली नाही. न पेक्षा, महात्मा गांधी हे नाव जनतेच्या स्मृतितून पुसले जावे, असा अश्लाघ्य प्रयत्न राष्ट्रीय रोजगार योजनेला असलेले त्यांचे नाव वगळून केला जातो आहे...**

'जेव्हा लोकांना त्यांची कृती दैवी किंवा धार्मिकदृष्ट्या मंजूर आहे याची पूर्ण खात्री असते, तेव्हा ते विशेष उत्कट आणि अटळ उत्साहाने वाईट कृत्ये करण्यासाठी सिद्ध होतात, असे फ्रेंच तत्त्ववेत्ता ब्लेज पास्कल यांनी म्हटले आहे. पास्कल यांच्या या विधानाचा प्रत्यय आपण गेली अनेक वर्षे घेत आहोत. देव आणि धर्म हा जोपर्यंत मनुष्याच्या वैयक्तिक श्रद्धेचा आणि अध्यात्मिक समाधानाचा विषय असतो, तोपर्यंत फारसा नुकसानकारक नसतो. परंतु, धर्माला जेव्हा वैयक्तिक श्रद्धा आणि अध्यात्मिक समाधानाच्या कक्षेतून बाजूला काढून राजकारणासाठी वापरायला सुरुवात केली जाते, तेव्हा धर्म आणि देवाच्या नावे लोक कोणत्या नीच पातळीला जाऊ शकतात, आपले मनुष्यत्व विसरून, पशु बनून किती क्रूरपणा करू शकतात याचा अनुभव साऱ्या जगाने गेली अनेक शतके घेतला आहे.'

**धार्मिकता म्हणजे नेमके काय ?**

धारयती इति धर्म: याचा अर्थ, जो धारण केला जाऊ शकतो तोच धर्म होय. धर्माची ही एक मौलिक व्याख्या आहे. याचा अर्थ तोच धर्म आहे, जो कोण्या व्यक्तीला वा समाजाला धारण करण्यास, टिकवून ठेवण्यात, वारसा देण्यात योग्य आहे. धर्माच्या लक्षणांमध्ये धैर्य, क्षमा, शौच्य, इंद्रिय निग्रह आणि सत्य अशा गोष्टी सामील असतात आणि हे जे सर्व गुण आहेत, त्यांना धारण करणे आवश्यक असते. या अर्थाने ईश्वराधना वा धर्माचरण करणाऱ्या व्यक्ती खऱ्या अर्थाने धार्मिक असतात व त्यांच्यापासून समाजाला उपद्रव होण्याची शक्यता नगण्य स्वरूपाची असते. अशा व्यक्ती बहुदा आपला देवधर्म आपल्या वैयक्तिक आचरणापुरताच मर्यादित ठेवून त्याच कक्षेत राहण्यात समाधानी असतात. बऱ्याचदा आपल्या असमाधानी चित्तवृत्तींचे शांतवन करण्याच्या खटपटीत असतात. याला सोप्या शब्दात धार्मिकता असे म्हटले जाते.

समाजात ज्याप्रमाणे निरूपद्रवी धार्मिक माणसे असतात, त्याचप्रमाणे लोकांच्या धार्मिकतेचा, त्यांच्या ईश्वरावरील श्रद्धेवरचा गैरफायदा घेणारे, लोकांच्या श्रद्धांचा उपयोग करून आपला चरितार्थ चालवणारे, त्यांच्या शोषणावर स्वतःचे पोषण करणारे भोंदूबाबाही जागोजागी असतात. या भोंदूबाबांचीही एक कक्षा असते, एक अवाका असतो. बऱ्याचदा अशांना संत-महंत, साधू असेही संबोधले जाते. अशा संत-महंत, साधू, योगी, बाबांच्या आहारी गेलेली माणसे, एक वेळ देवाचा अपमान सहन करतील, पण त्यांच्या बाबा व तथाकथित योग्या विरुद्ध उच्चारलेला चकार शब्दही ऐकून घेण्याच्या मनस्थितीत भक्त नसतात. परंतु, अशा भोंदू मंडळींचा उपद्रव त्यांच्या भक्तांना होत असला तरी त्या कक्षे बाहेरच्या लोकांचे ही मंडळी फारसे नुकसान करू शकत नाहीत.

**केवळ मुखी राम**

देवाधर्माला न मानणारी, पण धार्मिकतेचा बुरखा पांघरून लोकांच्या मनात असलेल्या देवाधर्मावरच्या श्रद्धेचा वापर नि व्यापार करून राजकारण करणारी जमातही अस्तित्वात असते. विशेषत: ज्या राजकारणाच्या प्रवाहाला लोकांच्या अंधश्रद्धा दूर करायच्या नसतात, उलट लोकांच्या श्रद्धांचा वापर आपल्या गलिच्छ राजकारणासाठी करायचा असतो, असे प्रवाह हेच कार्य करत असतात. त्यांच्या मुखात राम असतो आणि बगलेत नथुराम असतो. जेव्हा राम सोयीचा असतो तेव्हा राम आणि अन्यवेळी नथुराम हेच त्यांचे ब्रीद असते. दुर्दैवाने, आज आपल्याला अशाच मंडळींचे शासन सहन करावे लागत आहे. अशी वृत्ती अंगी बाणवलेले लोक भक्तांच्या झुंडी निर्माण करतात. या अंधभक्त झुंडीच त्यांचा आधार असतात आणि तेच त्यांचे शस्त्र असते. या झुंडीच्या बळावरच ही मंडळी राज्यकर्ती बनतात आणि त्यांच्या बळावरच राज्य टिकवतात.

आज जो पक्ष सत्तेवर आहे, तो पक्ष एकेकाळी साडेतीन टक्क्यांचा पक्ष म्हणून ओळखला जात होता. या पक्षाने जेव्हा प्रभू रामचंद्राच्या नावाचा उपयोग बाबरी मज्जिद की राम मंदिर या इतिहासातल्या वादावर राजकारण करण्यास सुरुवात केली, देशात उन्माद माजविण्यास सुरुवात केली, देशात विद्वेष पसरवून हिंदू विरुद्ध मुसलमान असे ध्रुवीकरण घडवून आणले तेव्हाच त्यांना सत्तेचा सोपान चढता आला. निवडणुकीत साक्षात प्रभू रामचंद्रांना उतरविण्यात आल्यावर, ज्या देशात प्रभू रामचंद्रावर श्रद्धा असणारी करोडो माणसे आहेत, अशी माणसे रामाला मत देणार हे सांगायला कुणा पंडिताची गरज नाही.

राम हे कोट्यवधी भारतीयांचे श्रद्धास्थान आहे. माणसे एकमेकांना भेटली की अभिवादन 'राम राम' म्हणून करत असतात आणि निरोपही 'राम राम' म्हणूनच घेतला जातो. आता मात्र 'राम राम'ची जागा 'जय श्रीराम'ने घेतली आहे. जणू युद्धावर निघाले आहेत असे भासून रामनामाला उन्मादी बनवून टाकले आहे. म्हणूनच रामाच्या नावे राजकारण करणाऱ्यांचा संघी-राम आणि महात्मा गांधींचा राजाराम यातील फरक

स्पष्टपणे सांगणे आवश्यक झाले आहे.

**हा तर रामद्रोह**

रामायणात वर्णित रामाचे आदर्श दिव्य असे प्रभामंडळ आहे. राजारामाला मर्यादा पुरुषोत्तम समजले जाते. राम केवळ एका धर्माचे वा संस्कृतीचे प्रतीक नाहीत. जगात सोळाहून अधिक देशांमध्ये या ना त्या रूपाने प्रभू रामाला पूज्य मानले जाते. यात मुख्य रूपाने नेपाळ आणि मॉरिशससारखे देश तर आहेतच, पण त्याचबरोबर इंडोनेशिया मलेशिया थायलंड, कंबोडिया, फिलिपिन्स आणि लावोससारख्या दक्षिण पूर्व आशियाई देशांमध्येही रामायण आणि प्रभू रामाच्या चरित्राचा सखोल प्रभाव आहे. म्हणूनच कवी अजहर इक्बाल लिहून जातात,

**दया अगर लिखने बैठू, होते है अनुवादित राम**
**रावण को भी नमन किया, ऐसे थे अनुशासित राम**

अशा मर्यादा पुरुषोत्तम रामाच्या प्रत्येक वचनाचा संघीय मंडळींनी अवमान करून आपल्या अधर्माचा परिचय दिला आहे.

या तथाकथित राम भक्तांनी राम मंदिर निर्माणसाठी बाबरी मशीद पाडली. धैर्य हा धर्माचा महत्त्वाचा गुण आहे. पण या बाबरी मशीद पाडणाऱ्यांकडे 'आम्ही पाडली' असे म्हणण्याचे धैर्य नव्हते. (ही मशीद परग्रहवासीयांनी पाडली असावी.) केले कृत्य कबूल करायचे धैर्य ज्यांच्याकडे नसते, ती मंडळी केवळ भेकडच नसतात, तर असत्याचे आचरण करणारी धर्मभ्रष्ट असतात. बृहदारण्यक उपनिषदातील

**असतो मा सद्गमय**
**तमसो मा ज्योतिर्गमय**
**मृत्योर्मा अमृतम् गमय,**

ही प्रार्थना धर्माने काय साधावे हे सांगते. मनुष्याने असत्याकडून सत्याकडे, तिमिराकडून प्रकाशाकडे आणि मृत्यूपासून अमरत्वाकडे जावे असे ही प्रार्थना सांगते. मात्र या धर्मवीरांनी उलटा प्रवास करून आपले अधार्मिकत्व प्रमाणित केले आहे.

रघुवंशाची दिलेला शब्द पाळण्याची परंपरा अखंडित राहिली आहे. प्राण गेला तरी चालेल पण दिलेले वचन तुटता कामा नये.

**रघुकुल रीत सदा चली आई**
**प्राण जाय पर वचन न जाये**

याचसाठी राजा दशरथाने अत्यंत कठीण असतानाही कैकेयीला दिलेले वचन निभावले होते. मात्र या तथाकथित रामभक्तांनी बाबरी मशिदीला धक्काही लावला जाणार नाही, असे वचन सर्वोच्च न्यायालयाला देऊनही बाबरी मशीद पाडून रामद्रोह केला होता.

**बोलणे मायावी**

या पार्श्वभूमीवर नॉन बायोलॉजिकल विश्वगुरूजी पंतप्रधान मोदींनी, श्री राम जन्मभूमी मंदिर ध्वजारोहण प्रसंगी केलेल्या भाषणात केलेली पोपटपंची शिकवलेल्या पाळीव पोपटालाही तोंडात बोटे घालायला लावणारी आहे. ते म्हणतात, हा धर्मध्वज आवाहन करेल, 'सत्यमेव जयते नानृतं!' म्हणजे सत्याचाच विजय होतो. असत्याचा नाही. हा धर्मध्वज उद्घोष करेल, 'सत्यम् एकपदम् ब्रह्म सत्ये धर्म: प्रतिष्ठित:!' अर्थात सत्य ब्रह्माचे स्वरूप आहे. सत्य धर्मस्थापित आहे, हा धर्मध्वज 'प्राण जाय पर वचन न जाये' या वचनाची प्रेरणा बनेल. अर्थात, जे बोलले जाईल तेच केले जाईल. हा धर्मध्वज 'बैर न ब्रिग्रह आस न त्राता! सुखमह ताहि सदा सब आसा!' म्हणजे भेदभाव पीडा क्लेशांपासून मुक्ती मिळून समाजात शांती आणि सुख असू दे, असा आशीर्वाद देत राहील.

जे विरोधी पक्षात असतात, तेव्हा एक भूमिका घेतात आणि सत्तेत आल्यावर एकदम उलट भूमिका घेतात, भारत-पाकिस्तान हिंदू-मुसलमान आणि स्मशान-कब्रस्तान या भाषेत बोलून जे कपड्यांवरून माणसे ओळखायला सांगतात, मटन, मछली, मंगळसूत्र, मुजरा या म-कारी भाषेत बोलून जे सामाजिक सद्भावनांची 'ऐसी की तैसी' करतात, जे कट्टा नि कनपट्टीच्या गोष्टी करत 'कटप्पाची' भूमिका निभावतात, ज्यांच्या कार्यकाळात हजारो निष्पाप नागरिक दंग्यांमध्ये बळी पडतात व ज्यांना राजधर्माचे पालन करा असा उपदेश दिला जातो, त्यांच्या तोंडी ही भाषा किती मायावी आहे, यावर वेगळे भाष्य करायची गरज नाही. ही मंडळी मुखी रामनाम जपत अंतरी नथुरामाची भक्ती करतात, हे सांगण्याची आता गरजच राहिलेली नाही. यांची वृत्ती आणि वक्तव्ये बोलकी आहेत. परंतु यांच्या वक्तव्यांनी सर्वसामान्य लोकांच्या आणि खऱ्या रामभक्तांच्या मनात हे खरेखुरे रामभक्त आहेत असा गैरसमज निर्माण होण्याची शक्यता टाळण्यासाठी गांधीजींचा राम सांगणे भाग आहे. शिवाय हीच संघी मंडळी रामराज्याच्याही गोष्टी करू लागली आहेत.



*रागीट राम आणि हनुमान. सत्ताधाऱ्यांच्या द्वेषमूलक राजकारणाचा हा प्रत्यय...*

**गांधीजींचा सत्यरुपी राम**

गांधीजींचा राम हजारो भारतीयांच्या अंतःकरणात वसत आलेला राजाराम आहे. म्हणूनच गांधीजींचा राम हजारो भारतीयांच्या अंतःकरणात वसत आलेला राजाराम आहे. म्हणूनच ते ईश्वर अल्ला तेरो नाम, सबको सन्मती दे भगवान, असं म्हणू शकतात.

रामनामाबद्दल गांधीजी म्हणतात, ईश्वराचा सर्वोच्च गुण आणि नाव सत्य आहे, हे जरी माझ्या विवेकाने आणि हृदयाने पुष्कळ दिवसांपूर्वी मान्य केले असले, तरी सत्याला मी रामाच्या नावे ओळखतो. माझ्या परीक्षेच्या अत्यंत कठीण प्रसंगी याच नावाने माझे रक्षण केले आहे आणि आजही करत आहे. याचा संबंध बालपणाशी असू शकतो किंवा तुळशीदासांबद्दल असलेल्या माझ्या आकर्षणाशी.

तो संबंध काही असो, पण गांधीजी सत्यालाच राम मानत होते. ते पुढे लिहितात, परंतु एक गोष्ट पूर्णपणे खरी आहे आणि या ओळी लिहीत असताना माझ्यासमोर माझ्या बालपणीच्या आठवणी उभ्या राहतात. जेव्हा मी माझ्या घराजवळील रामाच्या मंदिरात नित्य दर्शनाला जात असे. माझा राम तेव्हा तेथेच राहत होता. त्याने मला अनेक भीतींपासून आणि पापांपासून वाचवले. माझ्याकरता ती अंधविश्वासाची गोष्ट नव्हती. शक्य आहे, की त्या मंदिराचा पुजारी वाईट माणूस असेल. मला त्याच्याबद्दल काही माहिती नाही. शक्य आहे, की त्या मंदिरात कुकृत्ये होत असतील. मला त्यांच्याबद्दल काहीही माहिती नाही. त्यामुळे माझ्यावर त्यांचा काहीही प्रभाव नाही जी गोष्ट माझ्या बाबतीत खरी आहे तीच करोडो लोकांकरता ही खरी आहे. (हरिजन दिनांक १८.३.१९३३ पृ.६)

रामाची म्हणजेच सत्याची उपासना अविरत करत राममय झालेल्या महात्म्याची ३० जानेवारी १९४८ रोजी नथुरामने हत्या केली, त्या नथुरामचे प्रशंसक देशात रामराज्य आणायचे म्हणतात. गांधीजींनाही रामराज्य हवे होते असे म्हणतात. म्हणून गांधीजींची रामराज्याची कल्पनाही नीट समजून घेतली पाहिजे. रामराज्याबद्दल गांधीजी म्हणतात,

माझ्या रामराज्याचा अर्थ हिंदू राज्य असा नाही. रामराज्य म्हणजे दैवी राज्य वा ईश्वरी साम्राज्य. माझ्या दृष्टीतून राम आणि रहीम एकच आहेत. मला एकच ईश्वर माहीत आहे, तो आहे सत्य आणि सदाचरणाचा ईश्वर.

माझ्या कल्पनेतील राम या पृथ्वीतलावर कधी राहिले असतील व नसतील, परंतु रामराज्यांचा प्राचीन आदर्श एका खऱ्या लोकशाहीचा आदर्श आहे, यात काही संशय नाही. या राज्यपद्धतीत क्षुद्रतम नागरिकालाही लांबलचक आणि महाग प्रक्रियेशिवाय ताबडतोब न्याय मिळू शकतो. (यंग इंडिया, १९ सप्टेंबर १९२९, पृ. ३०५)

गांधीजी पुढे लिहितात, माझ्या स्वप्नातील रामराज्यात राव आणि रंक या दोघांनाही समान अधिकार असतील. (अमृत बाजार पत्रिका, २ ऑगस्ट १९३४)

सुज्ञांस अधिक सांगणे नको. वाट चुकवलेल्या भक्तांना प्रभू रामचंद्र सद्बुद्धी देवो, एवढीच प्रार्थना.

**डॉ. विवेक कोरडे यांची 'जातीयवादी राजकारणाचा अन्वयार्थ', 'गांधीची दुसरी हत्या', 'शहीद भगतसिंग', 'वैचारिक बंदुकांचे शेत', 'गांधीहत्येचे राजकारण', 'आरएसएस आणि नथुराम गोडसे', 'भगतसिंग, गांधी आणि सावरकर : अपप्रचारामागचे वास्तव' ही पुस्तके प्रसिद्ध आहेत.**
**ई मेल :** drvivekkordeg@mail.com

# जागतिक राजकीय अर्थव्यवस्था आणि आपलं रोजचं जगणं



हितेश पोतदार

अर्थबोध



**मी** सध्या शिक्षण आणि कामानिमित्ताने लंडनमध्ये राहत आहे. लंडन हे शहर केवळ ब्रिटनची राजधानी नाही, तर ती जगाची एक अनौपचारिक 'फायनान्स कॅपिटल' (वित्तीय भांडवलाची राजधानी) आहे. इथल्या कॅनरी वार्फ किंवा बँक स्टेशनच्या परिसरात फिरताना, गगनचुंबी इमारतींच्या काचांमधून मला एक वेगळे जग दिसते. हे जग आहे, 'जागतिक भांडवलाचे'. इथून जेव्हा मी जगाकडे पाहतो, तेव्हा मला एक विशेष 'व्हेंटेज पॉईंट' मिळतो. येथून पैशाचा प्रवाह कसा वाहतो, मोठे कॉर्पोरेट निर्णय कसे घेतले जातात, जागतिक सत्तेची गणिते कशी मांडली जातात आणि त्याचा विपरित परिणाम लाखों मैलांवरच्या महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांवर, नोकरदारांवर, कामगारांवर कसा होतो, हे अगदी स्पष्ट दिसते...

**मा**झ्या पीएचडी संशोधनाचा भाग म्हणून मी जेव्हा भारतातील व पर्यायाने महाराष्ट्रातील परिस्थितीचा अभ्यास करतो, तेव्हा एक स्पष्ट विरोधाभास समोर येतो. लंडन हे जागतिक निर्णयांचे केंद्र आहे, तर भारत/महाराष्ट्र हे त्या निर्णयांचे परिणाम भोगणारे एक टोक आहे. हजारो मैल दूर असूनही, आपल्याकडील महागाई, पिकांचे अनिश्चित दर किंवा अचानक जाणारी नोकरी या गोष्टी स्वतंत्र नाहीत हे कळायला सुरुवात होते. त्या सगळ्या लंडन किंवा न्यूयॉर्कमधील वित्तीय हालचालींचाच एक भाग आहेत, हे या ’व्हेंटेज पॉइंट’वरून अधिक स्पष्टपणे लक्षात येते

गेल्या वर्षी मी भारताच्या संदर्भात मानवी जीवनाच्या विविध पैलूंच्या राजकीय अर्थव्यवस्थेवर लिहिले होते. त्यात ‘प्रेम आणि मैत्री’च्या राजकीय अर्थव्यवस्थेपासून सुरुवात करून धर्म, काम/आराम, मराठी भाषा, सिनेमा इ विषयांवर लिहिले. त्यात कार्ल मार्क्सची अभ्यासपद्धती, भारतातील औद्योगिक अपघात, स्त्री–श्रम, गिग इकॉनॉमी, एआयमागील अर्थव्यवस्था अशा अनेक विषयांवर लिहिले आणि वाचकांचा त्याला मिळालेला प्रतिसाद प्रेरणादायी होता. त्याच प्रेरणेतून, आणि सध्या एआयबद्दल सुरू असलेल्या गोंधळाच्या वातावरणात, मला वाटले की आपण आता एका नव्या (तसा जुनाच) आणि अधिक खोल विषयाला हात घातला पाहिजे.

ही लेखमालिका त्याचाच एक विस्तार आहे. यात आपण एआयमुळे जग बुडणार आहे अशी अवाजवी भीती बाळगणार नाही, किंवा त्याचा माझ्याशी काय संबंध? असा भाबडा दृष्टिकोनही ठेवणार नाही. आपण आंतरराष्ट्रीय राजकीय अर्थव्यवस्थेच्या (International Political Economy) चश्म्यातून हे समजून घेणार आहोत की, ‘सिलिकॉन व्हॅली’ किंवा ‘लंडन स्टॉक एक्सचेंज’मध्ये घेतलेले निर्णय तुमच्या ताटातील भाकरीवर आणि खिशातील पगारावर कसा परिणाम करतात. वाचकांसाठी हा प्रयत्न ‘अदृश्य’ जागतिक शक्तींना ‘दृश्य’ करण्याचा असेल.

**जागतिक आर्थिक घटना आणि स्थानिक संकटांना जोडणे: वास्तविक–जगातील शब्दचित्र**

जागतिक स्तरावरील आर्थिक हालचाली आणि कॉर्पोरेट/व्यावसायिक करार बहुतेकदा अमूर्त आणि सामान्य जीवनापासून दूरचे वाटतात किंवा ते तसे वाटावेत म्हणून प्रस्थापितांचे अर्थतज्ज्ञ व धोरणकर्ते पुरेपूर प्रयत्न करतात. तरीही त्यांचे परिणाम लहरींसारखे सामान्य लोकांच्या दैनंदिन जीवनावर आश्चर्यकारक रीत्या प्रभाव पाडतात. वरवर असंबंधित वाटणाऱ्या घटना जसे की ‘बिग टेक’ कंपन्यांच्या स्टॉक्समधील उसळी, सरकारने मध्यस्थी करून केलेला एखादा ‘गुंतवणूक करार’, किंवा व्यापार धोरणातील (trade policy) एखादा बदल हे अशा परिणामांची साखळी सुरू करतात, ज्याचा फटका शेवटी एखाद्या गरीब शेतकऱ्याला किंवा कामगारालाच अधिक बसतो.

मी मागच्या काही वर्षांत घडलेल्या निवडक वास्तविक–जगातील अशा घटनांची मालिका मांडण्याचा प्रयत्न करणार आहे, ज्या थेट स्थानिक संकटांशी संबंध जोडता येतात. या उदाहरणांमार्फत व काही काल्पनिक शब्दचित्र तयार करून हे दाखवून देण्याचा उद्देश आहे की जागतिक शेअर बाजारातील तेजी, अमेरिकेच्या किंवा ब्रिटनच्या बाजारात होणारे बदल किंवा इथल्या सरकारांशी संबंधित कॉर्पोरेट करार ग्रामीण–शहरी सामान्य लोकांच्या जीवनावर अप्रत्यक्षपणे कसा परिणाम करतात.

**भाग एक : मुंबई लोकल ते वॉशिंग्टन : तुमची नोकरी कुणाच्या हातात?**

**शब्दचित्र एक : मुंबईतील तरुणी आणि जगाच्या बाजारातील अदृश्य हालचाली**

पहाटे ३.२५ ची वेळ. मुंबईची पहिली लोकल. विरार ते चर्चगेट. नेहमीसारखीच खचाखच भरलेली. महिलांच्या डब्यात मधोमध उभी असलेली एक तरुणी, शेवटची सीट हुकली म्हणून एका हाताने वरच्या रॉडला लटकलेली आहे. दुसऱ्या हातात तिचा फोन आहे. ती सोशल मीडिया स्क्रोल करत असताना तिचे डोळे काही हेडलाइन्सवर थबकतात : Tech layoffs in India spike again, Global VC funding slowdown, US Fed hikes rates.

तिला हे सगळं कुठेतरी दूर घडतंय असं वाटतं. वॉशिंग्टनमध्ये काय चाललंय याचा आपल्या विरार–चर्चगेटच्या प्रवासाशी काय संबंध? पण त्याच वेळी, तिच्या काळजात एक हलकी धडकी भरते. कारण तिच्या ऑफिसमध्येही कालच काही लोकांना नोकरीवरून कमी करण्यात आलंय. तिचं स्वतःचं कॉन्ट्रॅक्ट पुढच्या महिन्यात रिन्यू होईल की नाही, याची तिला खात्री नाही. आपलं स्वतःच मुंबईच्या बाहेर कुठल्या तरी कोपऱ्यात एक घर असावं, जिथे

ती आपल्या गावातील दारुड्या बापाच्या त्रासाला विटलेल्या इतर लहान भावा-बहिणींना आणून पुढील शिक्षण देऊ शकेल, हे तिचं स्वप्न आता धूसर होताना दिसतंय.

तिच्या हातातला फोन जागतिक वित्तीय बाजारांच्या उलाढालींनी हलतोय, आणि तिचं मन मुंबई लोकलच्या वेगाने कळकळतंय. या दोहोंतला धागा अदृश्य असला तरी, तो लोखंडासारखा घट्ट आहे.

**पण पडद्यामागे काय घडते?**

या तरुणीची नोकरी जाण्यामागे तिची 'कामगिरी' किंवा तिच्या कंपनीचा 'तोटा' हे खरे कारण नसतेच मुळी. यामागे एक मोठी जागतिक यंत्रणा काम करत असते, जिला आपण 'जागतिक वित्त भांडवल' म्हणतो.

जेव्हा आपण म्हणतो की US Fed hikes rates (अमेरिकेने व्याजाचे दर वाढवले), तेव्हा त्याचा अर्थ काय होतो? सोप्या भाषेत सांगायचे तर, अमेरिकेची मध्यवर्ती बँक (Federal Reserve) ही जगाच्या पैशाचा नळ आहे. जेव्हा ते नळ घट्ट करतात (व्याजदर वाढवतात), तेव्हा जगभरातील गुंतवणूकदार-जे आतापर्यंत भारतात पैसा गुंतवत होते-तो पैसा काढून घेतात आणि परत अमेरिकेत नेतात. कारण तिथे त्यांना आता सुरक्षित आणि जास्त व्याज मिळते. यालाच अर्थशास्त्रात 'कॅपिटल फ्लाइट' (Capital Flight) म्हणतात.

याचा स्थानिक परिणाम असा होतो की सर्वप्रथम गुंतवणूक आटते. जेव्हा हा परदेशी पैसा भारतातून निघून जातो, तेव्हा बंगळुरू किंवा पुण्यातील स्टार्ट-अप्सना मिळणारा 'व्हेंचर कॅपिटल' (VC) निधी थांबतो. दुसरा परिणाम-सरळ खर्च कपात. पैसा नसल्यामुळे कंपन्या 'Cost Cutting' च्या नावाखाली सर्वात सोपा मार्ग निवडतात. तो म्हणजे नोकरकपात. तिसरं, हे केवळ आयटी क्षेत्रातच घडते असे नाही.

याला 'फायनान्शियलायझेशन' (वित्तीयकरण) म्हणतात. म्हणजेच, जेव्हा अर्थव्यवस्थेचे निर्णय 'उत्पादना'वर (Production) नाही, तर शेअर बाजाराच्या गणितांवर, त्यातील सट्टेबाजीवर ठरतात, तेव्हा त्या निर्णयांचे परिणाम सामान्य लोकांवर अधिक असूनही ते अधिकचे अदृश्य स्वरूप घेतात. त्या तरुणीचा बॉस तिला कामावरून काढत नाहीये, तर हजारो मैल दूर वॉशिंग्टनमध्ये बसलेल्या काही बँकर्सचा निर्णय तिला घरी बसवतोय. तिची मेहनत आणि तिचे स्वप्न, हे जागतिक भांडवलाच्या महापुरातल्या एका छोट्या कागदाच्या होडीसारखे दोलायमान होणे अशा जागतिक पटलावर चालणाऱ्या वित्तियकरणाच्या प्रक्रियेमुळे घडते.

आता एक वास्तविक उदाहरण बघूया.

**जेट फ्युएल डील्स विरुद्ध स्थानिक विमानतळावरील कामगार (२०१७):**

जागतिक स्तरावर 'ऑईल डील्स' (तेलाचे करार) कसे ठरवले जातात आणि त्याचा थेट परिणाम स्थानिक स्तरावर कसा होतो? विमान वाहतूक उद्योग मोठ्या कॉर्पोरेट 'फायनान्स' आणि जागतिक इंधनाच्या करारांवर अवलंबून असतो.

२०१७ मध्ये, 'स्पाइस जेट' सारख्या विमान कंपन्यांनी, इंधनाच्या किमती कमी करण्यासाठी, भारत सरकारच्या तेल कंपन्यांना (Oil PSUs) आव्हान देणे सुरू केले. विमान कंपन्यांनी इंधन पुरवठ्यासाठी जागतिक स्तरावर टेंडर काढण्याची मागणी केली, जेणेकरून त्यांना स्वस्त दरात 'जेट फ्युएल' मिळू शकेल. त्यांच्या दबावामुळे, 'इंडियन ऑईल कॉर्पोरेशन' (IOC) आणि इतर सरकारी तेल कंपन्यांना अखेरीस सवलत देण्यास भाग पाडले गेले.

तेलाच्या मोठ्या कंपन्यांनी 'जेट फ्युएल'च्या किमती कमी करताच, आर्थिक परिणामाची एक साखळी सुरू झाली. या तेल कंपन्यांनी त्यांचे नुकसान भरून काढण्यासाठी खर्चात कपात करण्याचे धोरण स्वीकारले. 'इंडियन ऑईल कॉर्पोरेशन' आणि 'हिंदुस्तान पेट्रोलियम' (HPCL) सारख्या कंपन्यांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी असणारा 'परिश्रम भत्ता' (Hardship -llowance) कमी केला. विशेषत: छोटे आणि दूरवरचे विमानतळ किंवा टर्मिनल येथे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर हा परिणाम झाला. मुंबई किंवा दिल्ली येथील 'रिफायनरी' किंवा मोठ्या 'आऊटलेट्स'वर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या तुलनेत, ईशान्येकडील राज्यांमध्ये किंवा भारतातील लहान विमानतळांवर 'जेट फ्युएल' पुरवठा करणाऱ्या टेक्निशियन आणि टर्मिनल ऑपरेटर्स यांना मिळणाऱ्या 'अलाऊन्स'मध्ये कपात झाली.

वरवर पाहता, ही फक्त एक कॉर्पोरेट फायनान्स डील होती. परंतु, तिचा परिणाम असा झाला, की दूर असलेल्या 'लोकेशन'वर काम करणाऱ्या एका जेट फ्युएल टर्मिनल ऑपरेटरची इन हँड सॅलरी-हातात पडणारा पगार- मोठ्या



*वाफाळत्या चहासह चॅट-जीपीटीला प्रॉम्प्ट देणे म्हणजे वीज, पाणी या बहुमूल्य स्रोतांना आटवणे आहे...*

प्रमाणात कमी झाली. याचे कारण, मुंबईतील एअरलाइन हेडक्वार्टरमध्ये बसलेल्या उच्च व्यवस्थापनाने जागतिक 'फ्युएल डील्स'मध्ये किमती कमी करून घेतल्या. अशाप्रकारे, जागतिक स्पर्धेचा दबाव अखेरीस भारतातील सर्वात लहान विमानतळ टर्मिनलवर काम करणाऱ्या कामगारांच्या मासिक उत्पन्नावर पडला.

**भाग दोन : डिझेल, ड्रोन आणि मराठवाडा: जिओ-पॉलिटिक्सचे चटके**

**शब्दचित्र दोन : मराठवाड्यातील शेतकरी स्त्री आणि तेल-युद्ध-किमतींची साखळी**

ती पहाटेपासून रानात राबतेय. हातात विळा, पायात तुटक्या चपला. मनात एकच विचार-खत महागलं आहे, डिझेल महागलं आहे आणि बाजारभाव मात्र पडलाय. घरात दीड वर्षांचं पोरगं आहे आणि त्याला सांभाळणारी दहा वर्षांची मुलगी. परवाच गावात बातमी आली होती- डिझेल पुन्हा वाढलंय; खाडीतील युद्धामुळे आयात खर्च वाढला.

तिला ही 'खाडी' (Gulf) कोणती आणि कुठे आहे, हे ठाऊक नाही. तिथे कोण कोणाशी लढतंय हेही तिला माहित नाही. पण तिला एवढं नक्की ठाऊक आहे की, त्या डिझेलच्या किमतीतली वाढ तिच्या विळ्याच्या एका फटक्यासारखी थेट तिच्या पोटावर आदळते. कुठेतरी आखातात एका अमेरिकन ड्रोनने बॉम्ब टाकला आणि त्याचे पडसाद हजारो किलोमीटर दूर महाराष्ट्रातील एका शेतात उमटले. डिझेल महाग झाल्यामुळे ट्रॅक्टरचा खर्च वाढला आणि तिचं महिन्याचं बजेट कोलमडलं.

**जगाचा नकाशा आणि तुमचं शेत**

येथे आपण 'जागतिक पुरवठा साखळी' (Global Supply Chains) आणि 'जिओ-पॉलिटिक्स' या संकल्पना समजून घेऊ शकतो. एखाद्या देशाला स्वतःच्या सीमा असतात, पण अर्थव्यवस्थेला सीमा नसतात. त्याला आपण 'परस्परावलंबन' (Interdependence) म्हणतो. पण हे अवलंबित्व नेहमीच समान नसते. खरे तर ते कायम विषम असते.

'बटरफ्लाय इफेक्ट'सारखी जगाच्या एका कोपऱ्यात घडलेली छोटी घटना दुसऱ्या कोपऱ्यात वादळ निर्माण करू शकते. रशिया-युक्रेन युद्ध असो किंवा इस्रायल-पॅलेस्टाइन संघर्ष-यामुळे कच्च्या तेलाच्या (Crude Oil) पुरवठ्यात अडथळा येतो. जेव्हा पुरवठा कमी होतो, तेव्हा भाव वाढतात. आणि भारतासारख्या देशाला, जो आपल्या इंधनासाठी ८०टक्के आयातीवर अवलंबून आहे, त्याचा मोठा फटका बसतो.

याला 'स्ट्रक्चरल व्हायोलन्स' किंवा संरचनात्मक हिंसा म्हणतात. कोणावरही थेट गोळी झाडली जात नाही, पण अशा आर्थिक धोरणांमुळे लोक उपाशी राहतात किंवा आत्महत्या करतात. त्या शेतकरी माऊलीचे दारिद्र्य हे तिचे 'नशीब' नसून, जागतिक राजकारणाने तिच्यावर लादलेला कर असतो.

**वास्तविक उदाहरण :**

**जागतिक व्यापारातील उदारीकरण आणि विदर्भातील कापूस उत्पादक शेतकरी (१९९०-२०००) :**

१९९० च्या दशकाच्या उत्तरार्धात, आर्थिक धोरणांनी दूरवरच्या बाजारपेठांना ग्रामीण भारताच्या नशिबाचे अजाणते सूत्रधार बनवले. जागतिक व्यापार उदारीकरणाच्या दबावाखाली, भारताने १९९१ मध्ये कापसावरील आयातीचे निर्बंध हटवले, ज्यामुळे स्वस्त परदेशी कापसाचा पूर भारतीय बाजारात आला.

पाश्चात्य सरकारांनी त्यांच्या कापूस शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात 'सबसिडी' दिल्या. उदाहरणार्थ, २००१-०२ मध्ये अमेरिकेची कापूस सबसिडी ३ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचली होती. या अनुदानामुळे अमेरिकन कापूस कृत्रिमरीत्या कमी किमतीत विकला गेला आणि भारतीय उत्पादकांचे नुकसान झाले.

विदर्भातील कापूस शेतकऱ्यांसाठी याचे परिणाम विनाशकारी होते. १९९६ ते २००३ दरम्यान देशांतर्गत कापसाचे भाव ५५ टक्क्याहून अधिक कोसळले. बियाणे आणि खतांच्या वाढत्या खर्चामुळे आधीच अडचणीत असलेल्या अनेक लहान शेतकऱ्यांचा नफा क्षीण झाला व कालांतराने शेती तोट्यात गेली. स्वस्त आयातीशी स्पर्धा करू न शकल्यामुळे

आणि कर्जाच्या बोजाखाली दबल्यामुळे, हजारो शेतकरी नैराश्याच्या गर्तेत ढकलले गेले. या काळात महाराष्ट्रातील कापूस उत्पादक पट्ट्यात शेतकरी आत्महत्यांमध्ये दुर्दैवी वाढ झाली.

हे संकट जागतिक बाजारातील शक्तींमध्ये रुजलेले होते. 'ऑक्सफॅम'च्या एका अहवालात नमूद केले आहे की, भारताची ग्रामीण शेती व्यवस्था जागतिकीकरणाच्या वाढत्या स्पर्धेला तोंड देण्यासाठी सुसज्ज नव्हती (ill-equipped), ज्यामुळे शेतकऱ्यांना अशा संकटापासून वाचण्यासाठी कोणतेही सुरक्षा कवच मिळाले नाहीत.

म्हणजेच, एकीकडे परदेशी ॲग्री बिझनेस आणि व्यापारी सबसिडी आणि स्वस्त पुरवठ्याचा फायदा घेत होते, तर दुसरीकडे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या वेदना बहुतेकांसाठी अदृश्य राहिल्या. ही घटना दाखवून देते की वॉशिंग्टन (Washington) किंवा जिनिव्हा (Geneva) येथे होणारे ग्लोबल ट्रेड डील्स' (जागतिक व्यापारी करार) यांचा थेट संबंध विदर्भातील एका गरीब शेतकऱ्याच्या जगण्याशी कसा जोडलेला असतो.

**भाग तीन: शुल्क-फ्री AI आणि डेटाची अदृश्य चोरी: नवा वसाहतवाद**

**शब्दचित्र तीन: पुण्यातला** Gen-Z **विद्यार्थी आणि डिजिटल साम्राज्य**

पुण्यातील एका कॉलेजच्या गेटवर चहाच्या टपरीवर एक तरुण उभा आहे. हातात वाफाळता चहा आणि फोनवर उघडलेले चॅट-जीपटी त्याला वाटतं, की तो खूप स्मार्ट आहे कारण तो आपल्या असाइनमेंट्स एआयकडून लिहून घेतोय. सगळं काही फुकट आणि सोपं!

पण त्याला हा प्रश्न कधीच पडत नाही, की ही उत्तरे चॅट-जीपटीला कोण पुरवतं? कुठून येतं हे सगळं ज्ञान? तो बिनदिक्कतपणे ती उत्तरे कॉपी-पेस्ट करतो. पण त्याला हे माहित नाही, की अमेरिकेतील वाळवंटात आणि आखाती देशांमध्ये उभ्या राहणाऱ्या प्रचंड डेटा सेंटर्सला चालवण्यासाठी जी वीज लागते, जे पाणी लागते आणि जे हार्डवेअर लागते- त्यासाठी जगात काय काय उलथापालथी चालू आहेत.

सुदान आणि काँगोमध्ये 'कोबाल्ट' आणि 'लिथियम' च्या खाणींसाठी यादवी युद्धे चालू आहेत, जेणेकरून या पुण्यातल्या टपरीवर उभ्या मुलाच्या फोनची बॅटरी बनवता येईल. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, तो ज्याला फ्री एआय समजतोय, त्या बदल्यात त्याने स्वतःचा 'डेटा', त्याचा 'वेळ' आणि त्याची 'विचार करण्याची क्षमता' त्या कंपनीला विकली आहे.

**तुम्ही ग्राहक आहात की कच्चा माल?**

येथे निक स्निसेक यांचा 'प्लॅटफॉर्म कॅपिटलिझम' हा मुद्दा सर्वात महत्त्वाचा ठरतो. इतिहासात काय झाले होते? ब्रिटिश भारतातून कापूस (कच्चा माल) नेऊन मँचेस्टरमध्ये कापड बनवून तेच कापड आपल्याला महागात विकत असत. आज काय होत आहे? 'बिग टेक' कंपन्या आपला 'डेटा' (कच्चा माल) शोषून घेतात. हा डेटा अमेरिकेतील सर्व्हर्सवर जातो. तिथे त्यावर प्रक्रिया होऊन 'बुद्धिमत्ता' (Intelligence) तयार होते. आणि हीच बुद्धिमत्ता (उदा. ChatGPT किंवा Google Gemini) आपल्याला परत विकली जाते. ज्याला 'डेटा कलोनियलिज्म' म्हणजेच विदा वसाहतवाद सुद्धा म्हणता येईल.

या तरुणाला वाटतं की हे सगळं 'क्लाउड' (Cloud-services)मध्ये आहे. पण हा क्लाउड प्रत्यक्षात जमिनीवरच असतो! त्यासाठी भल्या मोठ्या आकाराच्या जमिनी लागतात, कारखाने लागतात. या तरुणाच्या हातातला फोन हे केवळ संवादाचे साधन नाही, तर ते एक नवे 'व्हॅल्यू एक्सट्रॅक्शन' (वरकड मूल्य प्राप्ती)चे मशीन आहे. तो तरुण ग्राहक नाही, तर तो एक 'विनावेतन कामगार' आहे जो त्या एआयला अधिक कार्यक्षम आणि बुद्धिमान बनवण्यासाठी आपला डेटा फुकट देत आहे.

**वास्तविक उदाहरण :**

**एक हरवलेला कारखाना : फॉक्सकॉनच्या स्थलांतरामुळे गावाची अवस्था 'त्रिशंकू' (२०२२)**

मोठे 'गुंतवणूक करार' हे कधी लोकांचे नशीब उजळवतात, तर कधी त्यांच्या आशा धुळीस मिळवतात. २०२२मधील वेदांता-फॉक्सकॉन प्रकल्पाचे उदाहरण याची साक्ष देते. खाण क्षेत्रातील दिग्गज व भारत सरकारचा वरदहस्त असलेली 'वेदांता' आणि आयफोन असेंब्लिंग करणारी तैवानची 'फॉक्सकॉन' यांनी मिळून १९.५ अब्ज डॉलर्सची प्रचंड मोठी गुंतवणूक असणारा 'सेमी कंडक्टर आणि डिस्प्ले फॅब' प्रकल्प उभा करण्याचे ठरवले होते.

हा प्रकल्प सुरुवातीला महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील तळेगाव येथे होणार होता. यामुळे १ एक लाख प्रत्यक्ष नि



*बटरफ्लाय इफेक्टच्या तत्त्वानुसार जागतिक राजकारणाच्या साठमारीत महाराष्ट्रातल्या शेतकरी माऊलीची होरपळ होत असते...*

अप्रत्यक्ष नोकऱ्या निर्माण होतील आणि महाराष्ट्रात एक नवीन 'सिलिकॉन व्हॅली' तयार होईल, असे स्वप्न दाखवण्यात आले होते. तळेगाव जवळच्या अंबाळे गावातील लोकांसाठी हा प्रकल्प अत्यंत वैयक्तिक होता. सुरुवातीला गावकरी आपली वडिलोपार्जित जमीन द्यायला तयार नव्हते. परंतु, एमआयडीसी आणि सरकारी अधिकाऱ्यांनी त्यांना भरघोस मोबदल्याचे आमिष दाखवून तयार केले.

शेतकऱ्यांना एकरी ७३ लाख रुपये (सुमारे ९०,०००) एवढा अभूतपूर्व दर देऊ केला गेला. गावातच फॅक्टरी आल्यामुळे सुशिक्षित मुला-मुलींना नोकरीसाठी मुंबई किंवा बंगळुरूला जावे लागणार नाही, हे त्यांना पटवून देण्यात आले. २०२२ च्या सुरुवातीपर्यंत, १,१०० एकर जमीन अधिग्रहित करण्यात आली आणि काही गावकऱ्यांना १५० कोटी रुपयांचे वाटपही झाले. काहींनी तर फॅक्टरीसाठी छोटे व्यवसाय सुरू करण्याची स्वप्नेही पाहिली होती.

हे सर्व स्वप्न सप्टेंबर २०२२ मध्ये अचानक भंगले. एका धक्कादायक निर्णयात, वेदांता-फॉक्सकॉनने महाराष्ट्र सोडून गुजरातला प्रकल्प हलवण्याचा निर्णय घेतला. गुजरात सरकारने (जिथे केंद्रातील सत्ताधारी पक्षाचेच सरकार होते) अधिक सवलतींचे 'पॅकेज' दिले होते, असे म्हटले गेले. गुजरातमध्ये निवडणुका जवळ आल्या होत्या, त्यामुळे हा निर्णय राजकीय फायद्यासाठी घेतल्याचेही आरोप झाले. ते आरोप खोडताना सत्ताधाऱ्यांची पुरती दमछाक झाली.

वरच्या स्तरावर झालेल्या या हालचालींचा अंबाळे गावातील लोकांसाठी अर्थ फक्त 'आपत्ती' (Disaster) असा होता. त्यांची जमिनीची स्वप्ने आणि नोकरीच्या आशा एका झटक्यात संपल्या. कॉर्पोरेट जगातील एक 'स्वाक्षरी' (Signature) किंवा दोन राज्यांमधील स्पर्धा, एका छोट्या गावाची संपूर्ण पिढी कशी उद्ध्वस्त करू शकते किंवा आशेला टांगून ठेवू शकते, याचे हे ज्वलंत उदाहरण आहे.

**भाग ४ : झूम कॉलवरील 'डील' आणि जमिनीवरची धूळधाण**

**शब्दचित्र ४ : झूमकॉल वरची एक डील आणि सामान्य लोकांवर होणारा परिणाम**

झूम मीटिंगची स्क्रीन. त्यात १०-१२ खिडक्या उघडलेल्या. काहींमध्ये परदेशी बिग टेक अधिकारी, काहींमध्ये भारतीय धोरणकर्ते, काहींमध्ये इंटरनॅशनल ब्रोकर्स... प्रेझेंटेशनची पहिली स्लाईड : *''India's Strategic Opportunity - Compute Infrastructure Partnership.''*

एक स्लीक इंग्रजी आवाज येतो : *''We can commit billions in off–balance sheet financing, provided regulatory flexibility is given on data localisation and energy usage norm.''*

(आम्ही अब्जावधी डॉलर्स गुंतवू शकतो, पण त्याबदल्यात आम्हाला डेटाचे नियम आणि ऊर्जेचे नियम शिथिल हवे आहेत).

स्क्रीनवर एक भारतीय अधिकारी मान हलवतो. काही अटी बदलल्या जातात, काही नियम शिथिल केले जातात. त्यांना ठाऊक नाही (किंवा कदाचित ठाऊक आहे म्हणूनच) या डीलचा परिणाम होणार आहे तो मुंबईतील त्या तरुणीच्या नोकरीवर, मराठवाड्यातील त्या शेतकरी स्त्रीच्या जगण्यावर आणि पुण्यातल्या Gen-Z मुलाच्या डिजिटल आयुष्यावर. मीटिंग संपते. ते खिडक्यांची Leave Meeting बटणं दाबतात. पण त्यांच्या निर्णयांनी महाराष्ट्रातील असंख्य जीवांच्या विंडोज मात्र बंद होत नाहीत.

**निर्णय 'झूम'वर आणि शिक्षा गावाला**

या शब्दचित्रात जो 'स्लीक इंग्रजी आवाज' नियम शिथिल करण्याची मागणी करतो, त्याचा अर्थ जमिनीवर काय होतो? जेव्हा बिग टेक कंपन्यांना 'नियम शिथिल' करून मिळतात, तेव्हा त्याचा थेट परिणाम शेतकऱ्याच्या हक्काचे पाणी उद्योगाला वळवण्यात होतो. आदिवासींच्या जमिनीवरील पर्यावरणीय निर्बंध हटवून जमिनी लाटण्यात होतो आणि

राज्याच्या तिजोरीतील कराचा पैसा (Tax Revenue) सवलतींच्या स्वरूपात माफ केला जातो. यालाच आंतरराष्ट्रीय राजकीय अर्थव्यवस्थेत 'असमान देवाणघेवाण' (Unequal Exchange) म्हणतात. निर्णय व्हर्च्युअल बोर्डरूममध्ये होतात, पण त्याचे थेट परिणाम गावे आणि झोपडपट्ट्या भोगतात आणि मग शहरी लोक.

खालील तीन वास्तववादी उदाहरणे हे स्पष्ट करतात, की हे काल्पनिक नसून आज आपल्या आजूबाजूला घडणारे भीषण सत्य आहे.

**वास्तविक उदाहरण १: गुगलचा 'AI हब' आणि तहानलेले विशाखापट्टणम (आंध्र प्रदेश, २०२५)**

झूम कॉलवरील त्या 'नियम शिथिलतेचे'चे सर्वात ज्वलंत उदाहरण आंध्र प्रदेशमध्ये पाहायला मिळते. ऑक्टोबर २०२५ मध्ये, गुगलने आंध्र प्रदेश सरकारसोबत १५ अब्ज डॉलर्सचा (सुमारे १.२५ लाख कोटी रुपये) 'AI हब' उभारण्याचा करार केला. विशाखापट्टणममध्ये १ गिगॅवॉट क्षमतेचे प्रचंड डेटा सेंटर्स उभे राहणार आहेत. हा करार कोणत्याही जाहीर सभेत नाही, तर गुगलचे सीईओ, भारतीय अधिकारी आणि अदानी व एअरटेलचे प्रतिनिधी यांच्यात बंद दाराआड झालेल्या बैठकांमध्ये निश्चित झाला. रॉयटर्स वृत्त संस्थेने नमूद केल्याप्रमाणे, भारतीय अधिकाऱ्यांनी खाजगीत अमेरिकन कंपन्यांना ग्वाही दिली की त्यांना 'व्यवसाय करणे सोपे' जाण्यासाठी (Easy Business Environment) हवे ते करण्यात येईल.

गुगलला खूश करण्यासाठी सरकारने सामान्य नियम धाब्यावर बसवले, सर्वप्रथम, सरकारने एका विशेष आदेशाद्वारे तीन गावांमध्ये (तार्लुवाडा, अडाविबरम, रामबिल्ली) सुमारे ४८० एकर जमीन या प्रकल्पासाठी दिली. त्यानंतर प्रचंड सवलती देत या प्रकल्पासाठी सरकारने तब्बल २२,००२ कोटींचे (सुमारे २.६ अब्ज) 'इन्सेटिव्ह पॅकेज' दिले आहे. यात करात सूट आणि वीज-पाण्याच्या दरात सवलत समाविष्ट आहे. मात्र स्थानिक कार्यकर्त्यांच्या मते, या प्रकल्पाला कोणतीही ठोस पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन (EIA) न करता घाईघाईने मंजुरी देण्यात आली. शेतकऱ्यांवर दबाव टाकून त्यांच्या जमिनी स्वखुशीने घेतल्याचे भासवले गेले.

अडाविबरम आणि रामबिल्ली गावातील शेतकऱ्यांनी त्यांच्या पूर्वजांच्या जमिनी गमावल्या. ज्या जमिनीवर त्यांची उपजीविका होती, ती आता डेटा सेंटरच्या कुंपणात अडकली आहे. १ गिगॅवॉट डेटा सेंटरला थंड ठेवण्यासाठी वर्षाला अब्जावधी लिटर पाण्याची गरज असते. विशाखापट्टणममध्ये आधीच पाण्याची तीव्र टंचाई आहे. जर हे पाणी डेटा सेंटरला वळवले, तर स्थानिक रहिवाशांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागेल. हे डेटा सेंटर एका मध्यम आकाराच्या शहराइतकी वीज वापरणार आहे. गुगलने जरी 'ग्रीन एनर्जी'चे आश्वासन दिले असले, तरी प्रत्यक्षात ते भारताच्या कोळसा-आधारित ग्रीडवरच अवलंबून असणार आहेत, ज्यामुळे प्रदूषण वाढेल.

**वास्तविक उदाहरण २ : महाराष्ट्राचे डेटा सेंटर धोरण आणि झोपडपट्ट्यांमधील अंधार**

२०२२-२३ मध्ये महाराष्ट्र सरकारने बिग टेक कंपन्यांशी (Amazon, NTT, Oracle) खाजगी चर्चा करून 'IT ITES Policy 2023' तयार केली. या धोरणाने डेटा सेंटर्सना अत्यावश्यक सेवा (Essential Service) म्हणून घोषित केले. हे धोरण म्हणजे जनतेच्या डोळ्यांदेखत पण त्यांना अंधारात ठेवून केलेली तडजोड होती.

या धोरणाने डेटा सेंटर्सना रहिवासी, हरित पट्टे (Green Zones) आणि 'ना-विकास' (No-Development) क्षेत्रातही बांधकामे करण्याची परवानगी दिली. पर्यावरणाचे नियम शिथिल केले गेले. डेटा सेंटर्सना वीज वापरावर लागणाऱ्या २१ टक्के 'इलेक्ट्रिसिटी ड्युटी' मधून सूट दिली गेली. तसेच त्यांना व्यावसायिक दराऐवजी निवासी (Residential) दराने मालमत्ता कर लावण्याची सवलत मिळाली. २०२५ च्या मध्यात, कोळसा वीज प्रकल्पांवरील प्रदूषणाचे नियम शिथिल केले गेले, जेणेकरून या डेटा सेंटर्सना स्वस्त आणि अखंड वीज मिळवता येईल.

महाराष्ट्रात नवी मुंबई आणि पनवेलमधील डेटा सेंटर्सना २४ तास अखंड वीज मिळते. पण त्याच वेळी, पनवेल आणि चित्ता कॅम्पमधील झोपडपट्ट्या आणि चाळींमध्ये वारंवार वीज कपात (blackouts) होते. डेटा सेंटर्सचा विजेचा वापर (४ गिगॅवॉट) इतका प्रचंड आहे, की तो तब्बल २५ लाख घरांची वीज खातो. झोपडपट्ट्यांमधील लोक तुटक्या पाइपमधून पाणी भरण्यासाठी रांगा लावतात, तर बाजूच्या डेटा पार्क्समध्ये लाखो लिटर पाणी कुलिंगसाठी वापरले जाते. कोळसा प्रकल्पांचा वापर वाढल्यामुळे



*अमेरिकेच्या फेडरल बँकेचे धोरण, आखातातून ठरणारे इंधनाचे दर यावर देशोदेशीच्या नोकरदारांचे भवितव्य ठरते...*

डहाणूसारख्या परिसरातील शेतकरी आणि रहिवासी प्रदूषणाचा सामना करत आहेत. थोडक्यात, मुंबई 'डिजिटल हब' बनत असताना, शहरातील २० टक्के गरीब जनता मात्र डिजिटल प्रगतीचा बळी ठरत आहे.

ही तिन्ही उदाहरणे सिद्ध करतात, की शब्दचित्रातील 'झूम कॉल'वरची ती डील काल्पनिक नाही. जेव्हा एखादा अधिकारी Energy Usage Norms शिथिल करण्यास होकार देतो, तेव्हा विशाखापट्टणमच्या नळाचे पाणी आटते. जेव्हा Regulatory Flexibility दिली जाते, तेव्हा पनवेलच्या झोपडपट्टीत अंधार होतो. जेव्हा Incentives दिले जातात, तेव्हा ब्राझिलच्या सरकारी तिजोरीला भगदाड पडते. जागतिक भांडवलाचे हे 'अदृश्य हात' स्थानिक संसाधने कशी ओरबाडतात, याचे हे भीषण वास्तव आहे.

**आणि म्हणूनच, आंतरराष्ट्रीय राजकीय अर्थव्यवस्था समजून घेणे अत्यावश्यक आहे**

वर मांडलेली चार शब्दचित्रे आणि जेट फ्युएलपासून ते एलआयसी–अदानीपर्यंतची आणि गुगलच्या डेटा सेंटरची वास्तविक उदाहरणे पाहिल्यानंतर, एक गोष्ट स्पष्ट होते: त्या सर्वांच्या मागे आहे एक व्यापक जागतिक यंत्रणा. ही यंत्रणा म्हणजेच आंतरराष्ट्रीय राजकीय अर्थव्यवस्था (International Political Economy, इथून पुढे IPE). आपण एका बेटावर राहत नाही आहोत. आपली स्थानिक संकटे ही जागतिक अर्थकारणाचेच एक रूप आहेत. पण हे नेमके का घडते? आणि याचा तुमच्या–माझ्या आयुष्याशी काय संबंध? याचे उत्तर शोधण्यासाठी आणि ही मालिका का महत्त्वाची आहे हे समजण्यासाठी आपल्याला दोन महत्त्वाच्या संकल्पनांचा आधार घ्यावा लागेल.

IPE आपल्याला हे दाखवते की जगाच्या एका कोपऱ्यात झालेला आर्थिक करार, वित्तीय निर्णय किंवा व्यापार धोरणाचा बदल – हे सारे आपल्या दैनंदिन जगण्याशी किती खोलवर जोडलेले आहेत. यामध्ये केवळ जागतिकीकरणाची सामान्य चर्चा नाही, तर सत्तेच्या रचनेचा अभ्यास आहे – कोण निर्णय घेतं, कोण त्याचा लाभ घेतं आणि कोण नुकसान सोसतं?

पहिली संकल्पना आहे 'वित्तीयकरण'. वित्तियकरणाच्या प्रक्रियेमुळे उत्पादक क्षेत्राचे भांडवल वित्तीय बाजारात गुंतवले जात आहे. पूर्वी वित्त हे उत्पादनाला मदत करण्यासाठी होते. आता ते मालक झाले आहे. आजच्या अर्थव्यवस्थेत नफा 'काहीतरी उत्पादन बनवून' (Production) मिळण्यापेक्षा, 'पैसे फिरवून' (Speculation) जास्त मिळतो. या प्रक्रियेत 'फायनान्शियल एक्सप्रोप्रिएशन' (Financial Expropriation) घडते. म्हणजेच, नफा थेट कामगारांच्या पगारातून किंवा सामान्य माणसाच्या बचतीतून (जसे LIC-अदाणीचे उदाहरण) ओरबाडला जातो. जेव्हा अर्थव्यवस्था उत्पादनाऐवजी सट्टेबाजीवर चालते, तेव्हा श्रीमंत अजून श्रीमंत होतात (जसे K-Shaped Recovery मध्ये दिसते) आणि कष्टकरी मात्र कर्जाच्या खाईत लोटला जातो.

'डिपेंडन्सी थिअरी'नुसार म्हणजेच अवलंबित्वाच्या सिद्धांतानुसार, जग दोन भागांत विभागले आहे: एक 'केंद्र' (Core – लंडन, न्यूयॉर्क, सिलिकॉन व्हॅली) आणि दुसरा 'परिघ' (Periphery – महाराष्ट्र, विदर्भ, आणि संपूर्ण जागतिक दक्षिण). या सिद्धांतानुसार, 'परिघा'चा विकास खुंटलेला नसून, तो 'केंद्रा'चा विकास करण्यासाठी जाणीवपूर्वक रोखलेला असतो. हे 'असमान देवाण–घेवाणीतून' (Unequal Exchange) घडते.

ते आपला 'डेटा', श्रम आणि संसाधने (कच्चा माल) ओरबाडून नेतात आणि आपल्यालाच 'एआय सर्व्हिस' (पक्का

माल) विकतात. ते आपली जमीन आणि पाणी (नैसर्गिक संसाधने) स्वस्तात घेतात आणि बदल्यात आपल्याला हवामान बदलाचे परिणाम भोगायला भाग पाडतात. आपले सरकार या प्रक्रियेत कमजोर नसून, ते मुळात या जागतिक भांडवलाला मदत करण्यासाठी आपले कायदे आणि नियम बदलत असते. हे संरचनात्मक अधीनतेचे (structural subordination) लक्षण आहे. 'केंद्र' हे नफ्याचे केंद्रबिंदू आहेत, तर 'परीघ' हे शोषणाचे केंद्रबिंदू आहेत.

ही लेखमाला पुढे या प्रक्रियांचे वेगवेगळे पैलू उलगडत जाईल: जसे 'डेटा वसाहतवाद' (Data Colonialism) आणि Big Techचा वाढता वर्चस्व; राज्याच्या धोरणांत वित्तीय भांडवलाचा हस्तक्षेप; जागतिक संस्थांद्वारे लादली जाणारी कर्जनियंत्रित अर्थनीती (Debt Conditionality); AI, ऊर्जा, पर्यावरण आणि स्त्री-श्रम यामधील नव्या सत्ता-रचनेची उकल; जागतिक मूल्य साखळ्यांमधील असमान देवाणघेवाण व इतर अनेक. या संकल्पांना हात घालताना स्थानिक परिणामांची उदाहरणे घेतली जातील ज्याद्वारे परिणामांची मीमांसा करणे आणि ते सोप्या भाषेत उतरवणे सोपे पडेल.


या मालिकेचा हेतू जागतिक अर्थव्यवस्थेतील अदृश्य धागे दृश्यमान करणे हाच आहे. तुम्ही शेतकरी असाल, विद्यार्थी, कंत्राटी कर्मचारी, गृहिणी वा स्टार्टअप्सचा भाग – जागतिक वित्त भांडवल आणि धोरण निर्णय तुमच्या आयुष्याला कसे आकार देतात हे समजून घेण्यासाठी ही लेखमाला तुमच्यासाठी आहे. कारण शेवटी, भांडवल जागतिक असलं तरी, त्याचा भार स्थानिक खांद्यावरच असतो. म्हणूनच, जागतिक राजकीय अर्थव्यवस्था समजून घेणं हा निव्वळ बौद्धिक नव्हे, तर अस्तित्वाचा प्रश्न बनला आहे.

**लेखातील संदर्भासाठी खालील QR कोड स्कॅन करा :**



**लेखक किंग्स कॉलेज, लंडनमधील इंटरनॅशनल डेवलपमेंट आणि जियोग्राफी विभागात पीएच.डी. अभ्यासक आहेत. युनिव्हर्सिटी ऑफ ऑक्सफर्ड येथेही ते अध्ययन सहाय्य करतात. त्यांचे संशोधन मुख्यत: कामगार (श्रम), तंत्रज्ञान आणि सार्वजनिक वित्त यांच्या अर्थराजकीय व्यवस्थेवर केंद्रित आहे. संपर्क : ९६५७७९९९८६,**

**ईमेल :** hiteshdpotdar@gmail.com





# तुम्हांस काय हवे खासगीपणा की सुरक्षितता?



रवि आमले

पाळतशाहीच्या पाऊलखुणा – १



'राष्ट्र सर्वप्रथम' हा सुविचार ज्या देशात ठोकून ठोकून जनतेच्या गळी उतरवला जातो, तिथे खासगीपणाला थारा नाही, हे अप्रत्यक्षपणे सांगितले नि सुचवलेही जाते. इथे खासगीपणाचा विचार एकप्रकारे निषिद्ध ठरतो. खासगीपणाचा अर्थ आपण चार भिंतीत काय करतो हा नाहीच, तो व्यक्ती नि विचार स्वातंत्र्याशी निगडित आहे. व्यक्ती नि विचारस्वातंत्र्याचा संबंध प्रगतीशील–प्रतिमाशील–प्रज्ञाशील माणूस होण्याशी आहे. पण आज शासनसत्तेची एकाधिकारशाही आणि या एकाधिकारशाहीला पूरक असलेल्या भांडवलशाहीच्या युतीमधून पाळतशाहीचे पर्व आकारास येऊ पाहतेय. नागरिकांच्या बुद्धी आणि भावनेचा संकोच करणाऱ्या या व्यवस्थेचे पदर उलगडणारी ही लक्षवेधी लेखमाला...

तुम्ही राहताय त्या सोसायटीत हल्ली चोऱ्या खूप वाढल्यात. परवा कोणाला मारहाणही झाली. त्याच्या आधी एकाच्या कारची नासधूस करण्यात आली. मोटारसायकली पेटवून देण्याचा प्रयत्नही उघडकीस आला. एकाने मुलींची छेड काढली होती. मोठे प्रकरण झाले त्यावरून. शेवटी सोसायटीच्या बैठकीत ठरले, की सदस्यांची सुरक्षा महत्त्वाची. सोसायटीत पूर्वीसारखीच शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित झाली पाहिजे. चर्चेतून ठरले, की सोसायटीतील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची संख्या वाढवावी. प्रत्येक मजल्यावर प्रत्येकाच्या दारासमोर सीसीटीव्ही कॅमेरा हवा.

परवा कोणाच्या तरी दारातून तब्बल २० हजारांचे शूज चोरीस गेले. प्रवेशद्वारावर, उद्वाहनानजीक बायोमेट्रिक यंत्र बसवावे. तेथे अंगठा लावल्याशिवाय आत कोणालाही प्रवेश नाही. हल्ली ते डिलिव्हरीवाले सतत येतात. ते कोणाकडे आणि कधी येतात-जातात, काय आणतात याची नोंद सोसायटीच्या ॲपमध्ये करणे सक्तीचे. सोसायटीने इंटरकॉम बसवले आहेत. त्यावरून कोण कोणाशी बोलतोय, याची नोंद ठेवली जाणार. म्हणजे उगाच काही कलह नको.

...आता तुमच्या सोसायटीमध्ये शांतता आणि सुव्यवस्था आहे. सोसायटीतील प्रत्येक व्यक्तीवर सोसायटीच्या अध्यक्षांचे आणि सुरक्षा रक्षकांचे लक्ष आहे. तुम्ही वा तुमची पत्नी कधी घराबाहेर पडते, कधी परतते? तुमच्या घरी किती वेळा झोमॅटो आणि स्विगीवाले येतात? अशा सर्व गोष्टींवर नजर आहे. तुमचे वागणे, वावरणे आता सारे सीसीटीव्हीच्या 'कक्षे'त आहे. हे सर्व माहितीबिंदू एकत्र केले, की तुमचा मुलगा कामास जातो की घरीच पडून असतो, कन्येला किती मित्र-मैत्रिणी आहेत, बाहेरून काही मागवण्याची तुमची ऐपत वा सवय आहे की नाही, अशा अनेक गोष्टी सहज समजू शकतात. प्रश्न असा आहे, की तुमचा असा डेटा सोसायटीच्या सुरक्षा रक्षकाकडे जमा व्हावा, हे तुम्हांस चालेल? तुमच्यावर सतत अशी कोणी नजर ठेवून असलेले तुम्हाला चालेल? चालायला हवे. कारण अखेर हा प्रश्न शांतता आणि सुव्यवस्थेचा आहे. हे झाले सोसायटीपुरते.

पण तुमच्या इमारतीच्याबाहेर एक मोठे जग आहे. हिंस्र. भयंकर. तेथेही तुम्हाला सुरक्षितता हवी असेल, भयमुक्ती हवी असेल, तर याच गोष्टी, पण याहून मोठ्या स्तरावर चालायला हव्यात. तेथे प्रत्येकावर नजर ठेवायला हवी. लोक काय करतात एवढ्यापुरतेच ते असून चालणार नाही. लोक काय विचार करतात, काय योजना आखतात, हेही जाणून घ्यायला हवे. तरच चोरी-हत्यांपासून दहशतवाद, देशद्रोहापर्यंतच्या कारवाया रोखता येतील. याकरिता काय हवे, तर सर्वच नागरिकांवर सर्वंकष पाळत. आता यात तुमच्या खासगीपणावर- प्रायव्हसीवर- काही निर्बंध तर येणारच. त्यास नाइलाज आहे. तुम्हाला सुरक्षाही हवी आणि खासगीपणाही, सोसायटीत चोरीही व्हायला नको आणि सीसीटीव्ही कॅमेरापण नको, असे कसे चालेल, मित्रहो? की मग होऊ देत राडे? दहशतवादी हल्ले?

**भाकरी की स्वातंत्र्य?**

असा प्रश्न आला, की मग कसले स्वातंत्र्य आणि कसला खासगीपणा? इतिहास सांगतो, की खासगीपणा की सुरक्षितता असा पर्याय घेऊन जेव्हा जेव्हा सत्ताधीश आलेले आहेत, तेव्हा तेव्हा नागरिकांनी थेट सुरक्षिततेचीच निवड केलेली आहे. खासकरून दहशतवादी हल्ले, युद्धे यानंतरच्या परिस्थितीत हे मोठ्या प्रमाणावर होताना दिसते. दारात पायताण उतरावे, इतक्या सहजतेने माणसे आपल्या खासगीपणाचा त्याग करण्यास तयार होतात. भयाची, असुरक्षिततेची भावना त्यांना तसे करण्यास उद्युक्त करते. स्वाभाविकच आहे ते. अखेर ७० हजार वर्षांचे संस्कार आहेत ते.

आफ्रिकेतून पहिला स्थलांतरित बाहेर पडला, तो स्वातंत्र्यासाठी वा खासगीपणासाठी खचितच नव्हे. मानवी संस्कृतीत खासगीपणा हे मूल्य फार उशीराने आलेले आहे. तो आदिम मानव बाहेर पडला होता ते जीव जगवण्यासाठी. सुरक्षिततेसाठी. भाकरी की चंद्र, भाकरी की स्वातंत्र्य, यात त्याचे प्राधान्य नेहमीच भाकरीला होते. जीव जगवण्याला होते. भय आणि भूक हे त्याचे प्राथमिक उद्दिपन होते. त्यापासून सुरक्षितता - मानसिक आणि शारिरीक, दोन्हीही - ही जीवनावश्यक गरज होती. या सगळ्यात स्वातंत्र्याला महत्त्व असणार ते किती? आणि हा प्रश्न केवळ त्या काळाचा नाही. तो आजचाही आहे. माणसे स्वातंत्र्यासाठी, देशाच्या, समाजाच्या स्वातंत्र्यासाठी लढतात, हे खरेच. पण त्याच बरोबर इतिहासाने आपणांस हेही दाखवून दिले आहे, की स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ते स्वातंत्र्य कोणाच्या तरी पायी अर्पण करण्यातही माणसे धन्यता मानतात. म्हणूनच त्यांच्यासमोर जेव्हा स्वातंत्र्य, खासगीपणा की सुरक्षितता असे द्वंद्व असते,



*जनतेच्या सुरक्षेची ढाल पुढे करून सीसीटीव्ही तंत्रज्ञानाचा होणारा वापर नागरिकांचे स्वातंत्र्य कैद करणारा आहे...*

तेव्हा ते स्वाभाविकच सुरक्षिततेची निवड करतात. पूर्वी असाच एक प्रश्न विचारला जायचा. भाकरी हवी की स्वातंत्र्य? स्वातंत्र्यापेक्षा पोट भरणे महत्त्वाचे हे त्यात अभिप्रेत असायचे. पण त्यातून व्हायचे असे, की आधी स्वातंत्र्य जायचे आणि नंतर भाकरीही.

सुरक्षितता की खासगीपणा हा प्रश्नही असाच आहे. खासगीपणा हा वैयक्तिक स्वातंत्र्याचाच एक भाग. त्या स्वातंत्र्याचे अर्घ्य देऊन सुरक्षिततेचा स्वर्ग लाभतो, हे आपल्या समाजाने पाळलेले एक मिथक आहे. पिंजऱ्यात लाभते त्यास सुरक्षितता म्हणत नाहीत. परंतु या मिथकावर आजही असंख्य लोकांचा अगाध विश्वास आहे. आणि तो विश्वास दृढ व्हावा यासाठी सर्वच सत्ताधारी – मग ते राजकीय क्षेत्रातील असोत की कॉर्पोरेट विश्वातील – सतत प्रयत्नशील असतात. त्याचे परिणाम आता आपल्याकडे ठळकपणे दिसू लागले आहेत. ऑल्विन टॉफ्लर यांनी गणलेल्या तीन लाटांवर तरंगणारा आपला हा देश. अर्ध कृषी, पाव औद्योगिक व चतकोर 'सेवा'भावी तंत्रप्रधान असा. पण या देशातही आज पाळतशाहीच्या पाऊलखुणा उमटू लागलेल्या आहेत. हे का आणि कसे होत आहे, याचे सामाजिक आणि राजकीय परिणाम काय होत आहेत आणि काय होऊ शकतात, हा अनेकांच्या चिंतेचा विषय आहे. आणि म्हणूनच त्याचा ऊहापोह करणे आवश्यक ठरते.

या विषयाची मांडणी नेहमीच 'खासगीपणा विरुद्ध सुरक्षितता' अशा द्वंद्वात्मक चौकटीत केली जाते. ही बाब येथे लक्षणीय आहे. खरे तर हे या विषयाचे अतिसुलभीकरण झाले. पण ते – केवळ याच नव्हे, तर अशा अनेक विषयांबाबत – जाणीवपूर्वक केले जाते. याचे एक साधे कारण 'प्रोपगंडापंडित' अडॉल्फ हिटलर याने त्याच्या आत्मकथनात सांगून ठेवलेले आहे. तो सांगतो – सर्वसामान्य व्यक्तीच्या मनाला 'हे' किंवा 'ते' अशा 'बायनरी'मध्येच विचार करता येतो. साधू आणि सैतान या दोन्हींच्या मध्ये एखादा 'माणूस' असू शकतो असे सांगितले, तर तो गोंधळतो. त्याच्या मेंदूला ते पचवताच येत नाही. तेव्हा त्याला सांगायचे, नाण्याला केवळ दोनच बाजू असतात. त्याच्यासमोर चित्र रंगवायचे ते केवळ काळ्या–पांढऱ्या रंगात. त्यात एखादी करडी छटा असू शकते, असे त्याला चुकूनही सांगायचे नाही. खासगीपणाच्या अधिकाराविरोधातील प्रोपगंडात हेच तंत्र वापरले जाते. आणि तसे करणे सोपेही आहे. याचे कारण एक समाज म्हणून आपण कधीही खासगीपणा या संकल्पनेचा अर्थ आणि महत्त्व नीट ध्यानी घेतलेले नाही. व्यक्तीहून समष्टी मोठी या तत्त्वावर चालणाऱ्या समाजात तसेही व्यक्तीचे स्वातंत्र्य, खासगीपणा क्षुल्लकच ठरते. ते पाश्चात्य विचारखूळ गणले जाते.

**खासगीपणाच्या गप्पा फुकाच्या?**

वैयक्तिक बाबींची चर्चाही चव्हाट्यावर करणारा असा हा आपला समाज आहे. येथे कोणीही कोणालाही 'यंदा कर्तव्य आहे का' येथपासून 'पेढे कधी देताय' येथपर्यंत काहीही विचारू शकते. नोकरी, पगार, विवाह, कौटुंबिक वादविवाद, आजारपण अशा गोष्टी या आपल्या चावडीवरील चर्चेच्या असू शकतात. आणि कोणाच्याही घरी कोणत्याही वेळी जाणे यात काही गैर आहे असे आपल्याला अजूनही वाटत नाही. आपले हे गणमान्य सामाजिक वर्तन कशातून आले आणि कसे घडले हा समाजशास्त्रीय चर्चेचा वेगळा भाग. पण आहे हे असे आहे. परिणामी खासगीपणाला आपल्याकडे किंमत नाही. आठ वर्षांपूर्वी 'आधार'बाबतच्या खटल्याची सुनावणी सर्वोच्च न्यायालयात सुरू होती तेव्हाची ही गोष्ट. त्यावेळी आपले महान्यायवादी के. के. वेणुगोपाल यांनी, खासगीपणा या संकल्पनेस घटनात्मक संरक्षण देण्यास विरोध केला होता. त्यांनी न्यायालयात केंद्राच्या वतीने अशी भूमिका मांडली होती, की खासगीपणा ही खूप ढोबळ संकल्पना आहे. अन्न वा निवारा या हक्कांसाठी खासगीपणाला मागे ठेवले तरी चालेल. महान्यायवादी म्हणजे ॲटर्नी जनरल. ते केंद्र सरकारचे मुख्य कायदेशीर सल्लागार. अशी व्यक्ती जेव्हा सर्वोच्च न्यायालयात खासगीपणास कायदेशीर दर्जा देण्याच्या विरोधात भूमिका घेते, तेव्हा ती बाब आपण या संकल्पनेस किती महत्त्व देतो हेच स्पष्ट

करते. पुढे सर्वोच्च न्यायालयाने खासगीपणा हा व्यक्तीचा मुलभूत अधिकार असल्याचा अत्यंत महत्त्वपूर्ण असा निकाल दिला, हा भाग वेगळा. परंतु देशातील बहुसंख्य नागरिकांना खासगीपणाबाबत वाटत असलेल्या या अशा 'जिव्हाळ्या'मुळे त्यावर दिवसेंदिवस आक्रमण होताना दिसत आहे. हे केवळ भारतातच होत आहे, अशातला भाग नाही. हे केवळ सरकारकडून होत आहे, अशातलाही भाग नाही. माहिती-तंत्रज्ञान (आयटी) क्षेत्रातील अनेक बड्या आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांकडून नागरिकांच्या खासगीपणाच्या अधिकारावर हल्ले चढवले जात आहेत. सरकारी पाळतशाहीविरोधात बोलणाऱ्यांना गप्प करण्यासाठी हा एक मुद्दा मोठ्या हिरिरीने मांडला जात असतो. सांगितले जाते, की कशाला खासगीपणाच्या गप्पा मारता? ते तर तुमच्या ऑनलाइन अस्तित्वाने केव्हाच संपले. आणि त्यात खोटे काहीही नाही.

**पाळतशाहीतली अभद्र युती**

आपला अवघा सामाजिक-वैचारिक-आर्थिक-कौटुंबिक व्यवहार गुगल, मेटा आदी कंपन्यांच्या डोळ्यांदेखत सुरू आहे. आपण काय बघतो, वाचतो, खातो, पितो, खरेदी करतो, कसे आणि कुठे राहतो, कुठे जातो आणि येतो, कोणाशी बोलतो, कोणाला मत देतो, आपले विचार, आपल्या आवडी-निवडी, आपले आजार आपले सगळे जगणे यावर संगणक आणि मोबाइल या साधनांद्वारे नजर ठेवण्यात येत आहे. हे आपणा सर्वांनाच माहीत आहे आणि हे सारे आपल्याच डोळेझाक संमतीने चाललेले आहे. असे असताना सरकार जर तुमच्याच सुरक्षिततेसाठी तुमच्यावर पाळत ठेवत असेल, तर त्यावर एवढा गदारोळ करण्याचे काय कारण आहे? वरकरणी रास्तच आहे हा सवाल. पण त्यात एक समस्या आहे. गुगलादी कंपन्यांना आपली खासगी माहिती समजत असली, या कंपन्यांकडे अर्थसत्ता अमाप असली, तरी त्या आपल्याला शिक्षा नाही करू शकत. त्या आपला अवघा वर्तन-विचार-व्यवहार नियंत्रित करू शकतात. पण त्यांच्याकडे आपणास शिक्षा करण्यासाठी दंडशक्ती नाही. ती ताकद असते राज्यव्यवस्थेकडे. व्यक्तीच्या खासगी माहितीचा वापर करून, ही व्यवस्था कोणाचेही आयुष्य उद्ध्वस्त करू शकते. कोणालाही गणशत्रू ठरवू शकते. कोणालाही तुरूंगात डांबू शकते. हे झाले, सरकारच्या विरोधकांबाबत. पण जे सर्वसामान्य नागरिक आहेत, बिचारे कुणाच्या अध्यात-मध्यात नाहीत, झालेच तर सत्ताधारी नेत्याचे पोवाडे गात आहेत, त्यांच्यासाठीही ही चिंतेची बाब ठरू शकते. याचे कारण पाळतीच्या माध्यमातून सरकार त्यांचेही जीवन नियंत्रित करू शकते. जे नियंत्रण झुगारतील त्यांना शिक्षा करू शकते. आणि डोळे उघडे ठेवून नीट पाहिले, तर दिसेल, की हे आपल्या आजूबाजूला घडत आहे. त्यापासून कोणासही सुटका नाही.

याचा अर्थ या खासगी कंपन्या कमी धोकादायक आहेत असा नाही. त्या त्यांच्याकडील कृत्रिम प्रज्ञायुक्त संगणकीय तंत्रज्ञानाने नागरिकांना एकाच वेळी निव्वळ ग्राहक आणि 'कमॉडिटी' बनवत आहेत. त्यांचा एक वेगळाच 'सर्व्हेलन्स कॅपिटॅलिझम' अवतरलेला आहे. दुसरीकडे सरकारे, आम्ही तुम्हाला या कंपन्यांच्या पाळतशाहीपासून संरक्षण देऊ असे सांगताना, स्वतःकडील अफाट ताकदीच्या बळावर नागरी स्वातंत्र्य अधिकाधिक संकुचित करीत आहेत. यातही काळजीस आणखी कारण हे, की पाळतीच्या बाबतीत खासगी आणि सरकारी यांतील दरी केव्हाच संपलेली आहे. हे दोन्हीही एकमेकांस पूरक काम करीत आहेत. जेथे उघड उघड हुकूमशाही वा एकाधिकारशाही आहे त्या देशांचे विचारायलाच नको. तेथे जॉर्ज ऑर्वेलचे '१९८४'साल उजाडले आहेच. पण लोकशाही देशांतही पाळतशाही हळुहळू अवतरू लागलेली आहे. लोकशाहीत सर्वसामान्य नागरिक सार्वभौम असतात असे म्हणतात. ते सार्वभौमत्व लोकांच्या हातातून निसटू लागलेले आहे. एकंदरच सत्तेचे 'डायनॅमिक्स' यामुळे मोठ्या प्रमाणावर बदलत चालले आहे.

या विरोधात लढायचे, तर सजगता हवी. हे नेमके काय आणि कशा प्रकारे चाललेले आहे, खासगीपणा म्हणजे काय, पाळतशाही कशाला म्हणतात, यात सुरक्षिततेचा मुद्दा कुठे येतो, आदी बाबींची प्राथमिक माहिती तरी करून घ्यायला हवी. त्या करीता प्रथम समजून घेतला पाहिजे पाळतशाहीचा प्रवास...

**रवि आमले हे ज्येष्ठ पत्रकार-संपादक, प्रथितयश लेखक आणि भाष्यकार आहेत. त्यांची प्रोपगंडा, रॉ: भारतीय गुप्तचर संस्थेची गूढ गाथा, मॅनहंट (अनुवादित), परकीय हात, वरुण ते बहिर्जी आदी पुस्तके वाचकप्रिय ठरली आहेत.**
**संपर्क:** ravi.amale@icloud.com

# महात्मा गांधी मार्गावरचा इनर मंगोलिया



गजानन जोशी

शोधक नजर







**आ**जच्या घडीला जगाची अमेरिका आणि चीन अशा दोन ध्रुवांमध्ये विभागणी होऊ पाहतेय. चीनचे आर्थिक, उद्योग क्षेत्रीय विश्वव्यापी वर्चस्व बलाढ्य अमेरिकेलाही आव्हान देऊ लागले आहे. या मागे, चीनने शोध-संशोधन क्षेत्रात घेतलेली विलक्षण आघाडी, चीनमध्ये आकार घेत घेतलेली शोध-संशोधनास पोषक संस्कृती आहे. विज्ञान किंवा वैज्ञानिक दृष्टिकोन हा चिनी समाजाच्या दैनंदिन जगण्याचाच एक भाग बनला आहे. चीनचे हे रुप विलोभनीय म्हणावे असे आहे. त्याचाच माग काढणारा गांधीविचारांनी जोडलेल्या, चीनचा भू भाग असलेल्या इनर मंगोलियातल्या अनुभवांवर आधारित हा लेख...

चीनमध्ये कामाच्या निमित्ताने साधारण चार वर्षे राहिलो. व्यवसायाच्या निमित्ताने खूप ठिकाणी (मोठी शहरे, लहान गावे, छोटी शहरे) भेट देण्याची संधी मिळाली. कोळशावरती आधारित वीज निर्मितीला लागणारी यंत्र उत्पादन कंपन्या, छोटी संयत्र उत्पादन करणाऱ्या कंपन्या तसेच वीज निर्मिती करणाऱ्या केंद्रांना देखील भेट देण्याची संधी मिळाली. प्रत्येक ठिकाणी अतिशय अद्ययावत यंत्र तसेच त्यांना चालविण्यासाठी अतिशय उत्तम शिक्षित लोकांचा समूह आणि अतिशय सुधारित प्रणाली बघायला मिळत होते.

असेच एक दिवस चीनमधील इनर मंगोलिया या राज्यातील होहोट या गावी भेट देण्याची संधी मिळाली. सर्वत्र वाळवंटी प्रदेश असलेले राज्य त्यामधील होहोट हे राजधानीचे शहर, अतिशय प्रगतीशील आणि सुंदर शहर. येथे कोळशावरती वीज निर्मिती करणारे महाकाय प्रकल्प वीज निर्मिती करत आहेत आणि चीन मधील बिजिंग आणि इतर शहरांना वीज पुरवठा करत आहेत. इतका दूरगामी प्रदेश असून देखील अतिशय प्रगतशील सुविधा आहेत.

अर्थात मंगोलिया म्हटले, की चिंगीस खान आणि त्याचे कारनामे आठवतात. इनर मंगोलिया हा भाग चीनने मंगोलिया पासून घेतलेला आहे. येथे मूळ मंगोलियाच्या खुणा दिसतातच. या प्रदेशात फिरत असताना, मूळ मंगोलियाच्या हद्दीपर्यंत जाण्याचा योग आला. हा काळ होता २००९-२०१० चा. तेव्हापासून मंगोलिया या देशाला भेट देण्याची प्रचंड इच्छा मनात उत्पन्न झाली.

व्यवसायाच्या निमित्ताने मंगोलियाला भेट देण्याचा योग २०१८ साली आला. मंगोलिया येथे सौर ऊर्जा प्रकल्पांची निर्मिती करण्यासंदर्भात तेथील काही उत्पादक संस्था, सरकारी कार्यालये, मंगोलिया सरकार मधील मंत्री यांच्याबरोबर चर्चा करणे आणि त्यांना काही चांगले पर्याय सुचवणे हा एकंदरीत उद्देश होता. आम्ही उलानबटार या राजधानीच्या गावी साधारण ३-४ दिवस राहिलो होतो. जवळपासच्या काही गावांना भेटी दिल्या होत्या.

**महत्त्व व्यावहारिक शिक्षणाचे**

आमचा मित्र/व्यवसायिक सहकारी दाशदोर्ज यागान हा आमच्याबरोबर असायचा. दाशदोर्ज हा व्यवसायाने आर्थिक सल्लागार, अमेरिकेमध्ये शिकलेला. त्याने तेथे अद्ययावत शाळा चालविली आहे. त्याचप्रमाणे तेथील महत्त्वाच्या विश्वविद्यालयाचा तो उपाध्यक्ष देखील आहे. आमच्या कामाच्या व्यतिरिक्त दाशदोर्ज मला तेथील शाळेमध्ये घेऊन गेला. अतिशय उत्तम शिक्षक आणि अद्ययावत प्रयोगशाळा तेथे आहेत. तेथील शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या समोर मी सौर ऊर्जा संदर्भात छोटेसे भाषण दिले. शाळा कशा पद्धतीत सौर ऊर्जा प्रकल्प आपल्या फायद्यासाठी उभारणी करू शकतात, हे सांगितले. महत्त्वाचे म्हणजे, शिक्षक आणि विद्यार्थी यांनी अतिशय उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन प्रश्न-उत्तरे झाली. सर्वांमध्ये शिकण्याबद्दलची इच्छा आणि आशा दिसली.

दाशदोर्जनी त्यानंतर सौर ऊर्जा याविषयांवर एक प्रशिक्षण वर्ग सुरू करण्याची कल्पना मांडली. आम्ही त्याबद्दल सविस्तर चर्चा करून त्याला मूर्त स्वरूप देण्यापर्यंत आलो असताना कोविडची महासाथ सुरू झाल्यामुळे ती कल्पना बाजूला राहिली. आता यावर्षी पुन्हा त्याची चर्चा सुरू झाली आहे आणि लवकरच प्रशिक्षण सुरू होईल, अशी शक्यता आहे.

महत्त्वाची बाब ही आहे, की चीन असू दे अथवा मंगोलिया दोन्ही देशांमध्ये मला शिक्षण-प्रशिक्षण-विद्यार्थ्यांसाठी व्यावहारिक (प्रॅक्टिकल) शिक्षण याला महत्त्व देत असल्याचे प्रकर्षाने जाणवले. या शिक्षण-प्रशिक्षण-प्रॅक्टिकल प्रशिक्षण याबद्दल चीनबद्दल मला काही सविस्तर लिहिण्याची फार इच्छा आहे. ते मी 'मुक्त संवाद'च्या माध्यमातून यथावकाश लिहीनच, परंतु एक डोळे आणि कान उघडे ठेवून फिरणारा प्रवासी म्हणून-व्यवसायाच्या निमित्ताने झालेले संवाद आणि आलेले अनुभव या अनुषंगानेही मी लिहिणार आहे. त्यामध्ये एक शोधक वा संशोधकाच्या पातळीवर कदाचित मी अपुरा पडेन. परंतु, शोध-संशोधनाचे महत्त्व जाणलेल्या चीनबद्दलची एक नवीन माहिती देण्याचा मी प्रयत्न करणार आहे. संशोधक आणि इतर मान्यवरांना जर त्याचा फायदा झाला तर उत्तमच आहे.

**निमित्त गांधीजींचे... त्यांच्या वैश्विक उंचीचे**

या लेखाच्या निमित्ताने माझ्या मंगोलियामधील भेटी मध्ये २०१८ साली आलेला अतिशय हृद्य आणि अविस्मरणीय अनुभवाबद्दल सांगणार आहे. हा अनुभव आहे, महात्मा गांधी यांच्याबद्दलचा आणि त्यांच्या वैश्विक महात्म्याचा. याबद्दलची थोडीशी पार्श्वभूमी सांगणेही जरूरीचे आहे. मी २०१८ साली मंगोलिया या देशाला भेट दिली त्याच्या अगदी काही दिवस आधी भारतामध्ये २०१८ मध्ये सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे (Statue of Unity) अनावरण झाले



*चीनचा भू भाग असलेल्या इनर मंगोलियातले प्रगतीत्सुक चेहरे... दाशदोर्ज यागान, त्याचा सहकारी आणि शाळेच्या प्रयोगशील मुख्याध्यापिका बाई...*

होते. हा पुतळा आज जगातील सर्वात उंच पुतळा आहे. त्यावेळेस माझ्या मनात आलेले काही विचार येथे मांडणे संयुक्तिक ठरेल असे वाटते.

ज्या राजकीय आणि सामाजिक विचारधारेवरती विश्वास ठेवणारे सरकार आहे, त्यांनी सरदार पटेल यांचाच पुतळा (या पुतळ्याशी जोडलेले जातीचे राजकारण होते, हे गृहीत धरूनही) का उभा केला? त्यांच्या विचारधारेतील एखाद्या मोठ्या व्यक्तीचा का उभा केला नाही? याचा अर्थच त्यांना त्यांच्या विचारधारेमधील या तोडीची किंवा या उंचीची व्यक्ती मिळाली नसेल की, जी Statue of Unity म्हणजेच सगळ्यांना एकत्र सामावून घेणारी असेल. या संघटना फक्त नेहरूंचा विरोध म्हणून अशा काँग्रेसमधीलच इतर व्यक्तींना आपलेसे करण्याचा प्रयत्न करीत असतील का? त्यामुळेच कधी सरदार पटेल तर कधी कॅप्टन सुभाषचंद्र बोस त्यांना हवे असतात का? या विचारधारेतील मुख्य संघटनेने नुकतेच १०० वर्ष साजरे केले. त्यांच्या आजोबा–खापर पणजोबांच्या मूर्ती का उभ्या केल्या नाहीत? त्यांनी भारताच्या स्वातंत्र्य चळवळीमध्ये भाग घेतला नाही म्हणून हा त्यांच्या मनातला एक न्यूनगंड त्यांना मनातून खातोय का? सरदार पटेल हे नेहमीच सच्चे काँग्रेसवादी आणि महात्मा गांधींचे अनुयायी राहिले आहेत. मग तरीही त्यांचीच मूर्ती का?

स्वातंत्र्यासाठीचा लढा गांधीजींच्या नेतृत्वाखाली नेहरू–पटेल–बोस आणि इतर सर्व नेत्यांनी लढला आणि देशाला स्वातंत्र्य मिळाले. नेहरू आणि पटेल हे कायम एकत्र होते. काही विषयांवर त्यांचे मतभेद असतीलही, परंतु ते बऱ्याच काँग्रेसमधील नेत्यांच्या बाबतीत सांगता येतील. हेच खऱ्या लोकशाहीचे लक्षण आहे. नेहरू आणि पटेल तसेच त्यांचे इतर सहकारी हे या लोकशाहीतलेच पाईक होते. नेहरू आणि सरदार यांचे नाते म्हणजे 'दो जिस्म मगर एक जान है हम' असे होते. हे यांना कसे समजणार ज्यांना फक्त नेहरू पहिले पंतप्रधान झाले म्हणून या कारणासाठी राग आहे. ही मंडळी हे देखील विसरतात की सरदार पटेल यांचा मृत्यू पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी म्हणजेच, १९५२ पूर्वी झाला होता. कधी–कधी माझ्या मनात एक प्रश्न येतो, की समजा सरदार पटेल यांना आणखी आयुष्य मिळाले असते, देवाच्या कृपेने आणि समजा ते पहिले पंतप्रधान झाले असते, तर या लोकांची प्रतिक्रिया काय झाली असती? थोडा विचार केल्यावर माझ्या लक्षात आले, की आज कदाचित या लोकांनी सरदार पटेल यांना प्रत्येक गोष्टींसाठी दोष दिला असता आणि कदाचित प्रयाग राजला (अलाहाबाद) पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जगातील सर्वात उंच पुतळा त्रिवेणी संगमावर उभा राहिला असता आणि त्याला पुन्हा Statue of Unity या नावाने संबोधण्यात आले असते. गंगा मैया का बडा सपुत म्हणून त्यांचे पूजन केले गेले असते. सरदार पटेल जर पहिले पंतप्रधान झाले असते, तर नेहरूंनी त्याचा आनंदाने स्वीकार केला असता. आणि देशाचे देखील तेवढेच भले झाले असते. कदाचित मग बंदी उठलीच नसती का? हा विचार मनात येतो. असो.

**आव्हानात्मक गांधीमार्ग**

या पार्श्वभूमीवर आणि हे विचार मनात असताना मी मंगोलियामध्ये कामानिमित्त गेलो असताना उलानबटार मधील महत्त्वाच्या रस्त्यावरून गाडीतून प्रवास करत होतो. थोड्याच वेळापूर्वी मंगोलियाच्या एका वरिष्ठ मंत्र्यांबरोबर बैठक झाली होती. मी आणि माझा मंगोलियाचा मित्र दाशदोर्ज त्याबद्दलच चर्चा करत निघालो होतो. आणि अचानक माझ्या उजव्या बाजूला Mahatma Gandhi Street या नावाचा रस्ता दिसला. आमची गाडी थोडीशी पुढे निघून गेली होती. मी लगेच दशदोर्जला गाडी वळवून महात्मा गांधी रस्त्यावर घ्यायला सांगितले. दाशदोर्जने देखील ऐकले आणि गाडी वळवून त्या रस्त्यावर घेतली.

त्या महात्मा गांधी मार्गाने जाताना माझे मन अतिशय आनंदित झाले होते. चीन आणि रशिया यांच्यामध्ये असलेला मंगोलिया, या दोन्ही देशांच्या दबावाखाली आणि प्रभावाखाली असलेला मंगोलिया, अतिशय मोठा भाग हा डोंगराळ–

वाळवंटी असलेला असा हा मंगोलिया आणि तेथे चक्क महात्मा गांधी मार्ग... कोणत्याही भारतीयाला अभिमान वाटावा असे हे दृश्य. त्या रस्त्याने जात असताना मला अतिशय उत्सुकता होती की या रस्त्यावर काय बघायला मिळेल. रस्त्यांच्या अगदी शेवटी एक छोटी बाग (ज्येष्ठ नागरिक आणि मुलांसाठी खेळण्यासाठीची व्यवस्था) होती आणि त्याला 'महात्मा गांधी गार्डन' नाव दिले होते.

या गार्डनमध्ये एक चौथरा उभारला होता, ज्याच्यावर महात्मा गांधी यांचा पूर्णाकृती पुतळा उभा होता. मी जाऊन प्रथम अभिवादन केले. त्यापूर्वी आणि त्यानंतरही बऱ्याच देशांना आणि गावांना भेटी दिल्या, तेव्हा बरेच पुतळे बघायला मिळाले आहेत. त्या व्यक्तींच्या आयुष्याबद्दल आणि कार्याबद्दल मला नेहमी उत्सुकता राहिली आहे. चीनमध्ये माओ, डेंग, डॉ. कोटनीस, व्हिएतनाममध्ये हो ची मिन्ह, अमेरिकेमधील नेत्यांचे पुतळे. परंतु फक्त आणि फक्त त्यांचे कर्तृत्व-काम-समाजामध्ये घडवलेले बदल हेच विचार माझ्या मनात नेहमी असताना मंगोलियामध्ये मात्र मला या पुतळ्याच्या उंचीबद्दल उत्सुकता लागली. हा पुतळा २००५ साली उभारला गेला, ज्यावर्षी भारत-मंगोलिया या देशांच्या मित्र संबंधाला ५० वर्षे झाली त्या महत्त्वाच्या प्रसंगाच्या आठवणींसाठी.

**कार्याची व्याप्ती मोठी, प्रेरणेचा परीघ मोठा**

इथे मी मनात दाटून आलेल्या या अभावित कुतूहलाबद्दल आश्चर्य वाटून घेऊ लागलो. कधीही कुणाच्याही कार्यावर पूर्ण लक्ष देणारा, आज मात्र गांधींच्या पुतळ्याच्या उंचीबद्दल विचार करू लागलो. महान व्यक्तींच्या कार्याबद्दल आपण नेहमी लक्ष केंद्रित करतो, जाणून घेतो, त्यातून बोध घेतो, काही शिकवण अमलात आणण्याचा प्रयत्न करतो. एखादा शिंपी अशा मोठ्या लोकांचे कपडे शिवत असताना त्यांची उंची जरूर मोजत असणार, परंतु असे शिंपी देखील प्रत्यक्ष उंची नंतर विसरत असणार, कारण ते देखील अशा महान व्यक्तींच्या कार्याचाच कायम विचार करत असणार. परंतु महात्मा गांधीजींच्या बाबतीत शिंपी तरी कोठून मिळणार, कारण हा तर नंगा फकीर फक्त पंचा आणि अंगावर देखील एक पंचा पांघरूनच जगाला मार्गदर्शन करत होता.

अशा या नंगा फकिराने सर्व जगाला मोहित केले होते आणि अजूनही करत आहे. या विश्वातील प्रत्येक मानवतावादी लढ्याला याने प्रेरणा दिली. लोकांनी आनंदाने लाठ्या-काठ्या झेलल्या, तुरुंगवास भोगले ते फक्त या महामानवावर विश्वास ठेवून. याची उंची प्रत्यक्ष किती होती किंवा यांच्या पुतळ्याची उंची किती आहे, याला कधीच कोणी महत्त्व दिले नाही. कारण यांचे काम महत्त्वाचे आणि अतिशय मोठे होते आणि आजही प्रेरणा देत आहे.

वेगवेगळ्या देशांमध्ये कित्येक नेते सामान्यातून पुढे आले आणि त्यांनी आपल्या देशातील नागरिकांसाठी लढे दिले. यांचे प्रेरणास्थान कोण होते किंवा आहे? एकच उत्तर मिळते ते म्हणजे, या सगळ्यांचा सोबती, प्रेरणास्थान, गुरू, प्रकाशघर आणि मार्गदर्शक आहेत, महात्मा गांधी. आज देखील २१ व्या शतकात महात्मा गांधीच. शास्त्रज्ञ आइनस्टाइन देखील नतमस्तक होतात, ते उंची पाहून नाही तर कार्य आणि प्रेरणा पाहून.

**प्रतीक वैश्विक एकतेचे**

त्यामुळे कोणताही पुतळा कितीही मोठा बनवा, जगात अतिउत्तुंग बनवा त्यांच्या समोर महात्मा गांधीजींचा पुतळा कित्येक मीटर उंचीनी उंचच असणार. सरदार पटेल हे गांधीजींचे सच्चे अनुयायी होते. त्यांना जर विचारले असते, तर त्यांनी देखील खडसावून सांगितले असते, की संपूर्ण विश्वात फक्त एकच व्यक्ती सगळ्यात उंच आणि ती म्हणजे महात्मा गांधी. ते स्वतः म्हणाले असते, माझा जर Statue of Unity असेल महात्मा गांधी म्हणजे Statue of Universal Unity.

एक महत्त्वाची घटना सांगायची राहून गेली. जेव्हा आम्ही उलानबटार रस्त्यावर गाडीने चाललो होतो, तेव्हा प्रचंड रहदारी होती. अक्षरशः मुंगीच्या गतीने गाड्या चालल्या होत्या. जेव्हा मी दाशदोर्जला गाडी माघारी वळवून महात्मा गांधी रस्त्यावर घ्यायला विनंती केली, तेव्हा या ट्राफिकमुळे त्याने बराच वेळ विरोध केला. परंतु मी पण गांधीजींचाच अनुयायी आहे. दाशदोर्जला वेगवेगळ्या पद्धतीने गांधीजी म्हणजे काय, गांधीजी का मोठे हे सांगण्याचा प्रयत्न करत होतो. शेवटी दाशदोर्ज तयार झाला आणि गाडी वळवली.

**गांधीजींचा तत्त्वविचार**

आपल्या भारतातील मोठ्या शहरांमधील प्रचंड वाहतूक देखील त्याच्यासमोर शुल्लक वाटावी इतकी प्रचंड वाहतूक उलानबटारच्या रस्त्यांवर नेहमीच असते. आमची गाडी जशी महात्मा गांधी रस्त्याला लागली, तेव्हा तर त्या रस्त्यावर




*शोध-संशोधनात जगाचे नेतृत्व करण्याची अफाट क्षमता असलेल्या चीनने हरित उर्जेच्या क्षेत्रात घेतलेली आघाडी डोळे दीपवून टाकणारी आहे...*

आणखीनच दाटी होती. त्याक्षणी मला आणखीन एक जाणीव झाली की गांधीजींच्या मार्गावरून चालणे म्हणजे सोपे नाही. गांधी जर समजून घेतले नाही तर गांधीजींच्या रस्त्यावरून चालणे, तर आणखीनच अवघड.

गांधीजींच्या मार्गावरून जाण्यासाठी शरीराची उंची नाही, तर विचारांची खोली आणि उंची समजली तर मग रस्ता अतिशय सुकर. गांधीजींचा चश्मा घातला तरी दृष्टी कशी येणार? त्यासाठी पुन्हा महात्मा गांधींचे बाह्यरूप नाही तर विचारांची आणि कार्याची खोली आणि उंची समजावून घेणे महत्त्वाचे आहे. त्यामुळेच महात्मा गांधींचा पुतळा लहान की मोठा यावर त्याचे महत्त्व नाही, तर तो इतका मोठा आहे त्याला सर्व जग Statue of Universal Unity म्हणून समजणार.

महात्मा गांधी यांचे पुतळे आपण सगळ्यांनी बऱ्याच गावांत आणि देशात बघितले आहेत. परंतु मंगोलियामध्ये या पुतळ्या संदर्भात आणखी एक महत्त्वाची बाब सांगणे फार आवश्यक वाटते. या पुतळ्याच्या चौथऱ्याच्या एका बाजूवर गांधीजींनी घातक पाप (सात घातक पापे) जी सांगितली आहेत ती उद्धृत केली आहेत. जी पुढीलप्रमाणे आहेत: १)Wealth without Work (कार्याशिवाय संपत्ती), २)Pleasure without Conscience (विवेकाशिवाय आनंद), ३)Knowledge without Character (चारित्र्यहीन ज्ञान), ४)Commerce without Morality (नैतिकताहीन व्यापार), ५)Science without Humanity (मानवतेशिवाय विज्ञान), ६)Religion without Sacrifice (त्यागाशिवाय धर्म) आणि ७) Politics without Principle (तत्वाशिवाय राजकारण) महात्मा गांधी म्हणजे, ही तत्त्वे समजून घेणे आणि अमलात आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणे. महात्मा गांधी म्हणजे, फक्त २ ऑक्टोबर आणि ३० जानेवारी नाही तर महात्मा गांधी म्हणजे, दररोज, ३६५ दिवस आणि २४ तास!

ज्यांना महात्मा गांधी म्हणजे, फक्त एक चतुर बनियाच वाटतो त्यांना हा बायोलॉजिकल महामानव महात्मा समजण्या पलीकडचा आहे. अशा महात्म्याच्या एका बाजूला पंडित जवाहर लाल नेहरू, तर दुसऱ्या बाजूला सरदार वल्लभभाई पटेल नेहमी असायचे. हे दोन्हीही उत्तुंग व्यक्तिमत्त्वे परंतु Statue of Universal Unity च्या समोर त्यांना आपल्या उंचीची पूर्णपणे जाणीव होती. त्यामुळेच या महान महात्म्याचे विचार ते दोघे आदरपूर्वक आणि अतिशय विनम्रपणे ऐकायचे आणि त्याबरोबर आपली वाटचाल करायचे.

**गजानन जोशी नामवंत ऊर्जानिर्मिती तज्ज्ञ, भाष्यकार आहेत. समाज, साहित्य आणि कला हे त्यांचे चिंतन आणि आस्वादनाचे विषय आहेत.**

**संपर्क :** joshigajanan@hotmail.com

## आमचे पाठीराखे

समतावादी मुक्त-संवाद पत्रिका

**कुमार केतकर, हुसेन दलवाई, रवींद्र टी. प्रधान, जयराज साळगावकर, दत्ता नायक, टी. जगत, विनोद शिरसाठ, डॉ.आनंद जोशी-सुमती जोशी, आशिष पाटकर, डॉ.दिलीप खताळ, डॉ.प्रदीप कर्णिक, प्रसाद केरकर, अतुल देऊळगावकर, डॉ.अजित जगताप, डॉ.रेखा शेळके, प्रशांत पवार, डॉ.मदार काळे, सुशीलकुमार शिंदे, विकास महाडिक, दत्ता बाळसराफ, चिन्मय दामले, प्रशांत खुंटे, प्रा. राजेंद्र भोईवार, सचिन परब, पांडुरंग शिवलकर, सोहन भांगले, अविनाश हावळ, प्रभाकर कुंभार.**

# नेक्सपेरिया म्हणजेच, गुजरा हुआ जमाना



डॉ. मोहन द्रविड

विश्वकारण




सुंभ जळला तरी पीळ जात नाही... अशीच काहीशी परिस्थिती युरोपखंडाची झाली आहे. इ.स. १५०० साली जगाच्या इतिहासाचं युरोपचं सुवर्णयुग सुरू झालं. त्या आधीच्या दशकात अरबांना स्पेन सोडावा लागला (इ.स. १४९२) आणि पृथ्वीच्या पश्चिम गोलार्धाचा शोध लागला (इ.स. १४९२). त्याच वेळी आशिया खंडात जायचा समुद्रमार्ग सापडला (इ.स. १४९८). त्यानंतरची पाचशे वर्षं युरोपीयांनी पृथ्वीतलावर राज्य केलं. त्या काळात युरोपमध्ये अद्वितीय अशी वैचारिक क्रांती झाली. त्याचे वैज्ञानिक आणि राजकीय असे दोन भाग होते. आजच्या जगातील मुख्य दोन राजकीय मतप्रवाह–लोकशाही आणि मार्क्सवाद – हे या वैचारिक क्रांतीतून जन्माला आले. जगरहाटीप्रमाणे जेते पराजितांवर जसा अन्याय करतात तसा युरोपने बाकीच्या लोकांवर केला हे जरी खरं असलं, तरी अज्ञानाच्या अंधःकारातून त्याने जगाला प्रकाशात आणलं, हे एक प्रकारे युरोपचे जगावर अनंत उपकार आहेत. दुर्दैवाची गोष्ट ही, की तोच युरोप आज स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेत आहे. त्यामागे स्वतःबद्दलच्या अवास्तव कालबाह्य कल्पना हे एक महत्त्वाचं कारण आहे...

युरोपखंडात लहानमोठी तीस राष्ट्रं आहेत. त्यांची एक व्यापारी संघटना आहे (युरोपीय संघ उर्फ EU) आणि एक लष्करी संघटना (नेटो) आहे. काही अपवाद सोडता बहुतेक राष्ट्र दोन्हींचे सभासद आहेत. अमेरिका आणि कॅनडा हे युरोपबाहेरील देश नेटोचे सभासद आहेत. तसं म्हटलं तर दोन्ही संघटना एकमेकांशी इतक्या एकरूप झाल्या आहेत, की त्या दुसऱ्याच्या क्षेत्रात सफाईदारपणे मतांच्या पिचकाऱ्या टाकत असतात. हल्ली, विशेषतः एकविसाव्या शतकात, त्या अमेरिकानामक मालकाभोवती घिरट्या मारत कावकाव करत फिरत असतात. त्यातही एक नियम आहे. जेवढा आकार लहान, तेवढी मस्ती जास्त. बॉल्टिक समुद्राजवळ तीन राष्ट्रं आहेत. त्या तिघांची मिळून वस्ती असेल, जेमतेम साठ लाख, म्हणजे आपल्या पुणे शहरापेक्षाही कमी. पण ती सतत रशिया किंवा चीनशी पंगा घेण्याच्या उद्योगात असतात.

दुसरं महायुद्ध संपून या वर्षी ८० वर्षं पुरी झाली म्हणून रशियाने मे महिन्यात आणि चीनने सप्टेंबर महिन्यात जंगी लष्करी कार्यक्रम केले, तेव्हा युरोपीय संघाच्या परराष्ट्रमंत्री बाईंनी असे उपहासात्मक उद्‌गार काढले, दुसऱ्या महायुद्धात चीन आणि रशिया यांनी भाग घेतला होता, हे कधी ऐकण्यात नव्हतं. या विदुषीबाई युरोपच्या परराष्ट्रमंत्री व्हायच्या आधी इस्टोनियानामक बॉल्टिक देशाच्या पंतप्रधान होत्या, हे लक्षात घेतलं म्हणजे, त्यांच्या चमत्कारिक विधानांचा अर्थ लागतो!

**युरोपीयांची दादागिरी**

त्या मानाने नेदरलँड्स (किंवा ज्याला कधीकधी हॉलंड म्हटलं जातं) मोठा. त्याची वस्ती दोन कोटीच्या आसपास. त्याचा इतिहास खरं म्हटलं तर वैभवशाली आहे. १५९० ते १६९० या शंभर वर्षांच्या काळात तो देश जगात सर्वांच्या पुढे होता. त्या वेळी जगाच्या सत्तर टक्के व्यापारी बोटी त्याच्या होत्या. डच ईस्ट इंडिया कंपनी ही जगाच्या इतिहासातील पहिली मल्टी नॅशनल कंपनी. ॲमस्टरडॅम स्टॉक एक्चेंज हे जगातलं पहिलं स्टॉक एक्चेंज. व्यापार-आधारित भांडवलशाही (Merchant Capitalism) इथे सुरू झाली. त्याच्या आधी (पंधराव्या आणि सोळाव्या शतकात) आघाडीवर असलेले स्पेन आणि पोर्तुगाल हे देश या शतकापासून मागे पडायला लागले होते, तेव्हा स्पर्धा नेदरलँड्स आणि इंग्लंडमध्ये चालू झाली होती. पण इंग्लंडला नशिबाने साथ दिली आणि नेदरलँड्स मागे पडला. पश्चिम गोलार्धात अमेरिकेतली न्यूयॉर्कसारखी (मूळचं नाव न्यू हॉलंड) राज्ये नेदरलँड्सने जिंकली होती. ती गेली. पूर्व गोलार्धातील ऑस्ट्रेलियाही (याचंही मूळचं नाव न्यू हॉलंड) गेलं. एक इंडोनेशिया मात्र १९४० साली जपानचं आक्रमण होईपर्यंत डचांनी सांभाळून ठेवलं होतं.

एवढं झालं तरी डचांचा ताठा कमी झाला नाही. विशेषतः गोऱ्या लोकांमध्ये असलेल्या श्रेष्ठत्वाच्या भावनेत घट झाली नाही. चीन तर बोलून चालून पिवळ्या कातडीचा देश. रशियाला जिथे निकृष्ट वंशाचं समजलं जातं, तिथे चीन म्हणजे किस झाडकी पत्ती! दुसऱ्या महायुद्धात रशियाकडून सडकून मार खाल्यापासून युरोपला रशियाची काही काळ दहशत होती. तसंच रशियाचे टॉलस्टॉय, डोस्टोएव्हस्की हे लेखक किंवा चायकाव्हस्की हा संगीतकार यांची कमीत कमी तोंडओळख असल्याने रशियन संस्कृती अगदी परकी नव्हती. पण चीनच्या बाबतीत आनंदच असतो. सध्या चालू असलेल्या चीन आणि जपान यांच्यातील भांडणाच्या संदर्भात बी. बी. सी.च्या एका पंडिताने पुढील प्रश्न निष्पापपणे विचारला होता, चीनचा जपानवर एवढा राग का? दुसऱ्या महायुद्धात जपानने चीनच्या दोन कोटी लोकांना निर्दयपणे मारले होते, एवढी गोष्ट लाखो पौंड पगार घेणाऱ्या या विद्वानाला माहीत नसावी, हे पटत नाही. कोणे एके काळी चीनने बंदुकीची दारू, लोहचुंबक, कागद, शाई असले महत्त्वाचे शोध लावले असतील. आता लांड्यालबाड्या करून, पाश्चात्यांच्या शोधांची चोरी करून, पैसे कमावलेत. पण त्यामुळे त्यांचा दर्जा काही उंचावत नाही. अशी युरोपची सर्वसाधारण विचारसरणी आहे.

**मक्तेदारीचा माज**

दुसऱ्या महायुद्धात पिवळ्या कातडीच्या जपानकडून मार खाल्ला असला तरी गोऱ्या कातडीच्या अमेरिकन लोकांनीच शेवटी जपानला नमवलं, याचा अभिमान होता. त्यानंतरची अनेक दशकं सुखासमाधानात गेली. चीन आणि रशिया ही राष्ट्रंसुद्धा पाश्चिमात्यांच्या धाकात होती. एकाकडून चीजवस्तू स्वस्तात मिळत होत्या आणि दुसऱ्याकडून ऊर्जा. २००८ सालानंतर सर्व चित्र बदललं. घरांना कमअस्सल तारणांवर दिलेल्या कर्जांमुळे अमेरिकन व अनुषंगाने इतर पाश्चिमात्य राष्ट्रांची अर्थव्यवस्था डबघाईस आली. याउलट चीनची अर्थव्यवस्था दौडाने धावत होती. २००८ साली चीनमध्ये झालेल्या देदीप्यमान ऑलिंपिक्स सामन्यांमुळे पाश्चिमात्यांच्या

अंगाची लाहीलाही झाली. त्यांना साठ वर्षांपूर्वीचा हॉलिवुडच्या चित्रपटात दाखवतात तो चिनी माणूस आठवला, कळकट्ट, शेंडी वाढवलेला, आज्ञाधारक, वर तोंड करून न बघणारा! काही करून मिळेल तसा चीनचा पाणउतारा करायचा विडा लहानमोठ्या पाश्चिमात्य राष्ट्रांनी उचलला.

आपणही या सत्कृत्याला हातभार लावावा, अशी इच्छा नेदरलँड्सच्या मनात आली. त्याकरता नेदरलँड्सने क्षेत्र निवडलं ते कम्प्यूटरच्या चिप्सचं. अशा चिप्सवर अत्यंत सूक्ष्म (दहा नॅनोमीटरपेक्षा लहान) कोरीवकाम करणारी यंत्रं जगात फक्त नेदरलँड्स हा एकच देश बनवू शकतो! किंबहुना नेदरलँड्समधली ASML नावाची कंपनी. (तुलनेकरताः करोना व्हायरसचा आकार ७० नॅनोमीटर आहे!) अमेरिकेतल्या अनेक रथीमहारथींनी तशी यंत्रं बनवायचे खूप वर्षं प्रयत्न केले, पण त्यांच्या हाती यश लागलं नाही. अशी यंत्रं चीनला मिळवू द्यायची नाहीत, अशी योजना आखली गेली, ती काही प्रमाणात यशस्वी झाली. अर्थात इतकं सूक्ष्म कोरीव असलेल्या चिप्स फार कमी कामाकरता लागतात. २८ नॅनोमीटरपेक्षा मोठ्या चिप्सना पारंपारिक चिप्स (Legacy chips) म्हणतात. वाहनांमधील (मोटरकार, ट्रक) ९५ टक्के चिप्स पारंपारिकच असतात. त्यापेक्षाही निकृष्ट दर्जाच्या चिप्सना मूलभूत चिप्स (Foundation chips) म्हणतात. आज जगातील ८० टक्के पारंपारिक आणि मूलभूत चिप्स चीनमध्ये बनल्या जातात. अमेरिकन सरकारच्या अहवालाप्रमाणे खुद्द अमेरिकेला लागणाऱ्या ७० टक्के पारंपारिक चिप्स चीनकडून येतात.

**डच चीप–घशी पडले...**

फिलिप्स नावाची नावाजलेली कंपनी नेदरलँड्सची आहे. तिने १९५०च्या पहिल्या दशकात चिप्स बनवायच्या क्षेत्रात पदार्पण केलं. कालांतराने चिप्स बनवायचा भाग तिने नेक्सपेरिया या नावाने वेगळा केला. उत्पादन हे शास्त्र असो की कला चीनने ते इतक्या प्रमाणात आत्मसात केलं आहे, की आज कोणताही देश त्याच्या जवळपासही जाऊ शकत नाही. तेव्हा उत्पादनाच्या स्पर्धेत टिकाव लागावा या उद्देशाने नेक्सपेरियाने कंपनीचा कारखाना चीनमध्ये हलवला. पण खुद्द चीनमध्ये या क्षेत्रात इतकी जीवघेणी स्पर्धा आहे की एवढं करूनही ती कंपनी चिनी वादळामध्ये काही टिकाव धरू शकली नाही. तिचं दिवाळं वाजायला आलं. तेव्हा ती कंपनी चीनमधल्याच २००६ साली स्थापन झालेल्या विंगटेक नावाच्या कंपनीला २०१८मध्ये विकायला सुरुवात केली. २०२० साली तो व्यवहार एकूण ५ अब्ज डॉलरला संपला. (चिनी कंपनीचा चिप्स बनवायच्या परदेशी कंपनीबरोबरचा सर्वात मोठा व्यवहार) विंगटेकचा मालक हा मूळचा इंजिनियर. नेक्सपेरियाबरोबर केलेला त्याचा पहिला मोठा व्यवहार.

कंपनीचं मुख्य ऑफिस, विक्रीसारखे विभाग, कर्मचारी कल्याण क्षेत्र नेदरलँड्समध्येच ठेवले. या सौद्याने नेक्सपेरियाचा प्रचंड फायदा झाला. ती आज महिन्याला दहा अब्ज चिप्स तयार करते आणि जगातली सर्वात मोठी चिप्स बनवणारी कंपनी आहे. तिचं वर्षाचं उत्पन्न २ अब्ज डॉलर (यू. एस.) आहे. तिचा साठ टक्के धंदा वाहनं बनवणाऱ्या कंपन्यांबरोबर होतो. काही अपवाद सोडून जगातील वाहनं बनवणाऱ्या कंपन्या आज संपूर्णपणे तिच्यावर अवलंबून आहेत. तर फोर्ड, स्टलॅंटिस, व्होक्सवॅगन, बीएमडब्ल्यू, टॉयोटा, मर्सेडीझ–बेंझ, अशा कंपन्या मोठ्या प्रमाणात तिच्यावर अवलंबून आहेत.

**पायावर धोंडा**

हे सगळं व्यवस्थित चाललं असताना नेदरलँड्सला काय अवदसा आठवली कोण जाणे. अशीही एक बातमी आहे की नेदरलँड्सला अमेरिकेने भरीस घातलं. तेही शक्य आहे. पण आतापर्यंतचा इतिहास डोळ्यासमोर आणला तर लक्षात येईल की वंशश्रेष्ठत्वाची भावना अमेरिकेपेक्षा युरोपमध्येच जास्त आहे. ते काही असो, पण नेदरलँड्सच्या सरकारने नेक्सपेरिया या कंपनीचा जबरदस्तीने ताबा घेतला. ही वर्तणूक बेकायदेशीर तर होतीच, पण त्या कृतीला दिलेली कारणंही हास्यास्पद होती. रशिया–युक्रेन युद्धात युक्रेनवर पडलेल्या एका क्षेपणास्त्रात कोणाला तरी नेक्सपेरियाची चिप सापडली. युरोपमधल्या सर्व देशांनी रशिया–युक्रेन युद्धाला पवित्रयुद्धाच्या (जिहादच्या) पातळीवर नेऊन ठेवलं आहे. युक्रेनमध्ये क्षेपणास्त्र म्हणजे युरोपच्या सोवळ्याला हात लावण्यासारखं होतं. डच सरकारने स्टेज तयार केला. प्रसारमाध्यमांनी दिवसरात्र शंख करायला सुरुवात केली. प्रकरण डच कोर्टात नेलं. तिथे निकाल ठरलेलाच होता. असं कायदेशीर रुपांतर दिल्यानंतर १९५० साली केलेल्या, पण आतापर्यंत कधीही न वापरलेल्या, आडापोहऱ्यातल्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी केलेल्या कायद्याखाली डच सरकारने ३० सप्टेंबरला नेक्सपेरियाचा कब्जा घेतला. (कायद्याचं निरर्थक नाव आहे Goods Availability Act!) डच कोर्टाने ८ ऑक्टोबरला कंपनीचे विंगटेककडे असलेले




*नेक्सपेरिया हे नेदरलँड्सचे खटले. ते पेलवत नाही म्हणून त्यांनी चीनच्या गळ्यात घातले आणि त्यानंतर युरोपीय महासंघ आणि अमेरिकेने आदळआपट करून चीनच्या तुलनेत आपण खूपच कमकुवत आहोत, याचे जगाला दर्शन घडवले...*

शेअर्स जप्त करून एका वकिलांच्या कंपनीला बहाल केले.

त्यानंतर डच सरकारनं पहिलं काम कुठलं केलं असेल तर नेक्सपेरियाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची हकालपट्टी करणं. तो अर्थातच चिनी होता आणि एवढंच नव्हे तर विंगटेक या कंपनीचा संस्थापक-मालक होता. त्या कृतीकरता दिलेली कारणंसुद्धा मासलेवाईक होती. एक म्हणजे तो कंपनीची गुपितं बाहेर फोडतो. असा आरोप म्हणजे मूर्खपणाचा कळस होता. स्वतःच्या कंपनीचं जाणूनबुजून नुकसान कोण करेल? यातील विशेष उपरोध म्हणजे-डच कंपनीच्या चीनमध्ये दुरूस्तीसारख्या कामावर असलेल्या अभियंत्यांना चीनमध्ये हेरगिरी करायला डच सरकार उद्युक्त करतं, असा दावा काही डच अभियंत्यांनीच केला आहे. डच सरकारचा दुसरा आरोप म्हणजे नेक्सपेरियाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी कंपनीचे काही कारखाने बंद व्हायच्या मार्गावर आहे. तिसरा आरोप म्हणजे मुख्य कार्यकारी अधिकारी युरोपमधल्या चाळीस टक्के कामगारांना कामावरून काढायच्या विचारात आहे. आता ते दोन्ही प्रश्न त्याच्या अखत्यारीतले आहेत. ते बरोबर की चुकीचे हे ठरवण्याशी डच सरकारचा कुठे संबंध येतो?

आता परिस्थिती अशी झाली की कंपनीचं ऑफिस नेदरलँड्समध्ये आणि चिप्स बनवायचा कारखाना चीनमध्ये! चिप्स वेफर्सपासून बनवतात. वेफर्सची खरेदी बाहेरच्या कंपन्यांकडून होते. आणि त्या कंपन्या युरोपमध्ये वेगवेगळ्या देशांत पसरल्या आहेत. चीनमधल्या कारखान्याने ४ ऑक्टोबरला स्वतःची वेगळी कंपनी (चिनी नेक्सपेरिया) स्थापन केली आणि मूळ कंपनीच्या ऑर्डर रद्द केल्या. तयार झालेला माल चीनमध्येच किंवा काही दोस्त राष्ट्रांमधल्या कंपन्यांना विकला. त्यांची बिलं डच कंपनीला जायला लागली. चिनी नेक्सपेरिया त्यांना हात लावायला तयार नाही. कंपनीचे शिक्के (Seals) चिनी नेक्सपेरियाकडे होते. डच कंपनीचं म्हणणं चिनी कंपनीने ते शिक्के डच कंपनीला न विचारता वापरले. चिनी कंपनीने स्वतःच्या नावाने बँकेत खाती उघडली. आणि त्या खात्यांत ज्यांचे पैसे जमा होतात त्यांनाच मालाचा पुरवठा करायचे जाहीर केले.

आता चिप्स मिळत नाहीत म्हणून जगभर बोंबाबोंब व्हायला सुरुवात झाली. जपानची निसान जवळजवळ बंद झाल्याचं व्यवस्थापनाने जाहीर केलं. मेक्सिकोमधील हाँडा कंपनी संपूर्ण बंद झाली आहे तर कॅनडाच्या अँटरियो राज्यातील हाँडा कंपनी निम्मी बंद झाली आहे. व्हॉल्व्हो, व्होक्सवॅगन यांचे कारखाने बंद व्हायच्या मार्गावर आले आहेत. मर्सेडीझ पर्याय शोधत जगभर फिरत आहे. वाहने बनवणाऱ्या कंपन्यांना अडचणी तर आल्याच पण वाहनांना सुटे भाग पुरवणाऱ्या बॉश, ऑटो मूव्हिओ, झीएफ फ्रीडरिकशाफन अशा कंपन्यांपुढेही समस्या उभ्या राहिल्या. त्यांनी अनेक कामगारांना घरी बसवलं आहे. हे शंभर वर्षांपूर्वी झालं असतं तर युरोपीयन सत्तांच्या तोफधाऱ्या लढाऊ बोटी (Gunboats) चीनच्या किनाऱ्यावर धडकल्या असत्या. आज परिस्थिती बदललेली आहे. तेव्हा झाली तेवढी नामुश्की स्वीकारणं भाग होतं. चिनी नेक्सपेरियावरसुद्धा परिणाम झाला. वेफर्स बनवणाऱ्या युरोपीयन कंपन्यांनी चिनी कंपनीचा वेफर्सचा पुरवठा बंद केला. चिनी कंपनीचेही काही कारखाने बंद झाले.

**अस्थानी बोंबाबोंब**

एवढ्या रामायणानंतर शेवटी डच सरकारने Goods Availability Act रद्द करून नेक्सपेरियाच्या डच ऑफिसचा कब्जा चिनी मालकाला परत दिला. पण चिनी सरकारचं आणि नेक्सपेरियाच्या चिनी कार्यकारी मंडळाचं एवढ्याने समाधान होणार नव्हतं. त्यांचं म्हणणं ही पहिली पायरी आहे, आणि आम्ही थोडी सूट देऊ. काही चिप्स बाजारात पाठवू. आता दुसरी पायरी म्हणजे, कोर्टाने काढलेली ऑर्डर मागे घ्या. डच सरकारचं म्हणणं, आम्हाला ते करता येणार नाही. आमच्या देशात कायद्याचं राज्य आहे, हुकूमशाही नाही. चीन शांत बसला. असेच आठ दिवस गेले. कार कंपन्यांचा दबाव वाढत चालला. बऱ्याच कंपन्या जर्मन. जर्मनीच्या परराष्ट्रमंत्र्यांनी

चीनला भेट दिली. पण त्यांना भेटायला कोणी चिनी अधिकारी आला नाही आणि जर्मन परराष्ट्रमंत्र्यांना हात हलवत परत जावं लागलं. तसं म्हटलं तर जर्मनी आणि चीनचे राजनैतिक संबंध अँजेला मरकल गेल्यापासून (सन २०२१ पासून) बिघडलेलेच आहेत. तेव्हा संबंध चांगले ठेवण्यासाठी खास प्रयत्न करावेत असं चीनला वाटत नाही. शिवाय या आधीच्या जर्मनीच्या परराष्ट्रमंत्र्यांनी दोन वेळा चीनच्या परराष्ट्रमंत्र्यांना मानवी अधिकार असल्या विषयांवर दोन उपदेशात्मक दिलेली व्याख्यानं लोक विसरलेले नाहीत. वेफर्स बनवणाऱ्या कंपन्या चीनमध्येही आहेत. त्यामध्ये एक विंगस्कायसेमी नावाची विंगटेकची सिस्टर कंपनी आहे. त्यांचे वेफर्स जगातल्या सर्वात प्रगत चिप्स बनवणाऱ्या तैवानमधल्या कंपन्या वापरतात. हे असूनही डच नेक्सपेरियाने ते वेफर्स निकृष्ट दर्जाचे आहेत, अशी बोंबाबोंब केली. यामुळे चिप्सच्या विक्रीवर परिणाम झाला.

पेचप्रसंग अजूनही मिटलेला नाही. खरं म्हणजे ही नेदरलँड्सने दिवसाढवळ्या केलेली चोरी आहे. युरोपवर एकूण परिस्थिती वाईट आली आहे. त्यामुळे आता चोरीचे मार्ग सुचताहेत. रशियाचे युरोपीयन बँकांतले ३०० अब्ज डॉलर चोरायची भाषा उघड-उघड चालली आहे. अमेरिकेची परिस्थिती फार वेगळी नाही. व्हेनेझुवेलाकडून तेल विकत घ्यायचा मूर्खपणा मी केव्हाच करणार नाही, ट्रंप म्हणतात. सरळ हल्ला करायचा, देश काबीज करायचा. म्हणजे तेल आपलंच! आणि ही नुसती वायफळ चर्चा नाही. कारण हा प्रयोग सीरियावर यशस्वीपणे करून झाला होता. आपण चोरी केली याची नेदरलँड्सला बिलकुल खंत नाही. इंग्लंडच्या गार्डियन या साप्ताहिकाला मुलाखत देताना ज्या डच मंत्र्याने या उचापती केल्या त्याने सांगितलं की वेळ आली तर मी परत हेच करेन!

**सरशी चीनची**

एकूणच जगाच्या व्यापारात राजकारण आणि देशभक्ती शिरली आहे. ही पूर्वीही काही प्रमाणात होती. टॅरिफ ही तशी जुनी कल्पना आहे. पण ट्रंपच्या कारकीर्दीपासून त्याला मध्यवर्ती भूमिका मिळाली आहे. निर्बंध (Sanctions) आणि बंदी ही दोन मोठी हत्यारं. २०२५ सालापर्यंत जवळजवळ सर्व पुरवठा साखळ्यांमध्ये कच्च्या मालापासून ते तयार वस्तूपर्यंत- स्वावलंबी व्हायची चीनची प्रतिज्ञा होती आणि ती बहुतांशी पुरी झाली असल्याने चीनचा आज सर्व उत्पादनावर वरचश्मा आहे. तो वाढतच जाणार आहे. २०२४ साली उत्पादित झालेल्या जगातील विद्युतवाहनांपैकी ७० टक्क्यांपेक्षा अधिक चीनमध्ये बनतात. चीनच्या नवीन धोरणाप्रमाणे या गाड्यांना लागणारे कम्प्यूटर चिप्ससह सर्व भाग चीनमध्येच बनलेले असणार आहेत. सारांश, हे चक्र असंच पुढे चालू राहणार आहे.

चीन आणि युरोप यांच्यातील एकमेकांकडे बघण्यातील दृष्टिकोन किती बदलला आहे, हे एका छोट्याशा कहाणीत पाहण्यासारखे आहे. ही कहाणी आहे १९८०च्या दशकातील. तेव्हा चीनचे सर्वेसर्वा नेते डंग शाओ पिंग यांनी सिंगापूरचे पंतप्रधान ली क्वान यू यांची भेट घेतली. त्या भेटीत डंगनी यूंना सिंगापूरची प्रगती एवढी झपाट्याने कशी झाली याबद्दल विचारले. त्यांनी दिलेल्या सल्ल्याप्रमाणे डंग यांनी जगातल्या दहा पुढारलेल्या देशांत त्या त्या देशाच्या अभ्यासासाठी पंधरा जणांचे गट पाठवले. त्याप्रमाणे जर्मनीतल्या एका मोठ्या कंपनीत एक चिनी गट पोहोचला. त्यातल्या ना कुणाला जर्मन भाषा येत होती ना इंग्लिश. तो गट रोज अभ्यागतांच्या खोलीत जाऊन थडकायचा, दुपारी जेवायचा आणि परत यायचा. असे दोन तीन दिवस गेले. शेवटी एका साहेबाने चिनी भाषा समजणाऱ्या माणसाला बोलावलं. त्या दुभाषाकडून कळलं की ते शिष्टमंडळ चीनच्या सरकारने पाठवलं आहे आणि त्यांचा प्रमुख हा चीनचा अर्थमंत्री आहे! तेव्हा कुठे कंपनीत हालचाल झाली. ते शिष्टमंडळ चांगले पंधरा दिवस थांबले, कारखान्याचा आणि इतर कामकाजाचा अभ्यास केला. पुढे झाला तो सर्वज्ञात इतिहास!

**डॉ. द्रविड हे फिजिक्समधील पीएच.डी. असून राजकारण, विज्ञान, इतिहास या विषयांवरील त्यांचे लिखाण वेगवेगळ्या मासिकांतून प्रसिद्ध होते. त्यांचे वास्तव्य अमेरिकेत असून 'मुक्काम पोस्ट अमेरिका' हे अमेरिकेचं सर्वांगीण दर्शन देणारे पुस्तक 'रोहन प्रकाशन'ने प्रसिद्ध केले आहे.**

**संपर्क :** ९८२०५ ६३१३०

**ई मेल :** mohan.drawid@gmail.com

# प्रेमाच्या शहाणपणाचा शोध



प्रा.श्रीनिवास हेमाडे

गोष्ट प्रेमाची



प्रेम ही आयुष्यातील सर्वात महत्त्वाची गोष्ट असली तरी ज्यांचे वर्णन करणे अतिशय कठीण असते, त्यातील ही एक गोष्ट आहे. ज्या व्यक्तीवर अथवा वस्तूवर आपण प्रेम करतो, ते का करतो ? कोण प्रेम करू शकतो ? कुणावर करू शकतो ? प्रेमात कशाची अपेक्षा काय असते ? मानवी जीवनातील प्रेमाने बजावलेली मध्यवर्ती भूमिका कोणती ? या भूमिकेचे स्वरूप कोणते ? ते स्वरूप निश्चित कसे होते ? चांगले प्रेम कशा तऱ्हेने करावे ? हिंसक आणि अहिंसक प्रेमात फरक कसा आणि का करावा ? जगप्रसिद्ध प्लेटॉनिक प्रेम आणि बिगर– प्लेटॉनिक प्रेम असा फरक करावा काय ? चांगले प्रेम म्हणजे काय ? आणि मुदलात प्रेम म्हणजे काय ? प्रेमाचे स्वरूप काय ? याचा काहीसा 'शोध घेणे' हा सदराचा हेतू आहे...

प्रेमाची गोष्ट आपण प्रेमाबद्दल बोलण्यापासून करू. 'प्रेमाबद्दल' बरं का, प्रेम प्रकरणाबद्दल नव्हे.

प्रेम प्रकरणे बहुधा योगायोगाने घडणारी खासगी एपिसोड्स असतात. प्रेमप्रकरणात 'प्रथम तुज पहाता' क्षणापासून असंख्य बाबी अतिक्रमण करतात. मग ते प्रेमप्रकरण जखम चिघळावी तसे अधिकाधिक चिघळत जाते. ते इतके टोकाला जाऊ शकते की ज्याला काटेकोरपणे 'प्रेम' म्हटले पाहिजे नेमके तेच वगळले जाते आणि इतरचं भानगडी घडत जातात.

'प्रेम' ही आपल्या मानसिक जगातील अशी एकमेवाद्वितीय 'गोष्ट' आहे की, व्यक्तीच्या अथवा वस्तूच्या प्रेमात पडण्यापूर्वी आपण खुद्द 'प्रेमाच्याच प्रेमात' पडतो! नंतर 'स्वतःच्याच प्रेमाचे प्रेमिक' बनतो. आत्मप्रेम ही तर आवश्यक पण गंभीर गोष्ट आहे. ग्रीक नायक नार्सिसस हा आत्मप्रेमात इतका गुंग झाला, की त्याचा त्या 'स्थिती' त अंत झाला. (राजकारणात जवळपास प्रत्येकजण नार्सिसस असतो, असेही आढळते.)

आत्मप्रेमातील अस्सल अर्थवत्ता जाणवत असतानाच माणूस स्वतःबाहेरच्या अस्सल प्रेमाच्या शोध प्रवासाला प्रारंभ करतो. या 'अस्सल प्रेमा'ला 'अस्सलता' (authenticity) कुठून लाभते? त्या अस्सलतेचा मार्ग कोणता? ती अस्सलता कोण, कसे देते? कितीतरी प्रश्न उद्‌भवतात. शेवटी प्रेम म्हणजे काय? हा अद्‌भुतरम्य (romantic) प्रश्न येतो. म्हणून प्रेमात पडण्यापूर्वी 'प्रेम' या 'गोष्टी' चाच शोध घेणे लाभदायक आहे.

**गरज प्रेमाची**

अन्न-पाणी ही मानवासह सर्वच सजिवांची रोजची, हरघडीची नितांत गरज असते, तशी 'प्रेमभावना' सुद्धा सर्वच सजिवांची गरज असते. काहीशा शिथिल अर्थाने सजिवांमध्ये मानवासह सर्वच पशुपक्षी आणि वनस्पती यांचाही समावेश होतो, हे आपण जाणतोच. रोजची दैनंदिन गरज नसली तरी 'प्रेमभावना' ही नेहमीची गरज असते, यात शंका नाही. आपल्यावर कुणीतरी प्रेम करावे असे सर्व प्राण्यांना वाटत असते, असे आधुनिक जीवशास्त्र अन् प्राणीशास्त्रही सांगते. प्रत्येक माणसालाही वाटते की आपल्यावर कुणीतरी प्रेम करावे; पण त्याही पुढे जाऊन आपण कुणावर तरी प्रेम करावे, प्रेमात पडावे अशी जवळपास प्रत्येक माणसाची तीव्र इच्छा असते. पण आपण प्रेमात पडावे असे प्राण्यांना वाटत असते, असा दावा करता येत नाही. हेतुपुरस्सर प्रेम करणे, ही निखळ मानवी कृती असते. प्रेम ही मानवी कृती आहे, प्राणिज कृती नाही.


वात्सल्य हे प्रेमाचे रूप मानले, तर वात्सल्यभाव सर्वच प्राणिमात्रात उपजत (innate), जन्मतः असतो, असेही दिसून येते. (मात्र हा वात्सल्य भाव मातेपेक्षा पित्यात अधिक प्रमाणात असतो, किंबहुना पित्यातच असतो, असा दावा बर्ट्रांड रसेल करतो!)

मानवेतर प्राणी माणसाच्या जवळ येऊन, अंग घासून, खेटून – जवळिकीच्या शक्य त्या कृतीतून प्रेमभावना व्यक्त करतात, तर प्रेमामुळे (आणि संगीतामुळेही) वनस्पती-रोपे, झाडे, पिके इत्यादींची सकस अन् अधिक वाढ होते, असा शेतकरी वर्गाचा, फुलझाडे, रोपे विक्रेत्यांचा, निसर्ग प्रेमीजनांचा अनुभव आहे. 'शेतीशास्त्र अभ्यासक्रमा'त हा मुद्दा अजून समाविष्ट नाही. मानवाला प्रेमभावना जास्त भावत असते, याचे मुख्य कारण भावना बोलून दाखवण्यासाठी, व्यक्त करण्यासाठी माणसाकडे 'भाषा' हे साधन असते. ('प्रेम काही भाषेत व्यक्त करता येत नाही', प्रेम करावे लागते इत्यादी युक्तिवाद तूर्तास बाजूला ठेवणे इष्ट ठरेल).

मानव आणि इतर सजीव यांच्यातील मूलभूत फरक म्हणजे मानव बुद्धीचा वापर करून प्रेमभावनेला काव्यात्मक, साहित्यिक स्वरूप देतोच; प्रेमाचा सातत्याने लाभ (की पुरवठा?) कसा होत राहील, याचे चिंतन करतो. प्राणी असे चिंतन करू शकत नाहीत, साहित्य निर्माण करू शकत नाहीत.

मानवी बुद्धीचा उत्तम आविष्कार साहित्य, संगीत, कला, नाट्य, धर्म, तत्त्वज्ञान इत्यादी मध्ये होतो. अब्जावधी वर्षांपूर्वी पृथ्वीवर जीवजाती अस्तित्वात आल्यापासून मानवजातीचा पहिला व खरा सामाजिक आविष्कार 'प्रेमभावनेचा शोध' या एकमेवाद्वितीय उच्च कृतीमध्ये आहे. 'प्रेम' हा समग्र मानवी भावनांचा परमोच्च बिंदू आहे, हा उद्‌घोष जगभरातील विचारवंत, तत्त्ववेत्ते आणि संत संस्कृतीच्या उद्‌भवाच्या आर्ष क्षणापासून केला आहेच. प्रेमभावना हा मानवी भावना आणि मानवी प्रज्ञा या दोन्हींचा सर्वोच्च आविष्कार मानला जातो.

प्रेमाचा शोध हा अंतिमतः (अमूर्त) ईश्वर हेच परमोच्च प्रेम या शोधात परिणत पावतो. (तू प्यार का सागर है / तेरी एक बूंद के प्यासे हम...!) समजा, ईश्वर नाकारलाच तर 'अंतिम तत्त्व' (ब्रह्म, चेतन तत्त्व अथवा जेम्सच्या दुर्बिणीने घडवलेले ब्रह्मांड दर्शन) अन् संपूर्ण अस्तिव व जीवन (The Existence and The Life) हे भौतिक तत्त्व प्रेमाचा विषय बनते. अर्थात मानवाने कितीही विज्ञान – तंत्रज्ञानात प्रगती केली असली तरी



*प्रेमाचा शहाणा विचार करणारे ग्रीक तत्त्वज्ञ प्लेटो आणि सॉक्रेटिस... शहाणपणाचे प्रेम म्हणजेच तत्त्वज्ञान हा विचार त्यांनी आपल्या चिंतनातून पुढे नेला...*

'प्रेमाचे विज्ञान-तंत्रज्ञान' शोधणे शक्य होत नाही.

मानवी कामभाव, अविवेकी प्रेमांधता, प्रेमीची अंगभूत गुणवत्ता, स्त्री-पुरुष व्यक्तिस्वातंत्र्य, मैत्री संबंध, निसर्ग सौंदर्य, मानवी सौंदर्य, नैतिकता, बांधिलकी, सचोटी, प्रेमातील राजकारण, विवेकशीलता, आरोग्य, शरीर-मन संबंध, लैंगिक आत्मपरिचय, सामाजिक-आर्थिक-राजकीय स्तर, पशुपक्षी प्रेम, निसर्ग प्रेम आणि अखेरीस पुरुषसत्ताकता, मातृसत्ताकता, विवाहसंस्था, कुटुंब-घराणे, धर्म, वंश, वर्ण, जात, लिंग आणि ईश्वर; गाव-देश, समाजातील नाटक, चित्रपट, संगीत, कला, संगणक, महाजाल इत्यादी ज्ञान व मनोरंजन साधने आणि त्यावरील धंदेवाईक प्रेम प्रतिमा अशा शेकडो घटकांचा परिणाम प्रेम संकल्पनेवर होत असतो. राजकीय नेत्यांची-सरकारची-नोकरशाहीची जनतेवरील प्रेमाचे स्वरूप, तसेच कायदा, शिक्षण, वंशप्रेम (वंशप्रेमाने दुसऱ्या महायुद्धात नरसंहार घडवला. इतरत्रही असे नरसंहार घडत आहेतच), धर्मांधप्रेम प्रेरित धर्मराष्ट्र देखील प्रेमाशी निगडित निर्णायक घटक आहे. या आणि अशा अगणित घटकांवरही माणसाचे अतूट प्रेम असते. प्रेमभावनेचा धर्मकारण, अर्थकारण आणि राजकारणाशी घनिष्ठ संबंध असतो, हेही अधोरेखित करणे गरजेचे आहे.

प्रेम ही आयुष्यातील सर्वात महत्त्वाची गोष्ट असली तरी ज्यांचे वर्णन करणे अतिशय कठीण असते, त्यातील ती एक गोष्ट आहे. ज्या व्यक्तीवर अथवा वस्तूवर आपण प्रेम करतो, ते का करतो? कोण प्रेम करू शकतो? कुणावर करू शकतो? प्रेमात कशाची अपेक्षा काय असते? मानवी जीवनातील प्रेमाने बजावलेली मध्यवर्ती भूमिका कोणती? या भूमिकेचे स्वरूप कोणते? ते स्वरूप निश्चित कसे होते? चांगले प्रेम कशा तऱ्हेने करावे? हिंसक आणि अहिंसक प्रेमात फरक कसा आणि का करावा? जगप्रसिद्ध प्लेटॉनिक प्रेम आणि बिगर- प्लेटॉनिक प्रेम असा फरक करावा काय? चांगले प्रेम म्हणजे काय? आणि मुदलात प्रेम म्हणजे काय? प्रेमाचे स्वरूप काय? याचा काहीसा 'शोध घेणे' हा सदराचा हेतू आहे.

**प्रेमाचे तत्त्वभान**

प्रेमीच्या स्वभावानुसार आणि प्रेमपात्र व्यक्तीच्या (किंवा वस्तूंच्या) स्वरूपानुसार प्रेमाचा आविष्कार बदलत जातो; साहजिकच प्रेमाचा अर्थही बदलत जातो. प्रत्येकाच्या प्रेमाची कल्पना भिन्न भिन्न असते. प्रत्येक प्रेमिकाला आपले प्रेम जगावेगळे वाटत असते. प्रेम ही एक 'गोष्ट' आहे आणि जगण्यातील सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. ती वस्तुतः विदग्ध गोष्ट (symposium)आहे, ते 'तत्त्वज्ञान' आहे.

प्रेमाचा विचार करताना असे लक्षात येईल, की जगातील सर्व संस्कृतींमध्ये प्रेमाचा विचार मुख्यतः पुरुषांकडून मांडला गेला आहे. स्त्रियांकडून क्वचित प्रेमविचार मांडला गेला. मूलतः विचार करणे आणि तो व्यक्त करणे हा प्रांतच पुरुषी बनवला गेल्याने साहजिकच मानवी विश्वातील समग्र प्रेमविचार देखील 'पुरुष प्रधान वर्चस्ववादी प्रेमविचार' बनला, तो मुख्यतः लैंगिक प्रेमापुरता मर्यादित केला गेला आणि स्त्रियांना केवळ 'प्रेमपात्र' हा दर्जा दिला गेला. परिणामी, प्रेम म्हणजे केवळ 'स्त्री-पुरुषांचे प्रेम' असा दृष्टिकोन तयार झाला; तो अर्थातच अपुरा आहे, याची 'सु-जाण' आज आपण विकसित केली आहे. तथापि स्त्री-पुरुषांच्या प्रेमापर्यंतच प्रेमाची गोष्ट मर्यादित करणे, याचा अर्थ एका उच्च, उदात्त अन् व्यापक विषयाचे 'बोन्साय' करण्यासारखे अर्थात लोखंडाच्या अंगठीत 'रत्न' जडवण्यासारखे होईल. दिवाणखान्यातील वाढ खुंटवलेल्या 'शोभादायक खुजट' वृक्षासम होईल.

'प्रेम करणे' ही एक मानसिक आणि शारीरिक कृती आहे. आजूबाजूची माणसे (परिसरातील परिचित स्त्री-पुरुष ते अपरिचित स्वदेशवासी, अज्ञात अखिल मानवजात), नैसर्गिक सजीव-निर्जीव वस्तू (निसर्ग, जमीन, देश, चंद्रसूर्य, तारे,

विश्व, पशुपक्षी, नद्या, समुद्र इत्यादी) आणि कृत्रिम वस्तू (घर, गाव, देश, स्मृतिस्थळे, पुस्तक, मोबाइल इत्यादी), उपजत क्षमता व कल्पना (बुद्धिमत्ता, करुणा, मैत्री, सहकार्य भावना, इत्यादी) व कृत्रिम संकल्पना (वंश, धर्म, वर्ण, जात, लिंगभाव, ईश्वर इत्यादी) अशा अनंत गोष्टींवर आपण प्रेम करतो.

प्रेमाबाबत तीन गोष्टी असतात : पहिली गोष्ट, एखादा जिवंत प्राणी आणि त्याचे अवयव यांच्यात नाते जसे विशिष्ट रचनेचे परस्परावलंबी, सेंद्रिय आणि रसरशीत स्वरूपाचे असते, तसे 'प्रेम' ही भावना व कृती आणि प्रेमिक व्यक्ती' यांच्यामधील प्रेमाचे नातेसंबंध विशिष्ट रचनेचे परस्परावलंबी, सेंद्रिय आणि रसरशीत स्वरूपाचे असतात. प्रेम हा मानवी भाव जीवनाचा जिवंत रस असतो. तो जीवन रसरशीत बनवतो. घर, गाव, विविध प्रकारची संपत्ती, यासारख्या निर्जीव वस्तूंवर व्यक्तीकडून भावनिक प्रेम केले जाते, पण वस्तूंकडून प्रेमभावना व्यक्त होत नसते. तरीही  व्यक्ती त्या वस्तूंमध्ये भावनिकदृष्ट्या गुंतून पडते. हे एकेरी प्रेम सेंद्रिय व रसरशीत नसते. तरीही त्या कृतींमधूनही 'प्रेम' संकल्पना व्यापक होत जाते. माणसांच्या परस्परावरील प्रेमात प्रतिसादाची गरज असते. प्रेमिक असणे हे दुहेरी नाते असते. निर्जीव वस्तूप्रेम कधीही दुहेरी नसते.

दुसरी गोष्ट, प्रेम आणि प्रेमाच्या नातेसंबंधाचे स्वरूप, त्यांचे महत्त्व व त्यांची उचितता या तिन्ही बाबी मानवी संस्कृती आणि स्थल-काल यानुसार बदलत राहतात. एवढेच नव्हे तर एकाच संस्कृतीमध्ये विविध कालखंडात या तिन्ही बाबी भिन्न भिन्न असतात.

तिसरी गोष्ट, प्रेमासंबंधी चिंतन व लेखन करणाऱ्या चिंतक, विचारवंत, लेखक, कवी इत्यादी व्यक्तीच्या शारीरिक, मानसिक आणि वैचारिक व्यक्तिमत्वाचा देखील 'प्रेमाच्या संकल्पने' वर मोठा परिणाम होतो. त्या व्यक्तीचे स्वतःचे स्त्री-पुरुष असणे, व्यक्तिमत्वात एखादी त्रुटी असणे अथवा अपरिहार्य कारणाने त्रुटी निर्माण होणे, त्याचप्रमाणे जन्मजात अपेक्षित लिंगभावनेहून भिन्न लिंगभाव असणे, त्या लेखकाचा जगाचा व माणसांचा अनुभव, त्यातून घडत जाणारे त्याचे व जगाचे नातेसंबंध अशा अनंत गोष्टींच्या प्रभावाच्या दबावाखाली 'प्रेम' संकल्पना विकसित होत जाते.

**बोध प्रेमाचा**

'ज्ञानाची मूर्त अथवा अमूर्त वस्तू' या दृष्टीने प्रेमभावनेकडे पाहता 'प्रेम' हे ज्या आधारे आपण जगतो, असे एक मानवी 'तत्त्व' (principle) आहे आणि ज्ञान या दृष्टीने ती एक संकल्पना (concept) आहे. आपण प्रेम का करतो? कोण प्रेम करू शकतो? कुणावर? प्रेमात कशाची अपेक्षा असते? रोजच्या जगण्यातील प्रेमाची मध्यवर्ती भूमिका कोणती? या भूमिकेचे स्वरूप कोणते? ते स्वरूप निश्चित कसे होते? त्या निश्चितीचे निकष कोणते? किंवा असे निकष म्हणून काही तत्त्वे असतात काय? 'चांगले आणि आनंदी प्रेम कसे करावे?' प्रेम भाव 'तत्त्व' (principle) आणि संकल्पना (concept) असेल तर 'तत्त्व' आहे आणि एक संकल्पना यात फरक कसा करावा? मग 'प्रेम' या 'तत्त्वा'चे आणि 'संकल्पने'चे - दोन्हींचे 'ज्ञान' होऊ शकते का? मुळात 'प्रेम म्हणजे काय?' या प्रश्नासह सारे प्रेमप्रश्न 'प्रेमाच्या ज्ञाना' बाबतचे प्रश्न आहेत.

गोष्टीच्या किंवा कथेच्या भाषेत बोलायचे, तर 'प्रेम' ही प्रत्येक माणसाने लिहावी, अशी जगातील एकमेव शहाणी गोष्ट आहे, संपूर्ण अशिक्षित ते अतिशिक्षित माणूस जर प्रेम करु शकत असेल तर प्रेम करणारा कोणताही माणूस 'प्रेमकथा' रचू शकतो. करुणा, समता, बंधुता, मैत्र, मानवता, लोकशाही अशा अनंत कथांची मूलभूत स्रोत आहे, म्हणूनच. 'प्रेम' ही खरी मानवी शहाणीव (Wisdom) आहे. माणूस बुद्धिमान (intelligent) आहे तसा शहाणा (wise) देखील आहे. बुद्धिमत्ता आणि शहाणपणा दोन्हीवर प्रेम करता येते. बुद्धी 'ज्ञान' निर्माण करते, तर शहाणपण 'प्रेम' निर्माण करते. 'बुद्धी  शहाणे' असण्याचा उगम 'प्रेम शहाणे' असण्यात असतो म्हणूनच 'प्रेम' हेच सर्व तऱ्हांच्या  शहाणपणाचा मूळ आधार आहे.

Philosophy या ग्रीक-पाश्चात्य शब्द-संकल्पनेच्या उत्पत्तीचं मूलतः 'प्रेम' शब्दापासून सुरु होते. Philosophy = love of wisdom (philo म्हणजे love आणि sophia म्हणजे wisdom - शहाणपण), म्हणून शहाणपणाचे प्रेम म्हणजे तत्त्वज्ञान.

Philo चा आधुनिक विस्तारित अर्थ friendship आणि affection, त्याचप्रमाणे Sophiaचा आधुनिक विस्तारित अर्थ  Wisdom, knowledge, skill. संस्कृत किंवा मराठीतील तत्त्वज्ञान संज्ञा Philosophy चे भाषांतर किंवा समांतर मानली जाते. Philosophy किंवा तत्त्वज्ञान हे 'शहाणपणावरील - बौद्धिक कौशल्यावरील - ज्ञानावरील प्रेमा'चा  शोध' आहे. ज्ञानाचा किंवा तत्त्वज्ञानाचा समग्र इतिहास हा 'शहाणपणाच्या प्रेमाचा इतिहास आहे. सारे मानवी

प्रयत्न या 'ज्ञानाचा शोध' घेण्यात खर्ची पडले आहेत; तर खुद्द प्रेमाचा शोध मात्र कवी, लेखक, संत मंडळींनीच अधिक करून घेतला आहे, असे आढळते.

संत आणि तत्त्ववेत्ते यांनी स्वतंत्ररीत्या 'प्रेमाचा शोध घेतला. हे दोन्हीही दृष्टिकोन पुरेसे नाहीत. अर्थात संतत्व आणि तत्त्ववेत्ता एकत्र असण्याचे दुर्मिळ समीकरण सॉक्रेटिस, लावोत्से, ज्ञानेश्वर, कबीर या सारख्या संत कवी तत्त्ववेत्त्यात आढळते, हेही खरे.

'प्रेमाचा शहाणा विचार' सॉक्रेटिस, प्लेटोपासून अनेक प्राचीन तत्त्ववेत्त्यांनी केला आहेच, पण आधुनिक आणि गेल्या काही दशकात उत्तराधुनिक तत्त्ववेत्त्यांनी अधिक वास्तववादी अन् यथार्थ विचार केला आहे. या सर्व विचारांना उजाळा देणे, त्या विचारांची जोड Philosophy ला आणि संतांच्या प्रेमशोधाला लाभली तर प्रेम भावना अधिक यथार्थतेने उमजून येऊ शकेल, अशी आशा बाळगता येते. 'प्रेमभावने'चे खरे अध्यात्म (Metaphysics), वास्तव नैतिकता (Ethics) आणि सौंदर्यशास्त्र (Aesthetics) मांडता येईल. वांछनीय पण 'कक्षेच्या बाहेर' असलेल्या ईश्वर प्रेमाचा खरा अर्थ समजून घेता येईल.

महर्षी पाणिनी त्यांच्या 'अष्टाध्यायी' या महाग्रंथात 'वाक्'ची व्यावहारिक व्याख्या देतात. 'वाक्'चा अर्थ होतो वाणी. महर्षींनी 'वाक्'चा अर्थ किंवा उपयोग स्पष्ट करताना 'आमंत्रण-निमंत्रण'मधील फरक सांगितला आहे. विधि-निमंत्रण-आमंत्रण-अधीष्ट-सम्प्रश्न-प्रार्थनेषु लोट् च (पाणिनी-सूत्र ३।३।१६१) या वाक्यातील (१) विधी म्हणजे आज्ञा, (२) आमंत्रण म्हणजे आग्रहाने येण्याची विनंती, (३) निमंत्रण म्हणजे 'तुम्ही कर्तव्यपालनासाठी या' अशी विनंती, (४) अधीष्ट म्हणजे धन अथवा वस्तूच्या बदल्यात देण्याघेण्याविषयी आदरपूर्वक चौकशी करणे, (५) सम्प्रश्न म्हणजे एखादी कृती करावी की नाही, या संबंधीचा प्रश्न विचारणे आणि (६) प्रार्थना म्हणजे विनंती.


पाणिनीच्या ग्रंथावर जी भाष्ये लिहिली गेली, त्यातील 'काशिकावृत्ती' हा एक अर्थविवरण देणारा समीक्षाग्रंथ आहे. 'काशिका'चा अर्थ होतो प्रकाशित करणारी 'प्रकाशिका' (उदा. दिवा, सूर्य). 'प्रकाशक' म्हणजे प्रकाशात आणतो तो. ('काश्' धातूला 'प्र' उपसर्ग जोडला जाऊनच 'प्रकाश' बनतो). 'काशिकावृत्ती' नुसार निमंत्रणम् नियोगकरणम्, आमंत्रणम् कामचारकरणम्, अर्थात 'निमंत्रण' म्हणजे येणे केलेच पाहिजे (ought). नियोग म्हणजे आज्ञा, येणे करण्याची, येण्याची आज्ञा. आणि 'आमंत्रण' म्हणजे तुमच्या इच्छेने करायचे (should) असेल तर या, नाही आलात तरी आमची काही हरकत नाही. उदाहरणार्थ रामायण-महाभारतातील यज्ञ, स्वयंवर, राजकीय बैठका इत्यादीचे अशी 'निमंत्रणे' देत होते. ही आज्ञा नाही, पण बोलावणे आग्रहाचे आहे. (म्हणजे तुम्हाला 'यंदा कर्तव्य आहे' फेम विवाह करण्याचे 'कर्तव्य' असेल, तर तुमचे 'कर्तव्य' म्हणून या; नसेल तर सोडून द्या.) अर्थात राजाज्ञा बंधनकारक (obligatory) असते, जवळपास सक्तीची असते. पण निमंत्रणम् म्हणजे येण्याची आज्ञा असली तरी ती पाळण्याची देखील सक्ती (mandatory) नाही. पण जर मी या प्रसंगात सहभागी असावे. ते माझे कर्तव्य आहे अशी तुमची उत्कट इच्छा असेल तर आणि तरच (if and only if) ती पूर्ण करणे हे मात्र बंधनकारक ठरते, अन्यथा नाही! चर्चासत्र, परिसंवाद, प्रशिक्षण शिबिर, अभ्यासवर्ग, बैठका इत्यादी ठिकाणी 'निमंत्रण' असते तर लग्न, बारसे, वाढदिवस इत्यादी ठिकाणी 'आमंत्रण' असते. (मयत विधीत ना आमंत्रण असते ना निमंत्रण!)

थोडक्यात, 'निमंत्रण' नैतिकदृष्ट्या बंधनकारक असते, पण सक्तीचे नसते तर 'आमंत्रण' बंधनकारक ही नसते व 'सक्तीचे' ही नसते.

या सदरात विचारवंतांच्या आणि तत्त्ववेत्त्यांच्या प्रेमभावना विषयक तात्त्विक विचारांचा शोध घेण्याचा प्रयत्न आहे. आजपर्यंत Love of Wisdom - Philosophyचा शोध घेतला गेला, आता Wisdom of Loveचा प्रेमाच्या शहाणपणाचा, 'प्रेमातील शहाणपणाचा' (Wisdom in Love) किंवा 'शहाण्या प्रेमाचा'(Wise Love), शोध घेण्याचा प्रयत्न करू. (महात्मा गौतम बुद्धाच्या प्रज्ञापारमिता मध्ये असे शहाणे प्रेम आढळते.) त्या शोध प्रवासाचे आणि त्याविषयी गुजगोष्टी करण्याचे हे 'निमंत्रण' आहे.


**लेखक व्यावसायिक तत्त्ववेत्ते आणि सल्लागार आहेत.**
**संपर्क : ९१५ ८६५ ८०६६,** wiselove2026@gmail.com

# वैशेषिक दर्शन : नास्तिकतेचा भास



जगदीश काबरे

नास्तिक दर्शन



**वैशेषिक दर्शनात विज्ञान आणि अध्यात्म यांची सांगड घालण्यात आलेली आहे. या स्थूल वैज्ञानिक मांडणीच्या आधारे आजचे 'गर्व से कहो वाले' हिंदुत्ववादी पूर्वजांचा गौरव करण्यासाठी आमच्याकडे पूर्वी सगळे विज्ञान होते, म्हणून सांगत असतात. आमचे विज्ञान युरोपने पळवले आणि ते आधुनिक विज्ञान म्हणून मान्यता पावले, असा यांचा ग्रह असतो...**

वैशेषिक दर्शन हे भारतीय तत्त्वज्ञानातील सहा प्रमुख दर्शनांपैकी एक आहे. त्याचे प्रवर्तक महर्षी कणाद होते. हे दर्शन विश्वाच्या रचनेचा आणि त्यातील तत्त्वांचा वैज्ञानिक दृष्टिकोनातून अभ्यास करते. या दर्शनाचे वैशिष्ट्य हे आहे की, या विश्वातील प्रत्येक पदार्थ हा बारीक बारीक कणांनी बनलेला आहे, असा त्याचा सिद्धांत आहे. म्हणजे त्याचा वास्तववादी (Realism) आणि परमाणुवादी (Atomistic) दृष्टिकोन आहे. वैशेषिक दर्शनानुसार विश्व सहा मुख्य पदार्थांपासून बनले आहे. ते पदार्थ म्हणजे द्रव्य, गुण, कर्म, सामान्य, विशेष आणि समवाय. सातवा अभाव हा पदार्थ नंतर या दर्शनात जोडला गेला.

**विश्वाचे रंगरुप**

अ) द्रव्य : अनुभवाचे विश्लेषण करताना वैशेषिकांनी प्रथम पदार्थ सांगितला तो 'द्रव्य' हा होय. आपला अनुभव नेहमी कशाच्या तरी संबंधित असतो. त्यास काही आश्रय असतो. अनुभवाच्या या भागास त्यांनी द्रव्य ही संज्ञा दिली. गुणाचा आणि कर्माचा आश्रय ते म्हणजे, द्रव्य अशी व्याख्या केलेली आहे. द्रव्य म्हणजे जे स्वतः होऊन राहते, जे तर्कदृष्ट्या दुसऱ्यावर अवलंबून नसते. वस्तूत बदल घडून येत असताही जे काही टिकून राहते, ते द्रव्य होय. द्रव्याकडून आपली अपेक्षा टिकून राहण्याची असते. रूप बदलत असताही जे अविचल राहते, ते द्रव्य. उदा. लाख अथवा मेण. उष्णतेने यांचे स्वरूप पार बदलून जाते. ती द्रवस्वरूपी होतात. पण तरीही तीच ही लाख, तेच हे मेण अशी आपली धारणा राहते. जे द्रवू शकते म्हणजे, लक्षणेने, रूप पालटते, तरीही टिकून राहते ते द्रव्य. चक्षुरिंद्रियालाच केवळ द्रव्याचे प्रत्यक्ष ज्ञान होते, असे या दर्शनात मानले आहे. द्रव्य हे पृथ्वी, जल, अग्नी, वायू, आकाश, काळ, दिशा, आत्मा आणि मन असे नऊ प्रकारचे असते.

१) पृथ्वी (Earth): घन स्वरूपातील द्रव्य, ज्याला गंध (वास) आणि स्पर्श आहे.

२) जल (Water): द्रव स्वरूप, ज्याला रस (चव) आणि शीतल स्पर्श आहे.

३) अग्नी (Fire): उष्णता आणि प्रकाश देणारे द्रव्य, ज्याला रंग आणि उष्ण स्पर्श आहे.

४) वायू (Air): वायू स्वरूप, ज्याला स्पर्श आहे पण रंग किंवा गंध नाही.

५) आकाश (Ether): ध्वनीचा आधार, सर्वत्र व्याप्त आणि असीम.

६) काळ (Time): सर्व घटनांचे क्रम आणि कालमापन यांचा आधार.

७) दिशा (Space/Direction): पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण, वायव्य, ईशान्य, नैऋत्य, अग्नेय, उर्ध्व आणि अधर अशा दशदिशांचा आधार.

८) आत्मा (Soul): चेतना आणि ज्ञानाचा आधार, प्रत्येक व्यक्तीचा आत्मा स्वतंत्र आहे.

९) मन (Mind): आत्म्याचे विचार आणि भावनांचे साधन, अत्यंत सूक्ष्म.

वैशेषिकांच्या मते, द्रव्य हे विश्वाचे भौतिक आणि अभौतिक घटकांचे मूळ आहे. सर्व दृश्य आणि अदृश्य गोष्टी द्रव्यातून निर्माण होतात.

आ) गुण : गुण म्हणजे द्रव्यातील विशिष्ट गुणधर्म, जे द्रव्यासोबत अविनाशीपणे जोडलेले असतात परंतु स्वतंत्रपणे अस्तित्वात नसतात. वैशेषिक दर्शनात २४ गुण सांगितले आहेत, यापैकी काही प्रमुख खालीलप्रमाणे: रंग (रूप), रस (चव), गंध (वास), स्पर्श (स्पर्श), संख्या (संख्या), परिमाण (आकार), पृथकत्व (वेगळेपणा), संयोग (जोड), विभाग (वेगळे होणे), परत्व (दूरत्व), अपरत्व (नजीकपणा), बुद्धी (ज्ञान), सुख (आनंद), दुख्ख (दुःख), इच्छा, द्वेष, प्रयत्न, गुरुत्व (वजन), द्रवत्व (द्रवपणा), स्नेह (चिकटपणा), ध्वनी (आवाज), संस्कार (प्रवृत्ती). थोडक्यात, गुण द्रव्याला विशिष्ट स्वरूप देतात. उदाहरणार्थ, पाण्याचा रस (चव) आणि शीतलता हे त्याचे गुण आहेत, जे पाण्याला इतर द्रव्यांपासून वेगळे करतात.

इ) कर्म : कर्म म्हणजे द्रव्यातील हालचाल किंवा क्रिया, जी द्रव्याच्या स्थानात बदल घडवते. या कर्माचे पाच प्रकार आहेत: उत्क्षेपण (वर उचलणे), अवक्षेपण (खाली टाकणे), आकुंचन (आकसणे), प्रसारण (पसरणे), गमन (सामान्य हालचाल). म्हणजे कर्मामुळे विश्वात गतिशीलता येते. उदाहरणार्थ, पाण्याचा प्रवाह किंवा हवेची हालचाल ही कर्माची उदाहरणे आहेत.

ई) सामान्य : सामान्याची व्याख्या, 'नित्यम् एकम् अनेकानुगतम' अशी केली असून ते द्रव्य, गुण आणि कर्म या तीन पदार्थांच्या ठिकाणी राहते असे सांगितले आहे. पर आणि

अपर असे त्याचे दोन विभाग केले आहेत. पर म्हणजे अती व्यापक, अपर म्हणजे कमी व्यापक. सामान्य म्हणजे अनेक वस्तूंमध्ये आढळणारा समान गुणधर्म. याला जाति किंवा सामान्यत्व असेही म्हणतात. उदाहरणार्थ; सर्व गायींमध्ये गोतत्त्व (गायीचे सामान्य गुणधर्म) असते, जे त्यांना इतर प्राण्यांपासून वेगळे करते. व्यक्ती व्यक्तीच्या ठिकाणी राहणारा पण तिच्याहून भिन्न असा हा सामान्य नावाचा पदार्थ आहे. या सामान्यामुळे आपण वस्तूंना वर्गीकृत करू शकतो आणि त्यांचे सामान्य गुणधर्म समजू शकतो.

उ) विशेष : विशेष म्हणजे प्रत्येक द्रव्यातील विशिष्ट गुणधर्म, जो त्याला इतरांपासून वेगळे करतो. उदाहरणार्थ प्रत्येक परमाणू किंवा आत्मा यांच्यातील वैशिष्ट्य, जे त्यांना अद्वितीय बनवते. म्हणून विशेषामुळे विश्वातील प्रत्येक गोष्ट अद्वितीय आहे, जरी ती सामान्य गुणधर्मांनी जोडलेली असली तरी...

ऊ) समवाय : समवाय म्हणजे द्रव्य, गुण आणि कर्म यांच्यातील अविभाज्य संबंध. हा संबंध द्रव्य आणि त्याच्या गुणधर्मांमधील कायमस्वरूपी जोड आहे. म्हणजे असे की, कपड्यातील रंग आणि धागे यांच्यातील संबंध लक्षात घेतला तर रंग हा कपड्याचा गुण आहे आणि तो कपड्याशिवाय स्वतंत्रपणे अस्तित्वात नाही हे आपल्याला कळते. अशाप्रकारे समवाय विश्वातील एकसंधता आणि स्थिरता प्रदान करते.

ए) अभाव : शेवटचा पदार्थ अभाव हा होय. मूळ वैशेषिक सूत्रांत याचा उल्लेख नाही. तेथे तो अभावाने झळकतो. मागाहून त्याचा समावेश पदार्थांच्या यादीत झाला. तो होणे अपरिहार्य होते. अभाव म्हणजे काहीच नाही, त्याची वास्तपुस्त करण्याची गरज नाही, अशी वृत्ती बाळगता येणार नाही. कारण, नाही नाही असे म्हणत असताच आपण त्याच्यासंबंधी बोलतो. पण ज्याच्यासंबंधी आपण बोलतो, ते काहीतरी असलेच पाहिजे, त्याला काही अर्थ असला पाहिजे, नाहीतर आपण अर्थशून्य बडबडतो असे म्हणण्याचा प्रसंग येईल. आपल्या बोलण्याचा जो अर्थ, पदांचा जो अर्थ तोच हा अभाव पदार्थ होय.

**वैशेषिक दर्शनाचा केंद्रबिंदू**

वैशेषिक दर्शनात विश्वातील सर्व भौतिक वस्तू परमाणूंनी (अणू) बनल्या आहेत, असे मानले जाते. हे परमाणू अविभाज्य आणि अविनाशी असतात. प्रत्येक द्रव्यासाठी (पृथ्वी, जल, अग्नी, वायू) वेगवेगळे परमाणू असतात. परमाणूंचा संयोग आणि वियोग यामुळे विश्वातील वस्तूंची निर्मिती आणि विनाश होतो. दोन परमाणू एकत्र येऊन द्व्यणुक (Dyad) बनवतात, त्यापासून त्र्यणुक (Triad) आणि पुढे मोठ्या वस्तू तयार होतात. परमाणूंचा संयोग ईश्वराच्या इच्छेने किंवा आत्म्याच्या कर्मानुसार होतो. त्यावरून त्यांनी कार्य-कारण सिद्धांत मांडला. प्रत्येक कार्याचे एक कारण असते. विश्वातील सर्व घटना कारण आणि परिणामाच्या नियमाने घडतात. म्हणजेच कार्य कारणापासून वेगळे असते. हा परमाणुवाद विश्वाच्या रचनेचे वैज्ञानिक आणि तार्किक विश्लेषण मांडतो. परमाणूंची संकल्पना आधुनिक अणु सिद्धांताशी साम्य दाखवते. वैशेषिक दर्शन विश्वाला वास्तव मानते आणि परमाणूंना त्याचे मूलभूत घटक मानते, ज्यामुळे हे दर्शन वास्तववादी आहे. परमाणूंच्या संयोग आणि वियोगाची प्रक्रिया तर्क आणि कारणमीमांसेवर आधारित आहे, ज्यामुळे वैशेषिक दर्शन तर्कशुद्ध आहे. हा परमाणुवाद वैशेषिक दर्शनाचा केंद्रबिंदू आहे आणि आधुनिक अणु सिद्धांताशी साम्य दाखवतो. दोन्ही सिद्धांतात विश्व सूक्ष्म कणांपासून बनले आहे असे मानले जाते. वैशेषिक दर्शनातील परमाणूंची अविभाज्यता आधुनिक विज्ञानातील मूळ अणु सिद्धांताशी (जॉन डाल्टनचा सिद्धांत) साम्य दाखवते.


**गर्व से कहो... कशाला**

परमाणूंच्या संयोगाने मोठ्या वस्तू बनतात, हे आधुनिक रसायनशास्त्राशी सुसंगत आहे. असे असले तरीही आधुनिक विज्ञानात अणूंचे उपविभाजन (उदा., प्रोटॉन, न्यूट्रॉन, इलेक्ट्रॉन) शक्य आहे, तर वैशेषिक दर्शनात परमाणू पूर्णपणे अविभाज्य आहे. वैशेषिक दर्शनात परमाणूंचा संयोग ईश्वराच्या इच्छेवर अवलंबून आहे, तर आधुनिक विज्ञानात तो भौतिक नियमांवर (जसे, रासायनिक बंध) अवलंबून आहे, असा महत्त्वाचा फरक आहेच. हा फरक भारतीयांनी गौण मानल्यामुळे वैशेषिक दर्शनाला भारतीय तत्त्वज्ञानातील भौतिकशास्त्र म्हणून ओळखले जाते.

वैशेषिक दर्शनानुसार प्रत्येक कार्याचे (Effect) एक कारण (Cause) असते. हा सिद्धांत असत्कार्यवाद (Arambhavda) म्हणून ओळखला जातो. उदाहरणार्थ, माती (कारण) पासून बनलेले मडके (कार्य) मातीपेक्षा वेगळे आहे. या कारणाचे तीन प्रकार आहेत:

१) समवायी कारण: मुख्य कारण, जसे मडक्यासाठी माती.

२) असमवायी कारण: सहाय्यक कारण, जसे मडके बनवण्यासाठी चाक.




*परमाणु संयोग ईश्वरेच्छेवर अवलंबून आहे, असे वैशेषिक तत्त्वज्ञान मानते, तर आधुनिक विज्ञान भौतिक नियम अधोरेखित करते. पण हा फरक गौण मानला गेला आणि वैशेषिक दर्शन भारतीय तत्त्वज्ञानातले भौतिकशास्त्र गणले गेले...*

---

३) निमित्त कारण: प्रेरक कारण, जसे कुंभाराची क्रिया.

अशाप्रकारे हा सिद्धांत विश्वातील सर्व घटनांना तार्किक स्पष्टीकरण देतो आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाला प्रोत्साहन देतो.

वैशेषिक दर्शनात ज्ञानाचे दोन प्रकार सांगितले आहेत:

१) प्रमाण म्हणजे प्रत्यक्ष अनुभव, अनुमान म्हणजे तर्क, उपमान आणि शब्द म्हणजे विश्वसनीय स्रोत.

२) अप्रमाण म्हणजे स्मृती, संशय, भ्रम आणि तर्कदोष. वैशेषिक दर्शन तर्क आणि प्रमाण यांच्या आधारे विश्वाचे विश्लेषण करते, ज्यामुळे ते न्याय दर्शनाशी जवळचे आहे. वैशेषिक दर्शनात आत्मा हा स्वतंत्र, अमर आणि चेतन द्रव्य आहे. प्रत्येक व्यक्तीचा आत्मा वेगळा असतो आणि तो ज्ञान, सुख, दु:ख इत्यादी अनुभवतो. जीवनाचे अंतिम ध्येय मोक्ष मिळवणे आहे, त्यामुळे अज्ञान, दु:ख आणि पुनर्जन्माच्या चक्रातून मुक्ती मिळते. मोक्षासाठी सत्यज्ञान (विश्वाच्या खऱ्या स्वरूपाचे ज्ञान) आणि नीतिमान आचरण आवश्यक आहे. आत्मा आणि मोक्षाची संकल्पना वैशेषिक दर्शनाला अध्यात्मिक आधार देते, ज्यामुळे ते केवळ भौतिकशास्त्रापुरते मर्यादित राहत नाही. अशाप्रकारे या दर्शनात विज्ञान आणि अध्यात्म यांची सांगड घालण्यात आलेली आहे. या स्थूल वैज्ञानिक मांडणीच्या आधारे आजचे 'गर्व से कहो' वाले हिंदुत्ववादी पूर्वजांचा गौरव करण्यासाठी आमच्याकडे पूर्वी सगळे विज्ञान होते, म्हणून सांगत असतात. आमचे विज्ञान युरोपने पळवले आणि ते आधुनिक विज्ञान म्हणून मान्यता पावले, असा यांचा ग्रह असतो. असो.

कणादांच्या मूळ दर्शनात ईश्वराचा उल्लेख कमी आहे, परंतु नंतरच्या वैशेषिक विचारवंतांनी ईश्वराला विश्वाचा नियंता आणि परमाणूंच्या संयोगाचा प्रेरक मानले. असे असले तरीही वैशेषिक दर्शनाने विश्वाच्या रचनेचा वैज्ञानिक आणि तार्किक दृष्टिकोनातून अभ्यास केला. हे एका उदाहरणाने स्पष्ट करता येईल. एका झाडाला फळ येणे हे वैशेषिक दर्शनाने समजावून सांगितले जाऊ शकते. झाड (द्रव्य), त्याचा रंग आणि आकार (गुण), फळ येण्याची क्रिया (कर्म) आणि झाडातील वृक्षत्व (सामान्य) यांचा समन्वय फळ निर्मितीला कारणीभूत ठरतो.

**स्पष्ट भूमिकेचा अभाव**

वैशेषिक दर्शन विश्वाच्या भौतिक आणि अभौतिक रचनेवर (Ontology) भर देते, तर न्याय दर्शन तर्कशास्त्र आणि ज्ञानमीमांसेवर (Epistemology) केंद्रित आहे. दोन्ही दर्शनांनी परमाणुवाद, कार्य-कारण सिद्धांत आणि मोक्षाच्या संकल्पनेवर समान विचार मांडले. वैशेषिक दर्शनात वैज्ञानिक दृष्टिकोन, परमाणुवाद आणि कार्य-कारण सिद्धांत आधुनिक भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्राशी सुसंगत आहे. परमाणूंची संकल्पना आधुनिक अणु सिद्धांताशी मिळतीजुळती आहे. वैशेषिक दर्शनातील तर्कशास्त्र आणि वर्गीकरण पद्धती आजही तत्त्वज्ञान आणि विज्ञानाच्या अभ्यासात उपयुक्त आहे. हे एका फुलाच्या उदाहरणाने स्पष्ट होते. म्हणजे असे की,

द्रव्य: फूल (पृथ्वी द्रव्यासह बनलेले).

गुण: रंग (लाल), गंध (सुगंध), स्पर्श (मऊ).

कर्म: फुलाचे हलणे (वाऱ्याने).

सामान्य: सर्व फुलांमधील पुष्पत्व (फुलांचे सामान्य गुणधर्म).

विशेष: त्या विशिष्ट फुलाचे वैशिष्ट्य, जे त्याला इतर फुलांपासून वेगळे करते.

समवाय: फुलाचा रंग आणि त्याचे द्रव्य यांच्यातील

अविभाज्य संबंध.


या उदाहरणातून वैशेषिक दर्शनाच्या सर्व पदार्थांचे स्पष्टीकरण मिळते. वैशेषिक दर्शन विश्वाच्या रचनेचा आणि त्यातील तत्त्वांचा तार्किक, वैज्ञानिक आणि अध्यात्मिक दृष्टिकोनातून अभ्यास करते. सहा पदार्थ, परमाणुवाद, कार्य–कारण सिद्धांत, आत्मा आणि मोक्ष यांसारख्या वैशिष्ट्यांमुळे हे दर्शन भारतीय तत्त्वज्ञानात अनन्य आहे.

कणादांच्या मूळ वैशेषिक सूत्रांमध्ये ईश्वराबाबत स्पष्ट भूमिका नसल्यामुळे काही विद्वानांना यात नास्तिक दर्शनाचा संशय येऊ शकतो. कारण मूळ सूत्रे विश्वाच्या रचनेच्या तार्किक आणि वैज्ञानिक विश्लेषणावर केंद्रित आहेत. पण ईश्वराचा उल्लेख नसणे म्हणजे त्याचा नकार नव्हे. परमाणूंच्या संयोगासाठी आणि विश्वाच्या व्यवस्थेसाठी एक नियामक शक्ती आवश्यक आहे, असे वैशेषिक दर्शन मानते. म्हणून नंतरच्या विचारवंतांनी ईश्वराला विश्वाचा नियंता आणि परमाणूंच्या संयोगाचा प्रेरक म्हणून स्पष्टपणे स्वीकारले. ईश्वर हा सर्वज्ञ, सर्वशक्तिमान आणि विश्वाच्या निर्मितीचा निमित्त कारण (प्रेरक कारण) आहे, असे वैशेषिक दर्शनात मानले जाते. प्रशस्तपाद, शंकर मिश्र यासारख्या नंतरच्या वैशेषिक विचारवंतांनी ईश्वराची संकल्पना स्पष्टपणे समाविष्ट केली आणि वेदांचा स्वीकार केला, ज्यामुळे वैशेषिक दर्शन नास्तिकतेचा आभास निर्माण करणारे असले, तरी ते आस्तिक दर्शन म्हणून स्थापित झाले.

**जगदीश काबरे हे विज्ञानप्रसार आणि सामाजिक उन्नयनाशी निगडित कार्यकर्ते, ज्येष्ठ लेखक आणि आस्वादक आहेत.**
**संपर्क :** ९९२०१९७६८०
**ई मेल :** jetjagdish@gmail.com

**अक्षर प्रकाशनाचं नवं पुस्तक...**

**रूमी** प्रेमाचा महाकवी **: अरविंद दोडे**




**किंमत रु.३००/–**

**तुम्ही जे शोधताय, तेच तुम्हाला शोधतंय!**

**सूफी संतकवी रूमी याचा गूढवाद. हा प्रेमाचा महाकवी तेराव्या शतकात झाला. त्याच्या हजारो कवितेतील प्रेमाचं रहस्य अशारीरिक पातळीवर प्रकाशमान झालंय. पण सामान्यांना देहबुद्धीच्या पातळीवरून प्रेमबुद्धीच्या पातळीवर जावं लागतं, तेव्हाच विश्वचैतन्याचं रहस्य कळतं. त्यानं मानवधर्माला आणि वंचित, उपेक्षित घटकांना जवळ करून, त्यांना ज्ञान देताना काही बोधकथा सांगून त्यांचं रंजन केलं. तत्कालीन सुलतान, बादशाह त्याला दरबारात येण्याचं मानानं आमंत्रण देत, पण तो म्हणत असे, 'मला, काही नकोय, तुम्हीच येत जा. तुम्हाला गरज आहे.'**

**निर्मळ, निरपेक्ष वृत्तीनं जगणारा श्रेष्ठ संत होता. तत्वज्ञ, प्रज्ञावंत, प्रतिभावंत, न्यायाधीश, लेखक, धर्मोपदेशक, समाजसेवक... काय काय होता तो! माणुसकी हा त्याचा हृदयस्थ झरा आणि आपुलकी हा अंत:स्थ हेतू. त्याचे वडील नामवंत धर्मज्ञानी होते, बाराव्या वर्षी त्यानं पवित्र कुराण तोंडपाठ केल्यानं त्याला प्रसिद्धी आणि लोकप्रियता मिळाली. तो पित्याच्या पाठीमागे नम्रपणे चालत असे, तेव्हा लोक आदरानं म्हणत, ''बघा, सरोवराच्या मागे सागर चाललाय!''**

**अशा या ज्ञानसागराचं चरित्र मराठीत प्रथमच येत आहे. त्याच्या कथा, कवितांची ही एक प्रेममयी संक्षिप्त ओळख!**


अ अक्षर प्रकाशन ऑर्चिड रोड मॉल, रॉयल पाम, 'बी' विंग, युनिट नं. २३५, सर्वे नं. १६९, आरे कॉलनी, गोरेगाव (पू), मुंबई–६५ फोन : ९३२२३९१७२० email : aksharprakashan@gmail.com

# ...और बस्ती ना हो, यह दिल्ली है



आशय गुणे

*मयंक ऑस्टेन सूफी यांच्या एक्स खात्यावरून साभार*



**बरसाती मजला**

सदासर्वकाळ प्रदूषित हवेने घेरलेल्या दिल्लीत सत्तेचा दर्प पसरलेला असतो. तो संसदेपासून गल्लीबोळापर्यंत जाणवतही असतो. इतर महानगरांप्रमाणेच इथेसुद्धा अठरापगड जाती-धर्माचे लोक राहत असतात. तरीही, रुढीबाज उत्तरेतल्या कोंडाळ्यातले हे राजधानीचे शहर त्रयस्थाच्या मनात नकारात्मक प्रतिमा उभी करते. उद्दामपणा, आक्रमकपणा हा रोजच्या जगण्यातला दुर्गुण त्यात अधिकची भर घालतो आणि दिल्ली म्हणजे काही तरी अप्रिय, टाळण्यायोग्य शहर बनते. अर्थात, हे सारे औट घटकेच्या प्रवासी-पाहुण्यांच्याबाबतीत घडते. मात्र जो या दिल्लीत तिच्या सर्व गुणावगुणांसह विरघळून जातो, त्याच्यासाठी दिल्ली उन्नत अनुभवांचा बहारदार गुच्छ पेश करते...

**दिल-ओ-दिल्ली दोनों अगर हैं ख़राब**
**पे कुछ लुत्फ़ इस उजड़े घर में भी हैं...**

**– मीर तकी मीर**

'भैय्या, थोडा आगे चल के रेड लाइट की तरफ आना...' हा उबरवाला मला नेमक्या कोणत्या ठिकाणी बोलावतोय, हा विचार करण्यात माझे पुढील काही सेकंद गेले. मुंबईत आणि बहुदा देशभरात 'रेड लाइट'चा अर्थ निराळाच घेतला जातो. पण तेवढ्यात हा रेड लाइट म्हणजे सिग्नल असणार अशी मलाच खात्री पटली आणि मी थोडं पुढे चालत मुख्य रस्त्यापर्यंत आलो. तिथपर्यंत जाताना माझी सोबत करायला तीन रिक्षावाले आणि दोन टॅक्सीवाले होते. माझ्या हातात असलेल्या मोबाइलकडे त्यांचे आधीच लक्ष गेले असल्यामुळे मी ऑनलाइन बुकिंग केलं आहे, हे त्यांना समजले होते. त्यामुळे काहीसा त्रासिक चेहरा व उर्मट आवाज याचे प्रदर्शन करीत, ते मला त्यांची सेवा मान्य करायची विनवणी करीत होते.

जानेवारी २०१७ मध्ये नवी दिल्ली रेल्वे स्थानकाच्या पहाडगंज गेट जवळ सकाळी ९ च्या सुमारास घडलेला हा प्रसंग माझ्या पुढील अनेक दिल्लीवारींची नांदी ठरणार होता, हे मला लक्षात येणं अशक्यच होतं, म्हणा! पण मी भर थंडीत दिल्लीत पाऊल टाकलं असल्यामुळे कदाचित, मला हे शहर क्षणात आवडलं. पुढे कामानिमित्त अनेकदा मी दिल्लीचा प्रवास केला. अगदी मनात उत्सुकता व आनंद बाळगून केला. पण या शहरात स्थलांतर करून 'दिल्लीवाला' होण्याचा प्रसंग आपल्यावर येईल असं मला कधीही वाटलं नव्हतं. आणि मागच्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात ही संधी चालून आली.

**अनागोंदीचे चित्रमय स्वगत**


मी सामाजिक क्षेत्रात (social sector) काम करीत असल्यामुळे दिल्लीतील व्यावसायिक विश्वात आपला ठसा उमटावा या हेतूने व दुसऱ्या शहरात स्थलांतरित म्हणून एकदा राहून बघावं, या इच्छेने दिल्लीत स्थायिक होण्याचे नक्की केले. ८ ऑक्टोबर २०२४ या दिवशी मी त्याच पहाडगंज बाजूने नवी दिल्ली रेल्वे स्थानका बाहेर आलो. एव्हाना मला लाल सिग्नलला रेड लाइट म्हणतात हे माहिती झालं होतं. सौरव गांगुली भोवती ऑस्ट्रेलियन संघ जसा स्लिप्स उभ्या करायचा तसे रिक्षावाले व टॅक्सीवाले रेल्वे स्थानका बाहेर येणाऱ्या पॅसेंजर भोवती करतात याची देखील माहिती झाली होती. चेहरा निर्विकार ठेवत त्यांना चुकवत आपल्या कॅबवाल्यापर्यंत पोहोचण्याची कलासुद्धा अवगत झाली होती. कॅबमध्ये बसलो, ओटीपी सांगितला आणि C-Block, DDA Flats, Munirka हे स्थळ गाठण्यासाठी गाडी पुढे सरसावू लागली. रिक्षा, हातगाड्या, टॅक्सी, सायकल-टांगे, दुचाकी वाहनं आणि कसलीही शिस्त न पाळणारी असंख्य लोकं असलेल्या त्या रस्त्याला क्लेम्सफोर्ड रोड म्हणतात, हे अनेकांना माहिती नसेल. मला मात्र कोणत्याही शहरात गेल्यावर तिथल्या रस्त्यांची नावं वाचायला आवडतात. अशात दिल्लीतील रस्ते म्हणजे माझ्या आवडत्या विषयाची - इतिहासाची - उजळणीच! तर, पुढे कनॉट प्लेसचं सर्कल (दिल्लीच्या भाषेत गोल-चक्कर) येईपर्यंत कोणतीही गाडी ही या क्लेम्सफोर्ड रोडवरील गर्दीतून वाट काढत पुढे सरकते.

रात्रभर राजधानी एक्स्प्रेसने प्रवास जरी झाला असला तरीही झोपेचा हिशेब लागलेला नसतोच. अशा प्रसंगी जर तुमच्या कॅबने आधीच रस्त्यावरील जनतेसमोर शरणागती पत्करली तर झोप पुन्हा डोकं वर काढू लागते. अशीच एक जांभई देत असताना माझी गाडी अचानक थांबली. पुढील गाडी कोणताही इशारा न देता अचानक थांबली होती, असं क्षणात समजलं. आता एवढ्या गर्दीत असं होणारच, पण त्याने माझ्या गाडीच्या ड्रायव्हरचा पारा चढला! तो इतका की त्याने गाडीची काच खाली केली आणि जोरात ओरडला, भेंन के...

मला शिव्या ऐकणं काही नवीन नव्हतं. पण लिंग आणि संबंधित अवयव यांची इतकी सरसकट अदलाबदल ही बहुदा दिल्लीतच होत असावी! गर्दी, बेशिस्तपण, भोंग्यासारखे वाजवलेले गाडीचे हॉर्न, उर्मट आवाजात विनवण्या करणारे रिक्षावाले या सगळ्याद्वारे दिल्लीने माझं चित्रमय स्वागत केलंच होतं. आता या शिवीने शाब्दिक स्वागतही झालं!

**दिल्लीचे ठग रुप**

परंतु दिल्लीचं अशाच प्रकारचं नकारात्मक चित्र आपल्या सर्वांच्या मनात घर करून बसलं आहे. त्या दिवशी कॅबमध्ये अचानक आपण पहिल्यांदा दिल्ली संबंधित कोणतं वर्णन ऐकलं होतं, हा विचार मनात आला. आठवला दहावीची परीक्षा झाल्यावर केलेला मुंबई ते चंदीगढ रेल्वेचा प्रवास. 'शिमला, कुलू मनाली व इतर' असा त्या वेळेस प्रसिद्ध असलेला प्रवास मी करत होतो. ट्रेन जशी दिल्लीत शिरली तशी आमच्या बरोबर प्रवास करत असलेल्या एक काकू सतर्क




*पावलापावलांवर संस्कृती-परंपरांची जीवंत प्रतीके असलेल्या मॉन्युमेंट्स भोवती दिल्लीचे रोजचे व्यवहार होत असतात...*

होऊन मला म्हणाल्या होत्या, सर्व बॅगा सीट खाली सारा, दिल्ली आलं आहे. इथल्या लोकांचा काही भरवसा नाही! वास्तविक, पनवेल मध्ये आपले बहुतांश आयुष्य घालवणाऱ्या त्या काकूंना दिल्लीची भीती का होती, काही कल्पना नाही. त्या आणि आता व्यावसायिक जीवनात कंपनीतील 'एच आर' दिल्लीच्या लोकांबद्दल जे बोलतात त्यात फारसा गुणात्मक फरक नाही. अरे, ये दिल्ली के लोग ना, या बंदिशीच्या मुखड्यानंतर होणारी बढत काही फार सकारात्मक नसते. तर, अशा या शहरात स्थायिक होण्यासाठी मी तिथला हिवाळा, तिथली मेट्रो आणि तिथलं व्यावसायिक जाळं या जमेच्या बाजू धरल्या आणि त्यांच्या जोरावर इथे काही काळ स्थायिक होण्यासाठी आलो होतो. आणि या तिन्हीपैकी दिल्लीच्या मेट्रो ने बाजी मारली!

**दिल्लीची जीवनरेखा**

दिल्लीच्या हिवाळ्याचे जरी मला जास्त आकर्षण वाटत असलं, तरीही मी २०१७ याच वर्षी तिथल्या मेट्रोच्या प्रेमात पडलो होतो. माझं तेव्हाचं ऑफिस हे ग्रीन पार्क मेट्रो स्थानकापासून साधारण वीस मिनिटं चालत अंतरावर होतं. मला चालण्याची आवड आणि सवय असल्यामुळे मी ऑफिस सुटल्यावर लगेच आजूबाजूचा परिसर चालत हिंडायचो.

असंच एकदा चालत ग्रीन पार्क मार्केटचा परिसर सापडला. तिथून थोडं पुढे गेलो आणि थेट ग्रीन पार्क मेट्रो स्टेशनच्या दारात पोहोचलो. दिल्ली मेट्रोच्या 'येलो लाइन' (Yellow Line) वरील हे एक स्थानक. आणि त्या दिवसापासून १०० ते १५० रुपयांचा प्रवास ३० रुपयांत होऊ लागला. त्या शिवाय प्रवास सुखकर आणि वेळेवर होण्याचीही हमी मिळाली. आणि ८ वर्षांपूर्वी Delhi Navigator नावाचे ॲप मी फोनमध्ये इन्स्टॉल केले, ज्याचा अगदी मागच्या वर्षी दिल्ली राहण्याचे ठिकाण ठरवण्यापर्यंत उपयोग झाला. दिल्ली मेट्रो बद्दल मी पुढे विस्ताराने लिहिनच. पण मेट्रोचं जाळं काय असतं, त्याने शहराचा चेहरा कसा बदलतो हे सारं मला २०१७ या वर्षी समजलं. ही कल्पना आकारास आणण्यासाठी दिल्लीच्या माजी मुख्यमंत्री श्रीमती शीला दीक्षित यांना जितके धन्यवाद देऊ तितके कमी.

तोपर्यंत मुंबईत लोकल ट्रेनच्या चार लाइन्सची सवय होती ज्यात खूप कमी जंक्शन आहेत. मात्र दिल्ली मेट्रोत आजच्या घडीला एकूण दहा लाइन्स आहेत व आणखी एक एअरपोर्टसाठी वेगळी एक्स्प्रेस लाइन धरून अकरा. इतक्या लाइन्स एकमेकात गुंतलेल्या असल्यामुळे तुम्हाला ऑफिसच्या सर्वात जवळ असलेल्या मेट्रो स्टेशनला डोळ्यासमोर ठेवत स्वतःचं घर निवडण्यासाठी अनेक जागांचे पर्याय उपलब्ध होतात.

उदाहरणार्थ, माझ्या कंपनीचं एक ऑफिस सिकंदरपूर मेट्रो स्टेशनच्या जवळ आहे (गुडगाव, हरियाणा) जे मेट्रोच्या 'येलो लाइन'वर स्थित आहे. दुसरं ऑफिस हे ओखला मेट्रो स्टेशनच्या जवळ आहे जे 'मॅजेंटा लाइन'वर स्थित आहे. या दोन्ही लाइनचं जंक्शन आहे 'हौज खास.' याचा अर्थ मी 'येलो लाइन' किंवा 'मॅजेंटा लाइन'वर स्थित कोणत्याही ठिकाणी घर घेऊ शकत होतो. जर मी 'येलो लाइन'वर राहिलो असतो तर 'गुडगाव'साठी मला लाइन न बदलता जाता येणार होतं व ओखलासाठी हौज खासला उतरून लाइन बदलून मॅजेंटा लाइनने प्रवास. आणि जर मी मॅजेंटा लाइनवर घर घेतलं असत तर मी ओखलाला जाताना लाइन बदलली नसती, मात्र गुडगावला जाण्यासाठी हौज खासला उतरून येलो लाइन

निवडली असती.

इथे रेल्वेच्या भाषेत सांगायचं तर हौज खास हे जंक्शन आहे. मुंबई लोकलचा संदर्भ द्यायचा झाला तर कुर्ला किंवा दादर. दिल्लीत अशा स्टेशनांना 'इंटरचेंज स्टेशन' (interchange station) म्हणतात. मुंबईत दादर, ठाणे, वाशी आणि कुर्ला सोडल्यास सोयीची जंक्शन कोणतीही नाहीत. त्यामुळे मुंबईत वेगाने ट्रेन बदलून प्रवास करणे सोपे नाही. मात्र दिल्ली मेट्रोच्या १० लाइन्सच्या जाळ्यात २९ इंटरचेंज स्टेशन आहेत. हे जाळं अजून वाढत चाललंय. त्यामुळे दिल्लीचा प्रवास एकरेषीय नाही व तिथे राहण्याचे पर्याय देखील वाढतात.

**सोहळे ऋतुंचे**

हे इतकं सोयीचं ठरलं, की मॅजेंटा लाइनवर स्थित मुनिरका हे ठिकाण मी निवडलं आणि तिथल्या दिल्ली डेव्हलपमेंट ऑथॉरिटी अर्थात 'डीडीए'च्या कॉलनीत घर नक्की केलं. अगदी दिल्लीशी संबंधित शब्द वापरायचा तर, माझं घर हे एक 'बरसाती' आहे. इमारतीच्या मुख्य गच्चीवर दोन खोल्या, स्वयंपाकघर, शौचालय आणि उरलेला परिसर, अर्थात गच्ची. तुम्हाला 'चश्मे बद्दूर' सिनेमा आठवतोय का? त्यात जे घर आहे ती आहे, बरसाती. ती बरसाती आहे, दिल्लीमधील डिफेन्स कॉलोनी या भागातील. दिल्लीत नेमकं किती वर्ष राहावं लागेल हे आता निश्चित नसल्यामुळे अगदी सुरुवातीलाच घर-भाड्यात खूप खर्च करायला नको हा मध्यमवर्गीय विचार मला 'बरसाती'चा वेगळा अनुभव देण्यास खूप उपयोगी पडला आहे. इथेच वर्षभरात मी दिल्लीचे सर्व ऋतु अगदी बारकाईने अनुभवले आहेत. या 'डीडीए' वस्त्या जितक्या सोयीच्या तितक्या त्यात सामाजिक खुजेपण देखील आहे. त्यांच्याबद्दल नंतर लिहिनंच.

'दिल्ली डेव्हलपमेंट ऑथॉरिटी'च्या कॉलनी काही ठिकाणी खूप वर्षांपासून आहेत. आमचीच कॉलनी १९७५ या वर्षी बांधली गेली, असं नंतर माझ्या वाचनात आलं. इथून सर्वात जवळ जवाहरलाल नेहरू विद्यापीठ (जेएनयु) आणि आयआयटी-दिल्ली ही दोन प्रमुख विद्यापीठं असल्यामुळे ७०च्या दशकापासून इथे तिथल्या प्राध्यापकांनी घरं घेतली आहेत व भाड्याने राहण्यासाठी विद्यार्थ्यांची ये-जा सुरू असते. तिथे पोचल्यावर मला कन्हैय्या कुमारने एकदा एका मुलाखतीत सांगितलेलं वाक्य आठवलं - जेएनयु नंतर संबंधित विद्यार्थी एक तर अम्रिकाला जातो किंवा मुंरीकाला! हेच ते मुनिरका.

मुनिरकाबद्दल आणखी एक रोचक माहिती मला काही महिन्यात मिळाली. झालं असं, की दिल्लीला पोचल्यावर मी दुसऱ्या दिवशी सकाळी परिसर बघायला बाहेर पडलो. तेव्हापासून अनेक दिवस अनेक ठिकाणी एक आडनाव मला सतत दिसलं - टोकस. अगदी अलीकडे एका लेखात समजलं की मुनिरका हे नाव मुनीर खान नावाच्या मुघलकालीन प्रशासनावरून पडलं आहे. मात्र त्याच्यावर कर्जाचं ओझं वाढल्यामुळे त्याला आपली जमीन चौधरी रुद्ध सिंह टोकस या इसमाला द्यावी लागली. तेव्हापासून इथे टोकस या समूहाचं प्राबल्य आहे. हा जाटांमधील एक समूह आहे. दिल्लीत, पंजाबात, उत्तरप्रदेशात आणि हरियाणात राजकीयदृष्ट्या एक प्रभावी समूह. असंही दिल्लीत जाती किती महत्त्वाच्या आहेत हे गाडीच्या मागच्या काचेवर जाट, गुर्जर किंवा चौधरी असं लिहिल्याने अगदी पटकन लक्षात येतं. पण नवीन शहरात स्थायिक झाल्यावर गाडीच्या मागच्या काचेवर लिहिलेलीच नावं नाही, तर एकंदर दुकानाचे बोर्ड आणि घरासमोरील पाट्या हे देखील बरंच काही सांगून जातं. मी मुंबईत राहत असल्यामुळे मला अगदी लहानपणापासून देशाच्या बहुतेक सर्व राज्यातील आडनावं माहिती आहेत. परंतु या सर्व आडनावांबरोबर मराठी आडनावंही असण्याची सवय मला झालेली आहे. पुढील काही दिवस गर्ग, वालिया, टोकस अशीच आडनावं दिसू लागल्याने आपण बहुभाषिक प्रदेशातून एकप्रकारच्या एकजिनसीपणाकडे आलोय, का असाही विचार मनात आला. गल्लीतून, बोळातून, मोठ्या रस्त्यावर, मेट्रो स्टेशनवर, मेट्रोत व दुकानांमध्ये फक्त आणि फक्त हिंदी. एरवी मुंबईत मराठी, थोडं पुढे गेलं की गुजराती, काही ठिकाणी दाक्षिणात्य भाषा व या सगळ्यांबरोबर नांदणारी हिंदी अशी माझी अंतर्गत मानसिक रचना झालेली आहे व दिल्लीने तिला छेद द्यायला सुरुवात केली.

**'कलेश'कारी भोवतालातले उत्सव**

आपण हिंदी पट्ट्यात आलो आहोत, याची जाणीव झाली. देशातील भाषिक समुदायांकडून - विशेषतः महाराष्ट्रासहित दक्षिणेतील सर्व राज्यांकडून या पट्ट्याकडे त्रासिकतेने व तुच्छतेने बघितले जाते. परंतु सर्व हिंदी राज्यांना एकाच नजरेने पाहणे हे देखील माझ्या तत्त्वात बसत नाही. मनात पूर्वग्रह धरून राहिलो तर दिल्ली आणि तिथल्या लोकांची मानसिकता यापैकी कशाचेही निरीक्षण करता येणार नाही, याचीही मला जाणीव होती. ढोबळ अर्थाने विचार केला, तर दिल्लीतील



*दिल्लीमध्ये रहदारीत अडकलेल्या गाड्यांचे वाजणारे हॉर्न ही एक तऱ्हेची आक्रमक नि आव्हानात्मक अशी संवादभाषाच आहे...*

लोकांबद्दलचे काही ठोकताळे मी आधी अनेकदा या शहरात कामानिमित्त यायचो तेव्हा बांधून झाले होते. उदाहरणार्थ, इथल्या लोकांचे देशातील इतर समुदायांपेक्षा चार सूर वरच्या पट्टीत बोलणे व त्याचे त्यांना काहीही न वाटणे. देशातील इतर शहरात जर गाडीच्या हॉर्नमुळे डोकं दुखत असेल तर दिल्लीत त्याचा परिणाम वाजवणाऱ्या व्यक्तीबद्दल डोक्यात हिंसक विचार येतो, हा आणखी एक फरक! इथल्या दुचाकी वाहनांना पाहून व फुटपाथवर त्यांचा अगदी लीलया होणारा प्रवेश अनुभवताना 'यापेक्षा पुणे बरं' असाही विचार अनेकदा माझ्या मनात आला आहे. रस्त्यावर, नाक्यावर होणारी भांडणं, शिव्या, मारामाऱ्या हे सर्व आपल्याला इंटरनेटवर 'कलेश' या नावाने अधूनमधून दिसत असतात. पण हे सारे झाले नकारार्थी विचार व अनुभव. या सगळ्याच्या पलीकडे जाऊन विचार केला तर इथला माणूस नेमका कसा आहे, तो असा का वागतो व त्यांचा जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा आहे हे समजणे जास्त गरजेचं आहे.

मी आलो, तो ऑक्टोबर महिना होता. पोहोचण्याच्या दोन दिवसानंतर दसरा होता आणि दिवाळी जवळ येऊ लागली होती. साधारण आठवड्याभराने एके दिवशी फुटपाथ, बाजारपेठ, हौसिंग सोसायटीच्या बाहेरील प्रांगण, घराचा उंबरा आणि मिळेल ती मोकळी जागा महिलांनी त्यांच्या दोन्ही हातांवर मेंदी (मेहंदी) काढण्यासाठी व्यापलेली आढळली. बहुदा त्याच्या दुसऱ्या दिवशी रात्री उत्तरेकडचा तो 'सहस्रांचा' चंद्र दर्शन सोहळा आमच्या भोवती असलेल्या इमारतींच्या गच्चीवर मला दिसला – करवा चौथ! बॉलिवूडच्या कृपेने लग्नात नवऱ्याचे बूट चोरणे व त्याच्या बदल्यात त्याच्याकडून पैसे मागणे ही आपलीच प्रथा आहे, असं महाराष्ट्रातील ज्या लोकांना 'हम आपके हैं कौन' या सिनेमामुळे वाटलं त्यांचे वैचारिक वारसदार आज तोच समज 'करवा चौथ'बद्दल बाळगून आहेत. हा विचार माझ्या मनात आला आणि त्याचवेळेस चंद्राला या सामूहिक उपास करणारींची दया आली आणि सोहळा संपला.

पण जसे दिवाळीचे वेध लागू लागले तसे पलीकडे हरियाणा व पंजाब इथल्या शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील पराळीची विल्हेवाट लावायला सुरुवात केली होती. काही दिवसांत आपण हिवाळ्यात प्रवेश करू या आनंदात असताना, मला माझा आवाज कधी गेला हे कळलं देखील नाही! हे पाहिल्या बरोबर माझ्या ऑफिसमधील स्थानिक सहकाऱ्यांनी मला पहिला मोलाचा सल्ला दिला. दिवाळी आली की ताबडतोब दिल्ली सोड!

दिल्ली सोडून जिथे जाईन तिथला परिसरच नव्हे तर तिथलं स्वच्छ आकाशही 'काय बघावे' या यादीत समाविष्ट असेल, याची मला तेव्हा अजिबात कल्पना नव्हती. दिल्लीचे प्रदूषण ही तर आता अजिबातच अतिशयोक्ती नाही...


**आशय गुणे हे दिल्लीस्थित अमेरिका इंडिया फाउंडेशनचे कम्युनिकेशन कन्सल्टंट, लेखक, अनुवादक आणि संगीत आस्वादक आहेत. त्यांचे डॉ. मनमोहन सिंग–ए टेम्पेस्टुअस टेन्यूर–सहलेखक सुजय शास्त्री– हे पुस्तक प्रकाशित आहे.**
**संपर्क:** gune.aashaygmail.com


# लिओनार्दो दा विन्श्ची नावाचा चित्रवैज्ञानिक



डॉ. आनंद जोशी

ज्ञान–विज्ञान






लिओनार्दोला निरीक्षण करणारा एक डोळा होता. हा चित्रकाराचा चक्षु हळूहळू एका शरीरवैज्ञानिकाचा, वनस्पतीशास्त्रज्ञाचा, निसर्ग तज्ज्ञाचा झाला. दुसरा डोळा होता विचार करणारा आणि क्रियाशील, त्याचे रुपांतर एका इंजिनियरमध्ये, एका नगर रचनाकारात आणि गणित तज्ज्ञात झाले. तो दृष्टिवंत होता. 'आज काय आहे' हे तो पाहात होता आणि 'आज काय नाही' 'उद्या काय होऊ शकेल' याची त्याला जाण आणि जाणीव होती...

ते दशक होते १९८०चे. वैद्यकीय व्यवसाय सुरू करून एक तप उलटले होते. थोडी उसंत मिळत होती. मुंबईच्या उत्तरेच्या टोकाकडून दक्षिण टोकाला जाणे फार कठीण आणि वेळखाऊ नव्हते. आठवड्यात एक फेरी एशियाटिक सोसायटीला व्हायची. कधीमधी 'एनसीपीए'ला जाणे होत असे. लिओनार्दो दा विन्श्चीच्या आलेखनाचे, त्याने निर्मिलेल्या उपकरणाचे, अभियांत्रिकेचे, काही चित्रांचे, प्रदर्शन तिथे भरले होते. अपूर्व योग होता. मी आणि सुमती (जोशी) प्रदर्शनाला गेलो होतो. सचित्र आणि माहितीपूर्ण कॅटलॉग घेतला. प्रदर्शन पाहून भारावून आम्ही दोघे बाहेर पडलो. समोरून पु. ल. देशपांडे आणि सुनीताबाई येत होत्या. पु.ल. त्या वेळी एनसीपीएचे संचालक होते. दोन पाच मिनिटे त्यांच्याशी बोललो. कॅटलॉगच्या पहिल्या पानावर त्यांची लफ्फेदार सही घेतली. तारीख होती २०/१२/८६. हा कॅटलॉग मी अधूनमधून पुन:पुन्हा बघत आलो आहे. लिओनार्दो नावाच्या उपजत तल्लख बुद्धी असलेल्या या स्वशिक्षित माणसाचा हा आंतरविद्याशाखीय जीवन प्रवास मला ऊर्जा आणि उमेद देत असतो. या जीवन प्रवासाची अर्थउकल माझ्या सीमित कुंचल्याने करण्याचा हा प्रयत्न.

**सोळावे शतक मोक्याचे**

सोळाव्या शतकाची सुरुवात हा इटालियन दृश्यकलेतील सुप्रसिद्ध कालखंड. हाच काल होता, लिओनार्दो दा विन्श्ची, (१४५२-१५१९) मायकेल ॲन्जेलो, राफाएल या फेमस मास्टर्सचा! यात लिओनार्दो ठळकपणे दिसतो, कारण तो फक्त दृश्यकलावंत नव्हता, तर तो अद्वितीय चित्रवैज्ञानिक होता. कलेच्या इतिहासकारांनी लिओनार्दोच्या जीवनाचे कालखंड आखले आहेत ते असे = पहिला फ्लॉरेन्स काल १४८१ पर्यंत, पहिला मिलान येथील काल १४८१ ते १४९९, दुसरा फ्लॉरेन्स काल १५०० ते १५०५, दुसरा मिलान काल १५०६ ते १५१३, रोम येथील काल १५१३ ते १५१६, शेवटचा फ्रान्समधील काल १५१६ ते १५१९. १९३९मध्ये लिओनार्दोची जन्मतारीख निश्चित झाली = १५ एप्रिल १४५२.

पश्चिम युरोपियन इतिहासाच्या कालविभाजनानुसार १५०० साली मध्ययुग संपले आणि १५०० मध्ये आधुनिक युगाची सुरुवात झाली. लिओनार्दो या दोन युगांच्या सीमेवर उभा आहे. हा बहुआयामी व्यासंगी चित्र-विद्वान भूतकाळाकडे पाहात भविष्याकडेही नजरतो.

**कटू स्मृतींचा गाव – विन्श्ची**

या पिटुकल्या शहरात कॅतेरिना या महिलेच्या पोटी अनौरस म्हणून तो जन्माला आला. पुढे त्याच्या आईने विवाह केला, औरसत्व मिळाले. जन्मावेळच्या या परिस्थितीचा त्याच्या जीवनावर, स्वभावावर सखोल परिणाम झाला. व्यथित एकलेपणा आणि कटुता जीवनभर त्याच्याबरोबर होती. निसर्ग सुंदरतेने वेढलेल्या शहरात त्याचे बालपण गेले. पण त्याचे बालपण अजिबात सुखकर नव्हते. त्याच्या बालपणच्या स्मृती कटू असाव्यात. त्याने त्याच्या नोंदवहीत नमूद केले आहे ते असे, मी पाळण्यात असताना घार येऊन तिने तिच्या शेपटीने माझे तोंड उघडले आणि शेपटीने अनेक वेळा आघात केला होता. आजपर्यंतच्या मेंदू विज्ञानातील संशोधनानुसार वयाच्या तीन ते चार वर्षापर्यंत अशा आत्मचरित्रात्मक स्मृती तयार होण्याची शक्यता जवळ जवळ नसते आणि पुन:स्मरणाची यंत्रणा विकसित झालेली नसते. कारण मेंदूतील केंद्रांचा तसा विकास झालेला नसतो. याला 'इन्फन्टाइल ॲम्नेशिया' 'अर्भककाळातील स्मृतिलोप' म्हणतात. असे जरी असले तरी जवळच्या माणसांचा आवाज, चेहरे ओळखणे, या स्मृती मात्र या काळात तयार होऊ लागतात. कारण जगण्यासाठी त्या अत्यंत जरुरीच्या असतात.

(आता नेणिवेतील स्मृती हुडकून काढता येतील का याबाबत संशोधन मेंदूविज्ञानात चालू आहे) मग प्रश्न असा येतो, लिओनार्दोने असे का लिहिले. वयाच्या चार वर्षा नंतर घरची, आजूबाजूची मंडळी जे बोलतात ते ऐकून मूल स्वत:च्या कल्पनेने स्मृती तयार करते. लिओनार्दोने स्वत:च्या कल्पनेने ही आठवण रचली असावी, वेदनादायक बालपणामुळे हे घडले असावे.

१९१० च्या सुमारास सिग्मंड फ्रॉइडने 'Leonardo da Vinci - Apsychosexual study of an infantile Reminiscence' लिओनार्दोच्या पेंटिंग्जचा अभ्यास करून मनोविश्लेषणात्मक आणि मनोलैंगिक दृष्टिकोनातून पुस्तक लिहिले. ते वादग्रस्त ठरले आणि त्याकाळी पाश्चात्य जगतात व्हायरल झाले. त्यावर अनेक साधक बाधक निबंध लिहिले गेले. अशा विचारांना समाजात अवकाश मिळाला तर नवीन ज्ञानाच्या निर्मितीला हातभार लागतो. परस्परविरोधी विचार ऐकून घेण्याची समाजाला सवय लागते. उदारमतवादाचा स्तर उंचावतो. अशा लेखांमुळे, पुस्तकांमुळे, पाश्चात्य जगात 'सायकोॲनालिसिस

अँड हिस्टरी ऑफ आर्ट', हे नवे दालन सुरु झाले.

**दोन डोळे शेजारी**

लिओनार्दोला निरीक्षण करणारा एक डोळा होता. हा चित्रकाराचा चक्षु हळूहळू एका शरीरवैज्ञानिकाचा, वनस्पतीशास्त्रज्ञाचा, निसर्ग तज्ज्ञाचा झाला. दुसरा डोळा होता विचार करणारा आणि क्रियाशील, त्याचे रुपांतर एका इंजिनियरमध्ये, एका नगर रचनाकारात आणि गणित तज्ज्ञात झाले. तो दृष्टिवंत होता. 'आज काय आहे' हे तो पाहत होता आणि 'आज काय नाही' 'उद्या काय होऊ शकेल' याची त्याला जाण आणि जाणीव होती.


वयाच्या चौदाव्या वर्षापासून लिओनार्दो फ्लॉरेन्स येथील सुप्रसिद्ध शिल्पकार चित्रकार आंद्रेय देल वेरोक्कियोकडे (१४३५-१४८८) उमेदवारी करत होता. तेथे स्त्री आणि पुरुष मॉडेल्स येत त्यांचे सूक्ष्म निरीक्षण करून त्याने मानवी शरीराची रेखाटने केली. हा त्याच्या शरीरविज्ञानाचा श्रीकार होता. त्यानंतर गुप्तपणे पळवलेल्या तीस मानवी मृतदेहांचे त्याने शवविच्छेदन केले. त्याची आलेखने केली. त्याचे हे कसब पाहून त्याला इस्पितळातून विच्छेदनाकरता बोलावणी येत. त्याने प्राण्यांचे सुद्धा विच्छेदन केले. १५१० ते १५११ या काळात पाविया विद्यापीठात प्राध्यापक मर्कांण्टोनिओ डेला टोर (१४८१-१५११) यांच्याबरोबर शरीरविज्ञानात संशोधन केले. या विद्येत पारंगत होत असताना त्याने जी माहिती गोळा केली, ती वापरून त्याने ही मानवी सुंदर ड्रॉइंग्ज रेखाटली. 'ही ड्रॉइंग्ज म्हणजे एक बोधन क्रिया आहे' असे तो म्हणत असे. त्याची बोटे चित्रकाराची, त्याने काढलेल्या मानवी कायेच्या रेखाकृती रखरखीत आणि सामान्य नव्हत्या तर कमनीय होत्या, पण शरीरविज्ञानाला सोडून नव्हत्या. स्व-अभ्यासाने लिओनार्दो स्व-शिक्षित झाला होता. देहाची अंगोपांगे, चेहरा-हात-पाय यांची त्याने केलेली अभ्यास-रेखांकने ही सजीव; गतिमान वाटतात. माझ्यासारखा सामान्य दर्शक मोहून जातो. दृश्यकलेच्या अभ्यासकांसाठी तर ती अनमोल आहेत. तो गेल्यानंतर काही शतके उलटली आणि त्याच्या वह्या संशोधकांना मिळाल्या, हे दृश्यकलेचे भाग्यच आहे. यातील ६० रेखांकाने न्यूयॉर्क येथील डोव्हर प्रकाशनाने १९८० साली प्रकाशित केली आहेत. मला हे पुस्तक पृथ्वी थिएटरच्या पुस्तकालयात मिळाले. विलक्षण विद्यानंदी योगायोग होता तो! काही आधुनिक वैद्यकीय विज्ञानाच्या पुस्तकात ही आरेखने मुखपृष्ठावर छापलेली आहेत.

पंधराव्या आणि सोळाव्या शतकात आधुनिक प्रायोगिक विज्ञानाने भरारी घ्यायला सुरुवात केली होती. तेव्हापासून चित्रकारांनी विज्ञानात रस घ्यायला सुरुवात केली होती. फिलिपो ब्रुनेलेशी (१३७७-१४४६), मसाशिओ (१४०१-१४२८), वगैरे चित्रवंताबरोबर ठळक नाव लिओनार्दोचे होते. त्याच्या मानवी शरीरविज्ञानाच्या ज्ञानामुळे त्याने मानवी आकार मग तो चेहरा असो वा हात पाय असो अत्यंत बिनचूकपणे, आणि प्रमाणबद्धतेने रेखाटले आहेत. त्याच्या या आलेखनाना तोड नाही. आज मेंदू विज्ञानात खूपच संशोधन सुरु आहे. मेंदूतील नवनवीन प्रक्रिया उजेडात येत आहेत हे ज्ञान चित्रकारांपर्यंत पोचले तर याचा उपयोग आजच्या चित्रकलावंताना निश्चित होईल, असे मेंदूतज्ज्ञांना वाटते.

चित्रकला तसेच मेंदूविज्ञान चित्रकारांकडे तसेच दर्शकांकडे लक्ष देते. या दोहोंशिवाय चित्रकलेचे वर्तुळ पूर्ण होत नाही. लिओनार्दोने प्रमाणबद्ध, सुसंबद्ध चेहरे काढले, पण त्याच्या प्रतिभेची बोटे चित्रकाराची होती. त्याला माहीत होते की नुसत्या प्रमाणबद्धतेने चित्र तयार होईल, पण चित्रकला निर्माण होणार नाही. त्याने चेहऱ्यावर भाव भावना दाखवून चेहरे जिवंत केले. चेहऱ्याचे विशिष्ट 'फिचर्स' धूसर करून दर्शकांना त्याचा अर्थ लावण्यास आणि निर्मितीचे वर्तुळ पूर्ण करण्यास भाग पाडले. त्याच्या कुंचल्याच्या फटकाऱ्यात, पेन्सिलीच्या रेषेतील प्रातिभ कसबामुळे हे घडले होते. लिओनार्दोच्या या तंत्राला इटालियन भाषेत 'sfumato' हा शब्द आहे, त्याचा अर्थ आहे 'धूसर रेषा आणि सौम्य रंगछटा'.

**आरीबोरीचा लळा**

आरीबोरी म्हणजे निसर्गात उगवलेला झाडा झाडोरा, म्हणजे बगीचातला आखीव रेखीव नाही. असा निसर्ग लिओनार्दोच्या गावाभवती भरपूर होता. तो एकटाच तेथे भटकंती करत असे. जशी दृष्टी तशी सृष्टी. त्याने नजरेने झाडे झुडपे न्याहाळली. त्याने आलेखने केली, नोंदी केल्या. त्याने एक 'ॲटलस ऑफ बॉटनी' वनस्पती विज्ञानाचा नकाशा तयार केला. आजही तो लंडन येथील विंडसर ग्रंथालयात आहे. झाडांच्या खांद्यांवर पानांची विशिष्ट योजना असते, त्याला पर्णविन्यास म्हणतात. याची रेखाटने करून त्याचे मॉडेलही त्याने तयार केले. सगळ्या पानांना योग्य सूर्यप्रकाश मिळावा म्हणून निसर्गाने ही व्यवस्था केलेली असते, हे त्याने नोंदवून ठेवले. त्या काळी सर्वसाधारण



*अफाट अशी प्रज्ञा कक्षा असलेल्या लिओनार्दोला जगाला चैतन्य मिळवून देणाऱ्या प्रत्येक घटकाच्या आंतररचनेचे कुतूहल होते...*

समज होता झाडे फक्त पाण्यावर वाढतात. त्या समजाला त्याचा विचार छेद देणारा होता. झाडाच्या मुळातून पाणी सूक्ष्म वाहिन्यांमार्फत केशाकर्षणाने वर चढत जाते, हे सुद्धा त्याने नमूद करून ठेवले आहे. पानांची वृक्षावरची योजना अशी का, असते हा वनस्पती विज्ञानातील एक नियम जणू त्याने दाखवून दिला. मोठ्या झाडाचे खोड कापले म्हणजे त्यात झाडाच्या वाढीची वर्तुळे दिसतात, म्हणजे 'ग्रोथ रिंग्ज', याची रेखाटने करून याचा उपयोग झाडाचे वय आजमावण्यासाठी होतो, हे सुद्धा त्याने नमूद करून ठेवले आहे.

तो वीस वर्षाचा असताना त्याने अवतीभवती असणाऱ्या आणि वाढणाऱ्या 'मॅडोना लिली' या पांढऱ्या शुभ्र लिलींची चित्रे त्याने काढली. पुढे १४७१ ते १४७६ काळात त्याने काढलेल्या 'Annuciation' या प्रसिद्ध धार्मिक चित्रात या सफेद लिली पुन्हा दर्शकांसाठी दिसू लागल्या.

**विज्ञानशाखा ते अभियांत्रिकी: अफाट प्रज्ञाकक्षा**

भूमिती भारतीयांकरता नवीन नाही. प्राचीनकाळापासून आपले पूर्वज भूमितीचा उपयोग करत आले आहेत. भास्कराचार्य (१२ वे शतक) यांच्या लीलावती या ग्रंथात भूमिती समाविष्ट आहे. 'लीला हा शब्द संस्कृतमध्ये खेळ, सहजसुंदर कृती या अर्थाने येतो. भास्कराचार्यांना गणितातील क्रिया व गणिती प्रश्नांची उकल या आनंददायक क्रीडेसारख्याच वाटत असणार' असे डॉ. मेधा लिमये यांनी त्यांच्या लीलावती या पुस्तकात नमूद केले आहे. (लीलावती वरदा प्रकाशन पुणे ऑक्टोबर २०२०) यातील 'आनंददायक क्रीडा' हा शब्द मला महत्त्वाचा वाटतो. विविध ज्ञानशाखांतील ज्ञान गोळा करण्यात एक 'प्ले एलिमेंट' खेळाचा अंश असतो. खेळ नियमांच्या चौकटीत खेळला जातो. खेळ खेळताना उल्हास व ताण तणाव दोन्ही असतात. खेळ संपल्यानंतर आनंद आणि (बौद्धिक) श्रमाचा सुखद थकवा, तसेच विसावा असतो. ज्ञानार्जनात असेच घडते. लिओनार्दोने विविध ज्ञानाशाखांतील ज्ञान गोळा करून त्याचा एकमेकाशी संबंध जोडला यांनी त्याची प्रतिभा प्रगल्भ झाली. याचा उपयोग त्याला दृश्यकलेच्या पटावर झाला.

लिओनार्दो भूमितीय समस्यांमध्ये रंगून जात असे. बहुभूजाकृती तयार करण्यात त्याला रस होता. त्याने एक बहुपृष्ठक तयार केला होता. सपाट बहुभूज पृष्ठभाग, सरळ कडा आणि टोकदार शिरोबिंदू असलेली त्रिमितीय वस्तू असा बहुपृष्ठक त्याने तयार केला होता. भूमितीचा उपयोग त्याने 'optics' = दृश्यविज्ञान आणि प्रकाशकिरणांच्या शोधाभ्यासाकरता केला होता.

रसायन विज्ञानात लिओनार्दोला रस होता. त्याने ऊर्ध्वपतनाकरता भांडे तयार केले होते. तो त्याच्या पेंटिंग्जसाठी स्वत: रंग तयार करत असे. त्यासाठी त्याने अभ्यास-प्रयोगशालेचे गुंफण केले होते. त्याला कशात रस नव्हता, हे ही समजून घेतले पाहिजे. त्याकाळचे बरेच रसायनशास्त्रज्ञ कोणत्याही धातूचे सोन्यात रुपांतर करू पाहणाऱ्या 'अल्केमि'त गढले होते. हा वेळ फुकट घालवण्याचा धंदा आहे असे त्याचे मत होते.

हायड्रोलिक्स, मरीन इंजिनियरिंग यात त्याने बरीच भर घातली आहे. पाखरे, कीटक यांचा अभ्यास करून त्याने 'फ्लायिंग मशिनचे' प्रयोग केले होते. शस्त्रात्रे, तोफा, बंदुका, आर्म्ड व्हेइकल्स याची त्याने तयार केलेली मॉडेल्स आणि आरेखने म्हणजे पुढे विकसित होणाऱ्या मिलिटरी इंजिनियरिंगच्या पाउलखुणा होत्या.

तो नगररचनाकार होता. त्याला संगीतात रस आणि गती

होती याचे विवेचन पुढे केले आहे. हे टंकलेखन चालू असताना माझ्या विचारांचे खोदकाम चालू होते.

**झेप घेरे पाखरा**

'आकाशी झेप घेरे पाखरा/सोडी सोन्याचा पिंजरा' हे जगदीश खेबुडकर (१९३२-२०११) यांच्या गीताचे सूर हा लेख लिहिताना दूरवरून कानावर आले. ते मला या लेखासाठी आशयघन वाटले. प्रतिभावान व्यक्तीने त्याच्या 'टॅलेंट'च्या सोनेरी पिंजऱ्यात बंदिवान होऊ नये. तो पिंजरा तोडून बाहेर भरारी घावी. प्रतिभेला आकाश द्यावे. कला आणि विद्या या दोन्ही ज्ञान शाखा. ज्ञान जखडून ठेवत नाही. (विष्णुपुराणात सा विद्या या विमुक्तये असा श्लोक आहे. त्याला आध्यात्मिक अर्थ आहे, पण मला कर्तव्य आहे ते 'विद्या मुक्त करते' या संकल्पनेशी. विद्या जशी मुक्त करते, तशी कला सुद्धा दृश्य कलावंताला मुक्त करते. लिओनार्दो हा मुळातच मुक्त कलावंत होता. जे जे दृश्य आहे त्याचा शोध घ्यावयाचा, ही त्याची धारणा होती. हे त्याने तीव्रतेने आणि अचूकतेने केले. त्याच्या नोंदवह्या, त्याची आरेखने यांचे हजारो तावच्या ताव संशोधकांनी शोधले आणि इतिहासाचे महत्त्व जाणणाऱ्या समाजाने जपून ठेवले. पुढच्या पिढ्यांनी ते अभ्यासिले आहेत. ज्ञानाची साखळी शर्यत चालू राहिली आहे.


तो डावखुरा होता. तो उजवीकडून डावीकडे लिहीत असे. त्याच्या नोंदी आरशात बघून वाचाव्या लागतात. त्याचे विचार 'पाखंडी' 'विधर्मी' होते, ते धर्मिष्ठ अधिकाऱ्यांच्या हाती पडू नयेत किंवा सहज समजू नयेत म्हणून त्याने हा मार्ग चोखाळला असावा. त्याने पाच महत्त्वाचे शब्द लिहून ठेवले होते- 'The sun does not move!' कोपर्निकसच्या (१४७३-१५४३) सूर्यकेंद्रित थिअरीचा अंदाज त्याला आला असावा. गॅलिलिओने (१५६४-१६६२) हीच थिअरी हे सत्य आहे, असे मांडल्यामुळे तो अडचणीत आला होता. १९९२ साली कॅथलिक चर्चच्या पोपने चर्चची चूक मान्य केली. धर्म आणि विज्ञानाच्या इतिहासात गॅलिलिओचे हे प्रकरण म्हणजे, एक मोठा अध्याय आहे.

लिओनार्दोच्या अनेक नोंदी वैज्ञानिक सत्याच्या शोध घेणाऱ्या होत्या. त्याची प्रज्ञा त्याला कशातही बंदिस्त करून ठेवू शकत नव्हती. लिओनार्दोला चित्रकला विज्ञानाच्या पायावर उभी राहावी असे वाटत होते.

व्याकरण, तर्कशास्त्र, भूमिती, वगैरे या व्यापक ज्ञान देणाऱ्या कला आणि चित्रकला वगैरे हातकामाच्या म्हणून बौद्धिक नसणाऱ्या हलक्या दर्जाच्या कला, असे अरिस्टॉटलने शिष्टपणाने नियमबद्ध करून टाकले होते. तोच गैरसमज पाश्चात्य समाजाने कायम ठेवला होता. लिओनार्दोने यालाच धक्का दिला. त्यामुळे त्याचे आश्रयदाते आणि त्याच्यामध्ये तणावाचे संबंध होते. घेतलेले 'कमिशन' 'कामगिरी' तो कित्येकदा त्याच्या स्वेच्छेने पूर्ण करे किंवा अर्धवट सोडून निघून जाई. म्हणून तर त्याच्या जीवनाचे फ्लॉरेन्स ते मिलान, मिलान ते फ्लॉरेन्स, नंतर रोम आणि शेवटी फ्रान्स असे कालखंड पडतात. त्याचा स्टुडियो म्हणजे चित्र विकण्याचे दुकान नाही, अशी त्याची धारणा होती.

**चित्रकला-अंतरंगी नानाकला**

भारतीय दृश्यकलेची परंपरा समृद्ध आहे. 'दृश्यकला संपादक गुलाममोहम्मद शेख, पॉप्युलर प्रकाशन, मुबई' या पुस्तकातील पार्श्वभूमी आणि चित्रकला - गुलाममोहम्मद शेख, या प्रकरणात पुढील उल्लेख आहे 'विष्णुधर्मोत्तर पुराणातील एका प्रसिद्ध संवादात आस्वादकाला एका कलेचे आकलन करण्यासाठी दुसरी कला, उदाहरणार्थ, चित्र पुरेपूर उमजण्यासाठी नृत्यकला समजून घेण्याचे सूचन आहे, त्यात रसास्वादाच्या प्रक्रियेचे अनेक गर्भित अर्थ सामावलेले आहेत'. मी थबकलो, हा बोधक आणि प्रगत विचार असे मला वाटले. हे फक्त आस्वादकालाच नव्हे, तर चित्रकारालाही लागू आहे असा विचार माझ्या डोक्यात आला. नृत्यकार नृत्य करताना चेहऱ्यावरचे हावभाव, हातांच्या नाजुक हालचाली, पदविन्यास, या नृत्यबोलीतून कथन करत असतो. त्याचप्रमाणे चित्रकार व्यक्तिचित्रणात चेहऱ्यावरचे भाव, हातापायाची स्थिती तसेच इतर आकारातून चित्रबोलीद्वारे दर्शकाला काहीतरी सांगत असतो. नृत्यकला ही रंगमंचावरील चित्रकला तर चित्रकला ही कॅन्व्हासवरची नृत्यकला असते, असे मला वाटून गेले. लिओनार्दो आणि संगीत, नृत्य यांचा निकटचा संबंध होता. त्याच्या काळात चर्चमध्ये धार्मिक घटनांवर आधारित संगीत नृत्याचे कार्यक्रम होत असत. गावातील प्रतिष्ठित लोक समारंभाला हजर राहत. चर्चच्या रंगमंचाची आरास लिओनार्दो आणि इतर कलाकार करत. रंगकर्मींनी मंचावर 'एन्ट्री' कशी घ्यायची याचे नृत्यदिग्दर्शन चित्रकर्मी लिओनार्दो व त्याचे सहकारी करत. नटनट्यांचे वस्त्र प्रावरण- 'कॉश्चुम्स' लिओनार्दो डिझाइन करत असे. भूमिकेनुसार



*चित्रकार हा जगाचा राजा असतो, असे म्हणणाऱ्या लिओनार्दोची ही भूमितीय कलाविष्कारी नोंद...*

वस्त्राचा रंग असे. त्याची नितांत सुंदर पेंटिंग्ज लिओनार्दोने केली आहेत. लिओनार्दोने अनेक वाद्ये तयार केली होती. त्याची चित्रे आजही उपलब्ध आहेत. त्या वाद्यांमागचे तंत्रज्ञान, यंत्रणा, विज्ञान याची नोंदवही सुद्धा त्याने केली आहे. 'एका कलेचे आकलन करण्यासाठी दुसरी कला' हे सूचन मला लिओनार्दोत असे दिसले.

**लिओनार्दोचे रंगविज्ञान**

इटालियन प्रबोधनपर्वात चित्रवंतांचे रंगामधील कुतूहल वाढले होते. लाल, पिवळा आणि निळा हे तीन प्राथमिक रंग आहेत हे लिओनार्दोने जाणले होते. यांच्या मिश्रणातून रंगांचा पट तयार होतो, याची त्याला पूर्ण जाण होती. रंग माणसाचे भावनिक जीवन समृद्ध करते हे त्याच्या लक्षात आले होते. त्याची चित्रे पाहिल्यास दर्शक हे अनुभवतो.

चित्रकार रंग वापरून चित्र काढत असतो, तेव्हा अनेक रंग एकमेकाशेजारी ठेवत असतो. त्यात सतत बदल करून पाहत असतो. त्याचे हे प्रयोग चालू असतात. त्याला इच्छित असलेला परिणाम साधेपर्यंत हे प्रयोग चालत राहातात. जेव्हा त्याचे समाधान म्हणजे, त्याच्या मेंदूचे समाधान होते, तेव्हा तो खूश होतो. लिओनार्दोने एका रंगा संगे दुसरा कोणता रंग खुलून दिसेल, याचे अनेक प्रयोग केले. रंग-संगतीच्या या प्रयोगानंतर त्याने नमूद केले 'विरोधी रंग' 'अपोनन्ट्स कलर्स' नजरेला सुखदायक 'प्लीजिंग' असतात. लिओनार्दोने पाचशे वर्षापूर्वी नकळत दृष्टिविज्ञानातील एक नियम सांगितला. पन्नास वर्षापूर्वी 'रूल ऑफ आपोनन्सी' हा दृष्टिविज्ञानातील नियम सप्रयोग सिद्ध झाला. मेंदूच्या दृष्टियंत्रणेतील ज्या मेंदूपेशी लाल रंगाने उद्दीपित होतात, त्याच पेशी हिरव्या रंगाने प्रतिबंधित होतात, तसेच पिवळ्या रंगाने उद्दीपित होणाऱ्या पेशी निळ्या रंगाने प्रतिबंधित होतात आणि 'vice versa for each' प्रत्येक रंग पेशीबाबत उलट हेच घडते. मानवी मेंदू 'रंगसंदर्भाने' रंगाचा अर्थ लावत असतो. म्हणून तर विशिष्ट रंगाच्या पार्श्वभूमीवर विशिष्ट रंग खुलून दिसतो. लिओनार्दोला मेंदूविज्ञान कळत होते, असा याचा अर्थ नाही. पण प्रयोगाने, निरीक्षणाने, तो एका वैज्ञानिक सत्यापर्यंत येऊन पोहोचला आणि प्रतिभेने त्याने ते नियमबद्ध करून ठेवले.

'चित्रकार हा सगळ्याचा राजा असतो' असे लिओनार्दो म्हणत असे. पण हे पद मिळवण्याकरता त्याने अतोनात मेहनत जीवनभर घेतली. चित्रकल्पनेला उंच नेण्यासाठी त्याने गावातील ढासळत्या भिंती शोधल्या आणि भुईवर निर्माण होणाऱ्या अनंत रंगात जे काही लिहून ठेवले असते, ते त्याने वाचण्याचा प्रयत्न केला.

लिओनार्दोचे चित्रजीवन पाहून 'चित्र सत्यम जगत् मिथ्या' या पंक्तीची आठव झाली. चित्रकार प्रभाकर कोलते यांनी त्यांच्या 'दृक् चिंतन' साद पहिली, २०२१ या पुस्तकात मोहन सामंत(१९२४-२००४) अत्याधुनिक पुरातन चित्रकार यांच्यावरील लेखात ही ओळ मी वाचली आणि ती स्मृतीत गोंदली गेली. लिओनार्दोचे व्यापक आणि सखोल जीवन आजही त्याच्या चित्रकृतीतून वाहत आहे, दर्शकांना तसेच अभ्यासकांना दिलखेचक आणि बुद्धिखेचक ठरली आहे.

**व्यवसायाने हृदयरोग तज्ज्ञ असलेले डॉ. आनंद जोशी हे मराठीतले नामवंत विज्ञानलेखक, ललितलेखक आहेत. 'बोलकी हाडे', 'मेंदूतला माणूस', 'कर्कविज्ञानाची गोष्ट', 'अक्षर पाविजे निधरि', 'व्यूहचक्र', 'आपले वर्तन, आपला मेंदू' (सहलेखक सुबोध जावडेकर) 'ऑर्वेलच्या अवतीभोवती' ही त्यांची प्रकाशित झालेली पुस्तके आहेत.**

**ई मेल :** drjoshianand628@gmail.com

# सत्य: श्रमिकांचे काव्यबद्ध भावविश्व



**डॉ. नेहा सावंत**

**काव्यगत संवाद**






*कविवर्य सुर्वे आणि त्यांचे चित्रपटीय प्रतिबिंब कवी सौमित्र...*

**मा**नवी मनाचा हुंकार असते कविता... काळ, वेळ आणि अवकाशाचा तुकडा असते कविता... कविता घडत जाते परिस्थितीच्या रेट्यातून... मनाला अस्वस्थ करणाऱ्या हिंदोळ्यांतून... प्रत्येक कवीला दिसणारे जग वेगळे... त्याची येणारी अनुभूती निराळी... यातून कवितेचं म्हणून एक जग आकारास येत जातं. कधी ती आशय-विषयाच्या अंगाने पुढे सरकते, कधी रुपबंध आणि घाटाच्या अंगाने पुढे पाऊल टाकते. कधी ती जगण्यातल्या तरलतेचा वेध घेते, कधी दाहकतेला भिडते, कधी जीवनविषयक तत्त्वांचा वेध घेताना चिंतनातून स्फुरलेला नवा विचार पेश करते... असे जेव्हा घडते, तेव्हा ती नवे वळण घेते, नवा टप्पा गाठते. मराठीच्या काव्य प्रांताला नवे वळण देणाऱ्या, तत्त्वचिंतनाच्या अंगाने नवा टप्पा गाठणाऱ्या अशाच काही निवडक कवी आणि त्यांच्या कवितांचा वेध घेणारी ही लेखमाला. योग असा, कविवर्य नारायण सुर्वेंचे हे जन्मशताब्दी वर्ष. लेखमालेचा प्रारंभ अर्थातच त्यांच्या कवितेपासून...

कोणत्याही वास्तववादी कवीची कविता आणि त्याचं जगणं यात अभिन्न असं नातं असतं, किंबहुना कवितेची नाळ त्याच्या भावविश्वाशी जुळलेली असते, याचा प्रत्यय मला नारायण सुर्वे यांची कविता वाचताना नेहमीच आलेला आहे. मी कृष्णाबाई सुर्वे यांच्या आत्मकथनाचं शब्दांकन करत होते, तेव्हा एकदा गप्पांच्या ओघात त्यांना प्रश्न विचारला होता, तुम्ही तुमचं आत्मचरित्र का लिहिलं नाही? त्यावर ते म्हणाले होते, माझं जगणं आणि कविता वेगळी नाही. माझी कविता हेच माझं आत्मचरित्र आहे.

'मास्तरांची सावली' या आत्मकथनाचं शब्दांकन करत असताना कृष्णाबाई त्यांच्या आयुष्यातील संघर्षपट उलगडून सांगत होत्या. त्यांना नोकरी का आणि कशी करावी लागली, याबद्दल त्या कथन करत होत्या. १९५० मध्ये मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशन आलं, त्यावेळी कपिला खांडवाला शिक्षण अधिकारी होत्या, मास्तरांनी प्रयत्न करून महानगर पालिकेच्या शाळेत प्यून म्हणून मला नोकरी लावली. घरात खाणारी तोंड वाढत होती. सुर्व्यांचा तुटपुंजा पगार, त्यात ते चळवळीतले कार्यकर्ते, कवी म्हणून नावारूपाला येत होते. येणाऱ्या जाणाऱ्या माणसांचा राबता वाढला होता. कुटुंबही वाढत होतं. कुटुंब नियोजन या विचारापासून सुर्वे कितीतरी योजने दूर होते, किंबहुना, त्यांच्या डोक्यात हा विचारच नव्हता. पण मला संसाराचा गाडा हाकायचा होता, मला कुटुंब वाढवून चालणार नव्हतं. पुरुषांना काय! शिवाय इतकी वर्ष इकडे तिकडेच राहिलो. स्वतःचं असं घर नव्हतंच. बऱ्याच काळानंतर परळला, बोगद्याच्या चाळीत, कामगारांच्या वस्तीत छोटीशी का होईना हक्काची पक्की खोली मिळाली होती. चाळीत सगळे गिरणी कामगारच होते. सगळ्या जातीधर्माची माणसं शेजारीपाजारी होती.

**दाहक जाणिवेचे प्रतिबिंब**


कृष्णाबाईंचं मनोगत ऐकताना सुर्व्यांची 'सत्य' ही कविताच माझ्या डोळ्यासमोर उलगडत होती, किंबहुना साक्षात उभी राहिली होती. पुन्हा एकदा नव्याने ती कविता वाचली. कविता वाचल्या बरोबर त्यातले कितीतरी पैलू जाणवत गेले. आजही ती तितकीच ताजी आणि रसरशीत वाटली. त्यातला वेगळेपणा नव्याने जाणवला. ही कविता प्रेमानुभव व्यक्त करणारी असली, तरी पारंपरिक, रोमँटिक कवितेपेक्षा कितीतरी वेगळी. रूढार्थाने जशी प्रेमकविता असते, तशी सुर्व्यांची प्रेमकविता नाही. हुरहूर, प्रतिक्षा, विरह हे भाव त्यांच्याही कवितेत येतात, पण वेगळ्या स्वरूपात. 'सत्य' कवितेत ते प्रकर्षाने जाणवते.

सुर्व्यांच्या कवितेतील प्रियकर, प्रेयसी सुस्वरूप, देखणे, विवाहपूर्व अवस्थेतील तसेच एकमेकांवर अनुरक्त असे दिसत नाहीत. तर त्यांच्या कवितेतील प्रियकर व प्रेयसी कामगार वर्गाचे प्रतिनिधित्त्व करणारे आहेत, त्यामुळे त्यांच्या कवितेतील प्रेयसी सौंदर्यवती नाही, तर संघर्षवती आहे. त्यांच्या कवितेतील प्रेमानुभव साकारण्यासाठी निसर्गाची पार्श्वभूमी येत नाही. तर कारखान्यांचा खडखडाट, चाळीतील वर्दळ, कोलाहल यांचे वातावरण असते. त्यामुळे तथाकथित प्रेमकवितेतील तरल अनुभवापेक्षा परिस्थितीची दाहक जाणीव प्रकर्षाने व्यक्त झाल्यामुळे ही कविता पारंपरिक प्रेमकवितेचे संकेत मोडताना दिसते.

याचे मुख्य कारण, त्यांच्या कवितेतील प्रियकर प्रेयसी हे विवाहित आहेत, पती पत्नी आहेत. ओढग्रस्तीचा संसार करता करता, एकमेकांवरील विश्वास, एकमेकांची काळजी घेणे, आधार देणे अशा प्रेमानुभवाच्या छटा येथे व्यक्त झाल्या आहेत. त्यामुळे पूर्वसुरींच्या प्रेम कवितेपेक्षा नारायण सुर्वे यांची प्रेमकविता वेगळीच नाही, तर अनन्य साधारण ठरते. या दृष्टीने त्यांच्या अनेक कवितांतील प्रेमानुभवाचा विचार करता येईल. मुळात, कवी नारायण सुर्वे यांचा पिंड प्रेमकविता लिहिण्याचा नसल्यामुळे फारच थोड्या प्रेमकविता त्यांनी लिहिल्या आहेत. त्यातलीच एक प्रातिनिधिक कविता म्हणून 'सत्य' या कवितेचा विचार करता येईल.

**कवितागत 'मी' आणि कवितागत 'तू'**

'सत्य'या कवितेची रचना तीन कडव्यांची आहे. ही कविता म्हणजे कविता गत 'मी'ने कविता गत 'तू'शी साधलेला संवाद आहे. कवितागत 'मी' म्हणजेच कवितेतील प्रियकर तर कवितागत 'तू' म्हणजेच या कवितेतील प्रेयसी. 'मी' आणि 'तू'चे सहजीवन येथे रेखाटले आहे. या कवितेचे तीन टप्पे म्हणजे मी आणि तू यांच्या संसारातील तीन अवस्था आहेत. शारीर आणि आंतरिक पातळीवरील प्रेमाचे परिपक्व आणि विकसित रूप या तीन कडव्यांतून रेखाटले आहे. या कवितेतील प्रत्येक कडव्याच्या सुरुवातीला पहिल्या ओळीत 'तुझे गरम ओठ' हे शब्दबंध तर दुसऱ्या ओळीत 'तेव्हाही रात्र' या शब्दबंधांची पुनरावृत्ती झालेली दिसते. पण या शब्दबंधांसोबत येणाऱ्या विशेषणांमुळे प्रत्येक कडव्यातील भावावस्था वेगळी



असल्याचे जाणवते, येथे वारंवार येणारे तुझे ओठ आणि रात्र हे शृंगारवाचक, प्रणयवाचक विभाव म्हणून येतात. प्रत्येक कडव्यातून प्रणयी अनुभवातल्या, एका सत्याची जाणीव कवितेतील प्रियकराला होते.

उदा. कवितेचा आरंभ पुढीलप्रमाणे–

**तुझे गरम ओठ ओठावर टेकलेस तेव्हा**
**तेव्हाही रात्र अशीच होती; घुमी**

येथे रात्र ही त्यांच्या प्रणयीभावाची पार्श्वभूमी आहेच, पण घुमी या भाववाचक विशेषणामुळे त्या प्रणयीभावातील आंतरिक ताण व्यक्त झालेला दिसतो. खडखडणाऱ्या कारखान्यांचा आवाज आणि रात्रीचा घुमेपणा यातून एकप्रकारचा आंतर्विरोध आणि विसंगती अधोरेखित केली आहे. विवाहोत्तर नव्या नवलाईचा अनुभव असल्यामुळे 'ती' चे बुजरेपण रात्रीवर आरोपित केलेले दिसते. म्हणजे रात्र घुमी नसून प्रेयसी घुमी झाली आहे, हे कवीला सुचवायचे आहे. हा घुमेपणा प्रेयसीच्या नवखेपणातून तसेच आजूबाजूच्या कोलाहलातून आला असावा. शिवाय या प्रणयानुभवासाठी जो एकांत हवा तो एकांत त्यांना मिळत नाही. कारण पलीकडे कारखान्यांचा खडखडाट आहेच, आजूबाजूच्या खोल्यांमध्ये दाटीवाटीने अंथरलेले बिछाने आहेत. त्याच परिसरात मशीद आहे. (सर्व जातीधर्माचे लोक एकत्र राहात आहेत त्याचे सूचन) अशा वेळी प्रणयातील आनंद घेता येत नाहीये, ही खंत व्यक्त झाली आहे. शिवाय या नव्या जोडप्याला एकांत मिळावा म्हणून आईने, भावंडांसह कोनाडा जवळ केला आहे आणि बापाला आपल्या बिछान्यासह फुटपाथवर झोपावे लागत आहे, हे विदारक वास्तव त्या दोघांनाही स्वीकारावे लागत आहे.

**तुझे गरम ओठ : ओठावर टेकलेस तेव्हा**
**तेव्हाही रात्र अशीच होती; घुमी.**
**पलीकडे खडखडणारे कारखाने**
**खोल्याखोल्यांतून अंथरले बिछाने**
**मुल्लाचा अखेरचा अल्लासाठी गजर**
**काटे ओलांडीत चालले प्रहर**
**भावंडांसह कोनाडा जवळ केला आईने**
**धुमसत, बिछान्यासह फुटपाथ गाठली बापाने.**

**तुझे गरम ओठ : खडीसाखर होत गेले तेव्हा**
**तेव्हाही रात्र अशीच होती ओढाळ.**
**खपत होतो घरासाठीच**
**विसावत होतो शीण तुझ्या काठावर**
**तुझ्या खांद्यावर–**
**तटतटलीस उरी पोटी**
**तनु मोहरली गोमटी**
**एक कौतुक धडपडत आले; घरभरले.**
**हादरली चाळ टाळांनी, खेळेवाल्यांनी.**
**वाकलीस खणानारळांनी.**

**तुझे गरम ओठ : अधिकच पेटत गेले तेव्हा,**
**तेव्हाही अशीच एक रात्र आली नकार घेऊन**
**पंखांखाली बसलीस चार पिले ठेवून**
**कोनाडा हळहळला – कळवळला.**
**'नारायणा' – गदगदला.**
**'शिक्यावरची भाकर घे' – पुटपुटला.**
**'उद्यापासून तिलाही काम बघ बाबा'.**
**गांगरलो, भोवंडून स्थीर झालो.**
**तिच्या ओठावर ओठ टेकवून**
**बिछान्यासह बाहेर पडलो. त्या रात्री,**
**तिचे ओठ अधिकच रसाळ वाटले. अधिकच**

**(सत्य – नारायण सुर्वे यांच्या समग्र कविता)**

(गिरणी कामगारांच्या वस्तीत हे चित्र अगदी सर्रास दिसत असे. ही परिस्थिती या कामगारांच्या कुटुंबियांनीही निमुटपणे स्वीकारलेली होती.)

**जीवनविषयक तत्त्वज्ञानाचा जागर**

अशा तऱ्हेने या पहिल्या कडव्यातूनच कवीने कामगारांच्या कौटुंबिक आणि शृंगारिक, प्रणयी जीवनाची बिकट अवस्था कथन केली आहे. एकीकडे एकमेकांविषयीची ओढ दुसरीकडे प्राप्त परिस्थितीशी करावी लागणारी तडजोड नेमकेपणाने रेखाटली आहे. अशा तऱ्हेचा प्रणय आणि शृंगार प्रथमच काव्यविश्वात रेखाटला गेला होता.

तर दुसऱ्या कडव्यात– तुझे ओठ: खडीसाखर होत गेले तेव्हा

तेव्हाही रात्र अशीच होती ओढाळ – असे म्हणताना, नवलाई सरली तरी 'ती'च्याविषयीची ओढ कमी झालेली नाही, उलट आता त्या परिस्थितीला दोघंही सरावली आहेत, याची जाणीव कवी येथे करून देतो. येथे चुंबनाला दिलेली खडीसाखरेची उपमा विलक्षण आहे. प्रेयसीच्या व्यक्तिमत्त्वातील गोडवा खडीसाखर या शब्दातून अधोरेखित केला आहे. चुंबनासाठी योजलेली खडीसाखर ही प्रतिमाही आगळीवेगळी आहे. दुसऱ्या कडव्यात आयुष्यात येणारा पुढचा टप्पा अधोरेखित केला आहे. नव्या नवलाईचे दिवस संपून वाढत्या जबाबदाऱ्या अंगावर पडल्या आहेत. कवितेतील तो घरासाठी, कुटुंबासाठी कष्ट करतोय, संसारवेलीवर नवे फूल येऊ घातलेय, या जाणिवेने तो आणि ती आनंदली आहेत. ती गर्भार असल्याने प्रपंच वाढतोय याची जाणीव त्याला होतेय. अशावेळी त्याचा थकवा तो तिच्या खांद्यावर विसावून दूर करतोय, त्याला तिचा आधार वाटतोय, म्हणूनच तिच्याविषयी त्याला अधिक ओढ वाटतेय. येथे त्याचे 'खपणे' आणि तिच्या खांद्यावर विसावणे यातून त्याला तिचा वाटणारा आधार अधोरेखित झाला आहे. ज्याप्रमाणे तो घरासाठी खपतोय, तशी तीही कुटुंबासाठी कष्ट करतेय, याची त्याला जाणीव आहे. म्हणूनच तिच्याविषयी त्याला ओढ आहे; आणि ही ओढ व्यक्त करण्यासाठी रात्रच हक्काची आहे, म्हणून रात्र ओढाळ वाटतेय.

'एक कौतुक धडपडत आले; घरभरले' या ओळीतून उभयतां आता आईबाबांच्या भूमिकेत शिरल्याची जाणीव कवी करून देतो. येथे कवी 'घर भरले' अशी शाब्दिक रचना न करता 'घरभरले' असे नावीन्यपूर्ण क्रियापद योजून त्या अनुभवाला अर्थपूर्णता देतो.

कामगार वस्तीत महाराष्ट्रातील विविध भागातील मंडळी, आपले मूळ घरदार सोडून नोकरी निमित्ताने मुंबईत वस्तीला असल्याने, नातलगांसारखा आपलेपणा जपला जात असे, एकमेकांचा आनंद वाटून वितरीत केला जात असे, हा अनुभव कवी 'हादरली चाळ टाळांनी, खेळेवाल्यांनी' या एका ओळीत करून देतो. कामगार जीवनाचे, सांस्कृतिक वातावरणाचे यथार्थ चित्रण घडवतो. मुंबईत बरेचसे गिरणी कामगार हे महाराष्ट्राच्या विविध भागांतून आलेले असत. आपापल्या गावाकडची संस्कृती आपल्यासोबत घेऊन येत असत. कोकणातून आलेले चाकरमानी आनंदाची, सणाची अभिव्यक्ती नमन, भजन, खेळे सादर करून करीत असत. त्यातून त्यांचे रंजन होत असे. या सांस्कृतिक पर्यावरणावरही कवी नेमकेपणाने प्रकाश टाकतो. 'जगा, जगू द्या आणि जगवा' हे जीवनाचे तत्त्वज्ञान येथे व्यक्त झालेले दिसते. कामगार वर्ग हा श्रमाची पूजा करणारा आहेच, पण श्रमपरिहारासाठी तो आपल्या सांस्कृतिक कलांचाही आनंद घेणारा आहे, या मार्क्सवादी जाणिवेचा प्रत्यय या कवितेतून कवीने नेमक्या शब्दांतून दिलेला दिसतो. चाळीत राहणाऱ्या कामगारांची परोपकारिता, आनंद वाटून घेण्याची वृत्ती, अडचणीच्या वेळी मदतीला धावून जाण्याची वृत्ती, शेजारधर्म यावरही अप्रत्यक्षपणे प्रकाश टाकलेला दिसतो. एकूणच कामगारवर्गाचे आंतरबाह्य जीवन नेमक्या शब्दात रेखाटले आहे.

**चिंतनगर्भ दृष्टीचे दर्शन**

तिसऱ्या कडव्यात कवितागत मी आणि तू ची रूपं बदलली आहेत, किंबहुना कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढल्या असल्यामुळे, एकमेकांबद्दल तीव्र ओढच, परंतु तरीही त्यात रात्रीचा नकार आहे. खरंतर हा रात्रीचा नकार नसून कवितागत 'ती' चा नकार आहे. हा नकार कवितागत 'मी' ला बदललेल्या परिस्थितीची, वातावरणाची जाणीव करून देतोय. दैहिक, जैविक प्रेरणेपेक्षा, शारीरिक गरजेपेक्षा पोटाची भूक अधिक महत्त्वाची आहे. कुटुंबात आलेल्या लेकरांची जबाबदारी आहे, वयस्कर आईवडिलांची जबाबदारी आहे. त्यांच्याही पोटाचा विचार महत्त्वाचा आहे, याची जाणीव पत्नीला आहे, अर्थात, या ओढग्रस्तीच्या संसाराला तीही सरावली आहे, संसारात मुरली आहे, तिच्यातील शृंगारभाव उद्दीपित झाला आहे, हे कवितागत मी ला जाणवते आहे. ही जाणीव पुढील ओळींतून व्यक्त झालेली दिसते.

**तुझे गरम ओठ: अधिकच पेटत गेले तेव्हा,**
**तेव्हाही अशीच एक रात्र आली नकार घेऊन**

येथे रात्र केवळ नकार घेऊन आलेली नाही, तर बदलत्या परिस्थितीची दाहक जाणीव घेऊन आली आहे. खरंतर रात्र नकार घेऊन आलेलीच नाही, तिचा नकार रात्रीवर आरोपित करण्यात आला आहे. तुटपुंज्या पगारात कुटुंबाचं भागणार नाही, तिच्यासाठी काम शोधावं लागेल या सत्याची जाणीव करून देते. मुलं जाणती आणि मोठी झाली आहेत. आता कोनाड्यातील आईची जागा कवितागत ती ने घेतली आहे. आणि नव्या नवलाईचा काळ संपून आपला प्रवास प्रौढत्वाकडे होतोय, वडिलांप्रमाणेच आपल्या पुढच्या पिढीच्या एकांतासाठी, जाणत्या मुलांसाठी आपल्याला बिछान्यासह, इतर चाळकरी माणसांप्रमाणे रस्त्याचा आधार घ्यावा लागणार आहे, या सत्याने कवितागत मी भोवंडून जातो. आपल्या संसारात साथ देणाऱ्या 'ती' विषयी अपार प्रेम दाटून येते, तिच्याविषयी आसक्ती वाटते म्हणून तिचे ओठ त्याला अधिक रसाळ वाटतात.

अतिशय विलक्षण असे आत्मीय आणि टप्प्याटप्प्याने विकसित होत गेलेले नाते येथे रेखाटले आहे. कवीने संसारातील पतीपत्नीचे साहचर्य, सामंजस्य आणि एकमेकांविषयी वाटणारा आदरभाव रेखाटला आहे. यातून कवीचा स्त्रीकडे पाहण्याचा उदार दृष्टिकोन व्यक्त झालेला दिसतो, पती पत्नीच्या नात्याबद्दलचे मुक्त चिंतनच येथे केले आहे. कामगाराचे आंतरिक भावविश्व रेखाटले आहे. इतकेच नाही तर तिसऱ्या कडव्यात त्याचे जीवनविषयक तत्त्वज्ञान व्यक्त केले आहे. नारायण सुर्वे यांना कष्टकरी वर्गाच्या, कामगार जाणिवेच्या कविता लिहिणारे म्हणून मार्क्सवादी कवी म्हटले जाते. कार्ल मार्क्स प्रमाणेच सुर्वे यांनी श्रमाला आणि श्रम करणाऱ्याला महत्त्व दिलेले आहे. कष्ट करणाऱ्यांमध्ये ते स्त्री आणि पुरुष हा भेद मानीत नाहीत. म्हणूनच प्राप्त परिस्थितीची भेदक जाणीव झाल्यावर कवितागत मी म्हणतो–

**कोनाडा हळहळला – कळवळला.**
**'नारायणा' – गदगदला.**
**'शिंक्यावरची भाकर घे' – पुटपुटला.**
**'उद्यापासून तिलाही काम बघ बाबा'**

कवितागत मी ला असे वाटते की पत्नी माझ्या जीवनाची जशी जोडीदार आहे, तशी कुटुंबासाठी अर्धा वाटा उचलू शकते, हा विश्वास त्याला आहे. कामगार जीवनातील कष्ट आणि शृंगारही समान पातळीवरचा – हेच सुर्व्यांना सूचित करायचे नाहीये का? पारंपरिक कवितेतून व्यक्त होणारे मध्यमवर्गीय जीवनातील, प्रेमी युगुलांचे प्रेम नसून कामगार वस्तीतील, चाळीत राहणाऱ्या कष्टकरी पतीपत्नीचे प्रेमभाव रेखाटले आहेत. तेही भावूकवृत्तीतून न रेखाटता वास्तववादी दृष्टीतून रेखाटले आहेत, यातच त्यांची चिंतनगर्भदृष्टी व्यक्त झालेली दिसून येते.

खरे पाहता ही कविता आत्मलक्ष्यी आहे. कवितेत 'नारायणा' असा उल्लेख आला आहे, म्हणून ती आत्मपर आहे असेही म्हटले जाते. परंतु त्या अर्थाने ही आत्मलक्षी नसून, सर्वच तरुण, नवविवाहित कामगारांच्या व्यक्तिगत जाणिवांचा हा प्रातिनिधिक आविष्कार आहे. येथे कवितागत मी म्हणजे नारायण सुर्वे नसून कामगार वर्गाचे प्रतिनिधित्व करणारा एक सामान्य कामगार आणि त्याची पत्नी आहे. म्हणून ही कविता आत्मलक्ष्यी ठरते.

आशय व अभिव्यक्ती दोन्ही बाबतीत ही कविता लक्षणीय ठरते. यातील यमक रचनेमुळे कवितेत लयबद्धता आली आहे, पण ही यमकरचना अगदी स्वाभाविकपणे व सहजोत्स्फूर्त आलेली दिसते. उदा. कारखाने – बिछाने, आईने– बापाने, गजर– प्रहर, पोटी, गोमटी इ. अर्थात कवितेतील वास्तवदर्शी आशय व त्याला साजेशी शब्दकळा, संवादशैली, कवीने टिपलेले पतीपत्नींचे आत्मीय नाते, पती पत्नीच्या शृंगारातील आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांतील संघर्ष व्यक्त करणारी भावस्थिती यातील आंतर्विरोध कवीने टिपलेला आहे, तरीही त्यात एक आंतरिक लय देखील साधलेली दिसते. कामगार पती पत्नीचे रतिजीवन आणि कौटुंबिक जीवन यातील ताण आणि चिंतन येथे व्यक्त झालेले दिसते. एकाच वेळी ही कविता आत्मलक्ष्यी ठरलेली दिसते, तर दुसरीकडे कामगार वर्गाचे व त्यांच्या संस्कृतीचे चित्रण करणारी म्हणून समष्टीलक्ष्यी पण ठरते, हे या कवितेचे वेगळेपण म्हणायला हवे.

रोजच्या धकाधकीच्या जीवनाची वाटचाल करताना, कवीला जाणवलेले सहजीवनातील संघर्षाचे अटळ सत्यच कवीने सांगितले आहे, त्यामुळे कवितेचे सत्य हे शीर्षक सार्थ ठरलेले दिसते. इतकेच नव्हे तर आजही ही कविता तितकीच ताजी व टवटवीत वाटते, हे सत्यही नाकारता येत नाही.

'सत्य'ने किंवा एकूणच त्यांच्या प्रेमकवितेने काव्यविश्वाला

काय दिले? याबाबत काही निरीक्षणे सलग नोंदवावीशी वाटतात. कवी नारायण सुर्वे यांची प्रेमकविता वेगळी ठरते कारण या कवितेने पारंपरिक प्रेमकवितेचे संकेत झुगारून दिले, मोडून टाकले आणि नवा प्रवाह त्यांनी सुरू केला. आत्तापर्यंतच्या प्रेमकवितेमध्ये प्रियकर आणि प्रेयसी यांच्यामध्ये सौंदर्यपूजक भावना प्रेमपूजक भावना अधिक दिसते, ती नारायण सुर्वे यांच्या कवितेत दिसत नाही. यांच्या कवितेतील प्रियकर हा सौंदर्यपूजक नाही किंवा प्रेम पुजारीही नाही, तर तो आहे, श्रम पुजारी, श्रमपूजक. त्यामुळे त्याची प्रेयसीही श्रमांवर श्रद्धा असणारी आणि स्वतःही श्रम करणारी अशीच आहे.

नारायण सुर्वे यांच्या कवितेने प्रेमकवितेकडे पाहण्याची एक वेगळी दृष्टी दिली. कष्टकरी वर्गाचे प्रतिनिधित्त्व करणारा कोणताही कामगार हा देखील प्रेम कवितेचा विषय होऊ शकतो, ही जाणीव त्यांच्या कवितेने दिली. तसेच सर्वसामान्य अगदी तळागाळातल्या कामगारालाही इतरांसारख्याच भावभावना असतात, दैहिक आणि शृंगारिक शारीरिक जाणिवाही असतात, पण या जाणिवेपेक्षाही त्याला आपल्या जबाबदाऱ्यांची जाणीव विशेष असते हे त्यांच्या सर्वच प्रेमकवितांमधून दिसून येते. रोमँटिक प्रवाहातील प्रेमकवितांच्या केंद्रस्थानी प्रेमभावना, प्रणय, सौंदर्य याच वृत्ती प्रकर्षाने व्यक्त होताना दिसतात, सुर्व्यांच्या कवितेत तसे दिसत नाही. तर संघर्षशील जीवन जगत असताना, त्या जीवनाचा अपरिहार्य आणि प्रेरक घटक म्हणून, जगण्याची ऊर्जा देणाऱ्या प्रेयसीविषयीचा उदार आणि कृतार्थभाव व्यक्त करणारा प्रेमभाव अभिव्यक्त झालेला दिसून येतो. उदाहरणार्थ – 'सत्य', 'तेव्हा एक कर', 'गलबलून जातो तेव्हा', 'धीर', 'पाने सळसळतात तेव्हा' इत्यादी कवितांमधून हा आविष्कार झालेला दिसतो.

**समूह जाणिवेचा प्रखर आविष्कार**

नारायण सुर्वे यांची प्रेमकविता ही केवळ व्यक्तिनिष्ठ किंवा व्यक्तिगत जाणिवेपेक्षा ती समूह जाणिवेचाही आविष्कार करताना दिसते. त्यातील प्रेयसी ही सौंदर्यवती, लाजवंती अशी दिसत नाही, तर नवऱ्याच्या खांद्याला खांदा लावून कष्ट करणारी दिसते. नारायण सुर्वे यांच्या कवितेने अर्थातच प्रेयसीकडे किंवा स्त्रीकडे पाहण्याची नवी दृष्टीच दिलेली दिसते. त्यांच्या कवितेने प्रेयसीकडे किंवा स्त्रीकडे उदारमनाने पाहण्याचा दृष्टिकोन, माणूस म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन दिला, असं निश्चित म्हणता येईल.

त्यांच्या प्रेम कवितेतील भावविश्व हे केवळ मी व तू यांच्या पुरते मर्यादित न राहता ते कामगार पतीपत्नीच्या प्रातिनिधिक स्वरूपात येते आणि समूह जीवनाचाच आविष्कार करते. म्हणूनच त्यांची प्रेम कविता पुढील काळाला अधिक प्रेरक ठरलेली दिसते.

कवी नारायण सुर्वे यांच्या केवळ प्रेमकवितेबद्दल नव्हे तर एकूणच कवितांबद्दल बोलायचे झाले किंवा निरीक्षण नोंदवायचे झाल्यास असे म्हणता येईल, की आज गिरण्या नामशेष झाल्या, गिरणी कामगार संपला (पण जोपर्यंत वर्गजाणीव संपत नाही तोपर्यंत विविध रूपातील कामगार मात्र कायमच असणार आहे) गिरणगावही नाहिसे झाले, पर्यायाने गिरणी कामगारांचे सांस्कृतिक समष्टीजीवन संपुष्टात आले. गिरणगावाच्या जागी टोलेजंग इमारती, मॉल्स उभे राहिले, अशा वेळी पुढील पिढीला सांगण्यासाठी नारायण सुर्व्यांनी कामगारांचं एरवी प्रतलावर न येणारं भावविश्व कवितारूपाने अक्षरबद्ध केलं आहे, असे निर्विवादपणे म्हणता येते.

**संदर्भ –**

**१) भटकळ हर्ष (संपादन), नारायण सुर्वे यांच्या समग्र कविता, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २०११.**

**२) राजापुरे पुष्पा (संपादन), सुर्वे यांचे विद्यापीठ, संदर्भ प्रकाशन, ठाणे, १९९३.**

**डॉ. नेहा सावंत अंधेरी–मुंबई येथील भवन्स महाविद्यालयात मराठी विभागप्रमुख आहेत. त्यांनी 'कुपारी बोलीतील साहित्याचा चिकित्सक अभ्यास' या विषयावर पीएच.डी. मिळवली असून, लेखन, शब्दांकन, संपादन, अभिनय, डबिंग, सूत्रसंचालन आदी क्षेत्रांत त्या सक्रिय राहिल्या आहेत.**
**संपर्क** : nehasawant603@gmail.com

# अपने मतलबवाला दर्दी सिनेपत्रकार : भाऊ पाध्ये



प्रसाद कुमठेकर

भाऊ पाध्ये जन्मशताब्दी विशेष




भाऊ पाध्येंचा 'दिनांक'नामा

भाऊ पाध्ये ही मराठी पत्रकारिता आणि मराठी साहित्य यामधली दीर्घकाळ प्रभाव राखून असलेली घटना होती. आहे. या घटनेवर त्यांचा पूर्ण ताबा होता, राज्य होतं. वरवर दिसणारे–भासणारे वास्तव भेदू पाहणारी तीक्ष्ण नजर आणि बूर्ज्वांना उघडे पाडणारी बंडखोर लेखणी या बळावर भाऊ पाध्यांनी मराठी विश्वाला एकापाठोपाठ एक हादरे दिले. भाऊ जितके कथा–कादंबऱ्यात रमले, तितकेच ते सिने पत्रकारितेतही मनसोक्त हुंदडले. पण त्यांच्या लेखनसामर्थ्याला असलेला हा रंगतदार पैलू बऱ्यापैकी दुर्लक्षित राहिला. सरत्या डिसेंबर २०२५मध्ये सुरू झालेल्या पाध्यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाने भाऊ पाध्ये शताब्दी चर्चासत्र आयोजित केले. त्यातल्या एका सत्रात लेखक, पटकथाकार प्रसाद कुमठेकरांनी भाऊ पाध्यांमधल्या सिनेपत्रकाराला पाध्येस्नेही शैलीत टिपले. त्याचेच हे संपादित शब्दरुप...

अग्रगण्य लेखक भाऊ पाध्ये यांच्या जन्मशताब्दीनिमित्त आयोजित केलेल्या भाऊ पाध्ये यांचे वाङ्मय : आकलन आणि पुनर्विचार या दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राची 'मतलबवाली' योजना केल्याबद्दल आणि इतक्या सन्मानवाल्या, बुजुर्ग, प्रतिभेचा लोहा मनवलेल्या, अभ्यासू विद्वान लोकांबरोबर मलासुद्धा बोलावल्याबद्दल रणधीर शिंदे सर, मोरे सर, आयोजनात शरीक असतील, त्या सर म्याडम सगळ्यांचे तह-ए-दिल से आभार. असे कार्यक्रम होणे अनिवार्य आहे, कारण याच निमित्ताने भाऊ पाध्ये यांच्या बहुआयामी कार्याचा आलेख पुन्हा उजळवून उजेडात आणला जातो... कालपासून इथे ते अगदी चांगल्या प्रकारे होत आहे... ही जज्बाती करणारी गोष्ट!

मुंबई, त्याआधी उदगीरच्या म.उ.म.उ. कॉलेजच्या लायब्ररीपर्यंत घेऊन आलेल्या या तबियतदार लेखकाच्या खूबसूरत लेखणीला सलाम! ज्यांनी भाऊ पाध्ये वाचला आहे, त्यांना मतलबवाली बात, खूबसूरत, जज्बाती लोहा मनवणे... मराठी चिवड्यात हे हिंदी-उर्दू-इंग्लिशचे शेंगदाणे फुटाणे खटकणार थोडीच.

तर माननीय भाऊ पाध्ये लेखक, कथाकार, कादंबरीकार, पत्रकार म्हणून माहीत आहेतच. १९८३ साली आलेला 'गोदाम' हा दिलीप चित्रे दिग्दर्शित चित्रपट भाऊ पाध्येंच्याच कथेवर बेतला होता. (एन.एफ.डी.सी.ने प्रोड्यूस केलेल्या या चित्रपटासाठी दिलीप चित्रे यांनी दिग्दर्शनाबरोबर पटकथा, संवाद, गीत, संगीत इतक्या जबाबदाऱ्या खांद्यावर घेतल्या होत्या.)

भाऊ पाध्यांनी कवितापण लिहिल्या आहेत, म्हणे. भाऊ पाध्ये यांच्या ब्लॉगवर 'अबकडई'मध्ये आलेली एक कविता वाचण्यात आली, त्यामुळे माझ्या 'म्हणे'ला वजन आले आहे.

दोन हजार पंधरा साली साहित्य अकादमीने काढलेल्या, 'भारतीय साहित्याचे निर्माते; भाऊ पाध्ये' या राजन गवस यांनी लिहिलेल्या पुस्तकात भाऊ पाध्ये यांनी 'ऑपरेशन छक्का' हे नाटक स्वतःच प्रकाशित करून बिस्किटाच्या दुकानात विक्रीस ठेवल्याचे दिसते, असा टोचदार रंजक उल्लेख सापडतो. मॉरल ऑफ दी ष्टोरी इज... कादंबरी, कथा, नाटक, ललित, कविता अशा सर्व फॉर्ममध्ये लिहू शकणारे भाऊ पाध्ये एक 'संपूर्ण' लेखक आहेत! टोकाची तारिफ आणि टीका दोन्हीचे ते धनी राहिलेले आहेत. 'यु कॅन लव्ह मी, यु कॅन हेट मी बट यु कॅन नॉट इग्नोर मी' हे शाहरुखचे वाक्य भाऊ पाध्येंना चपखल लागू होते.

**सर्वसंचारी प्रभाव**

डोंबाऱ्याचा खेळ, अग्रेसर, राडा, वासूनाका, दावेदार, बॅरिस्टर अनिरुद्ध धोपेश्वरकर, मुर्गी अशा कथा कादंबऱ्यांवर बरीच चर्चा झाली. या सगळ्यांत त्यांची सिनेपत्रकारिता काहीशी चर्चेबाहेरच राहिलीय. भाऊंनी 'नवाकाळ', 'नवशक्ती' या पेपरात नोकरी केली. काही काळ 'झूम' या सिने-साप्ताहिकाचे संपादन पण केले. सोबतच 'रहस्यरंजन', 'अभिरुची', 'माणूस', 'सोबत', 'दिनांक', 'क्रीडांगण', 'चंद्रयुग' या नियतकालिकांतून स्तंभलेखन केले. राजकारण, समाजकारण, खेळ, सिनेमा असा कोणताच विषय त्यांच्या लेखणीला वर्ज्य नव्हता.

पत्रकार म्हणून पाध्ये यांनी नेहरू युगाच्या आखिरी वर्षांपासून ते एकोणिसशे सत्तरच्या दशकात इंदिरा गांधींच्या उदयापर्यंत घडलेल्या भयावह सामाजिक-राजकीय उलथापालथींच्या बदलांच्या पार्श्वभूमीवर, माणसाच्या जिंदगीत आलेली बेकारियत दाखवण्यासाठी पॉप्युलर हिंदी पिक्चराची उदाहरणे खूब इस्तेमाल केली. ऐंशीच्या दशकात त्यांनी निळू दामले-अशोक शहाणे-निखिले वागळेंसारखे खमके संपादक असलेल्या साप्ताहिक 'दिनांक'साठी फिल्मी सिलसिला नामक स्तंभ लिहिला. 'मेरे भाई बलराज' या भीष्म साहनीच्या पुस्तकाचा 'माझा भाऊ बलराज' हा अनुवाद केला. (शीर्षकातच पाहा खामखाँ आदरार्थी वचन कसे बदलून टाकले आहे.) माणूस वगैरे नियतकालिकांसाठी 'मतलबवाल्या अदाकारांची' व्यक्तिचित्रे लिहिली. त्यातूनच 'सजती है यूंही मैफिल' नावाचं पुस्तक आकाराला आलं. या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर वहिदा रहमानचा फोटो आहे. कारण वहिदा रहमानला बघितल्यावर त्यांना ग्रेस केलीची आठवण यायची. तीच ग्रेस केली, जिला आल्फ्रेड हिचकॉक 'आइस कूल एलिगन्स' म्हणे. जी पुढे अभिनय सोडून प्रिन्सेस ग्रेस ऑफ मोनॅको झाली. 'कांटो से खिंच के आंचल' हा वहिदा रहमानवरील लेख या पुस्तकात आहेच.

संपादक, प्रकाशक आणि कल्पनांच्या ठिणग्या टाकणारा जागल्या अशा भारी भारी ओळखी असलेल्या सुनील कर्णिकांनी सप्टेंबर एकोणिसशे एक्याऐंशी साली हे पुस्तक छापून बेहद 'मतलबवालं' काम केलं आहे. या पुस्तकात अमिताभ, संजीव कुमार, सैगल, फरिदा जलाल, शत्रुघ्न सिन्हा, वहिदा रहमान, देवानंद, राजेश खन्ना, राखी, किशोर

कुमार, मोहम्मद रफी, मुमताझ, लीना चंदावरकर, नर्गिस, रेखा अशी एकूण पंधरा व्यक्तिचित्रं आहेत.

**कद्रदान पाध्ये**

भाऊ पाध्येंनी 'माणूस'च्या बहात्तरच्या अंकात लिहिलेले 'गुरुदत्त'वरचे लेख लोकवाङ्मय गृहाने इकट्ठा केले आणि एकोणिसशे नव्वद साली, गुरुदत्तचं चरित्र म्हणून छापलं. याला 'गुरुदत्त; तीन अंकी शोकांतिका' लिहिणाऱ्या अरुण खोपकरांची अप्रतिम प्रस्तावना आहे.

फ्लॅशबॅक; १९६१ ते १९८६ या काळात 'माणूस'मधल्या चंदेरी दुनियेत या प्रसिद्ध झालेल्या चित्रपटविषयक लेखांचे सतीश जकातदार आणि वंदना भाले यांनी संपादन केले होते. 'माणूस प्रतिष्ठान'तर्फे ते प्रकाशित झाले, यात 'काही सेन्सिबल काही इन्सेन्सिबल महंमुद' हा लेख वाचायला मिळतो. या पुस्तकातसुद्धा 'बेबस दुनियेत असंतोषाची स्वप्ने विकणारा अमिताभ बच्चन' हा लेख आहे. (सजती है यूंही मैफिल)

'सिनेमा म्हणजे डोकं बाजूला ठेवून बघण्याची गोष्ट' ही आपली चित्रसंस्कृती. भाऊ पाध्ये ज्या काळात सिनेमांवर लिहीत होते, त्या वेळी वृत्तपत्रांत चित्रपटांचे परीक्षण नव्हे, तर रिपोर्टिंग होत असे. पाहू रे तुझी वाट–प्रेक्षक पडले चाट! अशा यमक्या, कोटीछाप शीर्षकांच्या खाली 'एकूण चित्रपटाची जाण, मांडणी आणि सादरीकरण हे प्रभावी ठरते न ठरते, चित्रपट मनाच्या तारा छेडतो, मांडणीत थोडी सफाई हवी होती' अशा बेमतलब बूड न शेंड्याच्या मथळ्यांची नियतकालकांमधली जागामात्र भरली जायची.

**तोलिव नजर, सोलिव लेखणी**

सिनेमा या माध्यमात किमान 'इंटरेस्ट' ही अहर्तासुद्धा पाळली जात नसे. जो साक्षर तो परीक्षणे लिहायचा. अशा दयनीय पार्श्वभूमीवर भाऊंचे लेखन हे समीक्षा आणि वृत्तपत्रीय लेखन यांच्यामधला एक स्वतंत्र रस्ता आहे. त्यांचे लेख तात्कालिकतेच्या पलीकडे जातात. ते 'चित्र' पाहूनच लेख लिहायचे. लेख व्यक्तिनिष्ठ आहेत, त्यात उत्कटता आहे. ह्युमर आहे. एकेरीवर येऊन अधिकारवाणीने केलेले स्टेटमेंट्स पण आहेत. उदाहरणार्थ : नीतू सिंग म्हणजे कॉस्च्युम गर्ल, जितेंद्र हा टाकाऊ लडका. किशोर कुमारबद्दल बोलताना म्हणतात, आपण त्याला मानतो तितके दिलीप कुमार राज कपूरला कधी मानले नाही, अमिताभ किंवा राजेश खन्नाला मानले नाही, अशोक किंवा प्राण या बुजुर्गांनाही मानले नाही,



*भाऊ पाध्येंचे सिनेमाविषयक लिखाण अभ्यासणे म्हणजे, आसपासच्या जगाकडे आरपार पाहण्याची क्षमता असलेल्या प्रतिभावंताची अफाट क्षमता जोखणे आहे...*

आपली हिंदी फिल्म इंडस्ट्री किशोर कुमार नसता, तर कुछ भी नही असेच आपल्याला वाटले असते.

त्यांच्या या अशा शेऱ्यात मनमोहन देसाईच्या फिल्मासारखंच अपार कन्विक्शन.

भाऊ पाध्यांना सिनेमाचं व्याकरण, कथा, पटकथा, छायाचित्रण, प्रकाशयोजना, म्युझिक, बॅकग्राउंड म्युझिक याची व्यवस्थित कल्पना दिसते. त्यांना तांत्रिकदृष्ट्या सिनेमा कळायचा. पण त्यांच्या लेखात 'बघा मला किती माहिती' असा अविर्भाव नसे. ते त्या भानगडीतच पडत नाहीत. 'चित्रां'कडे ते जगण्याच्या अनुभवासारखे पाहतात. ते सिनेमाला सत्तर टक्के वेळेला चित्र, एकोणतीस टक्के वेळेला पिक्चर आणि एखाद टक्के वेळेला सेल्युलॉइडची पट्टी असच शब्द वापरतात. त्यांच्या चित्रपटविषयक लिखाणातसुद्धा मुंबईचा आवाज आणि बम्बैया भाषेचं इत्तर ठासून भरलंय.

**पब्लिकफ्रेंडली फटकारे**

हार्डकोर पिटातल्या प्रेक्षकाला तिसरा डोळा आणि सहावा सेन्स असतो. तो चित्रं किंवा पिच्चर बघून तुडुंब भरलेल्या अवस्थेत वासूनाक्यावर, आंटीच्या अड्ड्यावर, चाळीत, रेल्वे स्टेशनवर, कोपऱ्यावरचं इराणी रेस्टॉरंट असं कोठेही बसून त्याची वाट बघणाऱ्या पब्लिकला पिच्चरची ष्टोरी सांगतो. त्या ष्टोरीत तो खुद असतो. आजूबाजूचा माहोल असतो. आणि त्याने आत्ता पाहिलेला ताजातरीन 'पिच्चर' असतो.

आणि ऐकणारे असतात गिरणगावातले कामगार, वैतागवाडीतले कारकून, वासूनाक्यावरचे पोक्या, मामू, बकुळा, सू, चम्या, सोम्या, सोमण्या, परसू, सुर्वे मामा, डाफ्या, केशरवडी, पबी या पैकी कुणीही. पिक्चर डिस्कस करावा, हिरोईनबद्दल बोलावं, ष्टोरी ऐकवावी. त्यात काय मतलबवालं आहे, काय नाही ची भंकस करावी असाच पाध्यांच्या



*भाऊ पाध्येंमधला सर्वसंचारी लेखक उलगडण्याच्या उद्देशाने शिवाजी विद्यापीठात आयोजित परिसंवादात बोलताना लेखक प्रसाद कुमठेकर. सोबत ज्येष्ठ पत्रकार श्रीराम पवार, सचिन परब, भाषांतरकार गोरख थोरात...*

लिहिण्याचा एकूण बाज.

खानदान या पिक्चरचा रिमेक पूर्वी दो रास्ते नावाने आला होता ना? शीर्षकातच असं विचारत खाली मथळ्यात 'बिंदिया खानदानमध्ये खूबसूरत वाटली. सिल्क वाटली. एका लहानशा प्रसंगात तिने नायिकेच्या भूमिकेत असलेल्या सुलक्षणाला खाऊन टाकले.' म्हणत 'दो रास्ते'चे मूळ कथालेखक आमचे मित्र चंद्रकांत काकोडकर असं सांगून टाकतात.

जोडीला आमचे मित्र दादा कोंडके म्हणतात ना... असं म्हणत नेमक्या मुद्द्याला हात घालतात. नीतू सिंग सारखी दिलखुलास नाचणारी तिच्या शादी नंतर आता दुसरी कोणी उरली नाही! म्हणत हळहळ पावतात.

'खाते पे लिख' सांगणाऱ्या पब्लिकबरोबर 'राजेशने भाव वाढवला तेरा लाख केला. हाथी मेरे साथी नंतर लोक म्हणून लागले काका म्हणजे राजेश खन्ना इतके पैसे घेऊन करणार काय आहे? ठेवणार कुठे?'ची घमासान चर्चा करतात.

'उभयान्वयी अव्यय' या कादंबरीची नायिका वहिदासारखीच दिसायला हवी होती, असं वाटत होतं, चंद्रकांत खोतना... हे वाक्य पेरत 'आपण तर तिचा खूबसूरत फोटो भिंतीवर लटकवला आहे.' अशी कबुलकस्तुरी पण देतात.

डॅनीने जान आणली. जीवनची चोरो की बारात धमाल!

संजीवची धमाल! मौशुमी लाजवाब!

इथे कुठेही पंडिताई नाही. 'दे मार' चित्राला कॅमेरा कुठे फिरला, लाइट कुठून पडला असल्या बेफिजुल बूर्ज्वा समीक्षेचा रोग नाही. फिल्म तसा राग. तेलकट तर्रिदार मसाला पिक्चरला आंतरराष्ट्रीय सिनेमांच्या मोजपट्ट्या लावून ते मोजायची बेदम इंटेलेक्चुअलगिरी ते करत नाहीत. बकवास फिल्म आहे हे सांगताना सुद्धा 'भूमिका मिठी' आहेच आणि शबानाने तिच्यामध्ये जाण ओतली आहे' अशी मतलबची बात नक्की सांगतात. गोविंद निहलानीचे छायाचित्रण वगैरे तांत्रिक अंगाबद्दल श्यामच्या चित्राची नव्याने तारीफ कशाला करायची? असं म्हणत 'बाजी मध्ये गाणी अशी काही कथानकामध्ये फिट बसवली होती की ती गाणी लोकांनी फक्त कानांनी ऐकली नाहीत तर डोळ्यांनीही पाहिली' अशी गुरुदत्तची 'सही से' दखलसुद्धा घेतात.

**तबियतदार लिखाण**

भाऊ पाध्येंच्या चित्रपटावरच्या या लिखाणात समीक्षकाची अलिप्तता नाही. सिनेमाबद्दल लिहिताना ते सहजपणे समाज, राजकारण, खेळ या सगळ्यांची 'शुद्ध' सरमिसळ करतात. किंवा ती नैसर्गिकरित्या त्यांच्याकडून होतेच. म्हणूनच 'शोले'च्या तिकिटांच्या ब्लॅकचा संदर्भ ते थेट मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीतल्या तिकीट वाटपाशी जोडतात आणि लिहितात, अहो, 'शोले'ची तिकिटे ब्लॅकमध्ये विकावी त्याप्रमाणे या मुंबई नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये या जनता वाल्यांनी आपल्या तिकिटांचा ब्लॅक केला

राजेश खन्नावर लिहिता लिहिता अचानक क्रिकेटच्या मैदानात नेतात, एकूण राजेश खन्ना हे कोडे आहे, आधार म्हणून एखादा जोरदार भरवशाचा खेळाडू ब्रिजेश पटेल सारखा प्रेक्षकांच्या मनाची तार छेडून जातो आणि अल्पावधीतच तो एक सामान्य खेळाडू असल्याचं चित्र दिसू लागते. शत्रूवर लिहिताना राजकारणाकडे जातात, प्राणला ललकारणाऱ्या शत्रूला पब्लिकने जनता पार्टीच्या सरकार प्रमाणे खाली पाडले.

भाऊंच्या रगरगमध्येच 'चित्र' वाहतं. ते सुद्धा विथ तर्रिदार मसाला. ते त्यांच्या जगण्याचं अविभाज्य अंगच... आणि याचा कसलाही न्यूनगंड त्यांच्या लिखाणात नाही.

अर्थात चांगल्या 'चित्रां'चं, दिग्दर्शकाचं मोल ते जाणून आहेत. भद्र लोकांची झोप उडवणाऱ्या सत्यजीत रायना ते प्रचंड मानतात. पाथेर पांचाली पाहाणं हा प्रेक्षकाचाच गौरव आहे पाथेर पांचालीचा नव्हे, हे ठणकावून सांगतात. त्यांच्या सिनेमाच्या लिखाणात इतर गोष्टींचे संदर्भ येतात तसेच त्यांच्या इतर लिखाणात म्हणजे राजकीय, सामाजिक, ललित लेखनात 'सिनेमा'चे संदर्भ सतत डोकावत राहतात. नमुन्यादाखल सांगायचं, तर हमीद दलवाई यांच्यावर लिहिताना ते डायरेक्ट हॉलिवूडचे दाखले देतात

हमीद कसा यायचा? तुम्ही कधी हॉलिवूडहून येणारी 'ट्रिनिटी' ही विनोदी स्टंट चित्रपटाची मालिका पाहिली आहे? 'वॉच आऊट- वुई आर मॅड' वगैरे! त्यातला तो तरुण पोरगा टेरेन्स हिल पडद्यावर दिसला की, काही तरी आता गडबड-धमाल होणारच असे वाटते – तसे हमीद आला की, वातावरण व्हायचे.

त्यांनी 'ललित'साठी लिहलेल्या एका लेखात, त्यांच्या आवडीनावडी सांगतानाही सिनेमा हजर आहे तो आहेच, पी.टी आय.चा टेलिप्रिंटर हा आवडता लेखक. बीअर, टेबल-टेनिस आणि वहिदा रेहमान या आवडत्या गोष्टी. (दुर्दैवाने या तिन्ही गोष्टींपर्यंत माझा हात पोहोचू शकणार नाही.) नावडत्या गोष्टी: जयप्रकाशांचे राजकारण, प्रा. गंगाधर गाडगीळ यांचे लिखाण आणि व्ही शांताराम यांचे सिनेमे.

भाऊ पाध्येंसाठी सिनेमा हा केवळ सिने पत्रकारितेपुरता विषय नव्हता; तो त्यांच्या जाणीव-नेणिवेचा अविभाज्य भाग होता. ती त्यांच्या अभिव्यक्तीची भाषा होती.

आज पुस्तकस्वरूपात उपलब्ध असलेलं त्यांचं चित्रपटविषयक लिखाण केवळ हिमनगाच्या टोकासारखं आहे. त्यांचे सिनेमाविषयक स्तंभ, दिवाळी अंकातील लेख शोधून काढून पुस्तकरुपात आणले पाहिजेत. त्यांनी पेश केलेले 'मतलब-बेमतलबच्या पिक्चर'वरचे, हिरो हिरोईनवरचे लेख; माणसं, परिस्थिती, घटना आणि काळ यांना चाळून पाहण्याचं, त्यांना समजून घेण्याचं साधन ते नक्कीच ठरू शकतील.

**विशेष आभार : उमा नाबर (संदर्भ विभाग, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय)**

**आकाशवाणी, टेलिव्हिजन, ओटीटी अशा विविध माध्यम प्रकारांत आपला ठसा उमटविणारे प्रसाद कुमठेकर हे मराठी साहित्य विश्वातले पुरस्कारप्राप्त लेखक, कथाकार आहेत. अतित कोण? मीच..., बारकुल्या बारकुल्या ष्टोऱ्या, बगळा, इत्तरकथा ही त्यांची गाजलेली पुस्तके आहेत.**

**संपर्क:** ७९७७८ ६५६३६

KITABKHANA, MUMBAI


Located in a 150-year old heritage building in Fort, Kitab Khana is a bookstore with a soul. With an old world charm, the bookshop houses a beautifully curated collection of books from modern fiction, classics, children's books to titles in regional languages like Hindi, Marathi, Gujarati and more. KitabKhana offers a 10-15% discount all year round and also regularly hosts author events, bookclubs and workshops. Readers can unwind at the in-house cafe. A literary haven for bibliophiles.



Somaiya Bhavan 45/47 MG Road, Fort +91 22 61702276/77/78
Whatsapp: +91 88795 40538 / 10:30 am - 7:30 pm, Open all days

kitabkhanabooks

# फ्रीडमः स्वातंत्र्याचा चरितनामा



**सुलक्षणा महाजन**

बुक शेल्फ






**ज**र्मनीच्या चॅन्सलर म्हणून २००५ ते २०२१ या काळात १५ वर्ष  यशस्वी कारकीर्द करून निवृत्त झालेल्या अँजेला मरकल यांच्या आठवणींचे फ्रीडम हे पुस्तक वाचत असताना २२ जून २०२५ रोजी अमेरिकेने इराणच्या ३ अणुकेंद्रांवर तोफगोळे टाकून ते उद्‌ध्वस्त केल्याची बातमी समोर आली. त्यावेळी तथाकथित स्वातंत्र्याचा उद्‌घोष करणाऱ्या अमेरिकेचे हे राक्षसी स्वरूप विशेष भयावह वाटले होते. ते वाचत असताना अँजेला यांच्या सहमतीच्या, व्यवहार्य आणि सहिष्णु राजकीय भूमिकेचे विशेष महत्त्व जाणवले. जगातील सर्व देशांचे स्वातंत्र्याचे हक्क अधोरेखित करण्याला त्यांनी महत्त्व दिले होते. त्यांच्या विवेकवादी, वैज्ञानिक आणि लोकशाही समाजवादी राजकीय भूमिकेचे विशेष महत्त्व जगात जाणवले आहे. प्रचलित काळात राज्यकर्त्यांमध्ये दुर्मीळ असलेले सामाजिक जबाबदारीचे भान, त्यांची मानवतावादी भूमिका आणि सहिष्णुता असे गुण त्यांच्या 'फ्रीडम' या आठवणींच्या पुस्तकातून मला विशेष प्रकर्षाने जाणवतात...

दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर मित्रदेश आणि सोव्हिएत युनियन असे दोन तट जगात पडले होते. १९४५ मध्ये युरोपमधील देशांची पूर्व आणि पश्चिम भागात विभागणी झाली. त्यात जर्मनीचे दोन तुकडे होऊन पूर्व-पश्चिम असे दोन देश तयार झाले. शिवाय बर्लिन या राजधानीच्या शहराची विभागणी झाली. बर्लिन ही पूर्व जर्मनीची राजधानी झाली. तेव्हा पश्चिम जर्मनीने बॉन शहरामध्ये नवी राजधानी प्रस्थापित केली. पश्चिम जर्मनीमध्ये भांडवलशाही अर्थव्यवस्था, लोकशाही आणि व्यक्तिस्वातंत्र्य असलेले शासन तर पूर्व जर्मनीमध्ये शासनाची मक्तेदारी अर्थव्यवस्था, साम्यवादी पक्षाची एकाधिकारशाही आणि व्यक्तिस्वातंत्र्यावर बंधने असलेल्या राजकीय व्यवस्था निर्माण झाल्या.

या सर्व घडामोडींमध्ये अनेक जर्मन कुटुंबे पूर्व आणि पश्चिम भागांमध्ये दुभंगली. अँजेलाचा जन्म कासनर कुटुंबात १९५४ मध्ये पश्चिम जर्मनीच्या हॅम्बर्ग शहरात झाला होता. तिच्या वडिलांची प्रोटेस्टंट चर्चचे पॅस्टर म्हणून पूर्व जर्मनीमध्ये नेमणूक झाली. आध्यात्मिक मार्गदर्शन करणे, शिकवण देणे आणि बायबलची प्रवचने देणे हे त्यांचे काम असे. तिची आई या समाजसेवेमध्ये व्यग्र असे. घरी मात्र मोकळे उदारमतवादी वातवरण होते. मुलांवर धार्मिक परंपरांची सक्ती नसे. त्यामुळे विज्ञानवादी दृष्टिकोन रुजण्यास वाव होता.

तिचे शालेय आणि उच्च शिक्षण पूर्व जर्मनीमध्ये झाले. तेथे धर्मगुरूंच्या मुलांना दुय्यम प्रकारची वागणूक मिळत असे. परंतु पूर्व जर्मनीमध्ये पुरुषांच्या बरोबरीने स्त्रिया आणि मुलींना शिक्षणाच्या समान संधी असल्यामुळे आणि अंगभूत हुशारीमुळे अँजेलाला पूर्व जर्मनीमध्ये उच्च शिक्षणाच्या संधी मिळाल्या. भौतिकशास्त्र विषयात पीएच.डी.पूर्ण झाल्यावर लिपझिक येथे सायन्स अकॅडेमीमध्ये वैज्ञानिक म्हणून तिने नोकरी सुरू केली. वैज्ञानिक उलरीच मरकल यांच्याशी लग्न केले. लिपझिक शहरामध्ये नव्या आयुष्याला सुरुवात केली. मात्र काही वर्षांतच घटस्फोट घेऊन ती वेगळी राहायला लागली. राजकारणात आल्यावर तिने दुसरे लग्न केले, तरी अँजेला मरकल हीच ओळख तिने कायम ठेवली.

**ओढ स्वातंत्र्याची**

वैज्ञानिक म्हणून सोव्हिएत युनियनच्या गटातील देशांमध्ये होणाऱ्या जागतिक कॉन्फरन्समध्ये भाग घेण्याच्या संधी तिला मिळत. जगातील आणि अमेरिकेतील वैज्ञानिकांशी ओळखी होत. त्यांच्याकडूनही तेथील मोकळे राजकीय वातावरण, वैज्ञानिकांना उपलब्ध असलेल्या स्वातंत्र्याबद्दल, चर्चांबद्दल माहिती मिळे. त्या स्वातंत्र्याचा स्वतःच्या देशातील हुकूमशाही राज्यव्यवस्थेमध्ये असलेला अभाव तिला जाणवत असे. अशाप्रकारे सर्वसाधारण आयुष्य चालले असताना १९८० च्या दशकात सोव्हिएत रशियामध्ये गोर्बाचेव्ह यांचे ग्लासनोस्त आणि पेरिस्त्रोइका पर्व सुरू झाले. पाठोपाठ साम्यवादी गटातील देशांमध्ये स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले. पूर्व जर्मनीमध्ये स्वातंत्र्याच्या मागणीसाठी लोकचळवळी सुरू झाल्या. ९ नोव्हेंबर १९८९ या दिवशी नागरिकांनी बर्लिनची भिंत पाडली. जर्मनीचे दोन देश एक होण्याचा मार्ग मोकळा झाला. दुसऱ्या दिवशी अँजेला इतर लोकांच्या बरोबरच भल्या सकाळी ट्रेन पकडून पश्चिम बर्लिनमध्ये गेली. पूर्वेकडील नागरिकांचा उत्साह, आनंद तसेच पश्चिमेकडील नागरिकांनी केलेले स्वागत अनुभवले.

**झंझावाती वातावरणातला राजकारण प्रवेश**

त्या झंझावाती दिवसांच्या अनुभवाने तिच्या आयुष्याचा मार्ग पूर्णपणे बदलून गेला. विज्ञानक्षेत्रातून बाहेर पडून तिने डेमोक्रॅटिक अलायन्स (डीए-DA) या एका लहानशा राजकीय गटात सामील होण्याचा विचारपूर्वक निर्णय घेतला. त्या गटाने जर्मनीच्या एकीकरणाला पाठिंबा देऊन पुढे झालेल्या निवडणुकीत भाग घेतला. अँजेलाचे राजकारणातले पहिले धडे निवडणुकीच्या काळात एकीकरण धोरणाच्या प्रचारापासून सुरू झाले. पूर्व जर्मनीमध्ये १९९०मध्ये निवडणूक झाली. डेमोक्रॅटिक अलायन्सला एक टक्क्यापेक्षा कमी मते मिळाली. जर्मनीमध्ये मताच्या टक्केवारीनुसार राजकीय गटांना प्रतिनिधित्व मिळते. त्या व्यवस्थेमुळे बुंडेस्टॅग - म्हणजे लोकसभेत तिच्या गटाला केवळ दोन जागा मिळाल्या. तेव्हा डीए गटाने पश्चिम जर्मनीमध्ये सत्तेवर असलेल्या सीडीयू (Christian Democratic Union-CDU) पक्षामध्ये सामील होण्याचे ठरविले.

त्यावेळी पश्चिम जर्मनीमध्ये CDU आणि CSU (Christian Social Union) या दोन पक्षांचे संयुक्त सरकार सत्तेवर होते. मुक्त बाजारपेठ, कल्याणकारी राज्य आणि काही प्रमाणात पारंपरिक धार्मिक-सामाजिक धोरणांना पाठिंबा अशी दोन्ही पक्षांची सर्वसाधारण उदारमतवादी धोरणे होती. सीडीयू पक्ष युरोपमधील देशांच्या संघाचा पाठीराखा होता, तसेच अमेरिकेशी त्याचे सहकार्याचे संबंध होते. तर बव्हेरिया



*वैज्ञानिक मानस असलेल्या अँजेला मरकल यांनी राजकारणात चिकित्सा आणि सहानुभूती या दोन मूल्यांच्या आधारे जर्मनीला प्रगतीच्या वाटा खुल्या करून दिल्या...*

प्रांतामध्ये सीएसयू पक्ष बहुमतात होता. त्यांच्याशी काही बाबतीत वैचारिक मतभेद होते. अँजेला १९९० पासून सीडीयू पक्षामध्ये काम करू लागली. हेलमट कोल तेव्हा पक्षाचे नेते आणि जर्मनीचे चॅन्सलर होते. बॉन या राजधानीच्या शहरात पक्षाच्या मुख्यालयात अँजेला पक्ष कार्यकर्ती म्हणून दाखल झाली.

एका देशाचे दोन भाग वेगळे होणे दुःखदायक असते. तर वेगळ्या झालेल्या दोन भागांचे पुन्हा एकत्र होणेही काही सोपे, सरळ नसते. चाळीस वर्षांपासून विभागलेल्या जर्मनीचे एकीकरण हे मोठे आव्हान होते. अर्थव्यवस्था, राज्यव्यवस्था, समाजव्यवस्था आणि पायाभूत क्षेत्राच्या विकासातील तफावत यांचे सांधे जोडण्याचे काम सोपे नव्हते. विशेषतः शासकीय मदतीवर अवलंबून असलेल्या ग्रामीण भागातील शेती, लहान उद्योगात गुंतलेल्या लोकांना मुक्त बाजारपेठेच्या पूर्णपणे वेगळ्या व्यवस्थेमध्ये सामील होणे कठीण जात होते. तेथील समस्या, समाज, संस्कृती शहरांपेक्षा खूप वेगळ्या होत्या. तेथे बेकारी वाढली होती. पायाभूत सेवांची मोठी कमतरता होती. स्वतः ग्रामीण भागात लहानपण अनुभवलेल्या अँजेलाला या लोकांप्रती सहानुभूती होती. त्यांचे प्रश्न, मानसिकता समजून घेण्याची क्षमता होती. त्यांच्याशी नाळ जोडण्याचे कौशल्य होते. राजकारणामध्ये लोकभावना समजून घेत, वास्तवातील प्रश्न, मर्यादा समजून घेत निर्णय घेण्याची तिची राजकीय भूमिका तयार झाली.

**पक्ष प्रवक्ता आणि मंत्रीपदावरची आव्हाने**

डेमोक्रॅटिक अलायन्समध्ये प्रवक्ता म्हणून लोकांना तिच्या गटाची ध्येय धोरणे समजावण्याचा अनुभव मिळाला होता. त्याच आधारवर सीडीयु पक्षात विलीन झाल्यावर ती त्या पक्षाची प्रवक्ता म्हणून काम करू लागली. १९९० साली झालेल्या पहिल्या एकत्रित जर्मनीच्या निवडणुकीमध्ये तिला पक्षाने पूर्व जर्मनीमधील ग्रिमेन या ग्रामीण भागात उमेदवारी दिली. तेथून ती जर्मनीच्या लोकसभेवर निवडून आली. ३६ वर्षे वयाची अँजेला सर्वात तरुण लोकप्रतिनिधी होती. (१९९०-१९९४) तिच्यावर महिला आणि तरुण मुलांच्या खात्याचे मंत्रीपद सोपविण्यात आले. महिलांचे समान हक्क, कौटुंबिक धोरणे, तसेच तरुणांमधील बेकारी हटविण्याच्या प्रश्नांवर तिने मोठे काम केले. विशेषतः नोकरदार स्त्रियांच्या लहानमुलांसाठी पूर्व जर्मनीमध्ये प्रचलित असलेल्या संगोपन केंद्रांचे धोरण संपूर्ण देशभर राबविण्यासाठी प्रयत्न केले. पूर्व युरोपमध्ये तरुणांसाठी शिक्षण आणि रोजगार निर्मिती करण्यासाठी धोरण आखले.

त्यानंतरच्या निवडणुकीत, त्याच मतदार संघामधून ती पुन्हा निवडून आली. (१९९४-१९९८) तेव्हा तिच्यावर पर्यावरण, नैसर्गिक संपत्ती संरक्षण आणि अणु ऊर्जा खात्याचे मंत्रिपद सोपविण्यात आले. अंगभूत हुशारीबरोबरच तिचा वैज्ञानिक दृष्टिकोन तसेच वैज्ञानिक शिक्षणाचा आणि संशोधनाचा अनुभव तसेच कार्यक्षमता यासाठी तो कसोटीचा काळ होता. मंत्रिपदाच्या काळातील दोन अनुभव तिने तपशिलात दिले आहेत. १९९५ साली, ऊर्जा निर्मितीसाठी जर्मनी आणि फ्रान्समधील अणुभट्ट्यांत तयार होणारा किरणोत्सर्गी कचरा (Radioactive waste) साठविण्यासाठी, विशेष कंटेनर्स मधून, जर्मनीच्या गोरलेबान विभागात नेण्याचे काम होते. त्यासंबंधीचा करार तिच्या मंत्रिपदाच्या पूर्वीच झालेला होता. पोलिसांच्या पहाऱ्यात एक कंटेनर पोचलेला होता. परंतु नंतर कंटेनरच्या वाहतुकीविरोधात स्थानिक नागरिक, पर्यावरणाच्या संदर्भात जागरूक असलेल्या संघटना आणि अणु ऊर्जेच्या विरोधात असलेल्या संघटनांनी एकत्र येऊन चळवळ सुरू केली

होती. भौतिकशास्त्र विषयात संशोधन केलेल्या अँजेलाचा अणु ऊर्जेच्या शांततामय वापराला पाठिंबा होता. त्या संबंधात असलेले धोके आणि काटेकोर संरक्षण यंत्रणेची गरज तिला माहीत होती. तसेच जर्मनीमधील त्या सुरक्षिततेसंबंधी तिला खात्री होती. त्यामुळे हिंसक वळण लागण्याचा धोका असूनही चळवळीतील संघटनांशी चर्चा करण्यासाठी ती त्या गावात पोचली. अशा चळवळींमधील चर्चेमध्ये लोकभावनांच्या पुढे तात्त्विक मुद्दे कसे निष्प्रभ ठरतात, हा अनुभव तिने घेतला.

तेथे या विषयाशी संबंधित केंद्र, राज्य आणि स्थानिक लोकप्रतिनिधी आणि अधिकारी, तसेच वाहतूक आणि पर्यावरण खात्याशी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा झाली. नंतर प्रसार माध्यमांनी प्रश्नावर बोलताना तिने किरणोत्सर्गाची तुलना केक करताना सांडलेल्या बेकिंग पावडरशी केली. चिमूटभर पावडर सांडली तरी केक यशस्वी होतो, तिचे हे उद्‌गार तिच्यावर कठोर टीका करण्यासाठी पुरेसे ठरले. तणावाच्या परिस्थितीमध्ये झालेली तिची चूक तिला उमगली. त्यावेळी तिने माफी मागायला हवी होती, हे तिला नंतर जाणवले. मात्र त्यानंतरच्या काळात राजकारणात चूक कबूल करणे म्हणजे अकार्यक्षम असल्याची कबुली देणे नसते, तर चूक कबूल करण्यासाठी धाडस लागते हा धडा तिने घेतला.

पुढे अणु ऊर्जेशी संबंधित सामानाची वाहतूक रेल्वेतून करताना सुरक्षिततेची पातळी ओलांडली गेल्याचे आणि तिच्या खात्याने ते लपवून ठेवल्याचे आरोप झाले. ते प्रकरणसुद्धा ती मंत्री होण्याच्याही अगोदरचे होते. पुढे सर्व संबंधित शासकीय संस्था, खाजगी कंपन्या यांच्यातील सर्व पत्रे, संवाद याची कसून छाननी झाली. जर्मनीमधील खाजगी ऊर्जा कंपन्यांनी ती माहिती लपविलेली होती. अणु ऊर्जा खात्याला त्या बद्दल माहिती दिली गेली नव्हती हे सिद्ध झाले. त्याबद्दल लिहिताना तिने लिहिले आहे, की राजकारण म्हणजे काही आर्थिक उद्योग नसतो. तिथे कितीही मोठ्या कंपन्यांचा दबाव आला तरी, त्यासाठी राजकारणात बळी जावे लागले, तरी शासनाने सार्वजनिक हितालाच प्राधान्य दिले पाहिजे. त्यासाठी सत्याचा आग्रह धरणे महत्त्वाचे. हा दुसरा महत्त्वाचा धडा तिला मिळाला.

१९९५ साली जागतिक संघटनेची (UN) तीन दिवसांची पर्यावरण परिषद बर्लिनमध्ये घ्यायची होती. जर्मनीची पर्यावरण मंत्री या नात्याने ती परिषदेची अध्यक्ष होती. १० उपाध्यक्ष विविध देशांचे होते. हवामान बदलाचा धोका लक्षात घेऊन वातावरणातील घातक कार्बन वायू उत्सर्जन कमी करण्यासाठी प्रयत्न हा त्या परिषदेचा मुख्य उद्देश होता. एकाच देशातील तीन गटांमध्ये एकमत होणे कठीण असल्याच्या पार्श्वभूमीवर १५७ देशांच्या मतमतांची दाखल घेणे किती अवघड असेल याची तिला कल्पना आली होती. पूर्व जर्मनीमध्ये कारखानदारी कमी असल्यामुळे एकत्रित जर्मनीमधील या वायूंचे प्रमाण ५० टक्के होते. मात्र युरोप आणि अमेरिकेतील इतर पंचवीस विकसित देशांनी त्यांच्या ७५ टक्के असलेल्या घातक वायूंच्या उत्सर्जनाबाबत ठोस उपाय करणे महत्त्वाचे होते. विकसनशील देशांनी या संबंधात उपाय करणेही आवश्यक होते. त्यासाठी एकमत तयार करणे महत्त्वाचे होते. त्यांच्यात चर्चा होऊनही एकमत होत नव्हते. तेव्हा भारताचे मंत्री कमलनाथ यांचा सल्ला अँजेलाला विशेष महत्त्वाचा वाटला. त्यांच्या धोरणात्मक सूचनेमुळे परिषदेतर्फे कृती कार्यक्रम जाहीर करता आला याची विशेष नोंद तिने आत्मचरित्रात घेतली आहे.

**सहमतीचे राजकारण साधले**

त्यानंतरच्या युरोपमधील तसेच शाश्वत विकासासंबंधित जागतिक परिषदांमध्ये, पर्यावरण विषयांच्या परिषदांमध्ये भाग घेतल्यामुळे तिला जागतिक राजकारणाचेही अनुभव मिळाले. सामाजिक गरजा, आर्थिक विकास आणि पर्यावरण यांमध्ये मूलभूत अंतर्गत विरोधाभास असताना त्यातून मार्ग काढणे आवश्यक आहे; त्यासाठी बिगर शासकीय संस्था आणि राजकारणी यांच्यावर मार्ग काढण्याची जबाबदारी आहे, असे तिचे विचार बनले. या विषयावर अनेक तज्ज्ञ, राजकारणी यांच्याकडून त्यांची मते तिने समजून घेतली. त्या अनुषंगाने १९९७ साली The price of Survival: thoughts and conversations about Future Tasks of Environmental Policy हे पुस्तक (जर्मन भाषेत) लिहिले. शाश्वत विकासाच्या धोरणांचे मोजमाप करताना नैसर्गिक पर्यावरण, उर्जेचा वापर, आर्थिक चक्र आणि लोकांचे आरोग्य हे निकष असावेत याचा विचार केला. त्यासाठी सावधपणे, कधी कधी धीम्या गतीने काम केले. त्यात अपारंपरिक उर्जेच्या निर्मितीवर भर दिला. दुर्मिळ नैसर्गिक साधनांच्या किमती नियंत्रित करण्याचा तिचा प्रयत्न मात्र राजकीय विरोधामुळे यशस्वी झाला नाही.

मंत्रीपदाचा काळ तिची कसोटी घेणारा होता. या काळात



*मरकल यांनी स्वतःचा आब तर राखलाच, पण पुतीनसारख्या दांडगट राजकारण्यालाही संयमाने तोंड दिले...*

राजकीय वा सामाजिक विचारधारांच्या टोकदार आग्रहातून, निर्माण होत असलेल्या गलबल्यातून, अस्वस्थता निर्माण होते हे जाणून सहमती घडविण्यासाठी तिने केलेले प्रयत्न हे तिचे खास स्वभाव वैशिष्ट्य ठरले. त्या अनुभवाच्या आणि कसोटीच्या काळातून ती सहीसलामत बाहेर पडली. पुढे ती अनेक वर्षे जर्मनीची चॅन्सलर म्हणून यशस्वी ठरली. जर्मनीमधील राजकीय पक्ष तसेच युरोपमधील देश आणि जगातील लहान-मोठे देश या सर्वांचा अनुभव तिला मंत्रिपदाच्या काळात मिळाला. ताणलेल्या, आव्हानात्मक परिस्थितीमधून, चर्चांमधून सहमतीने मार्ग काढण्याचे कौशल्य तिने या काळात दाखवले. मात्र जर्मनीत १९९८ साली आणि त्यांनतर २००१ साली झालेल्या निवडणुकीत तिच्या पक्षाला बहुमत मिळाले नाही.

**चॅन्सलरपदाची शान जपली**

१९९८ ते २००० या काळात ती सीडीयु पक्षाची सचिव आणि नंतर अध्यक्ष झाली. या काळात तिने पक्षाच्या मजबुतीकरणावर भर दिला. विविध व्यवसायात काम केलेल्या अनेक स्त्रियांना तिने पक्षात आणले, त्यांना सल्लागार नेमले. व्यक्तिस्वातंत्र्य आणि कौटुंबिक सुधारणा, स्त्रियांचे प्रश्न, पर्यावरण हे तिला सर्वात महत्त्वाचे वाटणारे विषय होते. सोशल कॅपिटल संकल्पनेचा पाठपुरावा करण्यासाठी तिने विशेष समिती नेमली. लोकसभेतील कामकाज करत असतानाच संशोधक, अभ्यासक आणि तज्ज्ञांशी संवाद साधला. तेव्हा सीडीएस व सीएसयु पक्षातील राजकीय सत्ता स्पर्धेचा अनुभव घेतला. विरोधी पक्षनेता म्हणून तिने जर्मनीच्या आणि युरोपच्या राजकारणात स्वतःचे स्थान निर्माण केले. २००२ सालच्या निवडणुकीत मतदानात टक्केवारी वाढली तरी सीडीयु-सीएसयु पक्षांचे बहुमत थोडक्यात हुकले. नंतर आलेले फ्रीडम डेमोक्रॅटिक पक्षाचे सरकार केवळ तीन वर्षे टिकले. २००५ साली मुदतपूर्व निवडणूक झाल्यावर सीडीयु-सीएसयु पक्षांना बहुमत मिळाले. सीडीयु पक्षाची अध्यक्ष या नात्याने अँजेलाने पन्नासाव्या वर्षी जर्मनीची चॅन्सलर म्हणून शपथ घेतली. सर्वात तरुण आणि पहिली स्त्री चॅन्सलर बनली. महत्त्वाची नेता म्हणून जगभर ओळखली जाऊ लागली. पुढे १६ वर्षे तिने हे पद सांभाळले.

जर्मनीचे चॅन्सलरपद हे देशाच्या तसेच युरोपीय समुदायातील देशांच्या दृष्टीनेही महत्त्वाचे नि आव्हानात्मक होते. एरवीसुद्धा नेतृत्वापुढे असलेली आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय आव्हानेही मोठी असतात. असे एक आव्हान जगापुढे २००८साली उभे राहिले होते. लोकांची कर्ज परतफेडीची आर्थिक क्षमता न बघता निवासी घरांच्या खरेदीसाठी दिलेल्या कर्जामुळे अमेरिकेतील बँका आणि वित्तसंस्था मोठ्या आर्थिक संकटात सापडल्या. अवास्तव नफ्याच्या अपेक्षेने वाढत गेलेली बाजार व्यवस्था कर्जाची परतफेड होऊ न शकल्यामुळे पत्त्यांच्या मनोऱ्यासारखी कोसळली. त्याला सब-प्राइम घोटाळा असे म्हटले गेले. जागतिक वित्त बाजारात मोठे संकट उभे राहिलेच, युरोपमधील वित्तव्यवस्थाही संकटात सापडली. तेव्हा त्यांना मदत करण्याची सामूहिक जबाबदारी युरोपीय संघावर आली. त्या काळात अँजेला युरोपीय समुदायाची अध्यक्ष बनली होती. त्या वेळी संकटग्रस्त देशांना आर्थिक मंदीमधून बाहेर पडण्यासाठी तिने घेतलेली ठाम भूमिका महत्त्वाची ठरली. बेशिस्त देशांच्या अर्थव्यवस्थांना मदत करतानाही त्यांना आर्थिक शिस्त लावण्याचे काम तिने यशस्वीपणे केले.

**प्रवाहाविरोधात भूमिका घेतली**

अमेरिकेने सीरियामध्ये सुरू केलेल्या युद्धामुळे युरोपमधील अनेक देशांमध्ये निर्वासितांचे लोंढे येऊ लागले. त्याच बरोबर दहशतवादाचा, राजकीय, सामाजिक अस्वस्थतेचा धोकाही वाढला. त्या परिस्थितीतही विरोधकांना तोंड देत युरोपमधील सीमेवरील देशांशी चर्चा करीत मानवतावादी दृष्टिकोनातून जर्मनीमध्ये स्थलांतरितांना सामावून घेण्याचे धोरण तिने राबविले. इतर लहान युरोपीयन देशांनाही त्या संबंधात सामील करून घेतले.

तिच्या कार्यकाळात युक्रेनने युरोपीय आणि नाटो देशांच्या

समुदायात सहभागी होण्यासंबंधी मोठा प्रश्न उभा राहिला होता. एकीकडे जर्मनीमधील ऊर्जा क्षेत्रासाठी रशियाकडून पाइप गॅस मिळविण्यासाठी तिने पुढाकार घेऊन पुतीन यांच्याबरोबर करार केला होता. त्यावेळी रशिया आणि युक्रेनमधील तणावाची तिला कल्पना होती. नाटोमध्ये युक्रेनला सामील करून घेतले आणि रशियाने आक्रमण केलेच, तर त्याच्या संरक्षणासाठी इतर युरोपीय देश आणि अमेरिकेचे सैन्य तेथे तैनात करण्याची जबाबदारी आली असती. ते टाळण्यासाठी युक्रेनला सदस्य करून घेण्यास तिचा विरोध होता. रशियाचे अध्यक्ष पुतीन यांच्याबरोबर तिने चर्चा केली होती. त्यांच्या युद्धखोर, हेकट स्वभावाचा अंदाज घेतला होता. त्यावेळी तडजोड म्हणून युरोपीय समुदायाने युद्धाचा प्रसंग आल्यास युक्रेनला शस्त्रास्त्रांची मदत करण्याचा करार केला. पुढे याचा फायदा घेत रशियाने युक्रेनवर आक्रमण केले. अँजेलाने तिच्या युद्धविरोधी भूमिकेतून जर्मनीने सुरक्षासंबंधित खर्चावर बंधन घालण्यासाठी लोकसभेमध्ये कायदा केला. परंतु आज युक्रेन-रशियामधील दीर्घकाळ चाललेल्या युद्धाच्या काळात या दोन्ही धोरणांच्या बाबत अँजेला मरकल हिच्यावर टीका होत आहे.

**जागतिक महामारीचे आव्हान पेलले**

२०२० साली जगभर कोव्हीड-१९ च्या महामारीचे आव्हान उभे राहिले. त्या काळात एक वैज्ञानिक म्हणून तिने लॉकडाऊन, आरोग्यव्यवस्था यांच्या व्यवस्थापनेची जबाबदारी पार पाडली. २०२१ मध्ये तिच्या पक्षाला बहुमत मिळाले तरी मतांचे प्रमाण कमी झाले. ती पुन्हा जरी चॅन्सलर झाली तरी राज्यकारभार करण्यात वरील प्रमाणे धोरणात्मक अडचणी येऊ लागल्या. त्यावेळी घेतलेल्या निर्णयांची जबाबदारी स्वीकारून सात महिन्यांनी तिने चॅन्सलर पदाचा आणि सीडीयु पक्षाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन नवीन नेतृत्वासाठी मार्ग मोकळा करून दिला.

२००५ साली जर्मनीची पहिली महिला चॅन्सलर म्हणून तिने शपथ घेतली होती तेव्हा ती पन्नास वर्षांची होती. पुढील सोळा वर्षांची तिची कारकीर्द युरोप आणि जगभरात वाखाणली गेली. जागतिक पातळीवर देशांमध्ये सहकार्य आणि सद्भावना वाढविण्यासाठी तिने विशेष प्रयत्न केले. 'फ्रीडम' या आपल्या आत्मचरित्रामध्ये ते प्रयत्न सविस्तरपणे मांडले आहेत. जॉर्ज बुश, बराक ओबामा, ट्रम्प अशा अमेरिकेतील अध्यक्षांशी झालेल्या भेटीची आणि त्यांच्या व्यक्तिमत्वासंबंधीची काटेकोर निरीक्षणे तिने पुस्तकात लिहिली आहेत. रशियाचा सर्वेसर्वा व्लादिमीर पुतीन यांचा आढ्यतेखोर स्वभाव आणि बेमुर्वतखोर वर्तन तिने जवळून अनुभवले आहे. ट्रम्प हा सर्व जगाकडे केवळ रियल इस्टेटच्या दृष्टिकोनातून बघतो, हे तिचे निरीक्षण आहे. अमेरिकेतील निवडणुकीत कमला हॅरिसला विजय मिळाला पाहिजे, अशी तिची भावना होती, असे तिने पुस्तकात म्हटले आहे. भारताचे पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांची भेट तिच्यासाठी महत्त्वाची ठरली होती. त्या भेटीतून भारतामधील गुंतागुंतीच्या समस्यांची, अर्थकारणाची तिला जाणीव झाली असे तिने म्हटले आहे. पुढे पंतप्रधान नरेंद्र मोदींशी झालेल्या भेटीमध्ये भारतामधील वाढत्या धार्मिक-जातीय तेढीबद्दल, सामाजिक असंतोषाबद्दल विषय काढला, तेव्हा त्यांनी दिलेली उडवाउडवीची उत्तरे याबद्दलही तिने लिहिले आहे.

**स्वातंत्र्य म्हणजे काय?**

आत्मचरित्रात शेवटी तिने स्वातंत्र्याच्या संकल्पनेबद्दल विचार मांडले आहेत. वैयक्तिक स्वातंत्र्याबद्दल लिहिताना ती म्हणते, 'स्वातंत्र्य म्हणजे स्वतःच्या मर्यादा काय आहेत याचा शोध घेणे. तेथपर्यंत पोचणे आणि त्या मर्यादा पार करण्याचा प्रयत्न करणे. स्वातंत्र्य म्हणजे कधीही न संपणारे शिक्षण, न थांबता पुढे जात राहणे.' राजकारणातून निवृत्त झाल्यावर नवीन दिशांचा शोध घेण्याचे तिचे काम सुरू झाले. स्वतःचा शोध घ्यायला सवड मिळाली. हे पुस्तक लिहिताना लहानपणापासूनच्या, तरुणपणातल्या, राजकीय क्षेत्रात प्रवेश करण्यापूर्वीच्या, हुकूमशाही राज्यातल्या स्वातंत्र्याच्या अभावाच्या, अन्यायाच्या आणि नंतरच्या राजकीय अनुभवांना, आठवणींना उजाळा मिळाला.

आत्मचरित्र लिहिताना तिला स्वतःसकट इतर राजकारणी लोकांच्या भाषेबद्दल प्रकर्षाने जाणीव झाली. प्रत्येक व्यवसायाची एक विशिष्ट भाषा असते. राजकारणही त्याला अपवाद नाही. राजकारण्यांची कठीण प्रश्न टाळण्याकडे असलेली वृत्ती, गरज तिने अधोरेखित केली. अनेकदा ते केवळ वेळ मारून नेण्यासाठी बोलत राहतात, पण त्यात काहीही मुद्दे नसतात हे तिने उदाहरणे देऊन नमूद केले आहे. स्वतःही काही वेळेला ते केल्याचे तिच्या लक्षात आले, तेव्हा प्रांजळपणे तिने ते मांडले आहे.

शेवटी तिने राजकीय क्षेत्रात येणाऱ्या तरुण लोकांना प्रश्नांना सरळ आणि ठोस उत्तरे देण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे, असे

म्हटले आहे. 'विशेषतः नवीन डिजिटल आणि सोशल माध्यमांच्या काळात असत्यालाच सत्य करून सांगण्याची वृत्ती लोकशाही राज्यांमध्येही दिसते आहे. खरे स्वातंत्र्य हे स्वतःच्या फायद्यासाठी किंवा हुकूमशाही, अन्यायापासून मुक्ती मिळावी म्हणून नसते. तर स्वतःच्या शेजाऱ्यांसाठी, समाजासाठी आणि सर्वांच्या कल्याणासाठी असते, असे मत तिने मांडले आहे. अशा स्वातंत्र्यासाठी लोकशाही ही पूर्वअट आहे, असे ती म्हणते. ती नसेल तर स्वातंत्र्याला, राज्यघटनेला, देशाला आणि मानवी हक्कांना काही अर्थ उरणार नाही. लोकशाहीचे रक्षण करण्यासाठी एकत्र येऊन प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे. कोणाही एका व्यक्तीसाठी स्वातंत्र्य असूच शकत नाही, ते सर्वांसाठी असावे लागते.' हे तिचे विचार सर्वांसाठी महत्त्वाचे आहेत.

अँजेला मरकल हिचे 'फ्रीडम' हे आत्मचरित्र भारतासकट सर्व देशातील राज्यकर्ते, राजकारणी तसेच अन्यायाविरोधात, लोकशाहीसाठी, स्वातंत्र्यासाठी प्रयत्नशील असणाऱ्या, मानवी प्रगतीसाठी आणि मानवी हक्कांसाठी आणि स्त्री स्वातंत्र्यासाठी आग्रही असणाऱ्या नागरिकांसाठी महत्त्वाचे आहे.

**ताजाकलम :** २०२५ मधल्या नोव्हेंबर महिन्यात झालेल्या अटीतटीच्या निवडणुकीतून झोरान ममदानी हा तरुण न्यूयॉर्क शहराचा महापौर म्हणून निवडून आलेला आहे. त्याने स्वतःची सोशल डेमोक्रॅट म्हणून असलेली राजकीय भूमिका ठामपणे मांडली आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी निवडणुकीच्या काळात त्याच्यावर साम्यवादी असल्याचा आरोप केला होता. मात्र ममदानी याने स्वतःची सोशल डेमोक्रॅट म्हणून असलेली विचारधारा ठामपणे मांडत निवडणूक जिंकली आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात त्याची मध्यममार्गीय विचारधारा तो कशाप्रकारे राबवतो हे बघणे उद्बोधक ठरावे. या पार्श्वभूमीवर अँजेला मरकल यांचे 'फ्रीडम' हे आत्मचरित्र महत्त्वाचे वाटते.

**ज्येष्ठ नगरनियोजनकार व पुरस्कारप्राप्त लेखिका तसेच मुक्त-संवादच्या सल्लागार संपादक मंडळाच्या सदस्य आहेत.**

**ई मेल :** sulakshana.mahajan@gmail.com



# गाणं आत सुरू आहे...



गणेश मनोहर कुलकर्णी

सुरानुबंध



आयुष्यात सुरांनी प्रवेश करणे किंवा एखाद्यास सुरांचा लळा लागणे म्हणजे केवळ कानांना सुखावणे इतपतच मर्यादित घटना नसते, तर सुरांची सोबत असणे म्हणजे, वादळ-वाऱ्यांत, सुखा-समाधानात, तळ गाठणाऱ्या उतारावर आणि अकल्पित उंचीवर पोहोचल्यावर एखाद्यास सावरणारी, दिसेल न दिसेल अशी ती एक तिनकासमान गवताची काडी असते, पाण्याखालचा अदृश्य स्वरुपातला तो एक भरभक्कम सुकाणूही असतो. या गवताच्या काडीचा, पाण्याखालच्या अदृश्य सुकाणूचा आधार लाभणे म्हणजे आयुष्याचे सूर जुळणे... अशाच सूर जुळलेल्या क्षणांचा मागोवा घेणारी, सुरांसोबतचे अनोखे बंध-अनुबंध उलगडणारी ही लेखमाला...

लहानपणी आईने गायलेल्या भजनांनी जाग यायची. आई कानडी, त्यामुळे बहुतांश करून कन्नड भाषेतली भजनं कानावर पडायची. 'वरवं कुडं ताई वरवं कुडं...' हे गाणं आई नेहमी म्हणायची, ते लक्ष्मीला वरदान देण्याचं आवाहन असायचं. कर्नाटकातील प्रख्यात संत पुरंदर दासांनी लिहिलेलं भाग्यदा लक्ष्मी बारम्मा... आई खूपच सुरात म्हणायची. आईचं स्वतःचं एक कानडी भजन मंडळ होतं. या भजन मंडळाबरोबर आईनं भारतातली तमाम मंदिरं पालथी घातली होती. हे भजन पं. भीमसेन जोशींनी अप्रतिम गायलेले आहे.

आई-बाबा डोंबिवलीमधल्या शंकराचार्य समितीच्या मंडळावर कार्यरत असताना दोन मोठे कार्यक्रम केल्याचे आठवतात. पं. भीमसेन जोशींची अभंगवाणी आणि सुधीर फडके यांचे गीतरामायण. पहिल्या रांगेत भीमण्णांच्या सुरांवर झोपल्याच्याच आठवणी आहेत, मात्र सुधीर फडकेंच्या माता न तू वैरिणी या तडाखेबंद गाण्यावर दचकून जागं झाल्याचंही आठवतंय.

असं म्हणतात, की बडे गुलाम अली खांसाहेबांच्या मैफलीत एक रसिक यायचा, पहिल्या रांगेत बसलेला असायचा आणि खांसाहेबांचा पहिला 'सा' लागताच झोपी जायचा. तर त्यांचे शागीर्द खांसाहेबांकडे तक्रार करायचे, की बघा कसा बदतमीज आहे, तुम्ही इतकं जीव लावून गाताय आणि हा बिनधास्त झोपा काढतोय, तर खांसाहेब म्हणायचे, अरे यह तो अल्ला की इबादत है, मेरे सुरोंपर उन्हे नींद आती है म्हणजे झोप येणं ही सुद्धा परमेश्वराची देणगी आहे, ती ही अशा ईश्वरी सुरांवर. गालिब म्हणतो –

**मौत का एक दिन मुअ'य्यन है**
**नींद क्यूँ रात भर नहीं आती**

तर आपल्याला गाणं आवडतंय, हे खोलवर जाणवायला लागलं होतं. या खांसाहेबांना डोंबिवलीतील काही रसिकांनी खाजगी बैठकीसाठी बोलावलं होतं. त्यात विलास डफळापूरकर या अवलिया संगीत संयोजकाचा मोठाच वाटा होता. हा ओ.पी.नय्यरचा उजवा हात समजला जायचा. माझ्या बहिणीची एक सुंदर, देखणी मैत्रीण त्यांच्याकडे गाणं शिकायला जायची. तर त्या खाजगी मैफलीत खांसाहेब खर्जात गाताना सोबत पेटीवर जो होता, तो म्हणाला होता, की आपका सूर तो इसमे ढुंढनेसे भी नहीं मिल रहा है... याच डफळापूरकरांनी डोंबिवलीतल्या रेल्वेच्या गेटवर आत्महत्या केल्यावर तमाम संगीत प्रेमी हळहळले होते.

**खांसाहेबांची प्रभा**

असे म्हणतात, की खांसाहेबांचे महाराष्ट्रात आगमन होण्यापूर्वी इथल्या संगीताच्या दुनियेची अवस्था अतिशय केविलवाणी होती. दुसऱ्या महायुद्धाच्या धुमश्चक्रीत मराठी रंगभूमीला अवकळा प्राप्त झाली होती. शास्त्रीय संगीताची आवड सुरेल नाट्य संगीतातूनच तर निर्माण होत असतानाच नाट्यसृष्टीचं कोलमडणं शास्त्रीय संगीतालाही मारक ठरलेलं होतं. शास्त्रीय संगीताची ही म्लान अवस्था दूर करण्यासाठी अनेकांचा हातभार लागला. त्याचे श्रेय जसे त्या काळातले व्यासंगी चित्रपट संगीतकारांचे होते, तसेच त्या काळात गायल्या जाणाऱ्या रूक्ष आणि नीरस शास्त्रीय संगीताला आपल्या नजाकतदार गाण्याने एका वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवणाऱ्या बडे गुलाम अली खांसाहेबांनाही द्यायला हवे. खांसाहेब यमन रागाच्या प्रेमातच असायचे. साधारणपणे त्या काळात सगळ्या मुसलमान कलाकारांची, उस्तादांची हीच मनोधारणा होती, की आपल्या शिष्यांनी सुरूवातीची काही वर्षे तरी यमनचाच रियाज करायला हवा. जेणेकरून त्यांना नंतर आयुष्यात कुठल्याही रागावर मांड ठोकताना कसलीही अडचण येणार नाही.

एकदा या खांसाहेबांच्या मैफलीच्या अगोदर तंबोरे वगैरे सुरात लावताना आमच्यासारख्या एका अर्धवटरावाने यमनचे सूर ओळखून उस्तादांना छेडले. जरा तोऱ्यातच म्हणाला, क्या उस्तादजी आज भी यमनही? उस्तादजी म्हणाले, अच्छा आप यमनसे इतने वाकिफ है? ३० साल हुअे है, मेरे को तो अभी अभी यमन थोडासा समझमे आ रहा है... इतने साल मे चुटकीभर यमनही हात मे आया है...

हेच खांसाहेब एकदा मुंबईत चौपाटीवर शिष्यांबरोबर फिरत होते. म्हणाले, आज दिल खोलकर पानीपुरी खायेंगे, तर त्या ठेल्यावर अतिशय देखणी नवयौवना आली होती. उस्तादजी भान हरपून तिला पाहायला लागले. ती निघाली तर तिच्या मागे मागे चालू लागले. शिष्य हैराण, उस्तादजींना कसे थोपवणार? शेवटी एक जण म्हणाला, उस्तादजी रियाझ का समय हो रहा है... ते म्हणाले, चलो आणि सरळ घरच्या बैठकीत बसून तानपुरा लावू लागले. सगळ्यांबरोबर रियाजाला बसले आणि यमन छेडायला सुरूवात केली. एका क्षणी एक अनवट अशी तान घेऊन म्हणाले, उस खूबसूरत लडकी की लचक जैसी तान

होनी चाहिए. तेव्हा कुठे उस्तादजी त्या नवयौवनेच्या मागे का गेले, याचा शागीर्दांना उलगडा झाला. हेच उस्ताद रियाज करताना अचानक एक अनवट तान त्यांच्या मुखातून बाहेर पडली आणि ते चमकून रडायलाच लागले. सगळे शागीर्द हैराण, त्यांना वाटले त्यांच्या कडून काही चूक तर नाही झाली. म्हणाले, उस्तादजी कुछ गुस्ताखी तो नहीं हुई? उस्तादजी हुंदका आवरत म्हणाले, अरे मैं कौन हुं मेरे मुंह से ये कौन गवा रहा है...

गोपाळ भोबेंनी अशी एक आठवण नोंदवून ठेवली आहे, की त्यांच्या ओळखीचा एक जण ज्याला संगीताचा ओ की ठो कळत नव्हता. त्याने एकदा खांसाहेबांनी गायलेली, ‘का करू सजनी आये ना बालम’ ही ठुमरी ऐकली आणि निव्वळ या ठुमरीसाठी अख्खा रेडियोग्रामच विकत घेतला होता.

**प्रतिभेचे रागरंग**

हा रेडियोग्राम आपल्या ऐपतीचा नव्हता, याची अमिताभ बच्चनने एका मुलाखतीत सांगितलेली आठवण त्या काळाचे प्रातिनिधिक चित्रण करणारी आहे. इलाहाबादमध्ये नेहरू आणि बच्चन घराण्याचे आपुलकीचे संबंध होते. अमिताभ, राजीव, संजय हे त्या काळात एकत्र खेळायचे. एके दिवशी चीनच्या उपपंतप्रधानांनी नेहरूंना एक रेडियोग्राम भेट दिला. हा ग्रुंडिंग कंपनीचा रेडियोग्राम जर्मन मेड होता. आता हा ब्रँड तुर्कीश झालेला आहे. मग काय दिवस रात्र राजीव, संजय आणि अमिताभ त्यावर गाणी ऐकत दंगा करायचे. एकदा शेजारच्याच खोलीत काम करत असलेले पंतप्रधान नेहरू यांचा आवाज / गोंगाट ऐकून त्यांना ओरडायला लागले, तिघांनाही घाबरलेले बघून पंडितजींनी स्वत:च नंतर वातावरण हलके करायचा प्रयत्न केला आणि परत आपल्या कामासाठी निघूनही गेले.

याच पंडितजींना शेवटच्या आजारपणात झोप येत नसे, म्हणून रोज दुपारच्या वेळी त्यांच्या घरी जाऊन विविध कलाकार आपली कला सादर करायचे. कला सादर करणाऱ्या कलाकारांची उत्तम बडदास्तही ठेवली जायची. अगदी शेवटी शेवटी पंडितजींना श्वासोच्छ्वासाचा खूप त्रास होत होता. तेव्हा विनोबाजी भेटायला गेले होते, म्हणाले, तुम्ही खरं तर बासरीचा रियाज करायला हवा, पंडित नेहरू भडकले. म्हणाले, इथे मला एक एक श्वास घ्यायला त्रास होतोय आणि तुम्ही मला बासरी काय वाजवायला सांगताय. या दरम्यान दिल्लीत असताना उस्ताद विलायत खां जमेल तसे दुपारी किंवा संध्याकाळी



*बडे गुलाम अली खांसाहेब आणि महंमद रफीसाहेब... सुरांच्या दुनियेतल्या दोन अलौकिक घटना...*

पंडितजींच्या समोर आपले वादन पेश करायचे. तर एक दिवस उस्तादजींना कंटाळा आला होता. त्यांना न्यायला येणाऱ्या लोकांना ते म्हणाले, पंडितजींना सांगा की आमचा आज मूड नाही, आम्ही आज येणार नाही वाजवायला. पंतप्रधानांच्या कानावर हे गेले, तेव्हा त्यांनी उस्ताद विलायत खांसाहेबांच्या मुडचा सन्मानच राखला, उगाच रागावले वगैरे नाही, तर या प्रक्रियेला सुसंस्कृतपणे समजून घेण्याचाच प्रयत्न केला.

तर अशा दैवी प्रतिभेच्या कलाकारांमुळेच आपल्या शास्त्रीय संगीताचा पाया आजही टिकून आहे. शाळा-कॉलेजच्या दिवसांत इतर ठिकाणांप्रमाणे डोंबिवलीतही शास्त्रीय गाण्याच्या बैठकींचं आयोजन होत असायचं. डोंबिवलीची दाद पुण्या-मुंबई खालोखाल महत्त्वाची मानली जायची. एकदा डोंबिवलीत फडके रोडवर पं. हृदयनाथ मंगेशकरांची मैफल होती. माझी एक मैत्रीण निवेदनाला होती. पंडितजी कधी कुणाची कशी पंचाईत करतील याचा काही भरवसाच नसायचा. त्या दिवशी मैत्रिणीने ‘मेंदीच्या पानावर’ पंडितजी गातील असं म्हणावं, तर पंडितजी ‘मी डोलकर’वर जायचे. मैत्रीण अक्षरश: घायकुतीला आली, काय करावं हेच तिला सुचेना. असं बराच वेळ चालल्यावर



*प. भीमसेन जोशींनी कानावर संस्कार केले, तर डॉ. मृदूला दाढेंनी आदरभाव जोपासण्याचे मूल्य ठसवले...*

रसिकही पांगायला लागले. मग अचानक उत्तररात्री पंडितजी म्हणाले, भलते- सलते रसिक आतापर्यंत निघून गेले असतील. आता उरलेल्या अस्सल रसिकांसाठी मी अतिशय अस्सल असं गाणं पेश करणार आहे... आणि नंतर त्यांच्या पोतडीतून त्यांनी अशा काही अनवट चीजा गाऊन दाखवल्या, की मन अगदी तृप्त होऊन गेलं.

**सूरसोबत न्यारी**

अशीच एकदा गडकरी रंगायतनला दिवाळी पहाटच्या मैफलीत त्यांनी गायलेली नितांत सुंदर अशी भावगीतं अजूनही मनाच्या कुपीत जपून ठेवली आहेत. घरोघरी रेडिओ असण्याच्या काळात शाळा-कॉलेजात जाता येता कानावर गाणी पडायची. पण ज्या ज्या गाण्यासाठी पाय रेंगाळले, ती सगळी भावगीतं हृदयनाथांचीच असावी, हा निव्वळ योगायोगच. गाण्याच्या प्रेमात पडायला इथूनच सुरूवात झाली होती. कॉलेजला असताना पेपरची लाइन टाकायचो. एक काटकर नावाचे गृहस्थ सकाळी सकाळी पेटी बरोबर झटापट करताना दिसायचे. एकदा मी बाळबोधपणे विचारलं, काय सुरू आहे, तर म्हणाले गाण्याचा रियाज करतोय. मी भारावून रोजच तिथे रेंगाळायला लागलो. काका म्हणाले, शिकायचं असेल तर येऊन बसत जा. आठवड्यातून दोनेक दिवस जरी क्लासला आलास तरी चालेल. मी खूश झालो आणि महिनाभर रोज सर्वात शेवटचा पेपर टाकून त्यांच्याकडे बसायला लागलो. काही सरगम वगैरे शिकवण्याचा त्यांनी प्रयत्न केला. महिना संपल्यावर मी पेपरचे बिल मागितले, तर म्हणाले, अरे तूच काही पैसे मला द्यायला हवे. माझ्या क्लासची फी ४० रुपये महिना आहे. पेपरचे बिल वजा करून उरलेले पैसे तुम्ही क्लासची फी म्हणून जमा करायला हवी. मी क्लास बंद केला आणि पु.ल.देशपांडे म्हणतात, तसे डोंबिवलीकर एका महान कलाकाराला मुकले...

सैगल, तलत, मन्ना डे, रफी, किशोर, आशा, लता दीदींची गाणी ऐकतच आपली पिढी मोठी झाली. कॉलेजच्या दिवसांत अनेक गोष्टी करण्यासाठी तडफडायचो, त्यातलेच एक म्हणजे निवेदन. कॉलेजमधल्या फडके सरांनी मला या क्षेत्रात लागणारा आत्मविश्वास आणि ऐनवेळी बोलण्याची संथा दिली. मग नोकरी लागल्यानंतर देखील सुरूवातीच्या काळात असंख्य कार्यक्रम केले. त्यावेळी प्रत्येक उत्सवात मराठी ऑर्केस्ट्राचे फॅड होतेच. आमचा सुहास राऊत नावाचा एक आयोजक होता, तो कुठे कुठे कार्यक्रम घ्यायचा आणि ऐनवेळी बोलता येणारा म्हणून मलाही बोलवायचा. स्टेजवरच गायकांची नावं आणि त्यांची बसलेल्या गाण्यांची यादी हातात यायची. चल सुरू कर म्हणायचा. रस्त्यावर, चाळीत शेकडोंचा जमाव समोर असायचा. टीव्ही वगैरे बघण्याचा काळ यानंतरच सुरू झाला, लोकांना प्रत्यक्ष समोर चाललेलं बघायला आवडायचं. यात अनेक कलाकार भेटले, मिथिलेष पाटणकर सारखा प्रख्यात संगीत संयोजकही त्यावेळी त्याच्या उभरत्या काळात सोबत असायचा. आयोजकही मधल्या पंधरा मिनिटांचा मध्यांतर त्याच्या जीवावरच घ्यायचे, मीच निवेदन करायचो, की आता तुमच्या समोर मिथिलेश दया घना सादर करतील. मग चक्क १५-२० मिनिटे तो संपूर्ण गर्दी गुंगवून पकडून ठेवायचा.

**कहीं दम निकल ना जाये...**

एकदा दादर-माटुंगा भागातल्या बॉम्बे ग्लास वर्क्सच्या इमारतीच्या गच्चीत भर पावसात कार्यक्रम होता त्यात मुख्य गायिका मृदुला दाढे होत्या. धो-धो पावसामुळे माणसं इथे-तिथे विखरून उभी होती. आयोजक एका क्षणी म्हणाला, गणेश सुरू कर यार आणि मी चक्क पंधरा-वीस मिनिटे पावसाच्या कविता म्हणत गेलो, तोपर्यंत आमचे कलाकार आपापली पोझिशन घेऊन तयार बसले होते. त्यातच मी अलगदपणे गाण्याची घोषणा केली. रसिक चक्क भर पावसात बसून कार्यक्रम ऐकत होते. पण वातावरण हलकेफुलके करण्याची प्रक्रिया तो Ice breaking movement मी अगदी जवळून अनुभवलाय. तो क्षण मी यशस्वीपणे निभावला म्हणून माझं केलेलं कौतुक आजही आठवून मोहरुन जायला होतं.

त्याचवेळी एका क्षणी लतादीदींचं गाणं असं म्हणण्याऐवजी

निवेदनाच्या ओघात 'लताचं गाणं' असं अनावधनाने म्हटलं गेलं, तर मला तिथेच मृदुला दाढेंनी टोकलेलंही आठवतंय. त्यांचा आक्षेप होता, की दीदींच्या नावाचा एकेरी उल्लेख करून तुम्ही त्यांचा अपमानच करताय. खरं तर अपार आस्थेनंच आपण असा उल्लेख केलेला असतो, पण मी शिकत गेलो. यानंतर स्टेजवरून बोलताना अनवधानाने देखील कुणाचा अपमान होईल, असे काही बोलायचे नाही, याचं भान ठेवत राहिलो.

एकदा दिवाळी पाडव्याला आयोजकांनी रात्रीचा कार्यक्रम घेतलेला, बहुतेक परळला कुठे तरी केईएमच्या मागे असावा. सखीचे बाळंतपणाचे दिवस भरून ती इस्पितळात शेवटच्या टप्प्यात. मी तिला सोडून कसं जायचं या विवंचनेत. मोबाइल फोन अजून बोकाळले नव्हते, तो हा काळ. रात्री आठ वाजता मुलाचा जन्म झाल्यावर तडक टॅक्सीने स्टेजवर पोचलो आणि निवेदनाला सुरूवात करणार तर आयोजक स्वतःच माझं नाव पुकारत होते. उशीर झाला म्हणून सर्व रसिकांची माफी मागत होते. नंतर म्हणाले, या उशिराचं गोड कारण म्हणजे आमचे निवेदक नुकतेच बाप झाले आहेत आणि ते हॉस्पिटलमधून सरळ इकडेच आले आहेत. जमलेल्या श्रोत्यांनी टाळ्यांच्या गजरात माझं केलेलं कौतुक मला भारावून टाकणारं. बाप झाला म्हणून असाही सत्कार वाट्याला येतो, हे माझ्यासाठी अद्भुतच होतं.

असाच एक धार्मिक गीतांचा कार्यक्रम होता. सारस्वतांचे शंकराचार्य आले होते, त्या निमित्ताने मुलुंडला कार्यक्रम होता. कार्यक्रमाला जाताना शक्यतो घरी काही न सांगता निघायचो. कारण एक प्रकारचे दडपण असायचे, पोटात गोळा उठलेला असायचा तो आजही उठतो सुरूवात कळत नसते, काय बोलणार याची काहीच कल्पना नसते आणि स्वप्निलही अगदी तान्हं बाळ होता. फक्त आयोजकांचा फोन नंबर देऊन ठेवलेला असायचा. तर मी कार्यक्रमात रंगलेलो असताना अचानक मला समोरून सखी बाळाला घेऊन येताना दिसली. समोर सगळी रसिक मंडळी गाण्याचा आनंद घेत होती. तुम्ही निवेदकाच्या भूमिकेत असताना कार्यक्रम संपतोय याची जाहीर वाच्यता करायची नसते. अगदी सहजपणे कार्यक्रम संपवायचा असतो. इतक्यात बाळ रडायला लागलं म्हणून सखी उठून मला खुण करायला लागली, की मी आता निघते आणि मला समोर दिसत होतं, की आणखीन एका गाण्यानंतर कार्यक्रम संपन्न होणार होता. म्हणजे मी तिच्याबरोबर निघू शकणार होतो, पण हे सांगायचं कसं. मग गाणं संपल्याबरोबर मी माइक हातात घेतला आणि म्हणालो, की कार्यक्रम संपण्याची अशी घोषणा करायची नसते, तरीही कार्यक्रमाच्या शेवटाकडे आपण आलो आहोत, हे मला माझ्या सखीला कळवायचे आहे, कारण ती आता उठून निघायच्या तयारीत आहे आणि पुढे एक शेर म्हणून दाखवला...

**मैं नजरसे पी रहां हुं, ये समा बदल ना जाये**
**यू झुकाओ ना निगाहे, कहीं रात ढल ना जाये**
**मेरी जिंदगी के मालिक मेरे दिलपे हाथ रख दे**
**तेरी आने की खुशी में कहीं दम निकल ना जाये!**

आणि सगळा बुद्धिवंत कारवारी समाज उत्सुकतेनं मागे वळून बघायला लागला की याची जिंदगी का मालिक आहे तरी कोण. कारण त्या क्षणी सखी बाळाला हातात घेऊन संकोचून उभी होती... हे चित्र एखाद्या अज्ञात चित्रकाराने त्या क्षणालाच जणू बंदिस्त करून टाकल्यासारखे माझ्या मन:पटलावर कायमचं कोरलं गेलंय...

**(क्रमशः)**


**गणेश मनोहर कुलकर्णी प्रसिद्ध ललितलेखक, कला आस्वादक आहेत. त्यांच्या 'रूळानुबंध' या लेख संग्रहाला अलीकडेच राज्य पुरस्कार प्राप्त झाला आहे.**
**संपर्क : ९८१९९५७८५२**

# सहानुभावी नजरेचा कथात्म नजराणा



नीतिन वैद्य

ग्रंथ दालन






*लेखक सुरेंद्र दरेकर*

**बुडता आवरी मज आणि अस्तित्वसूत्र हे ४ दीर्घकथा (का कादंबरिका?) असलेले दोन जाडजूड संग्रह ३–४ वर्षांपूर्वी हातात पडले. तोवर सुरेंद्र विठ्ठल दरेकर हे नाव लेखक म्हणून पाहिले– ऐकले नव्हते. त्यामुळे फार अपेक्षा न ठेवता ते वाचायला घेतले तसे लक्षात येत गेले, ही कथा सहज, जातायेता, पडल्यापडल्या वाचायची कथा नाही. ती मध्यमवर्गीय माणसांच्या (परिस्थितीइतकेच वृत्तीनेही) रोजच्या व्यथा, वेदना, आनंद, अपेक्षाभंगांचे दंश, सतत अधिक चांगल्या आयुष्याची असोशी यांची कथा आहेच, पण यापेक्षा तिचं वेगळेपण तीत हे सगळं गांभीर्यानं, बुद्धीनं समजून घेऊ पाहण्याची तळमळ दिसते त्यात आहे. आपण शिकतोय त्या तत्त्वज्ञान आणि विविध ज्ञानशाखांमधल्या संकल्पना रोजच्या जगण्याला लावून त्याचा काही उलगडा करण्याच्या बौद्धिक धडपडीची ही कथा आहे...**

जगणं समजून घेणं, त्यातल्या अनघड जागांचा काही उलगडा करू पाहणं, आपल्या मर्यादेत त्यावर जाणवेल न जाणवेल असं काही भाष्य करू पाहणं हे साहित्याचं, ते लिहिण्याच्या असोशीमागचं एक कारण असतेच. सुरेंद्र विठ्ठल दरेकर हे निखळ बौद्धिकतेच्या, तार्किकतेच्या आधारेच पण त्यापलीकडच्या गोष्टीही न नाकारता, संवेदना अजिबात कोरडी न होऊ देता करू पाहतात. अगदी भावनिक पेचही तसे उलगडू पाहतात. पारंपारिक शिक्षणापलीकडचे आध्यात्म, आपण शिकतोय त्या विविध ज्ञानशाखांतले तत्त्वज्ञान, त्यातल्या वेगवेगळ्या संकल्पना रोजच्या जगण्याला, अनुभवांना लावून पाहणं, त्यातून त्याचा तिढा सुटतोय का पाहणं हे त्यांच्या कथेतून मी तरी मराठीत पहिल्यांदाच वाचले. त्यासाठी वेगवेगळ्या ज्ञानशाखांचा गाढा व्यासंग म्हणता येईल इतका अभ्यास हवाच, बरोबरच सामान्य आयुष्यातल्या रोजच्या छोट्या अनुभवांकडे बारकाईनं पाहण्याची सहानुभावी नजरही हवी. निखळ तर्कबुद्धीचा अवलंब तर करायचा तेही नात्यांमधील भावनिकतेला अजिबात ऑप्शनला न टाकता, हे अवघड आहे.

बौद्धिक कष्टांनी ज्ञान मिळवत जाऊ तसे समजुतीची एकेक पायरी (त्याचा लौकिक जीवनात उपयोग करीत बहुतेकजण चढत जातात त्या पायऱ्या आणखी वेगळ्या) चढत जातात माणसं, तशी खालच्या, सामान्य गणल्या जाणाऱ्या (की हिणवल्या) आयुष्यातल्या सुखसमाधान आनंद, दुःखवेदना अभावांतून येणाऱ्या मत्सरादि भावना समजून घेण्यासाठी लागणारी सहानुभावी संवेदना गमावत जातात, बहुदा. दरेकरांच्या कथांमधून मात्र आपण मिळवतो ते ज्ञान केवळ लौकिकार्थाने यशाच्या पायऱ्या चढण्यासाठीच नव्हे (त्यासाठी ते आहेच पण) तर व्यापक अर्थाने रोजचं जगणं, एकुणातच आयुष्य समजून घेण्यासाठी वापरणारी पात्रं दिसतात, हे फार वेगळं, लोभस आहे. हे करताना कथेचा ओघ, त्यातले संवाद कृत्रिम वा कर्कश बौद्धिक न होता सहज वाहतेपण त्यात हवे, ही तर तारेवरची कसरत. दरेकरांना ती साधली आहे असे म्हणता येते. त्यामागे त्यांचे येणारे अनुभव, त्याची मनात तत्काळ उमटलेली प्रतिक्रिया कागदावर लगेच उतरवण्याची घाई न करता तीन दशकांपेक्षा अधिक काळ मनात मुरवत ठेवताना पोट भरण्याबरोबरच विविध ज्ञानशाखांचा थक्क करणारा व्यासंग जोपासणे – साधना आहे असे वाटते.

**गुंतवळीचा गोषवारा**

पहिल्या दोन संग्रहांनंतर 'आपुला ठावो ना सांडीता' आणि 'वर्जितमध्य' असे आणखी दोन संग्रह आले. मग हा सगळा वॉर्मप वाटावा अशी गुंतागुंतीचे बहुस्तरीय कथानक असलेली पहिली कादंबरी आली, 'समर ऑफ सेवंटी नाईन'. ही कादंबरी म्हणजे संवेदनशील, विचारी मनाला व्याकूळ, हतबल करणाऱ्या अनुभवान्ती एकूण आयुष्याबद्दल पडलेले प्रश्नोपनिषद आहे. ते आपापल्या समांतर अनुभवांत तपशिलांचे रंग भरत ते वाचणाऱ्या प्रत्येकाने आपली बौद्धिक तात्त्विक वैचारिक बैठक पणाला लावून स्वतःला विचारावे इतके हे बौद्धिक अंगाने केलेले निखळ भावनिक, आध्यात्मिक कथन सनातन, मौलिक, कालातीत आहे.

आपल्या लेखनातून माणसाच्या अनुभवांची विविध अस्तित्वरूपे शोधून त्यांचा अर्थ लावू पाहतात दरेकर. व्यासंगामधून हाती आलेल्या संकल्पना प्रत्यक्षानुभवाशी लावून पाहत आयुष्याची, त्यातल्या अनाकलनीयतेची काही संगती लावायचा प्रयत्न त्यांनी केला, तो मराठीपुरता तरी साहित्यातला नवा आयाम आहे असे वाटते.

**आकलनाची समृद्ध पायवाट**

या नव्या कादंबरीत ते आधिभौतिक अध्यात्माला, त्यातल्या कर्मकाडांसह भिडले आहेत. एके ठिकाणी येते, 'मनासारखं घडून येण्यासाठी लोक किती गळ घालतात, पण आपण आपले म्हणणे फक्त कळकळीने मांडून वाट पाहायची असते, इच्छेचा अतिरेक न करता सत्याला त्याच्या अंगानेच उलगडू दिले पाहिजे. (आता यासाठी) लोक श्रद्धेवर गुजराण करतात का त्याहून अधिक काही असते, कळत नाही.' अशा अवघड जागी कर्मकांडांनी घरटी केलेली असतात. हे समजून घेण्यासाठी अनुभवांकडे, त्यांच्या आपल्याला होतेय त्या आकलनाकडे, कुठलीही आग्रही भूमिका न घेता, पूर्वग्रह नसलेल्या साक्षीभावाने पाहत सुरेंद्र दरेकर दिसतेय ती एक वाट समोर ठेवतात. यासाठी वेगवेगळ्या पार्श्वभूमींवरच्या, स्वभावा-परिस्थितीतल्या माणसांचा मोठा गोतावळा जमवतात आणि त्यातून त्या त्या परिस्थितीला माणसं देतात, त्या स्वभावगत प्रतिसादांचा माग काढतात. आकलनाच्या या धूसर वाटेवर चालायचे का हे वाचकाने ठरवावे, पण ती तुम्हाला समृद्ध करते असे नक्की म्हणता येते.

वाट्याला येते ते आयुष्य म्हणजे, अपघातांची मालिका



*माणसाच्या रोजच्या जगण्यातले, दोन क्षणांदरम्यानचे ताण टिपत, प्रत्येक माणसाकडे अत्यंत सहानुभूतीने पाहत सुरेंद्र दरेकर यांनी आपली लेखनसृष्टी आकारास आणली आहे...*

आणि आपली भूमिका केवळ 'आलिया भोगासी असावे सादर', इतकीच? सत्याला त्याच्या अंगाने उलगडू दिले पाहिजे हे खरेच, पण मग यात आपली भूमिका फक्त कळसूत्री असते की कृतीचे काही स्वातंत्र्यही असते? का अखेरीस विश्वातील जड वस्तूंप्रमाणे आपण म्हणजे कसलेच स्वातंत्र्य नसलेली जटील घडणीची एक वस्तूच असतो? आणि सापेक्षतेने आपल्या मर्यादेत (प्रयत्नरत) राहण्याची पराकाष्ठाच काय ती आपल्याला करणे शक्य आहे?

**गुंगवून ठेवणारा डोलारा**

गोष्टी घडायच्या तशाच घडणार असतील तर त्याचे विकल्प कोणी कशासाठी शोधले? आणि अखेरीस सगळ्या गोष्टींचे उलगडे होऊन तरी काय साध्य होते? 'काय साध्य होते अखेरीस?' हा या सगळ्या विचारव्यूहाच्या शेवटी येतो तो मोठा जटील प्रश्न आहे. अखंड चाललेल्या प्रवासात गंतव्य दिसण्याआधीच वाट चिरेबंदी भिंतीने बंद झालेली दिसावी आणि चालण्यातले अवसान गळून जावे, तसा तो समोर उभा राहतो. यासाठी दरेकर कथेचा जो अनेकस्तरीय, अनेकपदरी तरी घट्ट बांधणीचा डोलारा उभा करतात, तो त्यातल्या वैचारिकतेपलीकडे गुंतवून ठेवणारा आहे.

निवृत्तीनंतरच्या काही रिकामिकीत पत्नी काही गंभीर आजारातून बाहेर पडत असताना, आपण तिला इतकी वर्षं कायम गृहीत धरण्यातून तिचा अवकाश आक्रसल्याचे वसंतरावांना जाणवते. हे आजारपण त्यातून तर नव्हे, असेही वाटून जाते. त्यातून मुला-नातवंडांपासून गोडीगुलाबीत बोलून स्वतंत्र होत उत्तरायणात पत्नीसाठी ते नव्या स्वतंत्र सहजीवनाची सुरूवात करतात. पण लवकरच आपल्याला काही अपराधगंड वाटावा असे जे जाणवले ते तरी खरे होते का? मुळात आपण या दीर्घकाळात घडत होते त्यात पूर्णांशाने होतो का? असा काही परात्मभाव निर्माण करणारा, अनेक प्रश्नांसह विरून गेलेला भूतकाळ समोर रोज नव्या तपतशिलांसह पाकळीपाकळीने उमलावे फूल, तसा उलगडू लागतो.

बालपणातला आईवडिलांचा विजोड संसार, सतत मन मारत जगाव्या लागलेल्या आईची शेवटच्या आजारपणातही झालेली हेळसांड, ती गेल्यानंतर लगेचच जणू वाट पाहत असल्यासारखा वडिलांनी केलेला नवा घरोबा, त्यातून बुद्धिमान, विलक्षण स्वाभिमानी बहिणीने अनेक रहस्ये पोटात घेऊन लांब जात घराशी कायमचे तोडलेले बंध, पुढे वसंताचेही मामाच्या मदतीने शिक्षण-नोकरी-लग्न अशा जगरहाटीत घराशी एकूणच तुटत गेलेले भावबंध... प्रवासातल्या, सगळेच आता विस्मरणात गेलेय-जावेही अशा टप्प्यावर ही सगळी स्थानकं दत्त म्हणून अनपेक्षितपणे एखादे रहस्यमय कथानक उलगडत जावे, तशी एकेक करत समोर येतात आणि एखाद्या दूरस्थ कथेला वाचावे तशाच, कसलीच भूमिका नसल्याने आपलेपणाचा जीव नसलेल्या उत्सुकतेने वसंतरावांना त्याला सामोरे जावे लागते. संबंध राहिले नसले तरी आपली म्हणत-समजत आलो ती रक्तसंबंधातली माणसंही प्रत्यक्षात किती वेगळ्या प्रतलांवर उभी होती-आहेत, या जाणीवेने त्यांचे मन व्याकूळ होते.

**मन पोखरणारा दंश**

'भूतकाळाची वर्तमानातील गुंतवणूक' हा या कादंबरीतील वेगळाच पदर आहे. स्मृतींच्या तळाशी जाते तरी प्रत्यक्षात काहीच संपत नाही. पूर्वी काही कारणाने आणि गैरसमजानेही अनेक गोष्टी, माणसंही आयुष्याच्या कक्षेतून बाहेर गेलेली असतात. इथेही मेधाच्या निमित्ताने अनेक माणसं समोर येतात, प्रसंग घडत जातात तसे समज गैरसमजांचे दीर्घकालीन धुके वितळत जाताना जाणवते, सत्याला अखेरीस त्याच्या अंगानेच (आणि तेवढेच?) उलगडू द्यावे लागते. आपण फक्त साक्षी असतो आणि परिणामान्ती शेवटी 'सगळे उलगडून तरी अखेरीस काय साधते?' या प्रश्नाचा पोखरणारा कायमचा दंश उरतो.

असंख्य व्यक्तिरेखांच्या या कथेत वसंतरावांचे आई-वडील, बहीण (मेधाचा तिकडचा, यांना अज्ञात परिवारही तिच्या एकुलत्या मुलाच्या रहस्यमय करुण मृत्यूसहीत), पत्नी, मुलगा-सुन-नातवंडे आहेत तसा नोकरीच्या ठिकाणचा अनेक वर्षांच्या सहवासातला जिव्हाळ परिवारही आहे, अगदी नवीन

राहायला आलेत तिथला रमाबाईंनी बांधलेला शेजारही आहे. प्रत्येकाची मूळ कथेशी आशयाच्या नाळेने घट्ट बांधलेली तरी स्वतंत्र उपकथा. व्यक्ती तितक्या प्रकृती, त्यामुळे जगण्याच्या, कथानकाच्या मुख्य धारेशी आशयाने जोडलेल्या पण तपशिलात वेगवेगळ्या वाटांवरून व्यापक जीवनदर्शन होते. ज्योतिष, रमलविद्या, पूजा-उपासना, सिद्धी, नवस, तांत्रिक साधना, कृषी, आयुर्वेद, पुष्पौषधी, सुगंधाचे तत्त्वज्ञान ते केवळ आपुलकीच्या सहवासाच्या उपचारापर्यंत वेगवेगळे प्रकार. शक्य होईल त्या मार्गांनी माणसं समस्यांना भिडू पाहतात. दरेकर कशालाही 'जज' करत नाहीत, केवळ सहानुभावी ताटस्थ्याने पाहतात. तसेही शेवटी अंतिम महत्त्वाचे काय? साध्य का साधन?

इतक्या प्रदीर्घ काळानंतर सुदूर 'साम्राज्य म्हणता येईल असा मोठा उद्योग' उभा केलेली मेधा काहीही थेट न कळवता गूढ भासेलशा आडमार्गाने परत येतेय, या घटिताचे पापुद्रे एकेक करत उलगडत जाण्यात या प्रत्येकाचा काही ना काही सहभाग आहे. बहिणीच्या या उद्योगाचीही मुळंही बालपणातल्या मनावर चरे पडलेल्या प्रसंगात आहेत, त्यामुळे इतक्या वर्षाच्या दुराव्यानंतर ती परत येण्याच्या निर्णयालाही अनेक पदर आहेत. मेधा तर बुद्धीनं मेधावी, उच्चशिक्षित, विलक्षण स्वाभिमानी, पण फारसं न शिकलेली माणसंही आयुष्यातले अनघड तिढे कसे सोडवतात याचा सहानुभवी माग घेत प्रसंगांना सामोरे जाण्याची, त्या त्या वेळी करतात त्या निर्णयांची पश्चात कारणमीमांसा करत मानसिकतेत काय काय दडलेले असते, हे शोधत राहतात, लेखक दरेकर, ते ही अगदी स्वीकारशील वृत्तीने.

**आस श्रेयस्कराची**

आपल्याला लाभली आहे, त्या कुवतीनुसार कुठल्याही पद्धतीने आयुष्यातल्या अनुभवांचा अर्थ लावत श्रेयस्करापर्यंत पोचू पाहणारी पात्रं, हा एकूणच दरेकरांच्या साहित्याचा महत्त्वाचा विशेष आहे. 'एक लेखक म्हणून माझं ध्येय आहे वाचकाला आयुष्याशी घट्ट बांधून ठेवणं' असं नोबेल पारितोषिक विजेता कादंबरीकार ओरहान पामुकने म्हटले आहे. हे घडायचे तर आपल्या समजुतींपलीकडे माणसाला पूर्वग्रहविरहीत सहानुभावाने समजून घेणे, त्याच वेळी आपल्या मनातल्या आयुष्यविषयक प्रश्नांची वाचकांच्या मनात 'सिम्बॉलिक ट्रान्स्फर' करणे जमावे लागते. दरेकरांची ही कादंबरीही रोलरकोस्टर राइडसारख्या अनेक पदरी कथानकात एखाद्या रहस्यकथेसारखे गुंतवून ठेवतानाच घटितांपलीकडे अनेक प्रश्न वाचकाच्या मनात खेळवत ठेवते. आयुष्यभर कसलेही संबंध न ठेवता जाणीवपूर्वक लांब राहून आपले आयुष्य विलक्षण महत्त्वाकांक्षेने घडवलेल्या मेधाला शेवटी 'बुलावा यावा' तशी आपल्या मुळांची हाक ऐकू येते. त्यात परिस्थितीनं आणलेली हतबलता, अपरिहार्यता आहे का आपल्याला इतक्या काळात आलेले भान शेवट समोर दिसू लागल्यावर रक्तसंबंधी वारशाकडे सुपूर्त करण्याची अनावर असोशी? वारसा नक्की कशाचा असतो? दृश्य स्वरूपात बहुतांश जग ज्यासाठी झगडते तसा केवळ साधनसंपत्तीचा? का पूर्वजांच्या रक्तातून वाहत येतात त्या जनुकांचा? ती टिकून राहत आपला निर्णायक प्रभाव दाखवतात, असे एके ठिकाणी येते, पण शेवटी मेधा आणि आपण सख्खे बहीण-भाऊ तरी मानसिक पातळीवर आपले प्रवाह इतके वेगवेगळ्या दिशेने कसे गेले, असाही प्रश्न वसंतरावांना पडतो. प्रत्येकजण वेगवेगळे संचित घेऊन येत असेल तर जनुकीय वारशाला तरी काय अर्थ आहे?

**समृद्ध वाचनानुभव**

रक्ताच्या नात्याने उमगे ना प्रेम, पटली पाहिजे अंतरीची खूण, असे येते एके ठिकाणी, ही 'अंतरीची खूण' म्हणजे काय नेमके, याचा अनेकांगांनी पडताळा यात आहे. दरेकर प्रत्येकवेळी केंद्राच्या अधिकाधिक जवळ जातात. मानवी आयुष्यावर परिणाम करणारा निर्णायक घटक कोणता अखेर? त्यात कर्तृत्त्वाला, कार्य-निर्णयक्षमतेला कितपत जागा असते? मोठ्या आजारांबाबतही औषधोपचारात रोग्याच्या भावनिक क्षमतेची काही भूमिका असेल का? नसेल तर एकच औषध सर्वांनाच, सारख्याच परिस्थितीत सारखे लागू का पडत नाही? असे अनेक प्रश्न दरेकर शिताफीने सगळ्या बाजू दाखवत वाचकांवर सोपवताना वाचकाकडून आपल्याइतक्याच गांभीर्याची अपेक्षा करीत, या शोधयात्रेत सामावून घेतात. या कादंबरीचा वाचनानुभव त्यामुळे गुंतवून ठेवणारा, कमालीचा समृद्ध, सृजनशील होतो आणि एकूणातच हा जगण्यातल्या विशुद्धतेचा, निकोपपणाचा परिमाणी श्रेयस्कराचा सर्जक शोध ७९ मधल्या हा उन्हाळ्यात संस्मरणीय होतो.

**नीतिन वैद्य हे सोलापूरस्थित ज्येष्ठ लेखक, संपादक आणि साहित्याचे सांभाळकर्ते आहेत. आशय परिवार या नियतकालिकातून त्यांनी मराठी साहित्यसृष्टीतल्या दिग्गजांचे दस्तावेजीकरण केले आहे.**

**संपर्क** : vaidyaneeteen@gmail.com


# आत आणि बाहेर



अनुवाद : सुमती जोशी

मूळ कथा: वनफूल

बंग नाद



लघुकथेची खुमारी काही औरच असते. त्यातही लघुकथेची मूळ भाषा बंगाली असेल, तर ती कथा बंगालच्या मातीचा आणि त्या मातीत फुलणाऱ्या मानवी नातेसंबंधांचा गंध घेऊनच अवतरते. त्यात त्या नातेसंबंधातून आलेली लय असते, नादही असतो. ही लय आणि हा नाद कधी वाचकाला धक्का देतो, कधी अंतर्मुख करतो, तर कधी बुचकाळ्यातही पाडतो. बंगाली भाषेचे सौंदर्य यात असतेच, पण त्या त्या लेखक–लेखिकेची दृष्टी वाचकांचे भानही विस्तारते. अशाच काही निवडक कथांचा हा भावानुवाद...

आपलं मन दोन भागात विभागलेलं असतं. बाह्यमन आणि अंतर्मन. बाह्यमन चांगलं, सभ्य आणि सामाजिकतेचा विचार करणारं. अंतर्मन नेहमीच सभ्य आणि सामाजिक नसतं. त्याचं वागणं बोलणं, विचारप्रणाली चमत्कारिक. बाह्यमनाची कार्यपद्धती पाहून अंतर्मन कधी हसतं, कधी रडतं आणि क्वचित उसासेही टाकतं. दोन मनांचा झगडा नित्य नैमित्तिक.

रामकिशोरबाबूंचं अंतर्मन कित्येक दिवसांपासून मृतप्राय झालं होतं. बाह्यमनाच्या अत्याचारांमुळे अंतर्मन त्रस्त होतं. रामकिशोरबाबू वकील होते. खुनी माणसाला वाचवण्यासाठी खोटी साक्ष उभी करणं, मोठ्या जमीनदारांकडून गरिबांचा सत्यानाश घडवून आणणं, खोटं इच्छापत्र तयार करून निर्णय देणं अशा प्रकारची कामं करण्यासाठी ते नेहमी बाह्यमनाची मदत घेत. सुरुवातीला अंतर्मन तीव्र विरोध करून अनेक अडथळे निर्माण करत असे. आजकाल अंतर्मन तसं काही करत नाही.

एके दिवशी सकाळी रामकिशोरबाबू त्यांच्या टक्कल पडलेल्या डोक्यावरून हात फिरवत बागेत फेऱ्या मारत होते. एका विधवेच्या संपत्तीच्या खटल्याचं त्यांच्यावर दडपण आलं होतं. आज कोर्टात त्या केसाची सुनावणी होणार होती. म्हणून ते काहीसे उद्विग्न दिसत होते.

तितक्यात एक प्रौढ सद्‌गृहस्थ तिथे आले. नमस्कार करून म्हणाले, ''मला तुमचा सल्ला हवा आहे.'' रामकिशोरबाबू त्यांना ओळखत नव्हते. साहजिकच जराही संकोच न बाळगता म्हणाले, ''कायदेशीर सल्ला हवा असला तर माझी फी द्यावी लागेल. माहितेय ना तुम्हाला?''

''होय. किती फी द्यावी लागेल?''

''बत्तीस रुपये.''

''ठीक आहे.''

दोघं बैठकीच्या खोलीत येऊन बसले.

सद्‌गृहस्थ म्हणाले, ''माझे एक नातेवाईक आहेत. त्यांच्या एकुलत्या एका मुलाचा विवाह झाल्याला दहा वर्षे उलटून गेलीयत. मूलबाळ झालं नाही. तशी शक्यताही नाही.''

''डॉक्टरना दाखवलं का?''

''होय. त्यांचंही मत, मूल होण्याची आशा नाही.''

''मुलाची प्रकृती उत्तम आहे ना?''

''होय. त्याच्या नखातही रोग नाही.''

''माझ्याकडून कसला सल्ला हवाय?'' असं विचारून रामकिशोरबाबूंनी चिमूटभर तपकीर नाकापाशी नेऊन हुंगली.



*सर्व रेखाचित्रे : सागर शिंदे (७०३०९९००८१)*

## आत आणि बाहेर भाग – २

''मला विचारायचंय, जर वंशाचा लोप झाला तर शेवटी संपत्ती कोणाला मिळेल?''

रामकिशोरबाबू म्हणाले, ''मुलगा धडधाकट असला तर त्यानं पुन्हा लग्न करावं. हिंदू कायद्यानुसार असा विवाह करायला परवानगी असते.''

''तसं नाही. कायद्याची अडकाठी नसली, तरी नेहमी तसं वागता येईल का?''

रामकिशोरबाबू हसून म्हणाले, ''सेंटिमेंट बघत बसलो तर जगता येईल का? असल्या निरर्थक सेंटिमेंटसना चिकटून राहिल्यामुळे आपलं नुकसान होतं.''

रामकिशोरबाबूंनी या विषयावर एक प्रदीर्घ बौद्धिक घेतलं. बाह्यमन त्यांच्या निर्णयात सहभागी झालं. अंतर्मन मूक झालं.

पाहुण्यांनी विचारलं, ''समजा, त्या मुलाने पुन्हा लग्न केलं नाही, तर संपत्ती कोणाला मिळेल?''

''कायद्यानुसार जे जे उत्तराधिकारी असतील त्यांना.'' रामकिशोरबाबू घडाघडा बोलून गेले.

तरीही त्यांचं स्वत:चं मत पुन्हा एकदा ठासून सांगायला ते विसरले नाहीत – ''अहो महाशय, मुलाचं पुन्हा लग्न करून द्या. वांझ बायकोच्या संसारात सुख लागेल का कधी? मुलंबाळं नसली तर संसार स्मशानासारखा होतो. मला जे योग्य

वाटतंय ते मी तुम्हाला सांगतोय. आपल्या भावना दुखावल्या गेल्या असतील तर मला माफ करा.''

पाहुणे म्हणाले, ''नाही, नाही. अजिबात नाही. आपण सत्यवक्ते आहात. शिवाय अशिलाचं हित पाहणारे आहात, असं ऐकलंय; म्हणून तर आपल्याकडे आलो.'' फीचे बत्तीस रुपये देऊन त्यांनी निरोप घेतला. चार-पाच दिवसांनी एक गाडी रामकिशोरबाबूंच्या घरासमोर उभी राहिली. गाडीतून एक अल्पवयीन तरुणी खाली उतरली आणि घरात निघून गेली.

रामकिशोरबाबू विधूर होते. दुपारच्या वेळी घरात फारसं कोणी नसे. फक्त एक नोकर असे. रामकिशोरबाबू कोर्टात गेले होते. गाडीतून सगळं सामान उतरवून त्या नोकरानं घरात नेऊन ठेवलं. ट्रंकेवर नाव लिहिलं होतं, 'सरोजिनी देवी'.

वागण्यावरून अंदाज करता आला, नोकरानं तिला ओळखलं नव्हतं. तरुणीचं वागणं पाहून तो चकित झाला.

सरोजिनीनं नोकराला विचारलं, ''बाबू कुठे गेलेयत?''

''कचेरीत.''

''कधी येतील?''

''माहीत नाही.''

ती व्हरांड्यात आपल्या पेटीवर बसून राहिली. विषादाचं दुसरं रूप.

रामकिशोरबाबू कोर्टातून परतले. तिला पाहून अवाक् होत म्हणाले, ''हे काय सरी? काही न कळवता तू अचानक कशी आलीस?

''त्या घरी राहणं आता शक्य नव्हतं.''

''का? झालं काय?''

रामकिशोरबाबू आपल्या मुलीच्या बोलण्यामुळे आणखीच चकित झाले.

''शक्य नाही, म्हणजे?''

''ते मुलाचा पुन्हा विवाह करून देतायत. तुम्हीच तसा सल्ला दिलायत ना?''

''मी सल्ला दिलाय - म्हणजे?''

''त्यांनी एका अनोळखी माणसाला तुमच्याकडे पाठवलं होतं. त्याने तुमचं मत विचारलं होतं. तुम्ही म्हणालात- मुलाचा पुन्हा विवाह करून द्या.''

रामकिशोरबाबूंच्या नेपथ्यवासी अंतर्मनाने बह्मनाची शेंडी खेचली होती.

हताश झालेले रामकिशोर त्यांच्या एकमेव कन्येकडे असहाय नजरेने बघत राहिले.

सरोजिनीनं विचारलं, ''खरंच तुम्ही असं सांगितलंत का?''

**वनफूल या विसाव्या शतकातल्या बंगाली लेखकाने लिहिलेल्या कथेचा मराठी भावानुवाद. अनुवादिका सुमती जोशी या राज्य पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ लेखिका, अनुवादिका आहेत. त्यांची उत्क्रांती, बंगरंग, दैत्याचा बगीचा, मंत्र आदी स्वतंत्र तसेच अनुवादित पुस्तके प्रकाशित झाली आहेत.**

**ईमेल** : sumatijoshi154@gmail.com

## आ वा ह न

सप्रेम नमस्कार,

तुमच्या पाठबळाच्या जोरावर '**समतावादी मुक्त-संवाद पत्रिके**'ने (पूर्वाश्रमीचे 'मुक्त-संवाद') साडेतीन वर्षांचा टप्पा गाठला आहे. पुढची वाटचाल अशीच सुकर होण्यासाठी आपल्या मदतनिधीची आम्हाला आशा आहे. मदतनिधी जमा करण्यासाठी बँक खात्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

**खातेदार संस्थेचे नाव :** SAMATAWADI MUKTSANVAD PATRIKA

**बँक, शाखा :** SARASWAT BANK, MAHIM

**खाते क्रमांक :** 610000000035417

**आयएफएससी क्रमांक :** SRCB0000007

**'समतावादी मुक्त-संवाद पत्रिके'चा अंक मर्यादित संख्येने छापील आणि पीडीएफ अशा दोन प्रकाराने प्रकाशित होतो. हा अंक वाचकांसाठी विनामूल्य असून, अंकाच्या पीडीएफसाठी पुढील क्रमांकावर संपर्क साधावा अथवा व्हॉट्सॲपद्वारे संदेश पाठवावा. संपर्क : ९६१९८२३६७२/८५५१८५०४६२**

# आयुर्वेद - विज्ञान की छद्मविज्ञान



डॉ. श्रीराम सावरीकर

आयु:रंग



आयुर्वेद हे हजारो वर्षापूर्वीपासून प्रचलित भारतीय वैद्यकशास्त्र आहे. हे केवळ वैद्यकशास्त्र नसून ती एक जीवनशैली आहे असे म्हटले जाते. पण ही जीवनशैली आजच्या शहरी जीवनात उपयोगी आहे काय किंवा तिचे पालन करता येईल काय असा प्रश्न आपल्या सर्वांच्या मनांत निर्माण होत असतो. सकृतद्दर्शनी हा प्रश्न गैरलागू नाही. कारण आयुर्वेद प्राचीन शास्त्र असल्यामुळे त्यात वर्णित जीवनशैली त्याच प्राचीन समाज जीवनासाठी समयोचित असेल, आजचे समाज जीवन पूर्णत: बदललेले आहे. विद्युत उर्जेने आज रात्रीचा दिवस झाल्यामुळे आजचे दिवस रात्रीचे वेळापत्रकच पूर्णपणे बदलले आहे. अशा बदललेल्या वेळापत्रकाच्या गणितात समाज मनातील आयुर्वेद जीवनशैली बसण्यासारखी नाही म्हणून ती आचरणयोग्य नाही, असे वाटणे साहजिकच आहे. परंतु वास्तवात आयुर्वेदाच्या जीवनशैलीमधील दिनचर्येचे वेळापत्रक कालानुरूप स्वरूप धारण करू शकणारे आहे. पण त्यासाठी या जीवनशैलीतील निरोगी आयुष्याचे सूत्र समजणे आवश्यक आहे. हेच सूत्र समजवण्याचा प्रयत्न या लेखमालेतून करण्यात येणार आहे...

विकीपिडियावर आयुर्वेदाची छद्मविज्ञान (स्युडोसायन्स) अशी नकारात्मक ओळख करून दिलेली आढळते. विकीपिडियावरील माहितीला वैज्ञानिकांमध्ये विश्वासार्ह मानले जात नसले, तरी जगभरांतील बुद्धिमंतांच्या जगात विकीपिडिया हे कोणत्याही विषयासंबंधीचे ज्ञान त्वरित व सहजपणे मिळवण्याचे लोकप्रिय साधन आहे. आयुर्वेदाची ही नकारात्मक ओळख पुसून टाकायची असेल तर त्यासाठी एक विज्ञानाधिष्ठित वैद्यकशास्त्र म्हणून वैज्ञानिक जगतामध्ये आणि जनमानसामध्ये आयुर्वेदाची प्रतिष्ठापना करणे अत्यावश्यक झाले आहे. त्यासाठी आयुर्वेद तज्ज्ञांनी एका बाजूला त्यांच्या संशोधनातून मिळालेले तथ्याधारित निष्कर्ष संशोधन पत्रांच्या माध्यमातून आणि संशोधन परिषदांमधून वैज्ञानिक जगासमोर सादर करणे, दुसरीकडे लोकप्रिय दैनिके, नियतकालिके, प्रासंगिक प्रसिद्धी पत्रे आणि छोट्या मोठ्या सभा संमेलनातून व आपल्या दैनंदिन व्यवहारातून सामान्यांच्या मनातील आयुर्वेदासंबंधीचे गैरसमज दूर करणे आवश्यक आहे. हे दोन्ही उपक्रम सातत्याने करावे लागणार आहेत. तरच दीर्घकालाने का होईना, त्याचा योग्य परिणाम होण्याची शक्यता आहे. याचाच एक भाग म्हणून हा लेखन प्रपंच.

जागतिक आरोग्य संघटना देशोदेशींच्या विविध स्थानिक चिकित्सा पद्धतीप्रमाणेच आयुर्वेदालाही भारतीय उपखंडात प्रचलित असलेली एक पारंपरिक चिकित्सा पद्धती समजते. संबंधित देशातील संस्कृति, सिद्धान्त, स्थानिक समजुती आणि अनुभव यावर आधारित ज्ञान, कौशल्य व प्रचलित समजुती यांची गोळाबेरीज म्हणजे, त्या देशाची पारंपरिक चिकित्सा पद्धती अशी पारंपरिक चिकित्सा पद्धतीची व्याख्या जागतिक आरोग्य संघटना करते. जगातील बहुसंख्य देशामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या प्राचीन चिकित्सा पद्धती प्रचलित होत्या. वास्तविक त्यांना चिकित्सा पद्धती म्हणण्यापेक्षा घरगुती उपचार पद्धती (हीलिंग प्रॅक्टिसेस) असे संबोधणे सयुक्तिक ठरेल. आयुर्वेद, चायनीज मेडिसिन आणि युनानी मेडिसिन असे काही अपवाद वगळता अन्य देशातील प्राचीन चिकित्सा पद्धतींना वैज्ञानिक बैठक नाही.

**ग्रंथबद्ध व सूत्रबद्ध**

जागतिक आरोग्य संघटनेने पाश्चात्यांच्या प्रभावाखाली पारंपरिक चिकित्सा पद्धतीच्या व्याख्येमध्ये समजुती व प्रचलित उपचार यांचा समावेश करून कोणताही वैज्ञानिक आधार नसलेल्या देशोदेशींच्या सर्व प्राचीन घरगुती उपचार पद्धतींना आयुर्वेदासारख्या वैज्ञानिक चिकित्सा पद्धतींच्या समकक्ष प्रस्थापित केले आहे. परिणामी वैज्ञानिक पार्श्वभूमी व आधारांना दुर्लक्षित करून देशोदेशींच्या घरगुती उपचार पद्धती प्रमाणेच आयुर्वेदालाही जागतिक आरोग्य संघटना भारतातील स्थानिक समजुती व चालीरीति यावर आधारित एक घरगुती उपचार पद्धती समजते. वास्तविक आयुर्वेद ही एक ग्रंथबद्ध व सूत्रबद्ध वैज्ञानिक वैद्यकीय चिकित्सा पद्धती आहे. म्हणूनच जागतिक आरोग्य संघटनेने पारंपरिक चिकित्सा पद्धतींच्या गटामध्ये आयर्वेदाच्या केलेल्या समावेशाचा भारताने विरोध करणे आवश्यक होते. हा समावेश भारताने स्वीकारल्यामुळे आयुर्वेद हे वैद्यकशास्त्र न राहता कायमस्वरूपी घरगुती उपचार पद्धती बनून राहिली आहे. आयुर्वेद प्राचीन भारतातातील एक लोकमान्य आणि राजमान्य अधिकृत वैद्यकशास्त्र होते. त्यातील अनेक पारिभाषिक शब्द सामान्य जनतेच्या व्यवहारात प्रचलित होते. आयुर्वेदाच्या मूळ संहिता ग्रंथामधील कोणतेही सिद्धान्त, वैद्यकीय उपाय योजना, औषधी वा औषधविरहित उपाय योजना समजुती व प्रचलन यावर आधारलेल्या नाहीत. प्रत्येकाला प्रत्यक्ष प्रयोगाचा आधार आहे. जे डोळ्यांनी पाहता येणे शक्य झाले नाही, तेथे तर्काने ती गोष्ट स्पष्ट करण्यात आली आहे. अर्थात हा तर्कही जे दिसू शकले, त्यावर आधारित आहे. 'एतावद् दृश्यं शक्यमपि निर्देष्टुम्। अनिर्देश्यमतः परं तर्क्यमेव च।' जे जे दिसणे शक्य आहे त्याचाच स्पष्ट निर्देश केला आहे. ज्याचा निर्देश केला नाही ते तर्काने जाणून घ्यावे, असे चरक संहितेत चरकाचार्य म्हणतात. पुढे चालून शवविच्छेदनप्रसंगी त्वचेपर्यंत शरीराचे भाग जसे दिसू शकले, तसे त्यांचे वर्णन केले आहे. जे दिसले नाहीत त्यांचे वर्णन तर्कज्ञानाने जाणले असे स्पष्टपणे नमूद केले आहे. जे प्रत्यक्ष दिसते ते आणि जे शास्त्राभ्यासाने प्राप्त होते, ते असे दोन्ही प्रकारचे ज्ञान ज्ञानविवर्धक असते असेही नमूद करून प्रत्यक्ष प्रयोगांचे महत्व अधोरेखित केले आहे.

**विज्ञानाधिष्ठित आयुर्वेदावर झाकोळ**

भौतिकशास्त्र आणि रसायन शास्त्रातील अत्यंत पुढारलेल्या तंत्रज्ञानाने आज प्राणी शरीरातील सूक्ष्मातिसूक्ष्म भागांचा प्रत्यक्ष आणि सखोल अभ्यास शक्य झाला आहे. या अभ्यासाने प्राप्त ज्ञानामुळे आयुर्वेदातील तर्काधारित काही विधाने आज चुकीचेही ठरत असतील. तसेच आधुनिक संशोधनाने शरीरातील काही क्रिया आज अत्यंत विस्ताराने स्पष्ट झाल्या

असतील, पण चुकीच्या ठरणाऱ्या काही विधानावरून व विस्ताराने समजलेल्या शरीर क्रियांवरून संपूर्ण आयुर्वेद अवैज्ञानिक ठरत नाही. तसेच आयुर्वेदोक्त शरीर क्रिया व सिद्धान्त संक्षिप्त वा गृहीतकांवर आधारित असल्यामुळे निरूपयोगी ठरत नाहीत. उलट आज उपलब्ध ज्ञानाचा यथोचित उपयोग केल्यास त्यांची उपयोजितता अधिक सुस्पष्ट होण्यास मदत होत असल्याचे आढळून येत आहे.

येथे उदाहरण म्हणून आयुर्वेदातील त्रिदोष सिद्धान्तांचा ऊहापोह करू या. दोष, धातु, मल व अग्नि या चार शरीर घटकांच्या आधारे शरीरातील विविध रचना व क्रियांचे आयुर्वेदामध्ये स्पष्टीकरण केले जाते. दोष हे विविध शरीरक्रियांचे नियमन करणारे, धातु शरीराची रचना एकत्र सांधून ठेवणारे, मल शरीरातील विविध क्रियातून निर्माण होणारे निर्गमनशील मलस्वरूप घटक आणि अग्नि शरीरातील पचन व चयापचयादि परिवर्तन घडवणारा घटक होय. या चारही घटकांचे भारतातील प्राचीन धर्मग्रंथ, पुराणे, ललित साहित्य, ग्रामीण साहित्य अशा वैद्यकशास्त्रेतर साहित्यामध्ये ढोबळ उल्लेख विपुल प्रमाणात आढळून येतात. इतकेच नव्हे तर भारतीय समाजात दैनंदिन व्यवहारांत हे पारिभाषिक शब्द आजही प्रचलित असल्याचे आढळून येते. आयुर्वेद ही तत्कालीन समाजव्यवस्थेतील प्रचलित चिकित्सा पद्धती असल्यामुळे असे घडणे स्वाभविकच होते. वैज्ञानिक पारिभाषिक संज्ञा जेव्हा सामान्य जनतेमध्ये रूढ होत असतात तेव्हा संदर्भ बदलल्यामुळे सामान्य लोकांमध्ये त्यांचे मूळ अर्थही बदलून जात असतात. जोपर्यंत हे शास्त्र समाजात अधिकृतरित्या प्रचलित राहते, तोपर्यंत या संज्ञा त्यांच्या संदर्भासह व मूळ अर्थासह संबंधित शास्त्राच्या अभ्यासकांमध्ये टिकून राहतात. परंतु संबंधित शास्त्राचा व्यवहारातील उपयोग जसा जसा कमी होत जातो, तसे त्याचे अभ्यासक कमी होत जातात आणि परिणामी त्यातील पारिभाषिक संज्ञांचे संदर्भ व मूळ अर्थ लयाला जाऊ लागतात. नंतर उरतात ते फक्त समाजातील त्यांचे बदललेले संदर्भ आणि काही वेळा विपरीत झालेले अर्थ.

**वैज्ञानिक अर्थांची वानवा**

आयुर्वेदातील वैज्ञानिक पारिभाषिक संज्ञांचेही नेमके असेच झाले आहे. ब्रिटिशांच्या भारतातील आगमनाबरोबर आयुर्वेदाची जागा पाश्चात्यांच्या आधुनिक वैद्यकशास्त्राने घेतली आणि वैज्ञानिक आयुर्वेदाचे अभ्यासक कमी कमी होत जवळजवळ नष्टप्राय झाले असे म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही. आज प्रचंड संख्येने दिसणारे जे आयुर्वेदाचे पदवीधारक व्यवासायिक आपण पाहत आहोत, ते बहुसंख्येने आयुर्वेदाचा मुखवटा लावून पाश्चात्य वैद्यकाचा व्यवसाय करणारे लोक आहेत. त्यांना आयुर्वेद अभ्यासक म्हणणे म्हणजे स्वतःची फसगत करून घेणे होय. त्यामुळेच आज मूळ आयुर्वेद केवळ ग्रंथात उरला आहे. व्यवहारात आज दिसून येतो तो मूळ आयुर्वेद ज्ञानाशी आणि विज्ञानाशी फारकत झालेला समाजात रूढ झालेला आयुर्वेद.

हा आयुर्वेद एकीकडे आजीबाईच्या बटव्यात, परसातील बागेत, अंगणातल्या तुळशी वृंदावनात आणि स्वयंपाक घरातील मसाल्याच्या डब्यात बंदिस्त झाला आहे. तर दुसरीकडे पाश्चात्य वैद्यकाच्या औषधी मिश्रणाने दूषित होऊन स्वतःची ओळख विसरलेला आयुर्वेद बनला आहे. आता तो दैनंदिन वापरातील केश तेल, साबण, दंत मंजने, सौंदर्य प्रसाधने आणि आता पूरक आहार यांच्या वेष्टनातून तथाकथित आयुर्वेदिक औषधी उद्योगाने बाजारांत आणला आहे. हा आयुर्वेद जागतिक आरोग्य संघटनेच्या पारंपारिक चिकित्सा पद्धतीच्या व्याख्येत बसणारा आहे. हा आयुर्वेद छद्मविज्ञान आहे. या छद्मविज्ञानामागे मूळ विज्ञानाधिष्ठित आयुर्वेद झाकला गेला आहे. आजच्या आयुर्वेदाच्या अभ्यासकांनी, व्यावसायिकांनी तो विज्ञाननिष्ठ आयुर्वेद समाजासमोर आणण्यासाठी प्रयत्नशील असायला हवे. त्यासाठी पहिले पाऊल म्हणून समाजात प्रचलित आयुर्वेदिक पारिभाषिक संज्ञांचे वैज्ञानिक अर्थ समाजात रूढ करायला हवेत.

या संदर्भात वात, पित्त आणि कफ या तीन दोषांचे उदाहरण घेऊ या. दोष हा शब्द विकृति या अर्थाने जनमानसात परिचित आहे. आयुर्वेदामध्ये हा पारिभाषिक शब्द स्वतः विकृति प्रवण व विकृति निर्माणक्षम शरीर घटक अशा अर्थाने आहे. शरीरातील विविध क्रिया आयुर्वेदाने १. संवाहन वा चालन २. पचन वा परिवर्तन आणि ३. संश्लेषण आणि स्थिरीकरण या तीन बृहत् क्रियागटामध्ये वर्गीकृत केल्या आहेत. या तीन प्रकारच्या क्रिया पार पाडण्यासाठी तत्संबंधी विशिष्ट गुणधर्म बाळगणाऱ्या शरीर घटकांना अनुक्रमे वात, पित्त व कफ असे संबोधण्यात आले आहे याच तीन घटकांना त्रिदोष असे संबोधले जाते. विकृत नसताना म्हणजे निरोगी अवस्थेत हे तीन दोष शरीरातील सर्व क्रियांचे सूत्र

संचालन व नियमन करीत असतात. पण त्याच वेळी ते अत्यंत विकृतिप्रवणही असतात. विकृत अवस्थेत ते शरीरात रोग निर्माण करण्याची क्षमता बाळगत असतात. म्हणूनच त्यांना निरोगी अवस्थेत ठेवणे हे रोगप्रतिबंधनाचे तर रोगग्रस्तामध्ये रोगमुक्तीसाठी विकृत झालेल्या दोषांना प्राकृत अवस्थेत पुनर्स्थापित करणे हेच चिकित्सकाचे उद्दिष्ट असते. वात, पित्त व कफ हे तीन दोष शरीरामध्ये वेगवेगळ्या स्वरूपांत कार्यरत असतात. सामान्यतः ते एकत्रितपणे राहत असतात. प्रत्यक्षात त्यांना परस्परांपासून वेगवेगळे करता येत नाही. त्यामुळे शरीरातील अमुक एक विशिष्ट घटक द्रव्य म्हणजे अमुक एक दोष असे नेमके दाखवता येत नाही. परंतु असे असले म्हणून शरीरातील त्यांचे अस्तित्व नाकारता जाऊ शकत नाही. त्यांच्या भौतिक गुणकर्मावरून त्यांचे अस्तित्व दृश्यमान होत असते. तर त्यांचे कमी, अधिक वा सम प्रमाण त्यांची निरोगी वा विकृत स्थिती दर्शवत असते. दोषांचे हे सर्व गुणकर्म वैज्ञानिक दृष्ट्या प्रत्यक्ष परीक्षणयोग्य आहेत. योग्य साधन वापल्यास ते मापनयोग्यही होऊ शकतात. ते कल्पित किंवा छद्मविज्ञानाधारित नाहीत.


दोषानंतर क्रम येतो, तो शरीरातील धातुंचा. धातु हा शब्द जनमानसात इंग्रजीतील मेटल शब्दासाठी वापरला जातो. मेटल्स सामान्यतः एखाद्या वस्तूमध्ये काठिण्य निर्माण करून त्या वस्तूला विशिष्ट रचनेमध्ये स्थिर करण्यासाठी उपयोगी असतात. शरीरातील धातुंचेही नेमके हेच कार्य असते. शरीर घटकांना विशिष्ट रचनेमध्ये स्थिर ठेवण्याचे किंवा त्यांची विशिष्ट रचना बांधून ठेवण्याचे कार्य ते करीत असतात. थोडक्यात, दोष शरीरातील क्रियांचे नियमन करतात, तर धातु शरीर घटकांना स्थिर ठेवण्याचे कार्य करतात. ढोबळ मानाने आयुर्वेदात उल्लेखित शरीर धातु हे आधुनिक वैद्यक शास्त्रातील उतींशी– टिश्यूंशी समतुल्य आहेत. आयुर्वेदाने रस, रक्त, मांस, मेद, अस्थि, मज्जा व शुक्र असे एकूण सात धातु वर्णिले आहेत. शरीरात निर्माण होणाऱ्या, स्रवणाऱ्या पोषक मूल्य असणाऱ्या सर्व द्रवांचा समावेश रस धातुमध्ये होतो. शरीराला जीवित ठेवणारा शरीर घटकांतील जीव टिकवणारा धातु म्हणजे रक्त धातु होय. मांस धातु हा ढोबळ मानाने मांसपेशींशी तर मेद धातु शरीरातील चरबीशी संबंधित आहेत. अस्थि धातु शरीरातील हाडे आणि मज्जा धातु शरीरातील मज्जा संस्थेचे घटक आहेत. सातवा शुक्र घातु हा गर्भधारणेत सहभागी होणाऱ्या पुंबीजाशी संबंधित आहे. हे सातही धातु प्रत्यक्ष परीक्षण योग्य आहेत. त्यात अवैज्ञानिक अथवा छद्मवैज्ञानिक असे काही नाही.

तिसरा शरीर घटक गट म्हणजे, मलांचा गट होय. मल, मूत्र, स्वेद आणि कान, नाक इत्यादी अवयवांत साठणारा मल यांचा या गटांत समावेश होतो. हेही सर्व प्रत्यक्ष परीक्षणयोग्य आहेत. यातही कांही छद्मविज्ञान नाही.

कोणत्याही वस्तूचे, क्रियेचे, घटनेचे वर्णन संबंधितांच्या उपयोजिततेनुसार केले जात असते. त्या उपयोजिततेचा संदर्भ लक्षात घेऊनच संबंधित वर्णनाचे मूल्यमापन केले जाऊ शकते. अगदी साधे उदाहरण घ्यायचे, तर खाद्य पदार्थाचे वर्गीकरण एखादा आहार तज्ज्ञ पोषणाचा विचार करता कार्बोहायड्रेट, प्रोटिन्स, फॅट्स, व्हिटॅमिन्स असे करतो. तर सामान्य माणूस तृणधान्ये, कडधान्ये, फळे, भाज्या असे त्यांच्या स्वरूपावरून वर्गीकरण करतो. कारण दोघांच्याही गरजा वेगळ्या, संदर्भ वेगळे असतात. अशा परिस्थितीत एखादा आहार तज्ज्ञ सामान्य माणसाने केलेले खाद्य पदार्थांचे वर्गीकरण अवैज्ञानिक किंवा छद्मवैज्ञानिक असे म्हणू लागला, तर ते त्याचे अज्ञान आहे. याच रीतीने आयुर्वेदाने केलेले शरीरातील घटकांचे, क्रियांचे वर्णन वैद्याला रूग्ण चिकित्सा योजना करण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल असे आहे. या संदर्भाकडे दुर्लक्ष करून संपूर्ण आयुर्वेदाला अवैज्ञानिक किंवा छद्मविज्ञान म्हणणे, हे संबंधिताच्या अज्ञानाचे प्रदर्शक आहे.

स्वतःला उच्चशिक्षित वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगणारे समजणाऱ्या लोकांमध्ये आयुर्वेदाबद्दल अनेक प्रकारचे गैरसमज प्रचलित आहेत. या प्रत्येक गैरसमजाचे क्रमाक्रमाने निराकरण करण्याचा प्रयत्न 'आयुःरंग शहरी जीवन आणि आयुर्वेद' या लेखमालेतून आपण करणार आहोत. यातील लेख सामान्य लोकांसाठी असल्याने यात वैज्ञानिकांना अपेक्षित असलेले प्रत्यक्ष प्रयोगाचे पुरावे नाहीत. कारण त्यांची ही जागा नाही. यात वैज्ञानिक पारिभाषिक शब्दांचा वापरही टाळण्यात येत आहे. या लेखमालेतून आयुर्वेद हे एक विज्ञानाधिष्ठित शास्त्र असल्याचे स्पष्ट होईल, अशी अपेक्षा आहे.

**डॉ. श्रीराम सावरीकर हे एम. डी. (आयु), पीएच. डी. असून, पोदार मेडिकल कॉलेज (आयु) येथील माजी प्राध्यापक आहेत.**




पृष्ठे 216 + 8 किंमत : 300 रुपये
सवलतीत 250 रुपये (ट.ख. वेगळा)

# साधना प्रकाशनाचे नवे पुस्तक

## शशिकांत अहंकारी

# दृष्टी आरोग्यक्रांतीची

## अतुल देऊळगावकर

ग्रामीण भागातील एक विद्यार्थी, वैद्यकीय शिक्षण घेत असतानाच ग्रामीण आरोग्याचा स्तर उंचावण्यासाठी काय करता येईल, यावर सक्रिय होतो. त्या दृष्टीने विविध उपक्रम आखतो. त्यातूनच पुढे भारतवैद्य, हॅलो मेडिकल फाऊंडेशन, महिला बचतगट योजना, एकल महिलांचे सक्षमीकरण असे उपक्रम साकारतात. त्या स्थानिक भारतवैद्य उपक्रमातूनच पुढे राष्ट्रीय पातळीवर आशा साकारते. व्यवस्थेसाठी माणूस नाही, तर माणसासाठी व्यवस्था हे ब्रीद कठोरपणे पाळत समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी डॉ.शशिकांत अहंकारी आजन्म प्रयत्नशील राहिले. ग्रामीण आरोग्यात सुधारणा घडवण्यासाठी नवी दृष्टी देणारा त्यांचा जीवनप्रवास हृद्य तर आहेच, पण अनुकरणीयही आहे.

**वीणा गवाणकर**

### अनुक्रम

ज्वाला आणि फुले
मुक्काम पोष्ट वडू बुद्रुक
'हॅलो'जन
...तो सूर बने हमारा
गावाच्या नाडीवर बोट
सांगते ऐका!
प्रकृती : मातीची आणि शेतीची
सावटातून वाट
साथी

संपर्क **साधना प्रकाशन**
४३१ शनिवार पेठ, पुणे ३०
Ph. 020 24459635 / Mob. 7058286753
sadhana.prakashan@gmail.com

शेजारील QR कोड स्कॅन करून रक्कम ट्रान्सफर करून, साधना प्रकाशनाची पुस्तके मागवता येतील.

sadhanaprakashan.in या वेबसाईटला भेट द्या.

also available at amazon.in

Samatawadi MuktSanvad Patrika
Monthly Magazine- Publishing date- 1st of every month
RNI Regd No. MAHMAR/2023/86554

